

अनुक्रमणिका

मराठी भाषा : वाढ आणि बिघाड

श्री. के. क्षीरसागर

संकलन
शकुंतला क्षीरसागर

राज्य मराठी विकास संस्था

अनुक्रमणिका

मराठी भाषा : वाढ आणि बिघाड / श्री. के. क्षीरसागर
संपादन : शकुंतला क्षीरसागर
Marathi Bhasha : Vadha Ani Bighad / S. K. Kshirsagar
Editor : Shakuntala Kshirsagar

© राज्य मराठी विकास संस्था
पहिली आवृत्ती : २७ फेब्रुवारी २०००
पुनर्मुद्रण : १ मार्च २०१२

किंमत : रु.२२५

ISBN 81-87889-38-1

प्रकाशक
प्रशासकीय अधिकारी
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३ महानगरपालिका मार्ग इमारत
मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : ०२२-२२६५३९६६/
०२२-२२६३१३२५
Email : rmvs_mumbai@yahoo.com
website : http://rmvs.maharashtra.gov.in

मुद्रक
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटींग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड,
प्रभादेवी
मुंबई – ४०० ०२५

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

१. भाषेवर होणारे अंतर्गत आक्रमण २१
२. खरी भाषाशुद्धी आणि तिचे खरे वैरी ३७
३. खरी भाषा शुद्धी : माझ्या भूमिकेचा पुनरुच्चार ५४
४. सोवळेपणाची चळवळ ५८
५. भाषाशुद्धीची अनौरस संतती ६१
६. भाषाशुद्धी प्रवर्तक सावरकर : एक विलक्षण चमत्कार ६९
७. मराठी भाषेचे सरकारी शिल्पकार ७७
८. हरवले आहे मराठीचे मराठीपण ८१
९. मराठी माध्यमाला मुहूर्त ८५
१०. विद्यापीठे काय करू शकतील ८९
११. “हिच्या एक ताटात आम्ही बसू” ९२
१२. महाराष्ट्रीय समारंभातील मराठीचे स्थान ९४
१३. मराठी भाषा आणि वृत्तपत्रे ९६
१४. आजची मराठी भाषा : वाढ आणि बिघाड १००
१५. स्वतंत्र हिंदुस्थानची भाषा आणि लिपी १०२
१६. बालबोध लिपीवर गंडांतर १०५
१७. मराठी शुद्धलेखनाचे गुऱ्हाळ १०७
१८. आंतरभारतीचा उपक्रम १०९
१९. आंतरभारतीने आंतरिक क्रांती घडावी ११३
२०. संस्कृत विरुद्ध मराठी ११६
२१. ....म्हणजे रामाशिवाय रामायण १२०
२२. हिंदीचे भवितव्य १२३
२३. हिंदीचा उपयोग आणि दुरुपयोग १२६
२४. शिक्षणात हिंदीचे स्थान कोणते? १२८
२५. मराठीने केला कानडी भ्रतार १३०
२६. फारसीच्या अभ्यासाची गरज १३३
२७. हिंदुस्थानातील इंग्रजी भाषेचे भवितव्य १३५
२८. भाषांची लढाई आणि नवी विद्यापीठे १३९
२९. इंग्रजीवाचून अडणारे स्वराज्य १४३

३०. इंग्रजीचे ज्ञान आणि स्थान १४५
३१. ‘अंग्रेजी हटाव’ संबंधी अतिरेकी गैरसमज १४७
३२. अद्याप उरलेले इंग्रजी राज्य १४९
३३. भाषाविकास परिषदेचे धावते संस्कार चित्रण १५२
३४. भाषा- विकासाची समस्या १५६

निवेदन

भाषाविषयक विविध प्रश्नांच्या संदर्भात जिज्ञासू वाचकांची जाण अनेक अंगांनी वाढविणे हे राज्य मराठी विकास संस्थेला आपले एक महत्त्वाचे कार्य वाटते. ते उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून आम्ही पाच पुस्तके या वर्षी प्रकाशित करीत आहोत. डॉ. मिलिंद मालशे आणि डॉ. गीता भागवत यांच्या आम्ही यापूर्वी पुरस्कृत वा प्रकाशित केलेल्या दोन पुस्तकांना ('आधुनिक भाषाविज्ञान' आणि 'प्रशासनिक मराठी भाषेचा विकास') वाचकांनी उत्तम रितीने दाद दिली आहे. जाणकारांनी पारितोषिके देऊन त्यांचा सन्मान केलेला आहे.

नव्याने प्रकाशित होत असलेल्या पाच पुस्तकांपैकी कालदृष्ट्या पहिले पुस्तक आहे कै. प्रा. वासुदेव बळवंत पटवर्धन यांचे- 'शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम.' मुंबईच्या हेमंत व्याख्यानमालेत त्यांनी या विषयावर दिलेली व्याख्याने पुस्तकरूपाने १९०६ साली प्रकाशित झालेली होती. परंतु दुर्दैवाने आज त्या पुस्तकाच्या प्रती उपलब्ध नाहीत. अभ्यासक्रमात मराठी कशासाठी शिकवायचे या प्रश्नाचे उत्तर जसे या व्याख्यानांत पटवर्धनांनी दिले आहे तसेच सर्व शिक्षणक्रमात, सर्व स्तरांवर मराठीचे स्थान आणि स्वरूप कसे असावे याचे विवरण केले आहे. हे करताना त्यावेळी त्यांच्या डोळ्यांसमोर जर्मनीतील भाषाशिक्षणाचा जो आदर्श होता, त्याच्याशी आपल्याकडील भाषाशिक्षणाच्या वस्तुस्थितीची तुलना केली आहे. शालेय शिक्षणाशी विविध अंगांनी संबंधित असलेले आणि स्वतंत्रपणे लिहिले गेलेले अर्वाचीन मराठी वाङ्मयामधील हे पहिले मराठी पुस्तक आहे. हे पुस्तक प्रकाशित करताना त्याला अद्याप वर्तमानकाळातील शैक्षणिक परिस्थितीच्या संदर्भातही अर्थपूर्णता कशी आहे हे लक्षात यावे या दृष्टीने आम्ही अभ्यासपूर्ण प्रस्तावना व तळटिपांची जोड दिली आहे. आमच्या विनंतीवरून प्रा. रमेश पानसे यांनी हे अत्यावश्यक काम आनंदाने केले. गेली पंधरा वर्षे एक अभ्यासक-कार्यकर्ता या नात्याने प्रा. पानसे यांचा पूर्वप्राथमिक, प्राथमिक आणि ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणाशी विशेष जवळून संबंध आलेला आहे.

प्रा. वा. ब. पटवर्धन यांचा परिचय त्यांनी प्रगट केलेल्या विचारांवरून वाचकांना होईलच. पण आवर्जून आणखी दोन-चार गोष्टींचा उल्लेख इथे करावयास हवा. पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात पटवर्धन हे इंग्रजीचे अतिशय नाणावलेले असे प्राध्यापक होते. शेक्सपिअरची नाटके आणि शेली, किटस् बायरन आदी रोमँटिक कवींची कविता उत्तम रितीने शिकविण्याबद्दल त्यांची महाविद्यालयात विशेष ख्याती होती. त्याचबरोबर मराठीतील प्राचीन संतकवितेपासून त्यांना समकालीन असणाऱ्या रविकिरण मंडळाच्या कवितेपर्यंतच्या मराठी कवितेचे ते एक चोखंदळ समीक्षकही होते. न्या. रानडे, सुधारकाग्रणी गो. ग. आगरकर आदी शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच्या मान्यवर लोकनेत्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मराठीचा पुरस्कार करताना जो विचार केला होता, त्याच विचारसरणीला धरून काम करणारे पटवर्धन हे एक कार्यकर्तेही होते. त्यांच्या विषयीची ही पूर्वमाहिती सांगण्याचा उद्देश मराठीविषयक त्यांनी केलेल्या प्रतिपादनाचे नेमके वजन वाचकांच्या लक्षात यावे हा आहे.

दुसरे प्रकाशित होणारे पुस्तक 'मराठी भाषा : वाढ आणि बिघाड' – हे कै. श्री. के. क्षीरसागर यांच्या भाषाविषयक लेखांचे शकुंतला क्षीरसागर यांनी केलेले संकलन आहे. विविध भाषांतील दर्जेदार साहित्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या क्षीरसागरांचे हे लेखन वेळोवेळी अनेक नियतकालिकांतून आणि वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले होते. आणि त्या त्या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर, कविवर्य माधवराव पटवर्धन आदी भाषाशुद्धीच्या पुरस्कर्त्यांशी त्यांनी घेतलेल्या वैचारिक झुंजीसाठी गाजलेलेही होते. हे लेख वाचताना आमच्या असे लक्षात आले की भाषाशुद्धी, परिभाषेची घडण, मराठीचे लेखन आणि उच्चारण आदी आजही

अनुक्रमणिका

चर्चेत असणाऱ्या प्रश्नांवर प्रा. क्षीरसागर यांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते पुष्कळ अंशांनी स्वीकारले तरी गेले आहेत किंवा अजून स्वीकारावेत इतके उपयुक्त तरी आहेत. क्वचित विवेचनात त्यांनी घेतलेल्या काही उदाहरणांशी आपला मतभेदही होईल. परंतु, आपल्या भाषेच्या संदर्भात सर्वसामान्य शिक्षत माणसाच्या मनात आज जे जे प्रश्न घुटमळत आहेत त्यांचाच क्षीरसागरांनी 'मराठी भाषा : वाढ आणि बिघाड' या पुस्तकामध्ये परामर्श घेतलेला आहे. त्यांचे हे पुस्तक, आजच्या लेखक-वाचकांच्या मराठी बाबतच्या संभ्रमित झालेल्या मानसिकतेला निश्चित दृष्टीकोनाची आणि आधाराची बैठक पुराविल्याखेरीज राहणार नाही. कै. क्षीरसागरांनी हाताळलेल्या भाषाविषयक प्रश्नांच्या संदर्भात, नंतरच्या काळात प्रत्यक्ष कार्यानुभवच घेतलेल्या श्रीमती सत्त्वशीला सामंत (निवृत्त उपसंचालक, भाषा संचालनालय) यांची प्रस्तावना आम्ही या पुस्तकात घेतलेली आहे. तीही विषयाच्या संदर्भात आजची भाषिक स्थिती सांगत आवश्यक तेवढ्या अधिक माहितीची पुरेशी भर घालणारी आहे. मराठी लेखन आणि व्याकरण यांबाबत सत्त्वशीलाबाईंची स्वत:ची एक विशिष्ट भूमिका आहे. तिचा आदर राखण्यासाठी प्रस्तावनेतील काही तत्सम शब्दांचे लेखन त्यांच्या मूळ लेखनानुसार आम्ही ठेवलेले आहे. एवढे कृपया, वाचकांनी समजून घ्यावे.

तिसरे पुस्तक आहे डॉ. दिनेश द. माहुलकर या बडोदा येथे वास्तव्याला असणाऱ्या आणि बऱ्याच मराठी मंडळींना अपरिचित असणाऱ्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भाषावैज्ञानिकांचे- "वृद्धि : -भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन." 'वृद्धि:' हा पाणिनीच्या अष्टाध्यायी या ग्रंथातील पहिल्या सूत्रातील पहिला शब्द आहे. तो शीर्षकात योजण्याबाबत डॉ. माहुलकर विशेष आग्रही होते. त्यांचे म्हणणे असे. आहे की, विविध प्रकारची कुंपणे तोडून पलीकडे जा हा पाणिनीचा मंत्रच भाषाविकसनाच्या संदर्भात आज विशेष अर्थपूर्ण ठरतो आहे. पाणिनीचा हा विचार जितका जुना तितकाच नवाही आहे.

भाषाविषयावरील डॉ. माहुलकरांचे आजवरचे सर्व लेखन इंग्रजीतून झालेले आहे. हे त्यांचे पहिलेच मराठी पुस्तक प्रकाशनासाठी आम्हांला देऊन त्यांनी राज्य मराठी विकास संस्थेचा बहुमान केला आहे, अशी आमची कृतज्ञतेची भावना आहे. डॉ. माहुलकर यांच्या विचारांचा व कार्याचा परिचय राज्य मराठी विकास संस्थेच्या संस्थापकांपैकीच एक ज्येष्ठ भाषावैज्ञानिकांनी, डॉ. अशोक केळकर यांनी, प्रस्तावनेत समर्थपणे करून दिला आहे. त्याची पुनरावृत्ती मी करीत नाही. पण जगभर झालेली भाषाविषयक विचारांची गेल्या काही शतकांतील वाटचाल या पुस्तकात डॉ. माहुलकर यांनी ज्या सुबोध बोली मराठीत उलगडून दाखविली आहे तिने वाचक स्तिमित झाल्याखेरीज राहणार नाहीत, एवढे मात्र इथे आवर्जून सांगायाला हवे. डॉ. माहुलकर यांनी पाणिनीचा 'वृद्धि :' हा मंत्र उच्चारीत काढलेला वरील निष्कर्ष तर आपली मान उंचावणारा आहेच.

या पाच पुस्तकांच्या संचातील चौथे आणि पाचवे ही पुस्तके आहेत अनुक्रमे श्री. सुमन बेलवलकर आणि अविनाश बिनीवाले यांची. या दोघांनी 'लोकसत्ता' या मान्यवर दैनिकाच्या साप्ताहिक पुरवणीत १९९४ ते ९९ या काळात जी भाषाविषयक सदरे लिहिली त्यांचे हे संकलन आहे. 'बेलभाषा' आणि 'भाषा — आपली सर्वांचीच' ही दोन्ही पुस्तके, भाषाविषयक दोन वेगळ्या विचारक्षेत्रांचा विनोदात्म शैलीत परामर्श घेतात. सुमन बेलवलकर यांना परभाषकांना मराठी शिकवताना स्वभाषेचे आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जे दर्शन झाले ते त्यांनी मोठ्या खेळकरपणाने छोट्या छोट्या लेखांतून टिपले आहे. बिनीवाले यांनी मराठी भाषकाला वर्णमाला, लिपी, उच्चार इत्यादींच्या संदर्भात, जगातल्या विविध भाषांच्या विश्वातून गमतीजमती सांगत फिरवून आणले आहे. या दोघांनीही स्वत:च्या पुस्तकाला ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत त्याही त्यांच्या मूळ विवेचनात अधिक भर घालणाऱ्या आहेत.

अनुक्रमणिका

डॉ. अविनाश बिनीवाले यांनी वरील सर्व पुस्तकांची जुळवाजुळव करताना वेळोवेळी विचारविनिमय करण्यामध्ये आणि पुस्तकांच्या मुद्रणाच्या संदर्भातही विशेष सहकार्य केले आहे. त्यांचे मी मनापासून आभार मानते. त्याचप्रमाणे या प्रकाशनप्रकल्पात सहकार्य देणाऱ्या लेखक-प्रस्तावनाकार यांचेही आम्ही ऋणी आहोत. तसेच राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयातील माझे सहकारी – अनिता जोशी, कविता महाजन, गिरीश पतके, स्मिता जोशी, नेहा मोहोड, सरोज भंडारी, ज्योती जोशी –यांनीही आपापल्या कामाचा वाटा आनंदाने आणि हौसेने उचलला आहे. त्यांच्या सर्वांच्या सहकार्यामुळेच दिनांक २७ फेब्रुवारी रोजी, कविवर्य कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी, ही पुस्तके प्रकाशित होत आहेत.

गेली काही वर्षे महाराष्ट्रात कुसुमाग्रजांचा वाढदिवस हा मराठी दिवस म्हणून साजरा होत आला आहे. यंदा कविवर्य आपल्यामध्ये नाहीत. राज्य मराठी विकास संस्थेला त्यांचे सहकार्य अनेक प्रकारे लाभले होते. कृतज्ञतापूर्वक त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून वेगवेगळे पैलू दिग्दर्शित करणारी ही भाषाविषयाची पुस्तके आम्ही त्यांच्या जन्मदिनी प्रकाशित करीत आहोत.

सरोजिनी वैद्य
राज्य मराठी विकास संस्था,
मुंबई १.

अनुक्रमणिका

मनोगत

माझे पती श्री. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर (१९०१-१९८०) यांनी पन्नास वर्षांपूर्वी, बडोदे येथील वाङ्‌मय परिषदेच्या चौदाव्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात मराठी भाषेवरील, आक्रमणाचा विचार प्रामुख्याने केला होता. राज्य मराठी विकास संस्था आता त्याच बडोदे शहरात श्री. के. क्षी. यांच्या भाषाविषयक पुस्तकाचे प्रकाशन करीत आहे, हा योगायोग मला फार आनंदाचा वाटतो.

श्री. के. क्षी. यांच्या भाषाविषयक लेखनाची सुरुवात मात्र त्या आधीच म्हणजे १९३५ सालच्या अखेरीस झाली होती. देशभक्त विनायक दामोदर सावरकर आणि प्रो. माधवराव पटवर्धन या दोघांनी चालविलेल्या भाषाशुद्धीच्या चळवळीला विरोध करण्यासाठी श्री. के. क्षी. यांनी आपली लेखणी उचलली. पुणे येथे महाराष्ट्र शारदा मंदिरात १५ डिसेंबर १९३५ रोजी त्यांनी "खरी भाषाशुद्धी आणि तिचे खरे वैरी अर्थात सावरकर आणि पटवर्धन" हा निबंध वाचला. 'सह्याद्री' मासिकाच्या फेब्रुवारी आणि मार्च १९३६ या दोन अंकामधून तो प्रसिद्ध झाला. या दोन्ही लेखांनी मराठी साहित्याचा विश्वात जी खळबळ उडाली तिचे आणि त्या लेखांवरच्या सावरकर आणि पटवर्धन यांच्या प्रतिक्रियांचे चित्रण, श्री. के. क्षी. यांच्या 'तसबीर आणि तकदीर' या आत्मचरित्रात वाचावयास मिळते.

मराठी भाषेच्या वापरातील वाढत्या अराजकामुळे ते किती व्यथित असत हे त्यांनी या विषयावर पुढे त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या वर्षापर्यंत वेळोवेळी केलेल्या लेखनावरून स्पष्ट होते. 'मराठी भाषेचे सरकारी शिल्पकार ' हा त्यांचा या विषयावरचा शेवटचा लेख 'युगवाणी' च्या राजभाषा मराठी विशेषांकात प्रसिद्ध झाला. (नोव्हे.- डिसे. १९७९) परिभाषानिर्मितीच्या बाबतीतील त्यांची भूमिका या सरकारी शिल्पकारांनी समजावून घेतली नाही, तिचा विपर्यास केला, याचे दु:ख श्री. के. क्षी. यांना अखेरपर्यंत होते.

वस्तुतः या विषयावर त्यांना एक पुस्तक प्रकरणशः नियोजन करून लिहावयाचे होते. इंग्रजीतील 'King's English' या पुस्तकाच्या धर्तीवर त्यांनी आपल्या पुस्तकाचे 'राजमान्य मराठी' हे नावही निश्चित केले होते. १९६५ साली 'टीकाविवेक' या ग्रंथाचे लेखन आणि मुद्रिते तपासण्याचे काम संपल्यानंतर या दृष्टीनेच त्यांनी डेक्कन कॉलेजच्या लिंग्विस्टिक क्लबमध्ये Neologisms या विषयावर लिहिलेल्या निबंधाचे वाचनही केले. परंतु प्रकृतीची साथ न मिळाल्यामुळे 'राजमान्य मराठी'ला मूर्त स्वरूप प्राप्त होऊ शकले नाही.

भाषाविषयक लेखांचे हे संकलन करीत असताना मला सौ. सत्वशीला सामंत, प्रा. डॉ.मीरा सुंदरराज आणि माझे बंधू श्री. विलास शंकर रानडे यांचे बहुमोल साहाय्य झाले आहे.मी त्यांची मनापासून आभारी आहे.

राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालक डॉ. सरोजिनी वैद्य व त्यांचे सहकारी यांनी सर्व लेख बारकाईने वाचून त्यांची विषयानुरोधाने पुनर्मांडणी करणे, पुनरावृत्ती काढून टाकणे आदी अनेक कामे केली. राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने पुस्तकाचे प्रकाशन करण्याचेही मान्य केले. याबद्दल मी सरोजिनीबाईंची आणि संस्थेची विशेष ऋणी आहे.

श्री. के. क्षीरसागर यांचे १९३५ पासूनचे भाषाविषयक विचार आज वाचकांना ग्रंथरूपाने एकत्रितरीत्या प्राप्त होत आहेत. मराठीच्या अभ्यासकांना ते निश्चित मार्गदर्शक ठरतील असा मला विश्वास वाटतो .

शकुंतला क्षीरसागर
२९/४१८ लोकमान्य नगर,
पुणे ४११०३०.

अनुक्रमणिका

प्रस्तावना

पारतंत्र्यकाळात "मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे" अशी खंत व्यक्त करत असतानाही माधव जूलियन यांच्या मनी तिच्या 'यशाची दिव्य आशा' वास करीत होती. त्यानंतर स्वातंत्र्य येऊन तीन तपे उलटली, १९६० साली महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले व कागदोपत्री मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. तरीही प्रत्यक्षात इंग्रजीचे वर्चस्व कमी झाले नाही, त्यामुळे १९७९ साल हे महाराष्ट्र सरकारने जनजागृतीसाठी 'राजभाषा वर्ष' म्हणून साजरे केले व १९८५ या रौप्यमहोत्सवी वर्षापासून महाराष्ट्र राज्याच्या कारभारात मराठीला खऱ्या अर्थाने सुप्रतिष्ठित करण्याचा संकल्पही सरकारने सोडला. पण वस्तुस्थिती काय आहे? आज माधव जूलियन हयात असते तर त्यांचा ऊर आनंदाने भरून आला असता असे दृश्य खरोखरी दिसत आहे काय? उलट, मराठी नसे आमुची मायबोली, जरी ती आज राजभाषा असे" असे म्हणून त्यांनी कपाळाला हात लावला असता!

कविवर्य माधव जूलियन आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी 'भाषाशुद्धी'च्या नावाने जे बीज पेरले त्याला रसाळ आणि गोमटी फळे का आली नाहीत याचा शोध घेताना, मूळ बीज खरोखरी शुद्ध होते का हे तपासून पाहावे लागेल. "भाषाशुद्धीच्या अतिरेकी व विकृत कल्पनांनी डागाळलेल्या या बीजातून भाषिक अराजकाच्या विषवल्लीच तरारतील" असा इशारा कै.श्रीकृष्ण के. क्षीरसागर या नामवंत टीकाकाराने १९३६ सालीच दिला होता. तेव्हापासून तहत १९८० साली आपली जीवनज्योत मालवेपर्यंत हा एकांडा शिलेदार मराठी भाषेच्या क्षेत्रातील अराजकाविरुद्ध धर्मयोध्यांच्या आवेशाने लढत राहिला. पण 'उर्ध्वबाहुर्विरौम्यहं च कश्चन शृणोति माम्' हाच विधिलेख त्याच्या भाळी लिहिलेला होता. उरात हेच शल्य बाळगून श्री.के.क्षी. या जगातून गेले.

पूर्वायुष्यात त्यांनी सावरकर-पटवर्धनांशी सामना केला. उत्तर आयुष्यात त्यांना सरकारशी लढा द्यावा लागला. ढोबळ दृष्टीने पाहिल्यास, श्री.के.क्षी. यांची हार झाली असे काहीजण म्हणतील, पण ते खरे आहे काय? रोग्याने जाणकार वैद्याचा सल्ला धुडकावून कुपथ्य केले तर अंती नुकसान रोग्याचेच होणार. तीच परिस्थिती आज मराठीच्या तथाकथित अभिमान्यांची झाली आहे.

१९८१ साली साहित्य-संस्कृती मंडळाने सावरकरांचा 'भाषाशुद्धि' हा ग्रंथ पुनर्मुद्रित केला व त्याला श्री.के.क्षी. यांनी प्रस्तावना लिहिली. तिच्यात सावरकरांच्या विचारांचे खंडन करीत असतानाही त्यांचे ऐतिहासिक कार्य ते विसरले नाहीत. एका आक्रमक राष्ट्राने आपली सत्ता दुसऱ्या राष्ट्रावर लादल्यामुळे घडणारा भाषिक संघर्ष प्राय: बलात्काररूप असतो व त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी जित राष्ट्राचा स्वाभिमान जागृत करावा लागतो. ही कामगिरी सावरकरांच्या 'भाषाशुद्धि' चळवळीने बजावली. सावरकर आणि माधवराव पटवर्धन यांच्यासारख्या मनस्वी व्यक्तींनी एक रोग बरा करताना दुसरा रोग उद्भवण्याचा धोका पत्करला असला तरी त्या दोघांनी भाषेच्या शब्दसंपत्तीत मोलाची भर घातली हेही त्यांनी नमूद केले आहे.

या ठिकाणी एक गोष्ट आठवते. सावरकरांनी कधीतरी 'हंस पिक्चर्स'च्या स्टुडिओला भेट दिली होती. तेव्हा चित्रपटाची श्रेयनामावली देताना सर्व तांत्रिक शब्द इंग्रजीत वापरलेले पाहून व्यथित झालेल्या सावरकरांनी दुसऱ्या दिवशी इंग्रजी परिभाषिक शब्दांना सुभग मराठी पर्याय सुचवून ती यादी करून आणली. आजतागायत सर्व मराठी व हिंदी चित्रपटांतही ही सुंदर परिभाषा वापरली जाते व ती चांगलीच रुळली आहे. सावरकरांसारख्या प्रतिभावंताने मराठीत आणलेल्या 'उच्चांक', 'दिनांक' इ. शब्दांची श्री. के.

अनुक्रमणिका

क्षी. यांनी एकेकाळी खिल्ली उडवलेली असली तरी, आज हे शब्द रूढ होऊन गेले आहेत. पण हेही तितकेच खरे की, 'तारीख' हटवण्यासाठी सावरकरांनी 'दिनांक' आणला, तो रुळलाही, पण 'तारीख'च हटली नाही, कोर्टात अजूनही तारीख पडते. का कोण जाणे सावरकरांनी 'पोलीस' याला दिलेला 'आरक्षी' हा प्रतिशब्द कधीच रुळला नाही. संस्कृतिरक्षणाच्या नावाखाली सावरकरांनी 'हजार' या शब्दाऐवजी 'सहस्र' हा शब्द रूढ करण्याचा प्रयत्न केला. पण तो तितकासा यशस्वी झाला नाही. कारण, श्री. के. क्षी. यांच्या म्हणण्याप्रमाणे 'भाषा ही नदीच्या प्रवाहाप्रमाणे असते, ती पाटवणाप्रमाणे तटबंदीतून वाहत नाही.' कोण्या एका जुन्या हिंदी कवीने (बहुधा कबीराने) म्हटले आहे. 'भाषा बहता नीर,' भाषा-प्रदुषणाच्या बाबतीत 'बाटग्या अतिरेकापेक्षा सोवळा अतिरेक बरा' असे सावरकर म्हणत. पण श्री. के. क्षी. यांचा विरोध दोन्ही अतिरेकांना होता. विवेक, भाषाविवेक ही गोष्ट श्री. के. क्षीं. ना महत्त्वाची वाटत होती.

मराठी भाषेच्या सरकारी शिल्पकारांनी सावरकरांचा वारसा सांगितला आणि सरकारी भाषा दुर्बोध करून ठेवली. परिणामी, हे धोरण लोकांत अप्रिय झाले, इंग्रजीच्या अभिमान्यांचे फावले आणि या भाषावृक्षावर इंग्रजीचे बांडगूळ वाढले. दुर्बोध मराठीपेक्षा इंग्रजी बरी असे सर्वांना वाटू लागले. असे का झाले याचे उत्तर शोधायचे असेल तर निर्लेप मानाने व पूर्वग्रह बाजूला ठेवून, मराठीच्या अभिमान्यांनी श्री. के. क्षी. यांचे भाषाविषयक लेख वाचावेत. जुन्या काळी त्यांनी केलेले रोगनिदान आजही तंतोतंत लागू आहे हे लक्षात येईल. तपशील बदलला तरी आजही श्री. के. क्षी. यांची विधाने त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतील.

मराठी भाषेची निकोप वाढ होण्याच्या मार्गातील अडथळे कोणते याचे विवेचन करताना, श्री. के. क्षीं. यांनी ज्या अपप्रवृत्तींचा उल्लेख केला त्यांविषयीचे जुने दाखले जाऊन त्या जागी नवीन दाखले आले असले तरी त्या प्रवृत्ती मात्र कायम राहिल्या आहेत असे आपल्याला दिसेल. त्या प्रवृत्ती अशा –

प्रवृत्ती १ : इंग्रजी व फारसी-उर्दू या तथाकथित परकीय भाषांतील शब्दांपुरता फाजील सोवळेपणा. वस्तुतः १९५५ साली भारत सरकारने नेमलेल्या 'राजभाषा आयोगा'ने केलेल्या शिफारशीमध्ये एके ठिकाणी असे म्हटले आहे की 'Doctrinaire insistence on 'language purism' is deprecated.'' असे असूनही सरकारी भाषासमित्यांनी नको तिथे शुद्धतावादी धोरण अवलंबिले. उदा. हिंदीवाल्यांनी 'आबोहवा' या प्रचलित शब्दातील 'हवा' या अरबी शब्दाला घाबरून त्या जागी 'जलवायु ' हा शब्द रूढ करण्याचा प्रयत्न केला. पण 'आबोहवा' मधील 'आब' हा शब्द मुळात संस्कृतमधील 'आप्' पासूनच आला आहे याचा त्यांना विसर पडला. वस्तुतः आम्हाला 'एअर' च्या अर्थाने 'हवा', 'गॅस' या अर्थाने 'वायु' आणि स्वयंपाकघरातील इंधन दर्शविण्यासाठी 'गॅस' अशा तीनही शब्दांची जरुरी आहे. याच चालीवर राज्य सरकारच्या मंत्रालयीन भाषेत 'लिफ्ट' किंवा 'पाळणा' हा शब्द टाळून त्यासाठी 'उद्‌वाहन' हा बोजड व हास्यास्पद शब्द योजण्यात आला. **प्रवृत्ती २ :** जातिवंत मराठी शब्दांबाबतचे अज्ञान, उदा. 'Census' याला 'शिरगणती' किंवा 'खानेसुमारी', 'गणती', 'मोजदाद' हे प्रतिशब्द पूर्वपार रूढ आहेत. मग ती माणसांची असो वा पशूंची असो- पण सरकारी कोशात 'Census' (१) Population जनगणना (२) Cattle पशुगणना असे आकारण दोन पर्याय दिले आहेत.

प्रवृत्ती ३: पूर्वी आपल्याकडे काहीच नव्हते व प्रत्येक संस्थेचे आणि कल्पनेचे नव्याने भाषांतर करण्याखेरीज गत्यंतर नाही, ही लाचारी.

अनुक्रमणिका

या तीन मनोगंडांनी आपल्याला ग्रासलेले आहे असे श्री. के. क्षींचे म्हणणे आहे. नवशब्दनिर्मितीच्या हव्यासापोटी मराठी भाषेत अनेक विद्रूप शब्द जन्माला आले. 'दांडगेश्वर निती'चा अवलंब करून ते लादून रूढ करण्याचा प्रयत्न झाला. मग व्याकरणदृष्ट्या ते शब्द योग्य आहेत किंवा नाहीत याचा विचार करण्याइतकी फुरसत कोणाला? उदा. 'रजिस्टर्ड' याला हिंदीतील 'रजिस्ट्रीकृत' या धेडगुजरी पर्यायाच्या धर्तीवर 'नोंदणीकृत' हा शब्द बनविण्यात आला. वस्तुतः 'नोंदणीकृत' या तृतीया तत्पुरुषी समासाचा अर्थ 'नोंदणीने केलेला' असा होतो. 'कृतनोंदणी' हे त्यातल्यात्यात शुद्ध रूप. पण त्याहीपेक्षा सावरकरांनी वापरलेला 'नोंदीव' हा पर्याय किती तरी अर्थवाही व सुटसुटीत होता! ही 'हुल्लडबाजी' श्री. के. क्षी यांना आक्षेपार्ह वाटते.

इंग्रजी शब्दांच्या वर्णलेखनाशी सादृश्य साधण्याचा पोरकट अट्टाहास हे आणखी एक रोगलक्षण. उदा. रेडिओवरील प्रादेशिक बातम्यात हरघडी वापरला जाणारा 'अवर्षण-प्रणव क्षेत्र drought-prone area' हा एक बोजड शब्द प्रयोग. त्याऐवजी 'दुष्काळी' शब्दाच्या चालीवर नुसते 'अवर्षणी क्षेत्र' म्हणून काम भागू शकते. परभाषेतील शब्द टाळण्याकरिता निघालेल्या चळवळीमुळे यांत्रिक रीतीने शब्दसिद्ध झाल्याचे समाधान झाल्यासारखे वाटले तरी भाषांतरित मराठीतील वाक्प्रयोगांचे वळण मात्र इंग्रजीच राहिले . उदा. इंग्रजीतील 'To' या मायन्याचे 'यांस' ऐवजी 'प्रति' हे भाषांतर पाहावे. तसेच इंग्रजीतील 'डीअर' हा मायना मराठीत 'प्रिय' या शब्दातून व्यक्त केल्याने शासनव्यवहारातही ठायी-अनाठायी वाजवीपेक्षा अधिक सलगी दिसू लागली! वस्तुतः 'माननीय', 'रा. रा.' इत्यादी संबोधनेच मराठीच्या प्रकृतीला योग्य आहेत. म्हणून "सरकार आज जे काम करीत आहे ते शब्दनिर्मितीचे न समजता शैलीनिर्मितीचे, समजले तरच त्याला अस्सल मराठी वळण येईल." असे मराठी भाषेचे सरकारी शिल्पकार या लेखात क्षीरसागर लिहितात.

'भाषाशुद्धी'साठी एकीकडून परकीय शब्दांवर नको तेथे बहिष्कार दुसरीकडून नको तेथे निष्कारण परप्रांतीय व अनोळखी शब्दांचा भडीमार होतो व जोडीला संस्कृतचे अज्ञान असते. उदा. अलीकडे मराठीत 'समारंभ साजरे' न होता 'समारोह संपन्न' होतात. हल्ली 'मिरवणुकी' ऐवजी 'शोभायात्रा' निघते. 'संपन्न' याचा अर्थ 'समृद्ध' असा आहे. हिंदीच्या जास्तीत जास्त जवळ पोचणे म्हणजे एकाराष्ट्रीयत्वाच्या जवळ पोचणे ही एक भ्रामक कल्पना. उदा. सरकारी मराठीत 'प्रॉपर्टी' याला 'मालमता' हा रूढ पर्याय सोडून व हिंदीच्या पावलावर पाउल टाकून 'संपत्ति' हा पर्याय घेतला तरी, सामान्य मराठीभाषी समाजाच्या मनात तो 'वेल्थ' याचा प्रतिशब्द आहे. त्यामुळे 'संपत्तिकर' म्हणजे 'प्रॉपर्टी टॅक्स' की 'वेल्थ टॅक्स' हे सांगणे कठीण झाले.

येणेकरून सरकारी मराठी ही स्थानिक बहुजनसमाजापासून दूर जात चालली व भाषिक गोंधळात फक्त भर पडली. उलट हिंदीतील 'सरकार' हा शब्द मराठीत रूढ असल्याने तो घेतला असता तर एकरूपता साधली असती, पण तो उर्दू असल्याने तो टाळून 'शासन' हा संस्कृत शब्द अकारण आणला. या धोरणामुळे भाषाशुद्धीचे तथाकथित कैवारी हेच तिचे 'खरे वैरी' ठरले. या विसंगतीला काय म्हणावे ?

विरोधकांना श्री. के. क्षी. यांच्या लेखांतील उदाहरणांच्या तपशिलात एखादी चूक दाखवून देता येईल. उदा. 'लोकसभा' याऐवजी 'संसद' कशाला घ्यायचा असे श्री. के. क्षी. म्हणतात. पण 'संसद' हा शब्द श्री. के. क्षी. म्हणतात त्याप्रमाणे 'लोकसभा' या शब्दाचा समानार्थक नव्हे, 'लोकसभा' (हाऊस ऑफ पीपल), राज्यसभा (कौंसील ऑफ स्टेट्स) व राष्ट्रपती हे मिळून 'पार्लमेंट' म्हणजे 'संसद' बनते. शिवाय 'संसद' हा शब्द सुटसुटीत व सार्थ आहे. श्री. के. क्षी. यांनी त्या काळी दिलेले एखादे उदाहरण आजच्या

बदललेल्या सांस्कृतिक संदर्भात कदाचित अप्रस्तुत ठरेल. उदा. 'सौभाग्यवती' ऐवजी हिंदीप्रमाणे 'श्रीमती' वापरण्याची टूम श्री. के. क्षी. यांना रुचत नसे. पण आजच्या स्त्री-पुरुष समानतेच्या युगात कुमारी/ सौभाग्यवती/ श्रीमती अशी वर्गवारी सार्वजनिक जीवनात कालबाह्य झाली असून, कुमारी/ सधवा / विधवा/ घटस्फोटिता या सर्व स्त्रियांना सरसकट 'श्रीमती' हे उपपद लागले, ते योग्यच झाले. पण म्हणून काही त्यांच्या प्रतिपादनाच्या आशयाला बाध येत नाही. "नवीन शब्द व प्रयोग तर्ककर्कश टांकसाळ्यांच्या हाती देऊन चालत नाहीत. ते भाषा-प्रचाराचा मक्ता न घेता, हृदयाचा ठाव घेण्याकरिता लिहिणाऱ्या प्रतिभावान व नैसर्गिक लेखणीतून नकळत जन्मावे लागतात." असे श्री. के. क्षींचे म्हणणे आहे. ('खरी भाषाशुद्धी आणि तिचे खरे वैरी') शब्द हे भाषेतून कोशात येणे ही स्वाभाविक प्रक्रिया असून, श्री. के. क्षी. यांना तीच भूमिका मान्य आहे.

पण कधी कधी एखाद्या समाजाच्या इतिहासात असा एखादा टप्पा येतो की, ग्रंथनिर्मितीतून शब्द कोशात येण्याची वाट पाहण्याइतपत वेळ नसतो. सर्वच नवस्वतंत्र राष्ट्रांना अल्पावधीत बरीच मजल मारून प्रगत राष्ट्रांच्या जोडीला यायचे असते. अशा वेळी 'आधी कोश, मग भाषा' हा कृत्रिम मार्ग चोखाळावा लागतो. अशा प्रसंगी "स्वभाषेच्या प्रकृतीचे सूक्ष्म ज्ञान, वाचकांना सुबोध अर्थप्रतीती करून देण्याची तळमळ व योग्य स्थळी योग्य शब्द सुचवण्याइतपत भाषाप्रभुत्व, इतक्या गोष्टी एकत्र असतील तरच स्वभाषेची विटंबना आणि सामान्य वाचकाचे हाल न करता, नवे शब्द योजता येतील." (भाषेवर होणारे आंतर्गत आक्रमण)

मराठीच्या भाषाशैलीप्रमाणेच भाषणशैलीचाही विचार श्री. के. क्षी. नी अगत्याने केला आहे. चित्रपट, नाटके, रेडिओ व दूरदर्शन यांच्याकरवी मराठी समाजाची भाषणशैली घडवली वा बिघडवली जाते याचे त्यांना पुरेपूर भान आहे व त्यामुळेच तीवर विपरीत परिणाम होणार नाही अशा तऱ्हेने या साधनांचे नियंत्रण होणे जरुरीचे आहे असे श्री. के. क्षी. म्हणतात. आवाजाची गोडी व दमदारपणा ही नैसर्गिक देणगी असली तरी शुद्ध वर्णोच्चार, स्वराचा यथाकाल चढउतार आणि शैलीत मधुरता व डौल आणून त्याची विनियोगपद्धती कमावणे आवश्यक असते. या लेखातून दुर्गाबाई खोटे, ज्योत्स्ना भोळे या अभिनेत्री, सावरकर, फडके यांच्यासारखे नामांकित वक्ते इत्यादींच्या भाषणशैलीचे विशेष व बरेवाईट गुणधर्म श्री. के. क्षी. यांनी किती बाराकाव्यांनिशी वर्णिले आहेत !

ज्ञानप्रसाराच्या कामी रेडिओप्रमाणेच वृत्तपत्रांचाही वाटा मोठा आहे. तसेच त्यांच्यामार्फत भाषादोषांचाही प्रसार झपाट्याने होऊ शकतो. व्याकरणदुष्ट, विद्रूप किंवा बोजड वाक्यप्रयोग ग्रंथातूनही प्रसृत होऊ शकतात. तथापि, "प्रमाणभूत ग्रंथ परीक्षेला नेमले असतील तरच तरुण मंडळी वाचतात, दैनिके मात्र विद्वान-अविद्वान, वृद्ध-तरुण बायका-मुले या सर्वांच्या नित्यपाठात असतात." अशी साधार नोंद श्री. के. क्षींनी केली आहे. ('भाषाक्षेत्रातही विवेकबुद्धी हवी') बेडौल व सुडौल शब्दप्रयोग यापैकी जे चांगले असेल तेच टिकेल हा समज भ्रममूलक आहे. असे भाषादोष वृत्तपत्रांतून वारंवार नजरेला पडून त्यांची एकदा सवय झाली की, गोबेल्सच्या प्रचारतंत्राप्रमाणे तेच लोकांना बरोबर वाटू लागतात. वृत्तपत्रांचे लिखाण लगीनघाईने करावे लागते व इंग्रजी तारांचा मजकूर भाषांतरित करावा लागतो याची त्यांना जाणीव होती. म्हणून "ग्रंथांचा दुष्परिणाम वृत्तपत्रांइतका व्यापक आणि त्वरित नसला तरी, त्यांचा अपराध मात्र वृत्तपत्रांहूनही अक्षम्य होय." ('भाषेवर होणारे अंतर्गत आक्रमण') असे असले तरी, "हा प्रश्न दोषांच्या समर्थनाचा नसून दोष टाळण्याचा आहे आणि दोष टाळण्याची पहिली पायरी म्हणजे त्या दोषांकडे डोळे

उघडून पाहणे ही होय." असा सावधगिरीचा इशारा देऊन वृत्तपत्रांवर अधिक जबाबदारी आहे हे श्री. के. क्षी. सूचित करतात.

पण श्री. के. क्षी. येथे थांबत नाहीत. सरकार व वृत्तपत्रे यांच्या व्यतिरिक्त विद्यापीठांचे कर्तव्य काय आहे त्याचेही दिग्दर्शन करतात. मराठी माध्यमाला मुहूर्त' (१९६२) हा लेख आजही 'विद्यापीठ ग्रंथ निर्मिति मंडळ' किंवा 'साहित्य संस्कृति मंडळ' यांसारख्या संस्थांना मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. एखादा विषय नव्याने स्वभाषेतून मांडण्यासाठी "१) विषयाचे उत्कृष्ट आकलन, २) स्वभाषेवर चांगले प्रभुत्व व ३) तो विषय सुगम मराठीतून शिकवण्याची जिद्द-" या तीन गोष्टी आवश्यक असतात, हे क्षीरसागरांचे सांगणे आहे. पण एकाच व्यक्तीच्या ठायी त्यांचा सुरेख संगम असणे हा मणिकांचन योग दुर्मिळ म्हणावा लागेल. सर्वसाधारणपणे विषयाचे डोळस आकलन असलेल्यांची भाषाज्ञानाची बाजू लंगडी असते, तर सुडौल गद्य लिहिणाऱ्यांना वाङ्मयात गती असली तरी विशिष्ट तांत्रिक विषयाकडे पाहण्याचे ज्ञानचक्षू असतातच असे नाही. अशा स्थितीत आंधळ्याच्या पाठीवर लंगडा बसला तर लंगडा मार्गदर्शन करील व आंधळा वाटचाल करील आणि दोघांचा कार्यभाग साधेल. म्हणून त्या त्या विषयांतील तज्ज्ञांनी मराठीत लिहिलेली पाठ्यपुस्तके मराठीच्या प्राध्यापकांनी भाषिक अंगाने तपासावीत अशी व्यवहार्य सूचना श्री. के. क्षी. यांनी केली आहे. म्हणजे पाठ्यपुस्तके सुरुवातीच्या काळात भाषांतरित असली तरी, भाषांतरी वळणाची राहणार नाहीत.

श्री. के. क्षी. लिहितात की, भाषा हे संस्कृतीचे एक सूक्ष्म पण महत्त्वाचे अंग आहे आणि "संस्कृतीचे जीवन आणि मरणही सूक्ष्म गोष्टीतच असते." (भाषेवर होणारे अंतर्गत आक्रमण) आजच्या महाराष्ट्रीय समाजाला आपली मराठी संस्कृती खरोखर टिकवायची आहे का, या विषयी शंका वाटावी अशी सद्यःस्थिती आहे. अधूनमधून सभा-व्याख्यानांमधून सरकारवर आणि विद्यापीठांवर दोषारोप केले की आपण मायबोलीच्या ऋणातून मोकळे झालो अशी आपल्या बुद्धिजीवी वर्गाने सोयीस्कर समजूत करून घेतलेली दिसते. इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून शिकणारा मराठी श्रीमंत वर्ग हा पूर्वापार मराठीविषयी उदासीनच राहिला आहे. पण आता तर त्याचा पदर धरून आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत पाठवून अज्ञ जनांचा बुद्धिभेद करणारे मध्यमवर्गीय बुद्धिजीवी व त्यांचे अंधानुकरण करणारे प्रवाहपतित सामान्यजन पाहता, मराठी भाषा मुमुर्षू होत आहे ही राजवाड्यांनी व्यक्त केलेली भीती निराधार नव्हती असे म्हणावे लागते. यावर कळस म्हणजे मराठी राज्यात मराठीवर अन्याय होत आहे असा वेळोवेळी टाहो फोडणाऱ्या वाचिवीरांची दुटप्पी नीती प्रत्यक्ष व्यवहारात दिसते. त्यांचे बोलणे आणि त्यांची कृती यात सुसंगती नसते. म्हणून श्री. के. क्षी. यांना वाटते की "हिच्या एक ताटात आम्ही बसू" असा ध्यास घेतल्याशिवाय 'मऱ्हाटी संस्कृती' टिकणार नाही.

श्री. के. क्षी. यांचे राग-लोभ प्रखर असले तरी एकांगी नव्हते. त्यामुळेच त्यांनी मराठीचा दुराभिमान बाळगला नाही. संस्कृत, उर्दू-फारसी, इंग्रजी, हिंदी वा इतर कोणतीही भाषा यांचा अतिरेकी हव्यास किंवा दुस्वास त्यांनी केला नाही. मराठीच्या विकासासाठी या सर्व भाषाभागिनींचे साहाय्य त्यांनी आवश्यक मानले. संस्कृतशिवाय भारतीय अभ्यासक्रम म्हणजे 'रामाशिवाय रामायण' असे त्यांना वाटे. "इंग्रजी शिका, इंग्रजीतून शिकू नका", असे सांगून 'अंग्रेजी हटाव' संबंधीचे अतिरेकी गैरसमज दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'फारसीच्या अभ्यासाची गरज' तर त्यांनी प्रतिपादन केली आहेच. त्याचबरोबर हिंदीला 'राजभाषेपेक्षा लोकभाषा' म्हणून अधिक महत्त्व असल्याचे ते पटवून देतात. यांपैकी कोणत्याही भाषेची मराठीवर कुरघोडी होऊ नये म्हणून त्यांनी हिरिरीने बचावाचा पवित्रा घेतला असला तरी त्यांच्याशी

सहजीवन जगण्यास नकार दिलेला नाही. उलट "उद्याचे मराठीचे अध्यापक आणि ग्रंथकार हे अनेक देशांच्या वाङ्मयपेठांचे सौदागर असले पाहिजेत...व्यासंगातील सोवळेपणापेक्षा व्यापकपणामुळेच प्रांतिक भाषा अधिक आधुनिक व संपन्न होतील असा हा 'विरोधविकास' आहे." असे ते म्हणतात. (भाषांची लढाई आणि नवी विद्यापीठे')

१९५३ सालच्या 'भाषा-विकास परिषदेचे संस्कार-चित्रण' करताना, श्री. के. क्षी. यांनी आणखी एका महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष वेधले आहे. या परिषदेत शास्त्रीय परिभाषेची अखिल भारतीय शब्दावली शक्यतो एकरूप असण्याच्या गरजेवर भर दिला गेला. ही परिभाषा एकरूप करण्यासाठी संस्कृतच्या आधारे ती विकसित करावी असेही एक तत्त्व मांडण्यात आले. तथापि, विविध प्रादेशिक भाषांना सामान्य असा एकच शब्दसंग्रह वाढवणे हे राष्ट्रनिर्मितीला व राष्ट्रभाषा-निर्मितीला आवश्यक आहे. या भूमिकेवरून, प्रादेशिक भाषांतील शब्दसंग्रहात हवा तसा गोंधळ घालण्याची प्रवृती वाढत आहे. तशी तक्रार श्री. के. क्षी. यांनी त्यावेळी नोंदवली होती व तिचे प्रत्यंतर आजही येत आहे. हे तत्त्व कितीही आदर्श असले तरी तितकेसे व्यवहार्य नाही. कारण संस्कृत ही बहुसंख्य भारतीय भाषांची जननी असली व पारिभाषिक शब्दसंग्रह वाढवण्यास संस्कृतची मदत होणार असली तरी, एकच संस्कृत शब्द निरनिराळ्या भाषांत निरनिराळ्या अर्थांनी (कित्येकदा परस्परविरोधी अर्थांनीसुद्धा) वापरला जातो याची कित्येक उदाहरणे देता येतील . उदा. 'जातीय' या शब्दाचा अर्थ मराठीत 'कम्युनल', तर तेलुगुमध्ये 'नॅशनल' व गुजरातीत 'सेक्स्युअल' असा होतो. 'साक्षर' याचा अर्थ मराठीत 'लिटरेट' तर गुजरातीत 'साहित्यिक' असा आहे. तेलुगुमध्ये आंध्रप्रदेशाला 'राष्ट्र' म्हणतात तर मराठीत भारत हे 'राष्ट्र' आहे. तसेच एखादी कल्पना व्यक्त करण्यासाठी निरनिराळ्या प्रादेशिक भाषांमध्ये निरनिराळे प्रतिशब्द रूढ आहेत. उदा. 'गव्हर्नमेंट' याला हिंदी, मराठी, कानडी भाषेत 'सरकार' हा प्रतिशब्द असला तरी तेलुगुमध्ये त्याला 'प्रभुत्वम्' म्हणतात. अशा स्थितीत केवळ 'अखिल भारतीय एकरूप शब्दावली' चे तत्त्व पाळण्याकरिता कोणत्याही भाषेने आपापल्या भाषिक संकेतांना तिलांजली देणे सयुक्तिक आहे काय ? व तसे केले तरी जनतेला ते मानवेल काय ? 'लॉ' याला हिंदीने घेतलेला 'विधी' हा प्रतिशब्द एकेकाळी सरकारी मराठीने आपल्या प्रकृतीशी विसंगत असूनही स्वीकारला होता. पण त्यामुळे ' अखिल भारतीय परिभाषा' एकरूप झाल्याचे पुण्य लाभले का ? तसेच नाही. कारण मल्याळम मध्ये 'विधि' या शब्दाचा अर्थ 'डिक्री' असा असून 'लॉ' या संकल्पनेला ते लोक 'नियम' असा पर्याय वापरतात . एकरूपतेसाठी त्यांनी तडजोड केली नाही व 'कायदा' या अर्थाने 'विधि' हा शब्द स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला. पण मराठीने तो स्वीकारल्यामुळे परिणामी, 'अखिल भारतीय एकरूप परिभाषेचे' पुण्य तर साधले नाहीच, पण मराठीच्या डोक्यावर मात्र एक हास्यास्पद शब्द येऊन बसला. अलीकडे मात्र 'विधि' या शब्दाचा आग्रह सोडण्यात आला आहे केंद्र सरकारने नेमलेल्या 'राजभाषा आयोगा' च्या शिफारशीमध्ये म्हटले आहे की, "The maximum possible identity in evolving new terminology for all Indian languages should be aimed at." म्हणजे ज्या आधुनिक कल्पना नवीन आहेत केवळ त्यांच्याच बाबतीत सर्व भाषांनी शक्यतो एकरूप प्रतिशब्द स्वीकारावेत एवढाच या धोरणाचा अर्थ आहे. उदा. टेलिव्हिजन म्हणजे 'दूरदर्शन'.

वस्तुतः भारतीय संविधानातील ३५१ व्या कलमात हिंदीने आपला विकास साधण्यासाठी मुख्यत्वेकरून संस्कृतचे व नंतर इतर भारतीय भाषांचे साहाय्य घ्यावे असे मार्गदर्शक तत्त्व दिले आहे. 'विकास साधण्यासाठी' याचा अर्थ 'विद्यमान हिंदी भाषा, नवीन कल्पना व्यक्त करण्यास तोकडी पडेल तेथेच-' ही प्रक्रिया अवलंबिणे अपेक्षित होते. पण संस्कृतप्रेमी पंडितांनी हिंदीतील प्रचलित सुगम शब्द उखडून टाकून त्या जागी संस्कृत शब्दांचा 'रघुवीरी मारा' सुरू केला. त्याचे दुष्परिणाम काय झाले ते श्री.

के. क्षी. यांनी 'भाषा विकासाची समस्या' या लेखात दाखवून दिले आहेत. त्याचप्रमाणे इतर भारतीय भाषांचे सहाय्य घेण्याऐवजी हिंदीच्या सरकारी पंडितांनी आपले बोजड शब्द एकरूपतेच्या नावाखाली इतर भाषांच्या माथी मारण्याचा प्रयत्न केला. (उदा. अलीकडे 'प्रोव्हिजन' याचा हिंदीतील 'उपबंध' हा प्रतिशब्द मराठीत 'तरतूद' या शब्दाच्या जागी आणला.) गंमत अशी की, केंद्रसरकारची हिंदी ही उत्तरप्रदेशाच्या किंवा मध्यप्रदेशाच्या सरकारी हिंदीवर मात्र बंधनकारक दिसत नाही. (उदा. 'पॉवर' म्हणजे केंद्रीय हिंदीत 'शक्ति' तर उत्तरप्रदेशच्या विधीशब्दाकोशात 'अधिकार', 'गव्हर्नमेंट' म्हणजे केंद्रीय हिंदीत 'सरकार' तर मध्यप्रदेशात 'शासन') खुद्द हिंदीभाषी राज्यांत एकवाक्यता नसली तरी आमचे महाराष्ट्र सरकार मात्र स्वामिनिष्ठ आहे. म्हणून 'विधि', 'शक्ति', 'उपबंध' असले बोजड शब्द येथे पत्करले गेले.

एकंदरीत केंद्र सरकारातील 'संस्कृतनिष्ठ' हिंदीवाल्यांचा सासुरवास आणि महाराष्ट्रातील 'प्राकृत' जनांचा 'त्या' मराठीला विरोध या कात्रीत सापडल्यामुळे महाराष्ट्र सरकारची गट मृदंगासाराखी झाली.

प्रत्येक भाषेला विशिष्ट नाद असतो, तिचा विशिष्ट पिंड, प्रकृतिधर्म असतो. सर्व सरकारी भाषा आयोगांनीदेखील 'कोणत्याही भाषेच्या प्रकृतीला धक्का न लावता तिचा विकास करावा,' असेच प्रतिपादन केले आहे. पण हिंदी किंवा मराठी भाषेच्या प्रकृतीला बाध आणूनच हे सरकारी धोरण अंमलात आले. 'निकोप गद्य आणि सुगम शब्दसंग्रह' या भाषाविकासाच्या प्राथमिक गरजा होत. पण "ज्यांना भाषेची 'भावना'च नाही अशांच्या हाती यांत्रिक शब्दनिर्मितीच्या रूपाने भाषाविकासाचे कार्य गेले आहे." ही श्री. के. क्षी. यांना खंत होती. ('मराठी भाषेचे सरकारी शिल्पकार')

उशिरा का होईना पण महाराष्ट्र सरकारने आत्मपरीक्षण करावे, पूर्वग्रहरहित मनाने आपल्या धोरणाचा फेरविचार करावा, असे श्री. के. क्षी. सुचवतात. आपले भाषाधोरण केंद्रानुवर्ती ठेवायचे की लोकानुवर्ती ठेवायचे हा महाराष्ट्र सरकारपुढे पेच आहे. सामान्य दैनंदिन व्यवहाराच्या भाषेपुरते ते लोकानुवर्ती असावे लागेल, तरच ते लोकप्रिय होईल. मात्र शास्त्रीय परिभाषेच्या बाबतीत सवंग लोकप्रियतेच्या आहारी न जाता किंवा वृत्तपत्रांच्या टीकाटिप्पणीला न भिता, सरकारने शास्त्रशुद्ध धोरण अवलंबावे. पण हे काम देखील केवळ त्या विषयातील तज्ज्ञ व भाषाशास्त्रज्ञ यांच्याकडे नुसते सोपवून चालणार नाही. त्या भाषाशास्त्रज्ञांना भाषिक सौंदर्याचीही दृष्टि असावयास हवी, असे श्री. के. क्षी. चे सांगणे आहे. ('आजची मराठी भाषा वाढ आणि बिघाड').

भाषेचा इतक्या विविध अंगांनी विचार करणाऱ्या श्री. के. क्षी. यांनी तिच्या लिखित रूपासंबंधीही विचार केला नसता तरच नवल. 'हरवले आहे मराठीचे मराठीपण' म्हणून व्यथित होणारे श्री. के. क्षी. बालबोध लिपीवर गंडांतर येऊ पाहत आहे हा धोक्याचा इशारा देण्यास विसरत नाहीत. "यंत्राची सोय पाहण्याकरिता, छापण्याच्या वा टंकलेखनाच्या यंत्राची सोय पाहण्याकरीता जेव्हा ही सर्वपरिचित लिपी बदलण्याचा प्रयत्न होतो" तेव्हा त्यांचा लिपिसुधारणेला विरोध असतो. "अक्षरसंख्या जास्त म्हणून बालबोध लिपीविरुद्ध गहजब करणाऱ्या लोकांना इंग्रजीच्या अर्धवट मूळक्षरमालेमुळे हजारो स्पेलिंग पाठ करावी लागतात." याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. "छापखान्यांना बावन्न अक्षरे व शिवाय बाराखड्या यांचे खिळे तयार केल्यावर पुन्हा जोडाक्षरे जुळवण्याची आफत नको, म्हणून जोडाक्षरांच्या जोडया फोडण्यास आरंभ झाला." म्हणून श्री. के. क्षी. यांना खंत वाटते. श्री. के. क्षी. यांच्या काळी खिळे जुळवून छपाई होता असे. तो जमाना सरला. आता संगणकाचे युग अवतरले . आता लेखनपद्धतीच्या बाबतीत अशक्यप्राय असे

काहीही उरलेले नाही. तरीही मराठीच्या पाठ्यपुस्तकांत जोडाक्षरांची मोडतोड सुरूच आहे, नव्हे ती वेगाने चालू झाली आहे.

वस्तुतः रूढ पद्धतीची जोडाक्षरे हे देवनागरी लिपीचे ठळक वैशिष्ट्य होय. जोडाक्षरे लिहिल्याने जागा वाचते, लिपीचे वाचनही सुकर होते. दोन व तीन अक्षरे एका दंडावर पेलता येतात व ती एका दृष्टिक्षेपात एकाक्षरासारखी वाचता येतात. अलीकडच्या पाठ्यपुस्तकात जोडाक्षरे तोडून लिहल्याने, विद्यार्थी ती अक्षरे सुटी सुटी वाचतात. त्यामुळे त्यांचे उच्चारण बिघडत चालले आहे. परंतु पाठ्यपुस्तक मंडळाच्या या धोरणातही फारशी सुसंगती नाही. त्यांमध्ये जोडाक्षरे कधी रूढ पद्धतीने, तर कधी बिगररूढ पद्धतीने छापलेली आढळतात. त्यामुळे शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण होतो. तसेच या नव्या पद्धतीचे तोटे फारसे कोणाच्या लक्षात आलेले दिसत नाहीत. अजून मराठीतील साहित्यग्रंथ व वृत्तपत्रे यांमध्ये जोडाक्षरे रूढ पद्धतीनेच लिहिली जातात, ही समाधानाची बाब होय.

परंतु आजच्या शाळांमधून शिकणारा भावी वाचकवर्ग मात्र वेगळ्याच पद्धतीने शिकत आहे. त्याला रूढ जोडाक्षरांची ओळखच होत नाही. मग तो आपले साहित्य वाचणार कसे व लिहिणार तरी कसे ? जुन्या काळी श्री. के. क्षी. यांनी ज्या दुखण्यावर नेमके बोट ठेवले होते ते इतके विकोपाला जाईल याची कोणाला कल्पनाही आली नाही. साहित्य – वर्तुळातील मान्यवर व्यक्तींनी आगगाडीच्या डब्यांचा माळेप्रमाणे बेंगरूळ दिसणारी ही अनिष्ट लेखनपद्धती संपुष्टात आणावी व देवनागरीचे हे सांस्कृतिक धन सुरक्षित ठेवावे.

'बालबोध लिपीवर गंडांतर' येऊ पाहात आहे असा धोक्याचा इशारा देणारे श्री. के. क्षी. भाषेच्या लिखित रूपाचा व पर्यायाने तिच्या सौंदर्याचा स्वतंत्रपणे विचार करतात. पण शुद्धलेखनपद्धतीचा विचार करताना मात्र ते या लिखित रूपाला गौण लेखतात. मराठीची मूळ शुद्धलेखनपद्धती कायम ठेवण्याबाबत ते तितकेसे आग्रही नसावेत. ज्या अनुच्चारित अनुस्वरांना दुसरे कोणतेही व्याकरणिक कार्य नव्हते अशांची अडगळ साहित्य महामंडळाने दूर केली हे ठीकच झाले. पण लिंग-वचन-भेद दर्शविणारे अनुच्चारित अनुस्वारही काढून टाकण्याचे समर्थन करताना, भाषा ही उच्चारणप्रधान असल्याचा हवाला श्री. के. क्षी. देतात. मग त्याच न्यायाने सामासिक शब्द जोडून लिहिले काय वा तोडून लिहिले काय, उच्चारात फरक पडत नाही असे कोणी म्हटले तर ते त्यांना मानवत नाही. १९६१-६२ साली महामंडाळाने शुद्धलेखनाचे नियम काही प्रमाणात बदलले तेव्हा श्री. के. क्षी. यांनी तडजोडीवादी भूमिका घेतली असली तरी एकदा चालू केलेले चक्र थांबवता येत नाही याची त्यांना कल्पना नसावी, असे म्हणता येईल.

दहा वर्षांनंतरही 'शुद्धलेखनाचे गुऱ्हाळ' तसेच चालू राहिल्याचे लक्षात आल्यावर शुद्धलेखन क्षेत्रात अराजक माजू लागल्याची दुःखद जाणीव त्यांना झाली. १९३६ साली भाषिक अराजकाचे भाकीत वर्तवणाऱ्या श्री. के. क्षी. यांना या नव्या अराजकाची जाणीव काहीशी उशिराच झाली असे म्हणावे लागते. त्यांना ती जाणीव झाली तेव्हा ग्रंथलेखनाच्या कार्यामुळे म्हणा किंवा शरीरप्रकृती क्षीण झाल्यामुळे म्हणा या अराजकाविरुद्ध 'जिहाद' पुकारणे त्यांना शक्य झाले नसावे.

हयातभर 'रोमँटिसिझम्'चा पुरस्कार करणाऱ्या श्री. के. क्षी. यांनी भाषाही त्याच सौंदर्यासक्त वृत्तीने हाताळली. "संस्कृती, शुद्धता आणि माधुर्य यांचे मापन घडापासरीने करायचे नसून, तोळा-माशांनीच करायचे असते." ही जाणीव वागवल्यामुळे त्यांच्या तर्कशुद्ध वैचारिक लेखांची भाषा रूक्ष झाली नाही. मुसलमानांशी तडजोड करण्यासाठी हिंदी या राष्ट्रभाषेची लिपी म्हणून देवनागरीबरोबरच उर्दू भाषेच्या

लिपिलाही मान्यता देणारा आमचा "उदार राष्ट्रवाद म्हणजे अशीच एक 'प्रोषितभर्तुका' ठरणारा काय ?" अशा शब्दांत ते आपली अस्वस्थता व्यक्त करतात. इतर सांस्कृतिक अंगांकडे दुर्लक्ष करून, 'केवळ भाषा सोवळी राखणे हे शनिवारवाड्यावर मुकटे वाळवण्याहून कमी हास्यास्पद नाही." अशा मिस्किल शब्दांत ते तथाकथित भाषाशुद्धीची खिल्ली उडवतात," आपल्या लेखकबांधावांस बहिष्काराची धाबळी नेसावयास सांगूनही इंग्रजी शब्दांची गटारगंगा थांबणार नाही." असा इशारा देतात. इंग्रजीचे आक्रमण थोपवण्यासाठी नुसती शब्दबहिष्काराची चळवळ हा वरवरचा उपाय ठरेल. ज्या आंग्लसंस्कृतीचा पगडा बसल्याने केतकर म्हणतात त्याप्रमाणे आपणांस 'आंग्लशूद्रत्व' आले आहे त्या संस्कृतीचे वर्चस्व नाहीसे करणे अगत्याचे आहे हे सांगून श्री. के. क्षी. यांनी मूळ दुखण्यावर नेमके बोट ठेवले आहे. म्हणून "कात्रजच्या तळ्याचे रखवालदार मूळ साठाच अशुद्ध करीत असता, सावरकर घरोघरचे नळ शुद्ध करणार काय ? असा खडा सवाल श्री. के. क्षी. विचारतात.

श्री. के. क्षी. यांच्या भाषाशैलीसंबधी काही निरीक्षणे येथे नोंदवणे उचित ठरेल. 'सावरकरी सोटा', 'दांडगेश्वर नीति', महमंद तुघलकी उद्योग', 'रघुवीरी मारा', 'बाजीरावी कल्पना', 'डॉन क्विक्झोटी उपद्व्याप' इ. सारखी व्यक्तीनामांवर तयार केलेली सार्थ विशेषणे वापरण्याची त्यांची लकब असल्यामुळे त्यांच्या भाषेला एक आगळीच धार येते. चिरपरिचित शब्दांचा किंवा शब्दसमूहांचा वेगळ्याच आशयवलयांत वापर करणे हे त्यांच्या शैलीचे खास वैशिष्ट्य होय. "इंग्रजीच्या बेडीतून मुक्त होण्याचा मार्ग मराठीच्या अध्ययनाला इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाची जोड देणे हा खरा 'विरोधविकास'" - अशा विधानाचा हा मासला त्यासाठी पहावा; इंग्रज गेल्याबरोबर इंग्रजी गेली असे काही काळ वाटत असतानाच इंग्रजीचे भूत कायमचे माथी बसले हे सांगताना ते "The King is dead. Long live the King." असा समर्पक दाखला देतात. 'इंग्रजीला उलटी बढती' अथवा "भाषाशुद्धीची अनौरस संतती' यांसारखे विरोधाभासी वाक्प्रयोगही मधूनमधून आढळतात. "Style is the man' या सुप्रसिद्ध वचनात थोडासा बदल करून 'Style belies the man' असा एकदम विरोधी निष्कर्ष ते काढतात, तेव्हा तर आपल्याला श्री. के. क्षी. यांच्या विलक्षण बुद्धीचे खरोखरी कौतुक वाटते. 'Voice production' याला त्यांनी दिलेला 'स्वरोद्गारपद्धति ' हा प्रतिशब्द म्हणजे परिभाषा कशी असावी याचे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाषिक विकृतीची चिकित्सा करताना त्यांनी माधव जूलियन, स्वा. सावरकर किंवा डॉ. रघुवीर यांच्यासारख्या मान्यवरांच्या विचारसरणीवर घणाघाती हल्ले चढवले तरी, त्याला कुत्सित व्यक्तिगत टीकेचे स्वरूप येऊ दिले नाही. उलट, त्यांच्या स्वभाषेच्या तळमळीबद्दल त्यांनी गौरवोद्गारच काढले आहेत. 'भाषेवर होणारे अंतर्गत आक्रमण' व 'भाषा-विकास परिषदेचे संस्कारचित्रण' हे लेख त्यासाठी पाहावेत. सावरकरांच्या भाषणशैलीवर टीका करताना त्यांची उत्कटता, कळकळ व ओजस्विता त्यांनी नाकारलेली नाही. इंग्रजी शब्दांवर बहिष्कार पुकारणाऱ्या सावरकरांच्या नावामागे 'बॅरिस्टर' पदवीपेक्षा 'देशभक्त' हे बिरूद अधिक शोभेल असे म्हणून श्री. के. क्षी. यांनी मोठ्या खुबीने प्रतीपक्षाचे खंडन व मंडन करीत एकाच दगडात दोन पक्षी मारले आहेत. साने गुरुजींचा 'आंतरभारती' हा शब्दही श्री. के. क्षी. यांना तितकासा रुचला नाही तरी 'आंतरभारतीचा उपक्रम' मात्र त्यांना स्वागतार्ह वाटतो. हा दिलदारपणा त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचा विशेष आहे. विचारांचा मुकाबला वैचारिक पातळीवरच करायचा असतो, कमरेखाली वार करून नव्हे, हा शिरस्ता श्री. के. क्षी. यांनी आयुष्यभर पाळला.

अनुक्रमणिका

त्याबरोबर, ‘अप्रिय असले तरी सत्य व पथ्यकर असेल तेच बोलणार’, ही श्री. के. क्षी. यांची प्रतिज्ञा असल्याने ते काही बाबतीत अप्रिय झाले. ‘अप्रियस्य च पथ्यस वक्ता श्रोता च दुर्लभः’ अशा दुर्मिळ व्यक्तींपैकी ते एक होते. त्यांचा युक्तिवाद बिनतोड असल्याने त्याला तर्कसंगत उत्तर देण्याऐवजी त्यांना अनुल्लेखाने मारण्याचा प्रयत्न काही काळ चालला . पण त्यालाही श्री. के. क्षी. यांनी आपले मरणोत्तर उत्तर आधीच देऊन ठेवले आहे.

“कब आप खाक में मुझको मिला नही सकते ?
मेरे गुबार को लेकिन दबा नहीं सकते !”

“आपण मला मातीत मिळवू शकत नाही असे थोडेच आहे !.. पण माझी माती फिरून उठू लागल्यास मात्र तुम्ही तिला खाली दडपू शकणार नाही !” ही त्यांना खात्री होतीच.

-सत्त्वशीला सामंत
९, यशोदा कुंज, कोथरूड,
पुणे ४११०२९

अनुक्रमणिका

१. भाषेवर होणारे अंतर्गत आक्रमण

वाङ्मयप्रेमी बंधू-भगिनींनो,

आपल्या या सुप्रसिद्ध परिषदेच्या चौदाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी माझी निवड करून आपण माझा मोठा बहुमान केला आहे, हे तर खरेच. पण आपल्या या उदार गुणग्राहकतेबद्दल आपले आभार मानण्याच्याही आधी माझ्या डोळ्यांपुढे या कामगिरीचा बिकटपणा उभा राहिल्याखेरीज राहत नाही. एक तर बडोद्याच्या वाङ्मयपरिषदेचे अध्यक्षपद स्वीकारणे हे इतर कुठल्याही ठिकाणच्या परिषदेचे अध्यक्षपद पत्करण्याहून एका अर्थी अभिमानास्पद आहे, तसेच ते बिकाटही आहे. अनेक विद्या व कला यांचे माहेरघर म्हणून बडोद्याचा लौकिक गेली पन्नास वर्षे महाराष्ट्र व गुजरात या दोन प्रांतातच नव्हे, तर उभ्या हिंदुस्थानात दुमदुमत आहे. विश्वामित्रीच्या काठच्या या सुंदर नगरीत भारतातील दोन सुंदर आणि संपन्न भाषांचा आधीच प्रीतिसंगम झालेला. त्यातच कै. सयाजीराव महाराजांसारख्या रत्नपारखी अधिपतींची राजवट या शहराच्या सुदैवाने त्याला दीर्घकाल लाभलेली . त्यामुळे विद्या आणि कला यांच्या विकासाला गेली कित्येक वर्षे या शहरात जेवढी अनुकूलता होती, तेवढी पश्चिम भारतातील कोणत्याही एका शहरात आढळली असती असे वाटत नाही. व्यक्तीशः मी श्रीमंत सयाजीराव यांना अर्वाचीन महाराष्ट्रातील व भारतातील एक अत्यंत कर्तबगार राज्यकर्ते आणि दूरदर्शी समाजनेते या नात्याने फार मानीत असल्याने, त्यांच्या हातांनी वाढलेले शहर म्हणूनही मला या नागरीविषयी आदर व धाक वाटला असता. पण या शहराशी माझ्या पिढीचे आणि माझ्या रुचीचे लोक इतरही कारणांनी निबद्ध आहेत. माझा ज्यांच्याशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आला व जे आपल्या काव्यांनी महाराष्ट्राच्या भावी काळातील प्रत्येक तरुण पिढीचे लाडके कवी राहतील, त्या कै. माधवराव पटवर्धनांचे बालपण याच ठिकाणी व्यतीत झाले. याच राजवटीचे राजकवी, कविवर्य चंद्रशेखर, माधवरावांच्या कोवळ्या काव्यांकुराला प्रेमळ उत्तेजन देते झाले. याच बडोद्यात त्यांना श्रीपतराव शिंदे, विठ्ठलराव घाटे यांच्यासारखे दिलदार मराठा गडी बाळमित्र म्हणून लाभल्याने, प्रेमाच्या संजीवक सामर्थ्यावर त्यांचा अढळ विश्वास बसला; व उत्तरायुष्यातील अनेक विपरीत अनुभवांनीही ते अलीकडच्या कित्येक कवींप्रमाणे भावनाद्वेष्टे झाले नाहीत. याच नगरात अगदी निकृष्ट नोकरीत रखडणारे कविवर्य चन्द्रशेखरांसारखे झाकले माणिक, अचूक नजरेने हेरून राजकविपदावर भूषविले गेले .....

व्यक्तीशः मी वाङ्मयाचा आस्वाद व पुरस्कार हेच वाङ्मय परिषदांचे मुख्य कार्य असे समजतो.तसेच वाङ्मय परिषदेच्या दृष्टीने 'वाङ्मय' म्हणजे ललित वाङ्मयच, असेही मी अनेकवार प्रतिपादिले आहे. या दृष्टीने पाहता ज्या क्षेत्रांशी माझा स्वतःचा निकटचा संबंध आहे, ते म्हणजे टीकावाङ्मयाचे क्षेत्रही, दुय्यम क्षेत्र होय; व या अर्थाने, मी स्वतःला दुय्यम क्षेत्रात काम करणारा साहित्यिक समजतो, हेही मी पूर्वी एका रेडीओ व्याख्यानमालेच्या प्रसंगी स्पष्ट सांगितलेले आहे व या गौणप्रधानभावाप्रमाणे पाहता, भाषाशास्त्राचा आणि व्याकरणाचा तर अशा परिषदांशी त्याहूनही अप्रत्यक्ष व दूरचा संबंध आहे असे मी मानतो आणि मराठी-कानडी जिल्ह्यांच्या अगर मराठी-गुजराती जिल्ह्यांच्या सरहद्दींचे तंटे तोडणे हे काम तर साहित्यिकांचे नसून कायदेमंडळांतील सभासदांचे आहे असे माझे स्पष्ट मत आहे. तथापि ज्या ललित वाङ्मयाच्या आणि विशेषतः काव्याच्या, सौंदर्य-परीक्षेला मी अग्रस्थान देतो, तिला आजच्या माझ्या भाषणात मात्र मला अग्रस्थान द्यावेसे वाटत नाही. आज मलाही इतर वाङ्मयसेवकांप्रमाणे भाषेवरील आक्रमणाचाच प्रश्न अधिक अस्वस्थ करून सोडीत आहे, हे प्रथमच सांगून टाकले पाहिजे.

अनुक्रमणिका

पण मला त्रस्त करणारे आक्रमण हे तालुक्यांच्या सरहद्दींवरील स्थूल आक्रमण नसून शब्दांच्या, वाक्प्रचारांच्या आणि वाक्यरचनेच्या अंगाशी अविनीत अतिप्रसंग करणारे सूक्ष्म आणि अंतर्गत अतिक्रमण आहे. या दृष्टीने पाहता, मी आज मराठी भाषेच्या अस्तित्वाचाच प्रश्न प्रथम विचारार्थ आपल्यापुढे मांडणार आहे, असे म्हटले तरी चालेल.

या प्रश्नाचा विचार इतिहासाचार्य राजवाडे, ज्ञानकोशकार केतकर, देशभक्त सावरकर आणि प्रो. माधवराव पटवर्धन यांनी आपल्या दृष्टीने १८९२ सालापासून पुढे अनेक प्रसंगी मोठ्या आवेशाने आणि पांडित्याने प्रतिपादिला आहे. या विद्वानांनी भाषेच्या आणि समाजाच्या स्थितीचे मंथन करून काढलेले सिद्धांत, गेली पंचवीस वर्षे अनेक लेखकांच्या लेखांचे आणि अध्यक्षांच्या भाषणांचे जणू आधारस्तंभ बनलेले आहेत. कोर्टकचेऱ्या, टपाल, रेल्वेप्रवास वगैरेंचे व्यवहार आपण इंग्रजीतून करतो, एवढेच नव्हे तर खाजगी पत्रेही इंग्रजीतून लिहितो, त्या अर्थी आपली भाषा मरणार असा राजवाड्यांचा अशुभ अंदाज होता. भाषेतील व्यवहाराचे क्षेत्र वाढण्याकरिता, स्वराज्य व स्वातंत्र्य मिळवणे हाच एक इलाज आहे, यावर राजवाडे व केतकर यांचे एकमत होते. इंग्रजी शब्दांवर बहिष्कार घालणे, रूढ अरबी-फारसी शब्द खणून काढणे व या द्विविध बहिष्काराकरीता सामुग्री म्हणून लागतील तेवढे संस्कृत शब्द तयार करणे हा सावरकर-पटवर्धानांचा कार्यक्रम होता.

या चार असामान्य बुद्धीच्या आणि नेटाच्या देशभक्तांनी केलेले रोगनिदान आणि औषधयोजना सशास्त्र की अशास्त्र, उपयोगी की निरुपयोगी हे ठरविण्याला आता भरपूर साधने उपलब्ध आहेत. इंग्रजी शिक्षणच नव्हे तर परदेशी-पदव्याही मिळवून आल्यानंतर नैष्ठिकपणे मराठीतून पत्रव्यवहार करणारे अनेक विद्वान आज दिसत आहेत. काही तर केंब्रिज येथील पदवी लावून मोडीतून पत्रव्यवहार करतात आणि अशा प्रकरणी आपल्याहून कमी दक्ष असलेल्या लोकांना खजील करतात. कित्येक संस्था आज आपला कारभार मराठीतूनच करीत आहेत व कायदेमंडळातही मराठीतून भाषणे करणारे नामदार आहेत. सर्वांत महत्त्वाची आणि पूर्वीच्या विद्वानांना सर्वांत लांबची वाटणारी गोष्ट जी राजकीय स्वतंत्रता, तीही आज हस्तगत झालेली आहे. इंग्रजी व फारसी शब्दांच्या उच्चाटनाकरता जन्माला घातलेल्या शुद्ध संस्कृत शब्दांची संख्या तर आज हजारांनी मोजावी लागेल. राजवाड्यांपासून पटवर्धनांपर्यंत विद्वानांना ज्या आपत्तीची भीती वाटत होती, ती जरी एका दिवसात टळणारी नसली, तरी ती आता बरीच दूर गेलेली असेल असे मानण्यास वरील परिस्थितीत खूपच जागा आहे व म्हणूनच पंचवीस वर्षांपूर्वी मराठी भाषेचे मुख दिसत होते, त्याहून ते आज थोडे कमी मलिन दिसत असणार अशी आशा केल्यास, ती वावगी होणार नाही. पण वस्तुस्थिती तशीच आहे का? तोच प्रश्न तर मी विवेचनाकरता प्रथम घेतलेला आहे.

पण आजची स्थिती तपासण्यापूर्वी पूर्वीच्या सांस्कृतिक पुढाऱ्यांनी केलेले रोगनिदान अचूक होते किंवा कसे, हे पाहिले पाहिजे.

इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारानंतर सुशिक्षितांच्या खाजगी व्यवहारात इंग्रजी शब्दांचा व भाषेचा बराच भर असला, तरी मुसलमानी अमदानीत व मराठेशाहीत, लिखित गद्यात जसे परकीय राज्यकर्त्यांच्या भाषेतील शब्द बेसुमार शिरले, तसे ते इंग्रजी अमलात शिरले नाहीत. इंग्रजीत खाजगी पत्रव्यवहार करणारे चिपळूणकर-टिळक हे वाङ्मयात अत्यंत शुद्ध मराठी लिहीत. टिळक अत्यंत शुद्ध व सुगम मराठीत वक्तृत्वही करीत. त्यांच्या खाजगी संभाषणातील आणि पत्रव्यवहारातील इंग्रजी, आज केवळ मनोरंजक आठवणीपुरतेच शिल्लक आहे. अर्थात त्यासंबंधी राजवाडे व सावरकर यांच्यासारख्यांनी केलेला गवगवा,

मराठी भाषेच्या स्थैर्याच्या दृष्टीने सर्वस्वी अप्रस्तुत होता हे उघड आहे. या उलट आजच्या पिढीतील कित्येक प्रसिद्ध साहित्यिक व विद्वान 'व्रत' म्हणून मराठीतून पत्रव्यवहार करतात, एवढ्यावरून त्यांच्या लेखनातील मराठी भाषा अधिक शुद्ध असेल, अशी अपेक्षा करणेही बरोबर ठरणार नाही. कै. राजवाडे यांनी पुण्याच्या 'नूतन मराठी विद्यालय हायस्कूल' (?) च्या पंचवीस वर्षांपूर्वीच्या निमंत्रण-पत्रिकेतील एकूण सत्त्याऐंशी शब्दांपैकी अठ्ठावन्न इंग्रजी शब्द मोजून दाखविले होते. अर्थात या चिपळूणकाराभिमानी संस्थेने 'विद्यालय हायस्कूल' या शब्दप्रयोगापासूनच हास्यास्पद भ्रष्टाकाराला सुरुवात केली आहे, हे मलाही मान्य आहे. पण आज एकही इंग्रजी शब्द न वापरता पत्रव्यवहार कारणारे तरुण साहित्यिक जेव्हा पत्राच्या पत्त्यावर कित्येकदा

'प्रति –
प्राध्यापक क्षीरसागर'

यासारखे 'शुद्ध' मराठी लिहितात, तेव्हा मला ५८/८७ इंग्रजी शब्द असलेली निमंत्रणपत्रिका येण्याहूनही अधिक दुःख होते ! सारांश, "व्यक्ती व संस्था यांचा व्यवहार मराठीतून चालला आहे ना ? मग भाषेची 'तब्येत' ठीक आहे." असे म्हणण्यात मोठीच चूक होत आहे व या चुकीचे मूळ राजवाडे, सावरकर, पटवर्धन यांच्या शाब्दिक शुद्धीच्या आग्रहात आहे.

भाषा जिवंत व वाढती राखण्याचा आणखी एक इलाज म्हणजे स्वातंत्र्य संपादन, या बाबतीत कोणाचेच दुमत नाही. पण आज जगाचा व्यवहार इतका गुंतागुंतीचा झाला आहे की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आणि आपले व्यवहार आपल्या भाषेत चालविण्याचे ठरविल्यावरही, भाषेची शुद्धता राखण्याकरता त्याखेरीज इतर काही करण्याची गरज नाही अशी कल्पना असेल, तर ती चूक आहे व आज अनुभव तोच येत आहे.

आज बरेच राष्ट्रीय, राजकीय व सामाजिक व्यवहार देशी भाषांतून चालत आहेत; (आजही सर्वच तसे चालत आहेत असे नाही; पण याचा अर्थच हा की, हे व्यवहार इंग्रजीतून चालण्याचा आणि इंग्रजी राज्याचा तितकासा संबंध नव्हता.) व या दृष्टीने पाहता, राजवाडे केतकर, पोतदार यांना हवा असलेला भाषिक व्यवहाराचा विस्तार आज अंशतः तरी झालेला आहे. केतकरांना हवे असलेले बहुजन-समाजाचे शिक्षणही आज वाढीला लागले आहे. ज्यांना ज्ञानाची व वाङ्मयानंदाची भूक मराठीखेरीज अन्य भाषांतून भागविता येत नाही असा बहुजनवर्गीय वाचकवर्गही आज वाढलेला आहे. वाचकांची मागणी पाहून लिहिणारे लेखकही, केतकरांच्या इच्छेनुरूप वाढत आहेत आणि तरीही आज मराठी भाषा राजवाडे-केतकरांच्या वेळेहूनही मरणाच्या अधिक सन्निध आहे, असे मला वाटते.

राजवाडे यांनी मराठी भाषेला चार 'महारोग' लागल्याचे निदान केले होते व त्यांचे निवारण केल्याखेरीज तिचा मृत्यू टळत नाही असे म्हटले होते. मला स्वत: ला राजवाडे यांनी वापरलेला अभद्र शब्द मान्य नाही. तथापि त्या शब्दाने नकळत मराठीची भावी विकृती सूचित केली होती, हे खास! कारण महारोगाचा संबंध मरणाहून विद्रूपतेशी आणि विच्छिन्नतेशीच अधिक असतो. आज मराठी भाषेला जर कशाची भीती असेल तर ती मरणापेक्षा विद्रूपतेची आणि दुर्बलतेचीच अधिक आहे.

अनुक्रमणिका

आणि दुर्दैवाचा निष्ठुर खेळ तो हा की, तिच्या व्यवहाराचा आणि वाङ्मयाचा विकास हेच तिच्या विद्रूप विकृतीचे कारण ठरत आहे! माझ्या या निराशेच्या सुराचा अर्थ समजावून घ्यायचा असेल, तर मासिकांची वाढती संख्या, ग्रंथांची तिरंगी वेष्टने, वृत्तपत्रांचा प्रचंड खप आणि नवीन शब्दांची अखंड टांकसाळ एवढ्या बाह्य आणि संख्यात्मक पैदाशीकडे पाहून चालणार नाही. या सर्व भरपूर पिकांत निकोप वाढीची बीजे किती, आणि क्षयाची बीजे किती याचा विचार होणे जरूर आहे.

मराठी शब्दांच्या लेखनात, उपयोगात व नवनिर्मितीत आज अज्ञान, बेजबाबदारपणा आणि अशुद्धता यांचे जे निरंकुश राज्य दिसून येते, त्याकडे पाहिले, म्हणजे केवळ परकीय राज्यकर्त्यांच्या भाषेतील शब्द टाळणे आणि स्वभाषेतील व्यवहाराचे क्षेत्र वाढविणे, हे उपाय पुरेसे नाहीत हे दिसून येईल. मी अलीकडे लेखात, व्याख्यानात व साहित्यसंमेलनात या बेबंद राज्याच्या ज्या एकाच प्रांताचा उल्लेख पुन:पुन्हा केला होता, तो प्रांत म्हणजे वृत्तपत्रांचा. वृत्तपत्रांत घाईमुळे आणि नावीन्य-प्रेमामुळे दररोज शेकडो प्रकारच्या चुका होतात; तसेच इतर कुठल्याही वाङ्मयापेक्षा वृत्तपत्रांचे वाचन सर्व वर्गांच्या लोकांकडून नियमाने होत असल्याने, त्या चुकांचा प्रसार अधिक होतो, हा माझ्या अलीकडच्या प्रतिपादनाचा रोख होता. अलीकडे पुण्यामुंबईच्या दैनिकांत एक वार्ता प्रसिद्ध झाली आहे. एका विवाहित स्त्रीचा ताबा मागण्यासंबंधीच्या सोलापूरच्या खटल्याची ती वार्ता आहे.तिजमध्ये पुढील शब्दप्रयोग आहे : "आणि उर्वरित तरुणीस पोलिसांनी ज्या ठिकाणाहून नेले त्या ठिकाणी आणून पतीच्या स्वाधीन करावे," या वार्तेतील बाकीचे शब्द कदाचित मागेपुढे झाले असतील, पण 'उर्वरित तरुणीस' हे शब्द त्यात होते हे खास, 'उर्वरित' हा शब्द त्या ठिकाणी 'उपरिनिर्दिष्ट' या अर्थी त्या सोलापूरकर बातमीदारानेच वापरला असेल किंवा मुंबईच्या कचेरीतील उपसंपादकाने "A and the said lady..."या तारेतील शब्दांचे प्रौढ मराठीकरण करण्याचा यत्न केला असेल! त्याच सुमारास पुण्याच्या एका साप्ताहिकात 'अंतर्मुख जीवन' या ऐवजी 'अंतर्भुख जीवन' असा शब्द प्रयोग एका संपूर्ण लेखात अनेकदा केला होता. घाईत असलेल्या आमच्या तरुण लेखकांना हे अवजड शब्द पेलत तरी नसावेत, नाही तर 'एकेका शब्दाकडे इतके निरखून पाहणे हे रिकामटेकड्या साहित्यिकांचे काम होय, ते आम्हा पराक्रमी राजकीय चळवळ्यांचे काम नव्हे' अशी तरी त्यांनी भूमिका घेतली असली पाहिजे.

आजकालच्या वृत्तपत्रांतील अशुद्ध अगर अर्थशून्य शब्दांसंबंधी मी जेव्हा हाकाटी करतो, तेव्हा माझी तक्रार केवळ व्याकरण-शुद्धतेची असते असे नाही; -केवळ राजकीय बहिष्काराची तर ती दृष्टी नसतेच. माझी हाकाटी अर्थशून्य आणि बोजड शब्द वापरण्याच्या बौद्धिक विकृतीसंबंधी आहे. बोजड शब्द शुद्ध स्वरूपात वापरले तरीही मी ती एक आपत्ती समजतो. कारण भाषा तुम्ही जितकी कृत्रिम आणि पंडिती बनवाल तितकी ती बहुजन सामाजापासून दूर जाईल; इतकेच नव्हे,तर मूळच्या निकोप प्रकृतीलाही मुकेल. गेल्या पंचवीस वर्षांत —म्हणजे भाषाशुध्दीच्या आग्रहामुळे अनधिकारी व्यक्तींनाही शब्दनिर्मिती सनद मिळाल्यापासून- मराठी शब्दसंग्रहात फार मोठी पडली आहे व या दृष्टीने पाहता, भाषेची वाढ झाली आहे. पण शब्दांची शुध्द रूपे, शुध्द उच्चार यांची हानी झाली आहे आणि वापरलेले शब्द ज्यांना समजतात, अशा वाचकांची संख्या कमी झालेली आहे. शब्दांची संख्या वाढली आणि भाषेची सुबोधता कमी झाली,तर भाषेत वाढ झाली असे मी म्हणू शकत नाही. पूर्वीच्या वृत्तपत्रात एका वर्षांत वीस नवीन बनविलेले शब्द वापरावे लागत असले आणि आजच्या वृत्तपत्रात एका दिवसात वीस नवीन शब्द बनविले जात असले, तर आजची वृत्तपत्रे एका अर्थाने भाषेत भर घालीत आहेत असे म्हणाता आले असते. पण पूर्वीच्या शब्दांपैकी जर शेकडा नव्वद शब्द सामान्य वाचकांच्या परिचयाचे असतील,आणि आजच्या शब्दांपैकी शेकडा साठ शब्द अपरिचित व अशुध्द असतील, तर ती भर आहे असे म्हणणे कठीण जाईल. सिनेमाच्या क्षुल्लक वार्तासंग्रहात

'एकमेव चित्रवितरक' (Sole distributor) यांसारखे जाडजूड शब्द असले, तर ते केवळ शास्त्रज्ञांकरिता अगर पंडितांकरिता आहेत असे समर्थन खासच करता येणार नाही. 'बौद्धिक', 'सामरिक', 'नौदल', 'सांसदिक', 'विधेयक', 'अवैध', 'दग्धभू धोरण' यासारखे शब्द दैनिकाच्या रात्रपाळीत पेंगता पेंगता वापरावे व बनवावेही लागत आहेत व सकाळी चहाबरोबर पडल्या पडल्या वाचले जात आहेत. नवीन शब्द बनविणे आणि तेही प्रगल्भ पाश्च्यात्य भाषांतील शब्दांना प्रतिशब्द म्हणून बनविणे ही इतकी सोपी अगर क्षुल्लक गोष्ट खास नाही की, जी तरुण उपसंपादकांना पेंगता पेंगता करता यावी! किंबहुना ती केवळ पंडितांनी कोश हाताशी घेऊन करण्याचीही गोष्ट नव्हे. स्वभाषेच्या प्रकृतीचे सूक्ष्म ज्ञान, परभाषेतील शब्दांचे भाषांतर करायचे तिचे सूक्ष्म ज्ञान, वाचकांना सुबोध अर्थप्रतीती करून देण्याची तळमळ व योग्य स्थळी योग्य शब्द सुचण्याइतपत भाषाप्रभुत्व, इतक्या गोष्टी एकत्र असतील, तरच स्वभाषेची विटंबना आणि सामान्य वाचकांचे हाल न करता, नवे शब्द योजता येतील. आज 'अद्यावत' 'नेत्रदीपक', 'उपभारत मंत्री' यासारखे अशुध्द व अर्थशून्य शब्द शेकड्यांनी बाहेर पडत आहेत; व इंग्रजी शब्द मराठीत वापरून ती भ्रष्ट होण्याचा प्रसंग टळला' एवढ्या आनंदाप्रीत्यर्थ ते खपवून घेतले जात आहेत.

'अपटुडेट' हा इंग्रजी शब्द टाळण्याचे सत्कृत्य साधते म्हणून व शिवाय सावरकरांसारख्या थोर देशभक्ताने आणि प्रतिभावंत साहित्यिकाने तयार केलेला शब्द वापरायचा म्हणून, मराठी वृत्तपत्रांनी 'अद्यावत' हा शब्द, सुमारे वीस वर्षे वापरला. अखेर सावरकरांच्या एका उताऱ्यातून मुंबई विद्यापीठाच्या पाठ्यपुस्तकात तो शब्द छापण्याची वेळ आली व मग कंसात 'अद्ययावत' हे शुध्द रूप देणे भाग पडले!

मराठी भाषा वापरातून जाऊन आपण गोव्यातील, सीलोनमधील अगर फिजी बेटांतील अशिक्षितांच्या भाषेसारखी भ्रष्ट इंग्रजीमिश्रित भाषा बोलू लागणार, अशी राजवाडयांना भीती पडली होती. सुशिक्षितांचे काम इंग्रजी ग्रंथ व वृत्तपत्रे यांवर भागत असल्यामुळे मराठी वाङ्मयाचाच ग्रंथ आटोपेल, अशी केतकरांना भीती पडली होती. पण या दोन्ही भीती आज खोट्या ठरल्या आहेत. ज्यात एकही इंग्रजी शब्द नाही, असे वाङ्मय आजही निर्माण होत आहे. पण ते वाङ्मय जर वर निर्देशिलेल्या भ्रष्ट व दुर्बोध शब्दसंग्रहाने भरलेले असेल तर ती भाषेची वाढ अगर शुध्दता म्हणण्याला मी तयार नाही; इतकेच नव्हे तर अशा विद्रूप शब्दांनी बनलेल्या मराठीला मी मराठीही म्हणण्यास तयार नाही.

प्रत्येक इंग्रजी शब्दाला मराठी प्रतिशब्द बनविण्याचा हट्ट सोडला पाहिजे; दीर्घकाळ रूढ असलेल्या फारसी शब्दांना पंडिती संस्कृत प्रतिशब्द बनविणे बंद केले पाहिजे; सोपेपणाखातर क्वचित इंग्रजी शब्दही घेतले पाहिजेत. हायकोर्ट, कौन्सिल, स्टेशन यांसारखे शब्द अशिक्षितांपर्यंत पोचले आहेत, त्यांचे बोजड भाषांतर करण्याचे बंद केले पाहिजे. क्वचित प्रतिशब्दाचा नाद सोडून कल्पनाविस्तारही केला पाहिजे. De-mobilization की (De-militarization) चे भाषांतर 'निर्लष्करीकरण' असे केलेले मी अनेक ठिकाणी ('केसरी'तही!) वाचले आहे! अशा ठिकाणी मूळ इंग्रजी शब्दच बोजड आहे हे लक्षात घेऊन, 'नामाला नाम' तयार करण्याचा नाद सोडावा; व चारदोन शब्दांत अर्थ सांगावा. पण प्रत्येक इंग्रजी शब्दाला प्रतिशब्द बनविण्याचा हव्यास आणि अनधिकारी व्यक्तींनाही शब्द तयार करण्याची मिळालेली मुभा, एवढेच या रोगाचे मूळ नाही. हिंदी, बंगाली-गुजराती या भगिनी-भाषांतील शब्द मराठीत वापरून सर्व भारतीय भाषांचे ऐक्य साधायचे, ही भूमिकाही आज मोकाट सुटलेल्या पंडिती शब्दनिर्मितीच्या बुडाशी आहे. 'कादंबरी' हा सुंदर शब्द टाकून 'उपन्यास' वापरणे; 'आपला' हा आपला शब्द टाकून 'भवदीय' किंवा 'सेवेत' हा शब्द पत्राच्या खाली वापरणे ; 'नामांकित' हा कर्णमधुर आणि इतिहास प्रसिद्ध शब्द एकदाही न वापरता 'ख्यातनाम' अगर 'स्वनामधन्य' हे शब्द वापरणे, या सर्व प्रकारांच्या मुळाशी हिच प्रवृत्ती आहे. आज

प्रत्येकजण प्रांतिक भाषांचे ऐक्य करण्याच्या जाणिवेनेच; मूळचे परिचित शब्द टाकून हे अपरिचित व बोजड शब्द वापरीत आहे असे नव्हे; काही जण केवळ अनुकरण म्हणूनही ते वापरीत आहेत! पण मूळ प्रारंभ करणारांनी मात्र सर्व देशाला एक भाषा उपलब्ध करून देण्याची चतुर योजना म्हणूनच हे शब्द पत्करले. 'उत्तरदायित्व', 'हार्दिक' 'साहित्यिक' हे शब्द या प्रवृत्तीमुळेच अन्य प्रांतिक भाषांतून उचलण्यात आले आहेत.

पण यात केवळ काही बोजड शब्दांची भर पडत आहे हाच काय तो तोटा नाही. मराठीतील रूढ शब्द-प्रयोगांची या चळवळीत उघड उघड पायमल्ली होत आहे. 'केसरी' सारख्या दीर्घ परंपरेच्या पत्राने हिंदीच्या अनुकरणाने 'स्वर्गीय मालवीयजी' किंवा 'स्वर्गीय गांधीजी' असा प्रयोग करणे म्हणजे भाषेविरुद्ध गुन्हा आहे. मराठीत स्वर्गीय याचा अर्थ 'स्वर्गस्थ' असा नाही आणि 'स्वर्गस्थ' या शब्दाला 'कैलासवासी', 'वैकुंठवासी' व 'परलोकवासी' हे तीन शब्द अनेक पिढ्या रूढ आहेत.

दुसरा 'श्रीमती' शब्द घ्या. गंगाभागीरथी या शब्दाने केशवपनाचे दुष्ट स्मरण होऊन रानड्यांच्या पिढीतील सुधारकांच्या दाक्षिण्याला असह्य वेदना होऊ लागल्या; व म्हणून विधवा स्त्रियांच्या नावामागे 'श्रीमती' हे उपपद घालावयाचे ठरले. सधवा स्त्रियांच्या नावामागे तर 'सौभाग्यवती' हे कर्णमधुर व मंगल विशेषण महाराष्ट्रात अनेक शतके रूढ आहे. पण आज भाषेचे ऐक्य करण्याच्या नावाखाली हे विधवांच्या मागील उपपद, सधवांच्या मागे लागत आहे! तीस कोटी प्रजेला एक भाषेचे सौभाग्य केव्हा लाभेल तेव्हा लाभो; आज महाराष्ट्रीय सौभाग्यवतींच्या सौभाग्यावर मात्र भाषेच्या क्षेत्रात घाला आहे खरा! 'श्रीयुत' या मामुली मायन्यातील उपपदाऐवजी नुसते 'श्री' हे पूज्यभावदर्शक उपपद वापरण्याचा प्रमादही हिंदीच आहे! (उदा.श्रीगजानन, श्रीअरविंद यांबरोबरच श्रीनेहरू, श्रीगाडगीळ असे म्हणणे!)

बहुजनसमाज आज अधिकाधिक वाचू लागला आहे.त्याने वाचण्यासारखे शेकडो सुबोध, ज्ञानवर्धक, आनंदवर्धक ग्रंथ मराठीत उपलब्ध आहेत. पण तुकारामांचे अभंग, रामदासांचा दासबोध, चिटणिशी बखरी, टिळक-आगरकरांचे लेख, हरिभाऊंच्या कादंबऱ्या, केलुसकरांचे शिवाजीचरित्र, चिंतामणराव वैद्यांचे कृष्णचरित्र यांसारखी सर्वसामान्य आणि सुबोध मराठी पुस्तके वाचून सुसंस्कृत होऊ पाहणारा वाचकवर्ग, जेव्हा आजचे वाङ्मय हाती घेतो तेव्हा राष्ट्रभाषा निर्माण करण्याच्या धांदलीत त्याला स्वयंभाषेतील सौभाग्यवतीची 'श्रीमती' झालेली आढळते; आज तिचे 'स्वर्गीय' सौंदर्य म्हणजे मेलेले सौंदर्य की काय अशी शंका पडते!

आणि इतर बाबतीत राजवाड्यांचे अंदाज कितीही चुकले असले तरी एवढ्या बाबतीत मात्र त्यांनी योग्य इशारा दिलेला होता हे कबूल केले पाहिजे. बलुचिस्तानपासून मलायापर्यंत आणि बुखाऱ्यापासून कोलंबोपर्यंत, जेवढे देश इंग्रज जिंकतील तेवढ्या सगळ्यांची एक भाषा करण्याची 'महंमद तुघलकी' योजना करू नका, असा इशारा त्यांनी दिलेला होता. आज आपण त्यांचा इशारा विसरून तोच खुळेपणा करीत आहोत.

आपण रेडिओ लावून बसलो, तर आपणांला हिंदी, गुजराती, बंगाली बातम्या व भाषणे तर समजतातच, पण तेलगु-कानडी वार्ताही स्थूलमानाने ध्यानात येतात, पण त्याचे कारण आपले थोडेफार संस्कृतचे अध्ययन झालेले असते हेच आहे. परंतु सर्व भाषांचा शब्दसंग्रह एक करायचा म्हटल्यास, बाकीच्या भाषांचे कल्याण होईल की अकल्याण होईल मला माहीत नाही; मराठीचे आणि माझ्या

अल्पमतीप्रमाणे-गुजरातीचेही अकल्याण होईल. कारण मराठी व गुजराती यांच्या मानाने हिंदी व बंगाली या भाषा फाजील संस्कृत-प्रचुर व बोजड आहेत.(अलीकडेच बोजड केल्या गेल्या आहेत!)

मराठीतही संस्कृत शब्दांचा भरणा कमी नाही. पण ते प्रत्यक्ष व्यवहारात सहज शिरलेले, अनेक पिढ्या वापरात असलेले, सुगम असे शब्द आहेत. पण त्याच अर्थाचे आणि त्याहून बोजड असे हिंदी-बंगाली शब्द घेऊन अनेक भाषांचे ऐक्य साधण्यात, बहुजन समाजाचा व भाषेचा फायदा कितपत आहे, हा मुख्य प्रश्न आहे. या बाबतीत डॉ. केतकर यांनी एक महत्वाचा इशारा देऊन ठेवला आहे स्वभाषेत वाङ्मय वाढले नाही, तर इंग्रजी व संस्कृत शिकलेल्या उच्चवर्गीयांचे नुकसान होत नाही; कारण ते प्राधान्येकरून इंग्रजी व संस्कृत यांसारख्या अन्य भाषांवरच पोसलेले असतात. पण ज्यांना सराईतपणे वाचण्याइतपतच स्वभाषेचे शिक्षण आत्ता कुठे मिळत आहे, त्या मागासलेल्या वर्गाचे आणि स्त्रियांचे मात्र सर्वस्वी स्वभाषेवरच अवलंबून असल्याने नुकसान खास होते. डॉ. केतकरांच्या इशाऱ्यांतील हीच सामाजिक दृष्टी थोडी पुढे नेऊन मी असे म्हणेन की, ‘गैरकायदा’ या ऐवजी ‘अवैध’ म्हणण्याने, ‘लोकसभा’ म्हणण्यायाऐवजी ‘संसद’ म्हणण्याने अगर निवडणूक म्हणण्याऐवजी ‘निर्वाचन’ म्हणण्याने, इथे जमलेल्या विद्वानांसारख्यांचे काहीच नुकसान नसेल; पण लाखो अल्पशिक्षित देशबांधवांचे मात्र खास नुकसान आहे. शिवाय बोजडपणा येऊन भाषेचे कायमचे नुकसान होते ते वेगळेच.

पण हा प्रश्न फक्त हिंदी भाषेच्या नजीक जाण्याचा व चार पंडिती शब्द पत्करण्याचाच आहे असेही नाही. या सर्व सौद्यात बरेच अशुद्ध आणि अर्थशून्य शब्दही बिचाऱ्या बालबोध मराठीला (व बहुधा गुजरातीलाही) पत्करावे लागणार आहेत. महाराष्ट्रीय पंडितांची अगर पदवीधरांची तर गोष्टच नको, पण मराठी प्राथमिक शाळेतील शिक्षकही ‘राजनीतिक’ हे अशुद्ध रूप करणार नाहीत; पण पहिल्या दर्जाच्या हिंदी दैनिकात जाड मथळ्यात मी हा शब्द रोज वाचीत आहे! आणि ‘राजनैतिक’ असा एकदाही वाचू शकलेलो नाही. ‘महत्वपूर्ण परिवर्त्तन’ हे शब्द, हिंदी दैनिकांतील मथळ्यात ‘महत्वपूर्ण परिवर्त्तन’ असे छापलेले आढळतील. (शिवाय तेथे परिवर्तन हा शब्द मराठीतील अर्थाहून वेगळ्याच अर्थाने असेल.) ‘घनश्यामदास बिर्ला’ यात ‘घन:शाम’ असे विसर्गयुक्त लिहिलेले असेल. ‘शरच्चंद्र’ याऐवजी ‘शरश्चंद्र’ लिहिलेले असेल.

हे सर्व हिंदीत शुद्ध की अशुद्ध हे ठरविणे माझे काम नाही. पण जी एक गोष्ट मी भयावह मानतो, तिजकडे अद्याप वाङ्मय-व्यवसायी लोकांखेरीज इतरांचे कदाचित लक्षही गेले नसेल. ‘हिंदीच्या जवळ पोहोचणे म्हणजे एकराष्ट्रीयत्वाच्या जवळ पोहोचणे होय’ या कल्पनेने असो, की ‘भाषा म्हणजे पोरखेळाकरिता मोकळे मैदान’ या कल्पनेमुळे असो, पण आज मराठीत ‘घन:श्याम’, ‘शरश्चंद्र’ असे शेकडो वेळा छापलेले आढळेल; बाजारपेठेतील रंगीबेरंगी व अवाढव्य पाट्यांवर रंगवलेलेही आढळेल!

बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहचावे म्हणून संस्कृतच्या अध्ययनाला गौणस्थान देण्याचा उपक्रम आणि राष्ट्रभाषेच्या नावाखाली हिंदीचे अंध अनुकरण करण्याचा उपक्रम हे दोन्ही एकाच वेळी सुरु व्हावे हा एक अशुभ योगायोगच म्हटला पाहिजे. याची फळे अद्याप सुदैवाने आपल्यापैकी कित्येकांपर्यंत पोहोचली नसतील. पण मी जर त्यातील एकदोन सांगितली, तर आपण प्रथम भरपूर हसाल आणि त्यानंतर भाषेच्या भवितव्यासंबंधी चिंतातुर व्हाल!

अनुक्रमणिका

शाळांतून अर्धमागधी वगैरेसारख्या पळवाटांचा मिळेल तितका फायदा घेतल्यामुळे व अखेर सदोष छापलेले व निष्काळजीपणे वापरलेले जाडजूड शब्द भरपूर वाचल्यामुळे, आजचे तरुण किती विद्रूप मराठी लिहीत आहेत, त्याचे एक उदाहरण सांगतो. फर्स्ट इयर सायन्समधील एका विद्यार्थ्याने – 'शिवाजीच्या काळी महाराष्ट्र-भूमीवर यौवनांनी आक्रमण केले होते.' असे वाक्य लिहिलेले मी वाचले; तर त्याच्याही वरच्या वर्गातील म्हणजे इंटर-सायन्समधील विद्यार्थ्याने 'ती कॉलेजातील एक तरुणी होती; तिच्या अंगात यवनाने नुकताच प्रवेश केला होता' असे वाक्य लिहिले होते! शब्द-निर्मितीच्या व लिपिसुधारणेच्या आजच्या अराजकाने तरुण पिढीच्या डोक्यात असा गोंधळ झाला नाही तरच आश्चर्य!

'लेखनशुद्धी हे किरकोळ बाब होय' व वरीलसारख्या चुका फार तर अपक्व लेखकांच्या लिखाणात आढळणार, असे म्हणून कानाडोळा करणाऱ्यांनी, भाषेच्या घटनेशीच आज क्षणोक्षणी केवढा अविनय आचरला जात आहे ते पहावे. 'पश्चिम बंगाल' अगर 'उत्तर कोरिया' याऐवजी 'पश्चिमी बंगाल' व 'उत्तरी कोरिया' असा प्रयोग भाषा शुद्धीच्या नावाने टाहो फोडणारी हिंदुत्वनिष्ठ पत्रेही जाड ठशात वापरीत आहेत!

आणि हे मराठी अशुध्द आहे, इतकेच नव्हे तर ती मराठीची विटंबना आहे, असे म्हटल्यास त्या पत्रास ते समजणारही नाही! कारण 'पश्चिमी' हा शब्द इंग्रजी अगर फारसी असता, तरच त्यात काही अशुध्द! बाकी सर्व पावन होय! व शिवाय हिंदीत असेल तर ते रूप वापरायचे, एवढेच या प्रचारवादी लोकांना माहीत असते! यालाच आज भाषाभिमान असे मानतात! व यातच मराठीचे मरण आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, 'मश्रिकी' आणि 'मग्निबी' हे रूढ अरबी शब्द टाळण्याकरिता हिंदीने त्यांचे संस्कृत भाषांतर केले. 'पूर्व' हा शब्द विशेषण म्हणून हिंदीत रूढ नसल्याने म्हणा, की हिंदी शब्दसाधकांचे संस्कृतचे ज्ञान बेताचेच असल्यामुळे म्हणा, पण संस्कृतचे रूप फारसीच्या वळणावर तयार करण्यात आले, व मश्रिकी बंगालचे 'पूर्वी बंगाल' असे झाले! हिंदीने 'मश्रिकी' हा अरबी शब्द टाळण्याचे तरी पुण्य जोडले; पण 'उत्तरी कोरिया', पूर्वी बंगाल' हे शब्द मराठीत वापरणारांनी काय साधले?

हिंदीत 'उनकी पुस्तक ' असा स्त्रीलिंगी प्रयोग का?- तर फारसीत 'किताब' स्त्रीलिंगी म्हणून. हिंदीत बसन्तकी ऋतु आयी' असे का? तर अरबीत 'फस्ल' म्हणजे ऋतु हा शब्द स्त्रीलिंगी आहे म्हणून! फारसी-इंग्रजीवर बहिष्कार आणि हिंदी –बंगालीतून उसनवारी, या दुहेरी कार्यक्रमालाच भाषिक देशाभिमान समाजणारांना, या सर्व धेडगुजरी भानगडीत लक्ष घालण्याला वेळ तरी नाही, किंवा बारकावा तरी नाही! मी तर थोडे पुढे जाऊन असेही म्हणेन की, एकदा एखादा शब्द हिंदीतून उचलण्याचे सत्कृत्य केले, की नंतर शब्दांच्या उपयोगात शुध्दता, सूक्ष्मता, वगैरे राखणे जरूर आहे, याची जाणीव या प्रचारमूढ लोकांना नसते. कपात, कारवाई, समझौता, कार्यवाही, हे शब्द हिंदीत कसे वापरतात, व हिंदीचे अनुकरण करणारे लोक तेच शब्द मराठीत कसे वापरतात, याचे संशोधन होणे जरूर आहे. पुण्याच्या एका दैनिकाने गेल्या महिन्यातच "जनरल मॅकआर्थर यांना आपल्या सैन्याच्या लढाऊ वृत्तीत 'कपात' झाल्याचे आढळून आले."असा 'कपात'शब्दाचा उपयोग केला होता.दुसऱ्याने 'मलायातील भारतीय जामात' असा 'जमात' या शब्दाचा उपयोग केला होता. 'बेकायदा' या सर्व परिचित –शब्दाला 'अवैध' हा पंडिती शब्द वापरणारे लोकच दुसऱ्या परिच्छेदात लगेच 'समाज' याऐवजी 'जमात' वापरून मोकळे होतात! कारण काही तरी नवीन आणि हिंदीतल्यासारखे करणे, एवढे एकाच सूत्र त्यांस अवगत आहे.

पण यात पाच अगर पाचशे चुकांचाच केवळ प्रश्न आहे असे नव्हे; शब्दाच्या अन्वर्थकतेपेक्षा अपरिचिततेला आज अधिक तेजी आहे! एकीकडून परकीय शब्दांवर बहिष्कार व दुसरीकडून परप्रांतीय आणि अनोळखी शब्दांचा हव्यास, असे हे दुहेरी वेड लागल्याने, मेंदू आणि लेखणी यांचा संबंधच तुटल्यासारखा झाला आहे. एका दैनिकाने अलीकडेच उदयशंकर यांच्या मद्रास येथील व्याख्यानाचे वृत्त दिले होते. त्यात म्हटले होते, “हिंदी नृत्याचे पौर्वात्यकरण केल्यास युरोपचा त्यास विरोध होईल.” या वृत्तलेखकास ‘पाश्चात्त्यीकरण’ असे Westernization या तारेतील शब्दाचे भाषांतर करावयाचे होते, हे उघड आहे. पण एवढे जाड शब्द घाईच्या वेळी पेलणे या लोकांना इतके जड जात आहे, की पौर्वात्यीकरण आणि पाश्चात्त्यीकरण दोन्ही शब्द त्यांस सारखेच अवजड, अतएव सारखेच अर्थशून्य वाटत आहेत. आम्ही कॉलेजमध्ये असता ‘पौर्वात्य’ शब्दासही गौण ठरवून त्याऐवजी पौरस्त्य शब्द घालणे अधिक इष्ट की काय यावर चर्चा चालत असे, असे आठवते. शिवाय ‘पौर्वात्यकरण’ हे शुद्ध नसून ‘पौर्वात्यीकरण’ हे शुद्ध होय, हे आजचाही संस्कृतज्ञ तरुण सांगेल; पण ‘पौर्वात्य’ आणि ‘पाश्चात्त्य’ यातच गोंधळ करणारे छापील वाङ्मय रोज वाचण्यात येऊ लागल्यावर पूर्वोक्त व्याकरणदोषांची चर्चाच आटोपली.

हौसेने दत्तक घेतलेल्या पंडिती शब्दांचे हे हाल असल्यावर कानाकोपऱ्यातून मराठी रूपांची आणि प्रयोगांची चर्चा करण्याला अवसरच नाही. ‘तांदूळ’ यांचे विभक्तिरूप करताना ‘दू’ चा ‘द’ होतो, असे व्याकरण सांगते. ‘तांदूळ तांदळाचा’ ‘कापूस कापसाचा’, इ. पण भाषेची प्रकृती माहीत नसणारे लोक अधिक शुध्द असे समजून ‘कापुसाचा’ ‘पाउलाचा’ असे छापीत आहेत. ‘वितुष्ट’ ऐवजी ‘वितुष्टत्व’ हा शब्द मी हेडलाईनमध्ये वाचला आहे! ‘सकेशा’ हे रूप सदोष समजून ‘स्वकेशा’ वापरण्यातलाच हा प्रकार होय!

प्रयोगाच्या बाबतीतही सूक्ष्म दृष्टीच्या अभावी अर्थशून्य भाषा लिहिण्याचे व खपवून घेण्याचे प्रमाण इतके वाढत आहे की, भाषेतील शुध्दाशुध्द विचार इत:पर अशक्यप्राय होणार आहे. रेडिओतील दैनिक वार्तांतून मी पुढील वाक्य टिपून घेतले आहे: “उटकमंडहून त्रिवेंद्रमला निघालेल्या विमानाची कालपर्यंत बातमी नव्हती...ते नीलगिरी पर्वतात पडले असे समजण्यात येते.” ‘असे समजते’ आणि असे समजण्यात येते यांचे अर्थ अगदी भिन्न आहेत, हे मी सांगितले पाहिजे असे नाही.

हिंदीप्रमाणेच बंगाली, गुजराती वगैरेतूनही संस्कृत शब्द उचलणे हे एकराष्ट्रीयत्वाच्या खाती पुण्यकर्मात जमा होत असे. गुजरातीत ‘साक्षर’ हा शब्द विद्वान या अर्थी वापरतात; म्हणून मराठीत तो तसाच वापरून गुजरात आणि महाराष्ट्र यांचे ऐक्य साधू पाहणारे बहाद्दर आहेत! याबद्दल श्री. काका कालेलकर यांनाच एका चर्चाप्रसंगी विचारले. पण त्यांच्याच पुस्तकांच्या मराठी भाषांतरात असले शब्द असूनही, या प्रकाराला त्यांनी शुद्ध मूर्खपणात घातले, हे त्यांच्या भाषांतरकारांनी लक्षात घ्यावे. तथापि, बंगाली पुस्तकांची भाषांतरे करणारे लेखक, आज हाच प्रकार करून आधुनिक मराठी शब्द संग्रहाचा बोजडपणा व अर्थशून्यपणा वाढवीत आहेत.

माझ्या मते बंगालीत तर पंडिती शब्दांचा भरणा हिंदीहूनही अधिक आहे. ‘गतकाल’, ‘अपराण्हे’, ‘प्रतियोगिता’, ‘परिकल्पना’, ‘भारतस्थित’ प्रतिनिधी , ‘इतिपूर्व’. ‘आलोचना’, ‘साक्षत् करिछिल’, ‘निम्न-लिखित’, ‘वाणिज्यमंत्री’ या सारखे शब्दप्रयोग त्यांच्या दैनिक वार्तेत पदोपदी आढळतात. हे सर्व शब्द संस्कृत आहेत एवढ्या आधारावर, आमचे राष्ट्रैक्यमग्न लोक ते मराठीत वापरण्याला मुभा देणार काय? ‘बातमीदार’ याला हिंदीत व बंगालीत “संवाददाता’ हा शब्द वापरतात; निर्वासित याचा अर्थाने हिंदीत ‘विस्थापित’ वापरतात; ‘स्थानिक’ या अर्थी ‘स्थानीय’ वापरतात. एखाद्या कृत्याचा सभेत ‘निषेध’ केला

अनुक्रमणिका

म्हणण्याऐवजी 'निंदा' केली असे म्हणतात! हिंदीत माणसाला 'प्रामाणिक' म्हणण्याऐवजी 'प्रामाणिक कोश' (standard) असा प्रयोग करतात. काही तरी नवीन करून लक्ष वेधण्यासाठी धडपडणारे लोक आणि अनेक भाषांचे ऐक्य करता येईल असे प्रामाणिकपणे समजणारे लोक, असे दोघे मिळून मराठी प्रयोगाशी विसंगत असे हे शब्द मराठीत घुसडू लागल्यास भाषेची अवस्था काय होईल ? नव्या भारतीय राज्यघटनेचे भाषांतर करताना असे कित्येक पंडिती शब्द त्यात वापरलेच पाहिजेत, अशी सरकारी सूचना आहे असे कळते. हे खरे असल्यास त्या भाषांतराला मराठी भाषांतर का म्हणावे हा प्रश्नच आहे.

'निवडणूक' या अस्सल मराठी शब्दाऐवजी 'निर्वाचन' आणि 'राज्यघटना' या सुगम शब्दाऐवजी 'संविधान' हे शब्द मराठीत वापरल्याने कोणाचा फायदा होणार आहे? 'पार्लमेंट' या शब्दाला 'लोकसभा' किंवा 'राष्ट्रसभा' यासारखा सोपा शब्द सुचवायचा सोडून 'संसद' हा शब्द सुचविणारांनी काय साधले? (शिवाय याचा उच्चार 'संसद्' केला पाहिजे म्हणे!) मी तर उलट म्हणेन, 'कॉंग्रेस' हा शब्द घेतला त्याप्रमाणे 'पार्लमेंट' अगर 'कौन्सिल' हे शब्दही सरळ इंग्रजीतून घेण्याला हरकत नव्हती. श्री. काका कालेलकरांसारखे लोक तर भावनांना 'ॲपील' करणे यासारखे प्रयोग करण्यास हरकत नाही असे प्रतिपादितांना मी ऐकले आहे. आणि फारसी-इंग्रजी शब्दांना प्रतिशब्द म्हणून शेकडो नवे शब्द करणाऱ्या हिंदीत तर आज 'ॲपील' हा शब्द उघडपणे वापरलाही जातो! पण हिंदीला आज जे शेकडो संस्कृत शब्द, फारसी टाळण्याकरता घडवावे लागत आहेत, त्यांच्याऐवजी सोपे व शुध्द शब्द आज कित्येक पिढ्या आमच्याकडे रूढ आहेत! अशा स्थितीत घटनेचे भाषांतर करण्याच्या निमित्ताने कित्येक बोजड व सर्वस्वी अनावश्यक शब्द मराठी भाषांतर-कर्त्यांनी का स्वीकारावे? आमच्या नागपूरस्थ भाषिक प्रतिध्वनींनी (डॉ. देशमुख आणि प्रो. बनहट्टी यांनी) या गोष्टींबद्दल नापसंती दर्शविल्याचे कळते. कोशकार य. रा. दाते यांनी तर नापसंती दाखविलीच असणार. पण असल्या आत्मघातकी अटींवर भाषांतर करण्याचेच नाकारले का नाही? याचा परिणाम म्हणजे या तीन पंडितांनी केलेल्या या भाषांतराचे आणखी एक मराठी भाषांतर करावे लागेल! नाही तर त्यापूर्वीचे श्री. देवगिरीकर यांचे कमी पंडिती, पण अधिक 'मराठी' भाषांतर, महाराष्ट्रात मान्य समजावे लागेल.

मी प्रारंभीच सांगितले आहे की, वृत्तपत्रांतील भाषा-दोषांवर भर देण्याचे कारण, त्यांचा परिणाम अत्यल्प अवधीत जास्तीत जास्त वाचकांवर होण्याचा संभव हेच होय. वृत्तपत्रेच काय ती गुन्हेगार आहेत म्हणून नव्हे, तर वृत्तपत्रेच काय ती आजच्या पिढीच्या नित्य पाठात आहेत, म्हणून वृत्तपत्रांकडे बोट प्रथम करावे लागते व अधिक करावे लागते. पण या अप्रिय पंक्ति—भेदाच्या क्षालनार्थ, हेही सांगितले पाहिजे की, वृत्तपत्रांचे जीवन, आज प्राय: इंग्रजीतून येणाऱ्या तारांवर अवलंबून आहे व त्यांचे भाषांतर त्यांना घाईने करावे लागते. (अर्थात याही कारणाने भाषेचे स्वरूप भ्रष्ट आणि विद्रूप करणे सर्वस्वी अक्षम्यच होय.) पण ज्यांना घाई हेही कारण नाही, असे ग्रंथलेखक जर हेच भाषिक अपराध करीत असतील, तर ते त्याहूनही अक्षम्य नाहीत का? -ग्रंथांचा दुष्परिणाम वृत्तपत्रांइतका व्यापक आणि त्वरित नसला, तरी त्यांचा अपराध मात्र वृत्तपत्राहूनही अक्षम्य होय, यात शंका नाही व म्हणूनच मुंबई येथील गेल्या साहित्य-संमेलनात, जेव्हा वृत्तपत्रांबरोबरच इतरही नव-वाङ्मयांतील दोषांचा माझ्या ठरावात निर्देश करण्याची सूचना वृत्तपत्रकार-मित्रांनी केली, तेव्हा ती मी बिनबोभाट मान्य केली. भाषेतील हे दोष करणारे लेखक एका विशिष्ट संप्रदायाचेच आहेत; व तो संप्रदाय मोडून काढला पाहिजे, हे माझे आजचे प्रतिपादन आहे. संप्रदाय हा शब्द मी परिचित राजकारणी संप्रदायांच्या अर्थाने वापरीत नाही कारण या क्षेत्रात हिंदुत्ववादी, गांधीवादी, समाजवादी-आणि साम्यवादीही -सारखेच अपराधी आहेत. प्रारंभ मात्र भाषाशुध्दीवादी हिंदुत्वनिष्ठांनी केला, या दृष्टीने ते या दोषाला अधिक जबाबदार आहेत एवढेच काय ते.

अनुक्रमणिका

ज्यांची भाषा अत्र्यांच्यासारख्या जातिवंत मराठी लिहिणाराला सुगमत्वाचा नमुना वाटते त्या साने गुरुजींनी, 'तिची खोली अद्यातन होती ' यासारखे अशुद्ध, अर्थशून्य व क्लिष्ट प्रयोग केलेले आढळतील. 'माझी काव्यलोलुप वृत्तीच भाग्यशील नाही' या वाक्याचा अर्थ किती लोकांना कळेल? आणि कळला तरी 'भाग्यशाली ' हा पिढ्यान्‌पिढ्यांचा शब्द सोडून 'भाग्यशील' वापरणाऱ्या लेखकाने पोरकट अनुकरणाखेरीज काय साधले? 'कालविपर्यास' हा शब्द आज अनेक वर्षे वापरात आहे; त्याच अर्थी 'कालवैसदृष्य' हा शब्द वापरण्याने काय साधले? आणि या शिवाय नवीन लठ्ठ शब्द तयार करणारे लोक, 'दृश्य' ऐवजी 'दृष्य' लिहिण्याइतपतच संस्कृतचे सोयरे असतात ते वेगळेच! संस्कृतचा सोस असलेल्या या 'असंस्कृत' लोकांना शब्दसिद्धीची सनद देणे म्हणजेच मराठीत भर की काय? इंग्रजीच्या अंध अनुकरणामुळे आज- 'जेव्हा डोके रिकामे असते' -यासारखे अशुद्ध वाक्यार्थ मथळा म्हणून वापरले जात आहेत. अशा वाक्यार्थात अध्याहृत ठेवावयाचेच झाले, तर 'जेव्हा' हे अव्यक्त ठेवता येईल. व इंग्रजीच्या थाटावर मथळा द्यावयाचाच म्हटला तर 'डोके रिकामे असते तेव्हा'-असा द्यावा लागेल. ही चूक फार तर एखादा मराठीत लिहिणारा मिशनरीच करू शकेल; व अशा परकीय लेखकांकरता एका पाश्चात्य लेखिकेने लिहिलेल्या मराठीच्या व्याकरणातच प्रथमत: मी या नियमाचा निर्देश वाचल्याचे स्मरते. पण मराठी लेखकांना या व्याकरणनिर्देशाचे कारणच नाही; त्यांना हे स्वभावत:च कळायला हवे.

'डॉ.लोहिया यांचे पैसे लावून व्याख्यान', 'तो छापण्याचे गोपालस्वामींनी एकजात नाकारले.' या वार्तातील वाक्‌प्रचारांचा खून; तसेच 'जहागीर' याचे अनेक वचन 'जहागिऱ्या', 'They removed the wounded' या बातमीच्या भाषांतरात 'जखमींना तेथून नेले' यांसारखे प्रयोग दररोज करण्यात येत असल्याने, नवीन पिढीला भाषा शिकवणे अशक्यप्राय होत आहे आणि इकडे मराठीचा प्रवेश पदवीच्या अभ्यासात करून देणे, एवढेच मराठीचे अभिमानी आपले कर्तव्य समजत आहेत!

आमच्या विद्यापीठांना जुन्या ग्रंथांचे संशोधन एवढेच मराठीच्या प्रांतात राजाश्रयाने अगर पीठाश्रायाने करण्यासारखे कार्य दिसत आहे' पण आजच्या या भाषिक धरणीकंपाची पाहणी कोण करणार? की 'जे जुने नव्हे ते संशोधनच नव्हे' असे आमची विद्यापीठे मानतात? की आमच्या विद्यापीठांनाही ही भाषेची वाढच वाटत आहे? अशा अडाणी शब्दसिद्धीची वाढ करणाऱ्या लेखकांचे उतारे शाळांच्या आणि कॉलेजांच्या पाठ्यपुस्तकांतून उत्साहाने घेतले जात आहेत व ते उतारे 'मते' असलेल्या पण 'मत' नसलेले आमच्यासारखे 'प्राध्यापक' शिकवीत आहे! विचारांचे तेज आणि भाषा शुद्धता यांचा मराठी भाषेत इतका दुष्काळ खास नाही की, असे अशुद्ध लिखाण आमच्या तरुण पिढीपुढे अभ्यासनीय म्हणून ठेवले जावे! परंतु आजच्या वाङ्मयाच्या आणि विद्येच्या क्षेत्रात राजकीय आणि प्रचारी दृष्टीचे इतके प्रस्थ आहे की, खऱ्या विद्येची दृष्टी विद्यापीठांतही दुर्मिळ झाली आहे... निदान अर्वाचीन देशभाषांच्या बाबतीत तरी तशी स्थिती आहे.

या आराजकाला कारण, प्रचारकल्पनांप्रमाणेच घिसाडघाई आणि बाजारी वृत्ती ही देखील आहे. चाळीस वर्षांपूर्वीच्या, एखाद्या आज विसरूनही गेलेल्या लेखकाचे पुस्तक पहा आणि आजची प्रसिद्ध लेखकांची पुस्तके पहा. फार कशाला विद्यापीठाने मंजूर करून नेमलेली पुस्तके पहा. जुने अप्रसिद्ध पुस्तक अधिक चांगले छापलेले व अधिक चांगले बांधलेलेही असेल तर उलट खास विद्यापीठाकरता छापलेल्या आजच्या पाठ्यपुस्तकांत पानोपानी अशुद्ध छपाई आढळेल. टिळकांचे किंवा आगरकरांचे निबंध 'विद्यापीठाने लावले' म्हणून घाईने छापायचे, आणि पूर्वीच्या आवृत्तीपेक्षा दसपट अशुद्ध आणि बेढब आवृत्ती

विद्यार्थ्यांच्या हाती द्यायची, याला मातृभाषेचा काळाबाजार का म्हणू नये? मुद्दाम ओरड करून मराठी हा विषय कॉलेजच्या पहिल्या दोन वर्षांना नेमून घेण्यात आला आहे. त्या वर्षांना मुंबईच्या व पुण्याच्या कॉलेजात शिकवावी लागणारी पुस्तके पहावी, म्हणजे पुस्तकांचा उद्देश विद्यार्थ्यांना ज्ञानदान हा नसून, प्रकाशकांना द्रव्यदान हा आहे, असे वाटल्यावाचून राहत नाही. तसेच पुस्तकांच्या संपादकांचे काम,जुजबी आणि तऱ्हेवाईक प्रस्तावना व टीपा जोडणे एवढेच असावे; आणि प्रकाशाकांचे काम पहिल्याहून दसपट चुका करून पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देणे हे असावे, असे वाटल्यावाचून राहणार नाही! जेव्हा मुद्रण-दोषामुळे अर्थ लागेनासा होईल, तेव्हा विद्यार्थ्यांपैकी ज्याच्या हातात जुनी आवृत्ती असेल त्याच्या पुस्तकांचा उपयोग करणे, हा क्रम मला तरी ठेवावा लागला आहे व उपयोगी पडत आहे. 'कवित्व' यात शेकडा पन्नास ठिकाणी 'त' चे द्वित्व आढळेल; 'महत्त्व' यात तितक्याच वेळा 'त' चे द्वित्व नाही असे आढळेल ! उज्ज्वल यात 'ज' चे द्वित्व मला फारच थोड्या पाठ्यपुस्तकांत आढळले. मी मघाशी हिंदी व मराठी वृत्तपत्रांतील लेखनदोषाबद्दल दु:ख केले. पण कॉलेजमध्ये नेमून घेण्याकरता मुद्दाम तयार केलेल्या गद्यवेच्यात जर 'शृंगारवीरादि' याबद्दल 'श्रृंगारवीरादि' असे छापलेले असेल , 'अत्याचार' याऐवजी 'अत्त्याचार' असे असेल, 'महर्षि कर्वे' यांत 'वे' वर अनुस्वार असेल, आणि अशा चुका पानोपानी असतील, तर विद्यार्थ्यांना शुद्ध लिहिण्याचे वळण लावणे कितपत शक्य आहे?

पण हा झाला केवळ मुद्रणदोषांचा प्रकार. अपरिचित शब्द योजनेमुळे होणारे घोटाळे याहून आगळेच आहेत! आमचे माडखोलकर आजच्या पिढीप्रमाणे अशुद्ध व अर्थशून्य शब्द तयार करीत नसले, तरी त्यांना अपरिचित पण कर्णमधुर संस्कृत शब्दांचा हव्यास दांडगा! त्यांच्या एका उताऱ्यात 'निर्विण्ण मन:स्थिती' असा शब्दप्रयोग आहे. घाईने पुस्तक छापून विद्यापीठाकडे धाडताना संपादकांना संकट पडले! त्यांनी 'निर्विण्ण' हा अनोळखी शब्द चुकीने पडला असणार असे ठरवून, त्याऐवजी 'निर्विषण्ण मन स्थिती' अशी दुरुस्ती केली! अर्थ करण्याची जबाबदारी लेखकावरही नाही, संपादकावरही नाही! जिवंत लेखकांच्या उताऱ्यांची ही स्थिती, तर बिचाऱ्या आगरकर-लोकहितवादींची स्थिती काय होत असेल?

सदोष वाक्‌प्रयोग, विचित्र शब्द-योजना व कम्पॉझिटरच्या सोयीकरता लिपीसुधारणा, यातच मुद्रण-दोष, टाइप उडणे, इत्यादींची भर पडल्यावर पाठ्यपुस्तकांची दशा काय होत असेल? कॉलेजचे प्रौढ विद्यार्थी केवळ मतलबाकडे लक्ष देतात, किंबहुना मूळ लिखाणाऐवजी सारांश वाचून पसार होतात. पण हायस्कूल व प्राथमिक शाळा यांच्याही हाती आपल्याला शुद्ध पाठ्य-पुस्तक देता येऊ नयेत, ही गोष्ट भाषेच्या भवितव्याच्या दृष्टीने भयावह आहे.

'लगीन करतो बेडूकराव' यासारखे मथळे आजच्या प्राथमिक पुस्तकात आढळतात! विचारा नुकता कुठे वाचायला शिकलेला वसंत 'सिंधी लोक' याऐवजी 'सिंघी लोक' 'देणगी' ऐवजी 'देगणी' असे शब्द वाचून, आईबापांना व मास्तरांना सतावून सोडतो. त्याला छापखान्यांतील गर्दी, कागदावरील कंट्रोल आणि पाठ्यपुस्तकांच्या प्रकाशकांत लागून राहिलेली घोड्यांची शर्यत, यांची खबर कशी असणार?

भाषेत नव्यानेच शिरलेले अशुद्ध व बोजड शब्द कोशाच्या साहाय्याने काढूनही टाकता येतील; पण उच्चाराच्या शुध्दतेचा ऱ्हास एकदा झाला, म्हणजे त्यांची सुधारणा पुढेमागे करणेही अशक्य होईल. 'एकदा रूढ झाल्यावर कोणत्याही शब्दाला मान्यता मिळते' असे म्हणून दडपून, पाहिजे ते शब्द रूढ करणे, फक्त ते फारसी अगर इंग्रजी नाहीत, एवढेच पाहून घेणे- ही दांडगेश्वर-नीती' च काय ती ज्यांना अवगत आहे,

अनुक्रमणिका

त्यांची गोष्ट वेगळी. पण इतरांना हे ठाऊक असेल की, एका स्वराच्या दीर्घ अगर ऱ्हस्व, उदात्त अगर अनुदात्त उच्चाराने कोणत्याही समाजात मनुष्याचे शिक्षण व सामाजिक स्थान जोखले जाते.

महाभारताच्या स्वर्गारोहणपर्वात, ते आपले राष्ट्रीय काव्य वाचावे कोणत्या पद्धतीने याच्याही तपशीलवार सूचना देऊन ठेवलेल्या आहेत! त्यात असे सांगितले आहे की, वाचताना त्रेसष्टच्या त्रेसष्ट वर्णांचे उच्चार सुस्पष्ट झाले पाहिजेत. उच्चाराच्या स्पष्टतेबद्दल आम्हा महाराष्ट्रीयांचा प्राचीन काळापासून लौकिकही आहे. अशा स्थितीत लाखो रुपयांच्या सरकारी साधनसामुग्री द्वारे जे शब्द लहानथोरांच्या कानी जाणार, ते सर्वसामान्य हवेत;- निदान शुद्ध तरी हवेत. या दृष्टीने पाहता, ऑल इंडिया रेडिओनं संग्रही ठेवलेल्या मराठी वक्त्यांची भाषणे उद्वेजनक होतात, असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही.

कोणत्याही दिवशीच्या ऑल इंडिया रेडिओच्या वार्ता ऐकल्या, तरी मी म्हणतो त्याचे प्रत्यंतर येईल. मी सहज सापडलेल्या गेल्या जुलैमधील एका टिपणातील नमुना सांगतो. ता. १४ जुलै रोजीच्या बातम्यांत पुढील वाक्य होते- ‘देशातील वकिलातींना सूचना देण्यात आल्या.” हे वाक्य आमच्या अखिल भारतीय मराठी ‘ध्वनिक्षेपका’ने पुढीलप्रमाणे उच्चारले. देशातील वकिलांतींना सूचना देण्यान्त आल्या.’ कारण ‘घरान्त’, ‘त्यान्त’, ‘ह्यान्त’ या उच्चारांचा त्या वक्त्याला सराव होताच! त्याच महिन्यांतील आणखी एका टिपणातील नमुना ‘वटहुकूम’ या शब्दातील ‘वट’ चा उच्चार ‘वटसावित्री’ तील ‘वट’ उच्चाराप्रमाणे केला गेला! या गोष्टी ‘लहान’ नव्हेत, -तर ‘सूक्ष्म’ आहेत. आणि संस्कृती, शुद्धता व माधुर्य यांचे मापन घडापासरीने करायचे नसून तोळामाशांनीच करायचे असते. पण कापडाच्या अगर लोखंडाच्या कारखान्यांप्रमाणे भाषण-लेखनाचेही कारखाने उघडले, की ‘प्रगती’ ला उशीर नाही, ही आजच्या कारखानदार युगाची कल्पना! छापखाने व रेडिओ यांच्या द्वारे ज्ञानप्रसार झपाट्याने होतो, एवढी एकतर्फी वार्ताच आम्ही पाठ केली आहे. पण त्याच साधनांच्या द्वारे अज्ञान व भाषादोष यांचा प्रसारही तितक्याच झपाट्याने होतो, हे आमच्या नूतन राज्यकर्त्यांनी लक्षात घेतले पाहिजे व ही साधने अपात्र लोकांची मिरास होणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे.

या ज्ञानप्रसाराच्या आणि वाङ्मयप्रसाराच्या साधनाची आणखी काही फळे सादर करतो... गेल्या सप्टेंबरमधील वार्ता : “शिब्बनलाल सक्सेनांनी एका ‘उपसूचना’च्या द्वारा विरोध केला.” तसेच ‘गैरवाजवी’ याचा उच्चार ‘गैरवाज्वी’ इ. आता गोवा रेडिओवरील उच्चाराचे नमुने : ‘पुस्तक-परीक्षण’ याऐवजी ‘पुस्तक परीक्शण’, ‘प्रसिद्ध झाला’ याचा उच्चार ‘प्रसीध् झाला’ इ.इ. रेडिओच्या संग्रहींच्या वक्त्यांचे भाषण सर्वमान्य मराठीत होण्याऐवजी मिशनरी मराठीतच दररोज ऐकू यावे, यापेक्षा रेडिओच्या साधनाचा दुरुपयोग कोणता?

‘अल्पसंख्याक’ या शब्दाचा उच्चार मुंबई रेडिओच्या नेहमीच्या वक्त्याच्या तोंडून मी एकदाही शुद्ध स्वरूपात ऐकलेला नाही. तो शब्द ‘अल्पसंख्याक’ असा आहे- ‘अल्पसंख्याङ्क’ असा नाही, हे या वक्त्यांना आता कोणी तरी सांगणे व त्यांच्याकडून म्हणवून घेणे जरूर आहे. (नाही तर रेडिओचा खर्च करुन मुलाबाळांना अशुद्ध बोलायला शिकविल्याचे श्रेय येणार आहे!) तर मद्रास रेडिओवरील कानडी व तेलुगू वक्त्यांच्या तोंडून मी हा शब्द एकदाही सदोष उच्चारलेला ऐकला नाही; की ते वक्ते कृत्रिम नाटकी आवाजात बोलतानाही मला कधी आढळले नाहीत. इतर भाषांप्रमाणे मराठीतही उच्चाराला महत्त्व आहे, याची जाणीव ऑल इंडिया रेडिओला करून देण्याची वेळ आली आहे. आमची साहित्य संमेलने, फॅसिस्टविरोधी आघाडीपासून डांग जिल्ह्याच्या सरहद्दीपर्यंत, सर्व राजकीय स्वरूपाचे ठराव करतील. पण

अनुक्रमणिका

मराठीच्या माजघरातच मराठीला जो सूक्ष्म क्षय लागत आहे, तिची दखल घेणार नाहीत! आजचे युग ढोबळ व स्थूल गोष्टींचे युग आहे. पण माणसांचे काय, की संस्कृतीचे काय, जीवन आणि मरण सूक्ष्म गोष्टींतच असते.

ज्या शहरात पारशी, मुसलमान, ख्रिस्ती, युरोपियन यांसारख्या छपन्न प्रकारच्या लोकांशी क्षणोक्षणी संबंध येतो, किंबहुना ज्यात त्याच्याच बोलण्याच्या ढंगाला मान असतो, त्या शहरातील मराठीचे उच्चार भ्रष्ट होण्याचा पुष्कळच संभव असतो. वाक्यांतील पाच शब्दांत दोन शब्द इंग्रजी असले, तर भाषा बाटते, हे राजवाडे-सावरकरांनी ओरडून सांगितले; पण 'वटहुकूम' च्या ऐवजी 'वटहुकूम'; 'प्रसिद्ध' च्या ऐवजी 'प्रसीध्' या उच्चारांनी जीभच बाटते, हे ओरडून कोण सांगणार? 'बी. बी. सी.' आम्हाला रोज झोपेच्या वेळी इंग्रजीच्या वर्णोच्चारशास्त्रावरील धडे ऐकवते; -आमच्या मराठीचे वर्णोच्चार आम्हाला कोण शिकवणार? रेडिओने पगार देऊन ठेवलेले वक्ते उच्चार बिघडविण्याचेच काम करीत आहेत.

गीता, उपनिषदे यांचे अत्यंत अशुद्ध पाठ ऐकविण्याबद्दल तर रेडिओवर फिर्याद करण्याला एखादे कलम सापडते का, याचा विचार मनात आल्यावाचून राहत नाही. या बाबतीत मुंबईच्या वृत्तपत्रांतून लेखी ओरडही झाली आहे. 'स्थितधी : कि प्रभाषेत| किमासित व्रजेत किम्|' या चरणाची (व इतर अनेक चरणांची) रेडिओने केलेली विटंबना श्रोत्यांना खरोखर ऐकवत नाही! रेडिओवरील वक्त्यांची निवड आज अत्यंत बेजाबाबदारपणे होत आहे, असे नाइलाजाने म्हणावे लागते. मराठीचे व संस्कृतचे ज्याचे उच्चार मिशनरी वळणाचे नाहीत, असा वक्ता उभ्या महाराष्ट्रात मिळत नाही काय?

मुंबईचे वातावरण बकाली असले, तरी ज्यांचे उच्चार अत्यंत शुद्ध आणि अस्सल मराठी आहेत, अशी माणसे मुंबईतही आहेत. तथापि' या ठिकाणी मुंबईकरांना एक प्रेमाचा इशारा मात्र देऊन ठेवतो. हवामानामुळे असो की मद्यपानामुळे असो, काही देशांतील लोकांत अस्पष्ट व उडत उच्चार करणे ही एक 'फॅशन' समजली जाते. मराठीतही काही 'फॅशन्स' अगर ढंग असतील; पण; 'Fashionable Stammer' उर्फ तोतरेपणा, हा महाराष्ट्रात तरी गुण मानला जात नाही. हा दोष अनेक आधुनिक वक्त्यांच्या व नटांच्या बोलण्यात विशेषत: मुंबईत राहण्याने- शिरला आहे. असल्या लोकांची निवड ज्ञानप्रसाराच्या खात्यात (रेडिओ, विद्यालये वगैरेत) तरी होणे भाषेच्या शुद्धतेच्या व गोडीच्या दृष्टीने धोक्याचे आहे.

भाषेत किती हजार शब्द आहेत,याबरोबरच त्यापैकी किती शब्द जास्तीत जास्त लोकांना समजतात; किती शब्द त्या भाषेच्या प्रकृतीशी जुळणारे आहेत; किती त्या भाषेच्या कुशीत जन्म घेणारांच्या प्रत्यक्ष सामाजिक आणि सांसारिक क्रियांशी व संकेतांशी संबद्ध आहेत, याला महत्त्व दिले पाहिजे, आणि त्या दृष्टीने पाहता ज्ञानेश्वरीची जुनाट पद्यशैली आणि भाऊसाहेबांच्या बखरीची फारसी-मिश्रित गद्यशैली या देखील आजच्या तरुण लेखकांच्या शैलीहून मराठी भाषेला अधिक जवळच्या आहेत. स्वजनांच्या अंतरंगाला जाऊन भिडण्याची तळमळ आणि संस्कृतचे साक्षात ज्ञान, यांमुळे लोकहितवादी, लोकमान्य टिळक, यांच्यासारखे पूर्वीच्या पिढीचे लोक सुगम, शुद्ध, आणि भेदक मराठी लिहू शकले. आजच्या पुष्कळशा लेखकांचा संस्कृतशी संबंध मध्यस्थामार्फत (सेंकड हँड!) असल्यामुळे उलट त्यांना त्या भाषेशी पंडिती लगट करावीशी वाटते! दुर्दैव हे की, आजचे तरुण लेखक, केळकर, फडके, खांडेकर, माडखोलकर यांची भाषा जितकी वाचतात; तितकी टिळक, महादेव शिवराम गोळे, चिंतामणराव वैद्य, धनुर्धारी (टिकेकर) यांची वाचीत नाहीत. ती वाचतील तर ते अधिक जातिवंत मराठी लिहितील. आणि लोकहितवादींची भाषा वाचतील, तर इंग्रजपूर्व गद्याचाही गाभा आत्मसात केल्याचे श्रेय मिळेल. कारण

लोकहितवादींच्या लिखाणात इंग्रजीनंतरची आधुनिक दृष्टी व इंग्रजीपूर्वीचे बाळबोध वळण यांचा मधुर मिलाफ झाला आहे. (त्यांना संस्कृतचा गंध नव्हता, हे चिपळूणकरांचे मत, आणि त्यांना स्वतंत्र रचना करण्याची कुवत नव्हती, हे विसूभाऊ राजवाड्यांचे मत ही दोन्ही त्यांचे समग्र लिखाण न वाचता दिलेली, अतएव अज्ञानमूलक मते आहेत.) निकोप गद्य आणि स्वाभाविक सुगम शब्दसंग्रह, या भाषेच्या अगदी प्राथमिक गरजा आहेत. राष्ट्रैक्याच्या विशाल ध्येयाखातरही या दोन अमोल ठेव्यांवर कोणत्याही आधुनिक देशभाषेने पाणी सोडू नये. आजकाल निर्माण होणारे पुष्कळसे गद्य या दोन प्राणभूत गोष्टींच्या मुळावरच जन्मत आहे, ही दुर्दैवाची गोष्ट होय. अखिल भारतीय व्यवहाराची भाषा म्हणून प्रत्येक प्रांतातील सुशिक्षितांनी हिंदीचा अभ्यास जरूर करावा. पण नवी राष्ट्रभाषा निर्माण करण्याच्या हव्यासाने दीर्घपरंपरेच्या प्रांतिक भाषांच्या शब्दसंपत्तीचा जुगार मांडणे, हा शुद्ध वेडेपणा होय आणि हिंदी देखील, आम्ही तिच्या स्वाभाविक स्वरूपातच शिकू. राजकीय हेतूने तिला दिलेले पंडिती वळण लोक –व्यवहारात फार काळ टिकणे शक्य नाही.

शुद्ध व जिवंत मराठीत लिहिलेली अनेक पुस्तके, आज आवृत्त्या संपल्यामुळे बाजारात नाहीत; व अनेक भिकार पुस्तके केवळ आज विक्रेत्यांच्या कपाटात तिरंगी वेष्टनात मांडली आहेत, म्हणूनच ग्रंथालयात भरली जात आहेत! नव्या शाळा, नवी कॉलेजे यांच्या पुस्तकालयांच्या याद्या तपासून पाहण्यासारख्या आहेत. मी ज्या कॉलेजात काम करतो, ते लहानसे व बाल्यावस्थेत असलेले कॉलेज आहे. पहिल्या वर्षी इतर अनेक विभागांप्रमाणे मराठी विभाग भरताना, अगदी काटकसरीने म्हटली, तरी पाचशे पुस्तके घेण्याची आमची इच्छा व तयारी होती. परंतु ज्या पाचशेंना कोणत्याही विद्यालयाच्या ग्रंथालयाने प्रथम जागा द्यावी असे मी म्हणेन, त्यांतील तीन-चतुर्थांश पुस्तके पुण्यासारख्या ठिकाणीही उपलब्ध नसतात. कारण ती ‘लेटेस्ट’ नसतात! आणि कित्येक तर आज अजिबात दुर्मिळच आहेत. ज्ञानकोशकार केतकरांचे स्फुट लेख; लोकहितवादींचा ‘स्वाध्याय’ हा अमोल ग्रंथ, अगर त्यांचेच ऐतिहासिक दंतकथांचे तीन भाग हे ग्रंथालयाकरता घ्यायचे म्हटले तर मिळत नाहीत. गोळे व धनुर्धारी यांची पुस्तके तरुण मराठी वाचकांना ठाऊकही नाहीत. भाऊसाहेबांची बखर विद्यापीठाने नेमली असूनही कित्येक दिवस उपलब्ध नव्हती. पण क्लिष्ट भाषा आणि विकृत भावना यांनी भरलेली ताजी पुस्तके मात्र तरुण वाचकांच्या हाती न चुकता पडत आहेत. श्री. अरविंद यांच्या निर्वाणानंतर पंधराही दिवस झाले नसतील तेव्हाची गोष्ट. मी एका सुशिक्षित पुस्तक-विक्रेत्याला व प्रकाशकाला म्हटले-तुमच्याकडे अरविंदांची काही पुस्तके ठेवली आहेत की नाही? सध्या त्यांना मागणी असेल!

माझे वाक्यही पुरे होण्याच्या आत तो म्हणाला, “अरविंद गोखल्यांची ना? आहेत की!”

या संवादावरून आजच्या पिढीचे सहचर कोण आहेत, हे लक्षात येण्यास मदत होईल! व अरविंदांनी आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रांचे, वासुदेव गोविंद आपटे यांनी केलेले भाषांतर, अद्यापही पुण्याच्या आनंद कार्यालयात शिल्लक पडून का आहे हेही कळेल!

सर्वमान्य व प्रातिनिधिक मराठी गद्यग्रंथ प्रत्येक ग्रंथालयात उपलब्ध असणे जरूर आहे व प्रत्येक तरुण लेखकांच्या वाचण्यात ते प्रथम येणे जरूर आहे. त्यांची विस्मृती न होऊ देणे, त्यांची योग्यता वाचकांना पुन:पुन्हा पटविणे ही कामे विद्यापीठांची आणि टीकाकारांची आहेत. त्यांनीच आपले काम नीट केले नाही तर बिचारे प्रकाशक काय आपल्या अक्कलहुशारीने बाजार सजवीतच आहेत.

मित्र हो! मी आपणाशी बोलेन म्हणून ठरवले होते त्याहून अधिक बोलून गेलो! कदाचित माझ्या अधिकारापेक्षाही अधिक बोलून गेलो असेन! पण रसिकता व ऋजुता यासंबंधीच्या आपल्या शहराच्या लौकिकामुळेच मला थोडा अधिक बोलण्याचा मोह झाला असावा.शिवाय एखाद्या सिद्धांताचे मंडन अगर अनेक ग्रंथांतील विद्वत्ताप्रचुर अवतरणे, यांच्या भरीस न पडता, आजच्या काळात व आजच्या परिस्थितीत मला जे अत्यंत निकडीचे वाटले, तेच विचार मी बोलून गेलो आहे. विद्वत्ता आणि ग्रंथागार एखाद्याने पुण्याहून अगर नागपूरहून येऊन बडोदेकरांना पेश करणे हास्यास्पद होईल. पण तळमळ आणि प्रेम लहानांनी मोठ्यांना दाखविणेही चुकीचे होणार नाही. मजजवळ तर दुसरे काहीच नव्हते!

होते तेच आपण इतका वेळ गोड करून घेतल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

जय हिंद!

२.   खरी भाषाशुद्धी आणि तिचे खरे वैरी

आपली मराठी भाषा अशुद्ध होत चालली आहे व ती शुद्ध राखण्याकरिता फारशी व इंग्रजी शब्दांना वाळीत टाकावे असा प्रचार बॅ.सावरकर आणि प्रो. पटवर्धन हे दोन पराक्रमी विचाराग्रणी व वाङ्मयसेवक सध्या फार जोरात करीत आहेत. या चळवळीचे मूळ कोणते, या दोन वीरांच्या विचारांतून कोणते सिद्धांत आणि उपसिद्धांत उगम पावतात आणि या झुंजारांच्या अनुयायी सैन्याकडून व बाजारबुणग्यांकडून कशा प्रकारची जाळपोळ होत आहे याचा विचार माझ्यासारख्या तटस्थ लेखकासही करण्यावाचून गत्यंतर उरले नाही.

पहिली गोष्ट म्हणजे कोणत्याही देशाच्या भाषेचा, परदेशच्या भाषांशी ऐतिहासिक व भौगोलिक कारणांनी संबंध आल्याखेरीज राहत नाही. अशा संबंधांनी ज्या भाषेच्या प्रकृतीवर कायमचे परिणाम झाले नाहीत अशी भाषा अर्वाचीन काळांत दुर्मिळ. आपल्या प्राचीन संस्कृत भाषेच्या घटनेत वाङ्मयात अनेक दुर्मिळ विशेष आढळतात, त्यातच असामान्य शुद्धत्व हाही एक आढळेल. संस्कृत भाषेने आपल्या सहस्रावधी आयुर्मर्यादेत काही अनार्थ शब्द पचविले की नाही हा प्रश्न आपण शास्त्रज्ञांवर सोपवू परंतु इतपत निर्लेपत्व अर्वाचीन युगात राखणे दुर्घटच नव्हे तर रोगटपणाचेही ठरेल, असे म्हणण्यास हरकत नाही. देवाब्राह्मणांची म्हणून एक वेगळी 'गीर्वाणवाणी'जतन करणे शक्य आहे व काही दृष्टीनी फायद्याचेही आहे. परंतु नित्य व्यवहारातील, बाजारातील, कचेऱ्यांतील, आगगाड्यांनी सुलभ करून सोडलेल्या प्रांतोप्रांतीच्या प्रवासातील, भाषा शुद्ध राखणे कितपत शक्य आहे? असे म्हणतो तो दुसरे दिवशी एखदे पत्र लिहिताना 'वाइफला फीवर आला होता' असे लिहितो काय? सावरकर-पटवर्धनांचे नावही माहीत नसलेला मनुष्यदेखील लिहिताना सावध व जबाबदार असतो. उलट जन्मभर खाजगी पत्रव्यवहार इंग्रजीत करणारे, आणि शुद्धीचे नावही न काढणारे विष्णुशास्त्री, लोकमान्य टिळक, कविवर्य तांबे यांसारखे लेखक जिवंत व जातिवंत मराठी वाङ्मय निर्माण करू शकतात.

जातिवंत मराठी कोणते याचेही या भाषाशुद्धीच्या वावटळीत निश्चित अवधान ठेविले पाहिजे. लोकहितवादी, लो. टिळक यांसारखे तीव्र बुद्धीचे व आवेशाने लिहिणारे लेखक जी भाषा लिहीत; हरिभाऊ आपटे, धनुर्धारी यांसारखे महाराष्ट्राचा भूतकाल व वर्तमान, प्रतिभेने आकलणारे व चितारणारे सहृदय लेखक जी भाषा लिहून गेले व आजमितीस चंद्रशेखर, तांबे यांसारखे कवी, केळकर, माडखोलकर, अत्रे यांसारखे प्रसन्न गद्य लिहिणारे मार्मिक लेखक जी भाषा लिहितात, ती जातिवंत म्हणण्यास काहीही प्रत्यवाय नाही. उलट सावरकर, पटवर्धन यांसारखे पंथाग्रही व लहरी लेखक जी कमालीची कृत्रिम भाषा लिहीत आहेत व प्रत्यही बदलून विद्रूप करीत आहेत ती भाषा जातिभ्रष्ट आहे. सावरकरांचा परवाचा 'प्रतिभे'तील याच विषयावरील लेख पाहा. "तदर्थक स्वकीय नी सुरेख शब्द....नटवू देत आहोत.", "...प्रगत लिपी हे ज्यांचे पैतृक निजस्व आहे.", "त्यांची नावे स्वागतिण्यास ते आंदोलन सज्ज असते." इत्यादी इत्यादी. अशी भाषा तर हे पुढारीच वापरीत आहेत. आणि कसली तरी टूम घट्ट धरून स्वर्ग चढू पाहणारे गावोगावचे अनुकरणप्रिय बेजबाबदार लेखक तर याच प्रमाणात किती खून करीत आहेत ते दैनिकांतून आणि साप्ताहिकांतून रकाने भरभरून दिसतच आहे. या प्रत्येक शब्दागणिक एक एक प्रबळ सावरकरी कारण आहे हे प्रस्तुत लेखक जाणून आहे. 'नि' हे कोकणी बोलीतील तुटके अव्यय सावरकरांच्या भरजरी भाषेत का ' स्वागतिले' गेले असावे? आणि सुमारे दहाबारा वर्षांमागील 'हर्राजी', 'बुतफरोशी' वगैरे बोकडघास गिळणारी माधव जुलीयनी कविता 'अन्' यासारखे घरगुती देशस्थी अव्यय आपल्या 'पङ्गतीत' पावन का समजू लागली?

अनुक्रमणिका

दोघांची करणे दोघांसच माहीत. आपण तूर्त असे समजूया की, रा. सावरकर यांस 'व' हे मराठी वाक्यांच्या पोटात शिरलेले मुसलमानी पिलू 'नी' च्या आटोपशीर कट्यारीने काढून टाकावयाचे होते. आणि आपले मांसावलिप्त हात धुवून अलीकडेच शुद्धीमागे लागलेल्या 'माधव जूलियन' नामक विप्रविशेषास 'अन्' मध्येही काही भाषापौष्टिक द्रव्य आढळले असेल. पण इतक्या विक्षिप्त गद्य-पद्य भाषा लिहीणारांचे भाषाशुद्धीबाबतचे आदेश स्वीकारण्याइतके वाङ्मयक्षेत्र आज निर्वीर झाले आहे काय? पटवर्धनांचे काही गद्यप्रयोग पहा.... "प्रभूला चोराविरुद्ध आपले प्रभुत्व सिद्ध करावे लागते", "ग्रीकांची स्वारी या स्थानी ग्रीकांचे परचक्र असे का नाही?", "मराठी शब्दांना येत चाललेली ही मृत्युकळा" ... वगैरे वगैरे.

वाचकांना फिरून सांगितले पाहिजे की, एकही परकी शब्द वापरावयाचा नाही म्हटले तरी सावरकर व पटवर्धन यांचासारखे दुर्बोध व विद्रूप लिहिण्याची जरुरी नाही. सावरकर व पटवर्धन यांच्या प्रचंड लिखाणातून याहून किती तरी भयंकर अत्याचार निवडता येतील. ती फक्त त्यांचा परवाच्या लेखातून-ते सहज माझ्यासमोर असल्यामुळे-चारदोन मासले उचलले आहेत. पटवर्धनांच्या काही काव्यपंक्ती पहा.

"व्हाया पास कितीकदा नवस मी केले तिथे शैशवी"
"जोराने बसतां सुरुंग-धबका अदृश्य हो जीवन"
"भिंतीला दिसतात दोनच मला त्या टांगल्या तस्बिरी"

किती निवडाव्या? सर्वच अशा आहेत की ज्या भाषेत काव्य देखील इतपतच कर्णमधुर, त्या भाषेला भविष्यच नाही असे कोणीही म्हणावे! पण हे पटवर्धनांच्या माजी अवस्थेतील मासले आहेत. त्यावेळी त्यांस त्यांचे सध्याचे अवतारकार्य दिसले नव्हते. त्यावेळचे त्यांचे विचार व त्या वेळच्या तत्त्वांनुसार झालेली त्यांची सजावट मनोरंजक होईल म्हणून पुढे शब्दशःच उतरतो.

त्या वेळचे पटवर्धन म्हणतात, "पूर्वाश्रमीचे फारशी-अरबीच काय पण अनेक बारमासे मराठी शब्दांनासुद्धा सोवळ्या दास्यवृत्ती टीकाकारांनी (दास्यवृत्तीची व्याख्या १९२७ सालच्या फरमानाप्रमाणे! १९३५ च्या फतव्याप्रमाणे नव्हे!) प्रतिष्ठित पद्यात मज्जाव केलेला आहे. या जुलमी सुलतानीचा निषेध म्हणूनच..." इ. १९२७ चे पटवर्धन पुढे म्हणतात, "आमचे या बाबीतीतील धोरण पुढीलप्रमाणे आहे. हा शब्द पूर्वाश्रमी कोठलाही असला तरी आमच्या बहुजनसमाजाने एकदा त्याला पङ्क्तिपावन करून घेतला की, तो मराठी झाला. त्याची जात सुटली. नंतर त्याला दूर ठेवणे अन्यायाचे आहे."

आतापर्यंत घेतलेल्या अवतरणांत सावरकर व पटवर्धन यांच्या अत्यंत अस्वाभाविक क्लिष्ट भाषेचे स्वरूप आलेच आहे व हेही निर्दिष्ट केले गेले आहे की, त्यांची क्लिष्टता त्यांच्या भाषाशुद्धीच्या कल्पनेप्रमाणेही जरूर नाही. त्यांच्या व विशेषे करून सावरकरांच्या भाषेसंबंधी आणखी एक गोष्ट सांगितली म्हणजे त्यांच्या सोवळ्या भाषेचे पूर्ण दिग्दर्शन झाले. ती गोष्ट म्हणजे ते चिरपरचित परकीय शब्दांचे शुद्धीखातर बोजड भाषांतर करतात! रूढ, स्वकीय शब्दांची अवहेलना करून आपल्या सुलतानी टांकसाळीतून नवीन विकृत शब्द सोडतात. (उदा. 'मथळा' हा शब्द शुद्ध मराठी असूनही त्यांस 'शीर्षक' हा शब्द अधिक पसंत होतो.) आणि इतके करूनही शिवाय ढळढळीत फारशी व इंग्रजी शब्दही वापरतात! उपरिनिर्दिष्ट शुद्धि-प्रचारक लेखातीलच त्यांचे प्रयोग पहा:

अनुक्रमणिका

“बिनीवर झुंजणारे लोक”, “शेवटी एका वर्षाचे आत साऱ्या सरकारी कार्यालयात निर्भेळ तुर्कीच वापरण्याची आज्ञा सुटून पुढे आलेल्या नव्या प्रतिशब्दांपैकी प्रत्यही पाच पंचवीस शब्द सरकारी राजवृत्तांत प्रसिद्ध होऊ लागले.”

ज्या लेखात ‘व’ या अव्ययावरही कडक बहिष्कार आहे व ‘कायदा’ शब्द वापरणाऱ्यावर देखील सावरकरांनी तिरस्काराचा मारा केला आहे, त्याच लेखात ‘सरकारी’ हा शब्द पुन:पुन्हा: येतो आणि ‘आघाडी’ हा सुंदर मराठी शब्द टाकून ‘बिनी’ शब्द वापरला जातो. कदाचित ‘बिनीवर झुंजणारे’ या ऐवजी ‘चमू-पुरोभाग-युयुत्सु’ या सारखा शुद्ध मराठी शब्द अद्याप तयार व्हावयाचा असेल!

सावरकर-पटवर्धनांच्या शुद्धतेच्या कल्पनेविषयी आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही की, त्यास इंग्रजी व फारशी शब्दच काय ते परकीय वाटतात. मराठीत कानडी शब्दांचा भरणा आहे, त्यासंबंधी ते एक अक्षरही बोलत नाहीत. यावरून त्यांची चळवळ भाषात्मक नसून राजकीय आहे असेही वाटते. तसेच अपरिचित व उच्चारण्यास कठीण असे संस्कृत शब्दच ते प्राधान्येकरून निवडतात. ज्या मनुष्यापुढे लोकशिक्षण व बहुजन प्रगती ही ध्येये असतील तो ‘पैतृक निजस्वा’ सारखे भिकार प्रयोग करणार नाही व ज्याचे ध्येय शुद्ध भाषाशास्त्रीय असेल तो फारशी शब्दाहूनही कानडी शब्द दूरचे समजेल. पण रा. सावरकर यांस या दोन्हींचीही फिकीर नाही. त्यांस काही रूढ शुद्ध झोडून काढताना मराठी भाषेच्या समृद्ध बगीच्याची वाताहत झाली तरी पर्वा नाही. कारण आपल्या सावरकरी सोट्याने जमीनदोस्त केलेल्या प्रत्येक रोपाचे जागी एक एक अवजड ओंडका ढकलून आणण्याचे धाष्ट्र्य त्यांच्या अंगी आहे!

त्यांच्या भाषाशुद्धीच्या कल्पना कृतीत आणताना ते कोणकोणते अत्याचार करण्यास मंजुरी देतील हे त्यांच्या समोरील पाश्चात्य आदर्श पाहिले म्हणजे दिसून येईल. सावरकर हे मुसोलिनी किंवा कमाल पाशा यांसारखे सर्वाधिकारी असते तर त्यांनी काय केले असते हे त्यांच्या ‘प्रतिभे’तील लेखावरून दिसून येईल. सावरकर तुर्कस्तानातील सक्तीवर फारच फिदा दिसतात आणि कमाल पाशाने रोमन लिपी सुरू करण्यात काय स्वाभिमान दाखविला हे फक्त सावकरांसच माहीत! आणि तोही त्यांस सोईस्कर वाटत असल्यास अखिल हिंदुस्थानने भगवद्‌गीतेची आवृत्ती इंग्रजी स्पेलिंगांतून वाचावी असेही फर्मान ते उद्या काढतील!

येथपर्यंत सावरकर-पटवर्धनांच्या विचित्र व आततायी भाषाशुद्धीसंबंधी झाले. आता बहुजनसमाज (आणि यात लो. टिळक, चिपळूणकर वगैरेही मोडतात!) हे दोघे समजतात तितका स्वाभिमानशून्य व कर्तव्यशून्य आहे की काय हे पाहिले पाहिजे.

आपली विद्रूप भाषा न स्वीकारणारांवर सावरकर-पटवर्धन या दोघांचा मुख्य आरोप म्हणजे हे सर्व लेखक, वक्ते व सामान्यजन मूळ शब्द मारून फारशी व इंग्रजी शब्द घेतात. हा आरोप विचारात घेताना बऱ्याच बारीक तपशीलात शिरावे लागेल व ते मला प्रस्तुत लेखात करावयाचे नाही. म्हणून या आरोपाचा मुख्य भाग ढासळून पाडणारी एकच बाजू आपण प्रथम पाहू. ज्या फारशी शब्दांनी कोणत्याही मराठी अथवा संस्कृत शब्दाची गळचेपी केली नसेल व मराठीत एक स्वतंत्र कल्पना व एक स्वतंत्र नादमाधुर्य आणले असेल, अशांस हे शुद्धिवाले पंक्तिपावन ठरविण्यास तयार आहेत काय? बहुजन समाज असेच पुष्कळ शब्द वापरीत आहे. या जातीच्या शब्दांनंतरची जात म्हणजे जे शब्द धड मूळ शब्द घालवीतही नाहीत व फारसा महत्वाचा नवीन अर्थ अगर नाद मराठी शब्दसंग्रहास देतही नाहीत. उदाहरणार्थ ‘मेहेरबानी’ पण अशा

शब्दांसही मी ‘अजागलस्तनस्यैव’ निरर्थक समजत नाही. भाषा हे एक आराधनाचे किंवा प्रहाराचे हत्यार समजून कौशल्याने वापरणारा, कुशल लेखक जेथे ‘कृपा’ वापरील तेथे ‘मेहेरबानी’ वापरीलच असे नव्हे आणि जेथे ‘प्रेम’ वापरील तेथे ‘मोहब्बत’ कधीच वापरणार नाही! पण हे सर्वच त्याने कोठे न कोठे वापरलेले असतील. आणि हे सर्वच त्याच्या लिखाणात अज्ञ जनांच्याही कानास खुपणार नाहीत. पटवर्धन मात्र ‘मालकाचा नोकर’ काढून त्या जागी ‘प्रभूचा किंकर’ हे शब्द आवेशाने आणतील आणि बिचारे धनी, गडी वगैरे शुद्ध मराठी शब्द या आततायी प्रचारकांच्या पुस्तकी शब्दापायी तुडविले जातील! मला या बाबतीत असे स्पष्ट सांगावयाचे आहे की, मराठीत असलेल्या सर्वच परकीय शब्दांनी मूळ मराठी शब्द मारलेले नाहीत. उलट भाषाशुद्धीवाले मात्र (दोघेही स्वाभाविकता व सुलभता यांस सर्वस्वी पारखे असल्यामुळे) कित्येक चांगले शब्द मारीत आहेत व कित्येक भिकार समास मराठीच्या माथी मारीत आहेत.

असे का होत आहे? यांस भाषाशुद्धीची कळकळ नाही काय? व उलट ज्यास कळकळ असेल असा मनुष्य भाषेत शिरणाऱ्या अगर शिरलेल्या शब्दांबाबत काहीच निर्बंध पळणार नाही काय? पहिल्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे यांस स्वभाषेची कळकळ आहे की नाही हे त्यांच्या आजवरच्या लिखाणावरून ठरविणे झाल्यास निकाल त्यांच्याविरुद्ध द्यावा लागेल. आणि ही कळकळच जर संशयित ठरली तर त्यांच्या या प्रचंड गडगडाटाचे इंगित काय? या दोघांसही भाषेसारख्या सामान्य जन आणि असामान्य कलावंत यांच्या प्रांतातील, अतएव केवळ साध्यासुध्या तरी, नाहीतर सूक्ष्म कलात्मक तरी -पदार्थांविषयी उत्साह वाटणे कठीण आहे. यातील एक आततायी आहेत व दुसरे तर्कटी आहेत. जेथे तारतम्य हाच प्रधानगुण आहे अशा ठिकाणी दोघांसही जाणे परवडणार नाही. या अत्युत्साही व प्रचंड उद्योगी वीरांची धामधूम, त्यास वाटत आहे स्वभाषेची, पण वस्तुतः आहे परकीय भाषेसंबंधी संताप निष्फळ दाखविण्याची!

या सुमारास एक नाजुक प्रश्न उघडच पुढे आणलेला बरा. ज्यांनी आपल्यावर राज्य केले आहे व जे आपणांवर राज्य करून गेले त्यांच्या भाषेवर आग पाखडणे स्वाभिमानाचे आहे की नाही? मी या बाबतीत असे म्हणेन की केवळ आपणांवर राज्य करीत आहे या कारणाने एखाद्या राष्ट्राची संस्कृती श्रेष्ठ समजण्याची वृत्ती गुलामगिरीची होय. आणि भाषा हे एक संस्कृतीचे अंग आहे व संस्कृतिवर्धनाचे साधन आहे. अतएव भाषेसंबंधीदेखील जागरूक रहावे. पण केवळ भाषा म्हणून भाषा सोवळी राखणे हे शनिवारवाड्यावर मुकटे वाळविण्याहून कमी हास्यास्पद नाही. जे लोक राममंदिर याठिकाणी मशीद म्हणतील ते भाषेची व संस्कृतीची अक्षम्य हानी करीत आहेत. उलट जे लोक ‘भवानी समशेर’ या जागी ‘भवानी खड्ग’ म्हणतील ते काहीच साधीत नाहीत. याचा अर्थ संस्कृतीचे साधन या दृष्टीने भाषाशुद्धीस बहुजनसमाजाची मान्यता मिळेल, पण परकियांच्या संस्कृतीची महत्त्वाची अंगे स्वीकारून आपल्या संस्कृतीची अवहेलना करणे आणि केवळ भाषाशुद्धीवर जोर देणे म्हणजे मात्र राष्ट्रीयदृष्ट्या भाषाशुद्धी नव्हे. रा. पटवर्धन यांस सुनीत, गझ़ल यांसारखे परकीय काव्यप्रकार मराठीत आणून लोकांस त्यांची बातमीही लागण्यापूर्वी अमुक सुनीत ‘गोपाल’ प्रकाराचे आहे या सारखे प्रयोग करणे यांत भाषाशुद्धीची हानी वाटत नाही. रा सावरकर यांनीही प्रतिकारास पोषक असल्यास मांसाहारापासून तो वर्णविध्वंसनापर्यंत कोणत्याही परकीय गोष्टीचा बेधडक पुरस्कार करण्यास कमी केलेले नाही. अशा संकटात धिटाई दाखविणाऱ्या अशा वीरांनी भाषेच्या बाबतीत मात्र एखाद्या आजीबाईप्रमाणे सोवळे सांभाळणे हास्यास्पद होय. आमची त्यांस नम्र विनंती आहे की, ‘संस्कृतिसंवर्धन’ व ‘राष्ट्रीयदृष्ट्या प्रतिकार’ या दोहोंस भाषाशुद्धी किती प्रमाणात आवश्यक आहे या दृष्टीने त्यांनी प्रस्तुत प्रश्नाचा विचार करावा.

अनुक्रमणिका

केवळ भाषेच्या दृष्टीने परकीय शब्दांसंबंधी स्वाभाविक निर्बंध कोणते ? या प्रश्नाचा विचार करताना परकीय शब्द स्वभाषेत येतात की आणले जातात, याचा प्रथम विचार केला पाहिजे. सावरकर-पटवर्धन ज्या पद्धतीने शब्द आणून सोडतात त्या पद्धतीने कुठलाच नवीन शब्द भाषेत रूढ होत नाही. एखादा संस्कृत शब्द, प्रतिशब्द अथवा एखादा परभाषेतील शब्द प्रचारकी बाण्याने आणणे स्वाभाविकतेस विघातक आहे. आजवर जे जे नवीन शब्द आले ते ते कोणी पंडिताने आणून सोडले नाहीत. सामान्य जनांच्या स्वाभाविक संपर्कात ते केव्हा आले हे कळलेच नाही. त्यांतही काही रुजले व काही रूजले नाहीत. काही मुळचे स्वरूप अजिबात पालटून मराठी जिव्हेवर नांदू लागले. या सर्व प्रक्रियेचा अर्थ या भाषावृक्षावरील शब्द तोडून त्या भाषेच्या फांदीवर चिकटवून दे असा प्रकार कधीच होत नाही. भाषेला कोणते शब्द मानवतात व कोणते मानवत नाहीत हे हळूहळू रूढ होणाऱ्या शब्दांच्या इतिहासाकडे पाहिल्यास स्पष्ट दिसून येईल. या शास्त्रात खोल शिरण्याचे हे स्थळ नव्हे.

भाषासिद्धीच्या प्रवाहाची मुख्य दिशा मात्र स्पष्ट आहे. प्रत्येक भाषेला काही विशिष्ट नाद असतो. हे नादवैशिष्ट्य ही भाषा बोलणारांच्या उच्चारण पद्धतीवर (Accent and Intonation) अवलंबून असते. जुने शब्द हल्लीच्या स्वरूपात का आले याचे उत्तर या राष्ट्रीय वैशिष्ट्यांत सापडते. अशा स्थितीत भाषेच्या विशष्ट रचनेचा भंग करून केवळ संस्कृत कोशात आढळतात म्हणून हवे ते शब्द मराठीवर लादता येणे शक्य नाही. यायोगे लिहिण्याची भाषा पंडिती व अस्वाभाविक होत जाईल आणि व्यवहाराची भाषा व पुस्तकी भाषा यांचा संबंध अजिबात तुटेल. मराठीने स्वाभाविक रीत्या जे नवीन शब्द बनविले आहेत त्यायोगे हा वैशिष्ट्यभंग झालेला नाही. याचे कारण व्यवहाराच्या अकृत्रिम ओघात आलेले शब्द पांडित्यांची कदर न करता शक्य तो मराठी पेहराव घेत घेत आले आहेत. तसेच प्रत्यक्ष व्यवहाराच्या वातावरणात जे शब्द प्रथम पदन्यास करतात ते भाषेतील विशिष्ट रचनेमध्येही (Idioms) आपले योग्य स्थान ठरवीत ठरवीत येतात. सारांश ते आगंतुक व उपटसुंभ वाटत नाहीत. या बाबतीत पंडिती वळणाचे लोक दोन चुका करतात. एकतर केवळ कोणताही संस्कृत शब्द मराठीत दडपण्यास हरकत नाही, या भ्रमाने मराठी शब्दसमूहाचे स्वरूप बिघडवितात. तर उलट दुसरे म्हणजे, कधी कधी मराठीस अनुकूल असे रूप घेणाऱ्या शब्दास उलट मूळ स्वरूपाप्रत पाठवितात. पटवर्धनांसारखे लोक अजिबात फारशी शब्द वापरणार तरी नाहीत किंवा वापरलेच तर त्यांचे मराठी रूप बदलून त्यांस खास इराणी पोशाखात तरी वापरतील! उदाहरणार्थ 'गहजब' हा शब्द आपल्याकडील बायकादेखील वापरतात. पटवर्धन, अर्थात आजचे पटवर्धन त्याबद्दल 'तांडवाकांत' यासारखा काहीतरी भेसूर शब्द वापरतील व ज्यावेळी ते फारशी शब्द पंक्तिपावन करून घेणे पवित्र धर्म समजत त्यावेळी त्यांनी या शब्दांचे मूळ पर्शियन रूप मराठी लोकांस शिकविण्याचा यत्न केला असता. त्यांनी एकट्यानीच 'गझब' हे शुद्धरूप वापरून गहजब केला असता! सारांश सामान्य लोक व पंडित यांचे गोत्र कधीच जमत नाही.

सामान्य लोक भाषेचे नादवैशिष्ट्य राखून असतात तर पंडित कोशातील शब्द जतन करण्याचा प्रयत्न करीत असतात. एखादा मूळ शब्द (आई शब्दाप्रमाणे) कानडी होता की (पगार शब्दाप्रमाणे) पोर्तुगीज होता की (वतन शब्दाप्रमाणे) फारशी होता हे सर्वसाधारण मनुष्य पाहत बसत नाही. जे शब्द भाषेत स्वाभाविक मार्गाने रूढ झाले आहेत ते वापरण्यास त्यास मुळीच हरकत वाटत नाही. याचा अर्थ हे पंडित असा करतात की, सामान्य लोकांची भाषा शुद्ध नाही व आपली भाषा शुद्धात शुद्ध होय! सामान्य लोकांस लेखनात किंवा भाषणात हवे ते खपत असते तर हा आरोप खरा म्हणता आला असता. पण पटवर्धनांचा 'हर्राजी' शब्द ऐकताच कोणताही मनुष्य हे मराठी नव्हे असे तात्काळ म्हणाला असता. यावर पटवर्धनांचे उत्तर येईल की, "आम्ही जे फारशी शब्द वापरले ते पूर्वी बखरीतून वगैरे वापरले होते.

बखरवाले हे तर तुम्ही पंडिती वळणाचे म्हणत नाही ना?" पण बखरीतील फारशी शब्दांच्या भरण्याबाबत एक निराळीच परिस्थिती लक्षात ठेविली पाहिजे. बखर लिहिणारे किंवा मराठेशाहीतील पत्रव्यवहार लिहिणारे लोक हे एका अस्वाभाविक परिस्थितीत वाढले होते. त्यामुळे त्यांचा शब्दसंग्रह हा सामान्य जनसमूहाचा शब्दसंग्रह कधीच होऊ शकला नाही. गाण्याच्या बैठकी, सैन्याच्या छावण्या अथवा बाजार यांमधील साध्यासुध्या प्रसंगात जे परकीय शब्द येतात ते सहज रूढ होतात व त्यांची रूपेही भिन्न भाषा बोलणारांच्या परस्पर संमतीने नादानुकुल बनत जातात. या व्यवहारी भाषेत लेखनातील भाषेइतकी परकी शब्दांची गर्दीही नसते. शिवाय बखरी, ऐतिहासिक पत्रव्यवहार ज्या काळी लिहिले गेले त्या काळी संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन होऊन वाङ्मयात्मक वळणावर लिहिणारे लेखक मराठीत तयार झाले नव्हते. असे लेखक इंग्रजी शिक्षणानंतर सहजच निर्माण झाले. त्या लेखकांनी बखरीप्रमाणे फारशी शब्दांचीही खैरात केली नाही किंवा शुद्धिवादी कृत्रिम लेखकांप्रमाणे अपरिचित संस्कृत शब्दांचीही खैरात केली नाही. त्यांच्या भाषेत रूढ आणि अपभ्रंशाच्या राजमार्गाने 'शुद्धीकृत' झालेले फारशी व संस्कृत शब्द यांचा सुंदर मिलाफ आढळतो. त्यांनी कित्येक नवे संस्कृत शब्दही वापरले; पण ते आजच्या शुद्धिवाल्यांच्या वळणाचे नाहीत. याचे कारण हे लेखक श्रुतिविहीन नव्हते हेही असू शकेल!

सामान्य लोक ज्याप्रमाणे पटवर्धनांच्या 'हर्राजी' शब्दास हरकत घेतील त्याप्रमाणे ते त्यांच्या कित्येक प्रयोगांसही घेतील. सावरकर आणि पटवर्धन या दोघांस आहार, पोशाख, कलाकौशल्य हे परकीयांपासून घेण्यापेक्षा घेतलेले परकी शब्द नुसते राहू देणे देखिल भयंकर वाटते. तसेच भाषाशुद्धी म्हणजे शब्दशुद्धी हाही त्यांचा विचार त्यांच्या वंचनेचाच द्योतक आहे. त्यांस परकीय शब्दांचा स्पर्श खपत नाही, पण परकीय प्रयोगांबद्दल (Idioms and Cosntructions) मात्र यांस मुळीच भीती वाटत नाही! एकतर त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी या बाबतीत गिल्ला केल्याचे दिसत नाही आणि दुसरे खुद्द त्यांच्या लिखाणात कमालीचे हास्यास्पद परकीय प्रयोग काढून दाखविता येतात. मनोराज्य शब्द मराठीत प्रचलित असून 'मनोदुर्ग' हे (Castles in the air) या इंग्रजी शब्दप्रयोगाचे भाषांतर करीत बसणे याला आम्ही गुलामगिरी समजतो. सावरकर, पटवर्धन तसे म्हणत नसतील. 'जमीन-अस्मानाचे अंतर' यांतील फारशी जमीन आणि अस्मान खणून काढण्यास सज्ज झालेले सावरकर आणि पटवर्धन Poles asundero या इंग्रजी वाक्प्रचाराचे (Idiom) 'दोन ध्रुवांइतके दूर' यासारखे मराठी भाषांतर मात्र शुद्ध समजतील. ही झाली विशिष्ट शब्दप्रयोगांची (Idioms) स्थिती. आता वाक्यप्रयोगांकडे पाहू. आपल्या ग्रंथात पानाच्या तळाशी टीपा देताना 'पहा पान २६३' असे आजचे सर्व प्रतिष्ठित मराठी लेखक लिहितात. पटवर्धन हेही अनेक वेळ तसे लिहून गेले आहेत. या ठिकाणी '२६३ पान पहावे' असे म्हटले ते मराठी असे आम्ही समजतो. फार कशाला, ज्यांतील भाषा, भावना, धर्मकल्पना सर्वच बाटग्या आहेत अशा चरणांनी पटवर्धनाचे प्रतिष्ठित काव्यही भरून गेले आहे.

"येथे तो निजला प्रभूमधि कुठे आतां सभोती फुले?"

ही ओळ शुद्ध मराठी नव्हे, शब्द धेडगुजरी आहेत.सामान्य मनुष्य वरील प्रयोग व शब्द स्वयंस्फूर्तीने अशुद्ध समजतो. त्यास शुद्धीची चळवळ लागत नाही.

याप्रमाणे खरी भाषाशुद्धी आणि सावरकर-पटवर्धनी भाषाशुद्धी यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. हे पंडित जी शुद्धी करू पाहत आहेत तिची भाषेस जरूरी नाही. हे लोक भाषेत जे भयंकर प्रयोग आणून सोडीत आहेत त्यांच्याविरुद्ध शुद्धीची चळवळ करणे महाराष्ट्रास अपरिहार्य होऊन बसले आहे. प्रस्तुत

लेखात फक्त सावरकर व पटवर्धन यांच्या मूळ भूमिकेचा परामर्ष घेता आला. त्यांच्या विमानाचे खूर धरून शुद्धीच्या स्वर्गात जाऊ पाहणाऱ्या जाऊ पाहणाऱ्या 'इतरेजनां'चा धुमाकूळ काय वर्णावा? एकजण 'राजश्री' सारखा सर्वांग सुंदर व वाडवडिलांनी वापरलेला शब्द फेकतो व त्या जागी 'श्रीयुत' घालतो, तर दुसऱ्यास 'श्रीयुत' हा शब्द पांडित्यदर्शनाची भूक भागविण्यास पुरा पडत नाही म्हणून त्या जागी 'रावमहाशय' वापरतो! साधा Player शब्द घ्या. त्यासही यांना शब्द सापडू नये! असे काही आमच्याकडे पूर्वी खेळच नव्हते. 'खेळातील गडी, गडी वाटून घेणे' वगैरे प्रयोग पोराबाळांसह सर्वांना माहीत आहेत; पण त्याचे जागी आज अखिल महाराष्ट्रातील वर्तमानपत्रे 'खेळाडू' शब्द वापरीत आहेत. या साध्या शब्दात त्यांचे जातिवंत मराठी शब्दाविषयीचे अज्ञान, नवीन चालू केलेल्या शुद्धीविषयीचे अज्ञान आणि "पूर्वी आपल्याकडे काहीच नव्हते, प्रत्येक संस्थेचे आणि कल्पनेचे भाषांतर करण्याखेरीज गत्यंतर नाही" ही लाचारी, हे तीनही मनोगंड एकदम दिसून येतात. याच संबंधांतील 'फटका' शब्द घ्या. "नायक नायडू यांनी तीन फटके मारले व नंतर त्यांचा त्रिफळा उडविण्यात आला." यांतील बाकीचे विदुषकी प्रयोग आपण तूर्त बाजूला ठेवू. पण 'फटका' शब्द, आज अमेरिकेतून येथे आलेला मिशनरीदेखील अशा ठिकाणी वापरणार नाही. ज्या भाषांतरबहाद्दरांना टोल्याबद्दल 'फटका' शब्द चालतो त्यांस 'चपराक' शब्दही चालला असता! या प्रतिशब्दांची निवड करतांना यांस स्वभाषेचे साफ विस्मरण आणि परकी शब्दाची एकाग्रतेने जाणीव असे होऊन जाते काय? यांच्या निवडीत दिसून येणारे अज्ञान आपण पाहिलेच. आता निर्मितीकडे (अथवा पटवर्धनांच्या लाडक्या 'सर्गशक्तीकडे' पहा.) या सर्गवीरांनी आणि टांकसाळ्यांनी कृपा करून एक गोष्ट लक्षात ठेवावी की, कोश काखोटीत मारल्याने एका भाषेतील अनेक शक्तीच्या वलयांनी अंकित अशा शब्दरत्नांस दुसऱ्या भाषेत आणता येत नाही. Honeymoon, Goodnight, Thank you वगैरे शब्दप्रयोगांचे मराठी करता न आल्यास मराठीस कमीपणा आहे असे मानणारे स्वभाषेच्या हीनत्वाच्या कल्पनेने ग्रस्त असले पाहिजेत. मराठीतील गर्भाधान, तिळगूळ, भाऊबीज वगैरे शब्दांचे लॅटिन समासान्वित भाषांतर करण्याचा खटाटोप इंग्रज करतील काय? मला वाटते मराठ्यांचा अंमल इंग्लंडावर चालू झाला असता तर त्यांच्यातील काही असंतुष्ट व अरसिक वैय्याकरणांनी या चळवळी हाती घेतल्या असत्या! कित्येकांस वर दिलेली उदाहरणे प्रस्तुत विवेचन चुरचुरीत करण्याकरिता कपोलकल्पित बनविली आहेत असे वाटेल. अशा मंडळीस रा.पटवर्धनांनी Golden Treasury हे पुस्तकाचे विशेष नाव 'हैमकोश' म्हणून मराठीत आणण्याचा यत्न केला आहे हे ठाऊक आहे काय? आणि पर्ल व्हाइट हे पाश्चात्य नटीचे नाव घेतल्यास मराठीची शुद्धी जाईल म्हणून तिचे 'मुक्ता ढवळे' असे नामकरण करणारे भाषाकोविददेखील आपले पटवर्धनच होत! चोवीस तास इंग्रजीत वागणाऱ्या आजच्या विपरीत परिस्थितीच्या दासांनी अपरिहार्य म्हणून खाजगी संभाषणात एक इंग्रजी शब्द वापरताच त्यांजवर निर्भेळ दास्यवृत्तीचा व सदोष भाषावधाचा जोड आरोप ठेवणाऱ्या शुद्धिभक्तांची शुद्धी ही अशा प्रकारची आहे! फारशी, इंग्रजी शब्दांवर बहिष्कार घालणे म्हणजे शुद्धी; अशा मताची माणसे देखील सावरकर-पटवर्धनांसारख्या पुढाऱ्यांवर खास बहिष्कार घालतील.

भाषांतर म्हणजे भाषाशुद्धी या हीनग्रहाने ग्रस्त अशा लेखापैकी फक्त प्रख्यातांवरच या ठिकाणी मी आघात केला आहे. त्यांच्या निर्बुद्ध आणि हास्यास्पद अनुयायांनी जे शेकडो शब्दप्रयोग या भाषेत सोडले आहेत त्यांचा मी उच्चारही करू इच्छित नाही. यांच्या भाषाशुद्धीची तत्त्वे स्वीकारली आहेत की नाहीत हा प्रश्न वेगळा; पण ज्या हिरवट लेखकास विचारशक्तीच्या गंभीर हेतुव्यतिरिक्त भाषा वापरणे, टूम म्हणून शब्द काढणे ही भाषामातेची विटंबना वाटत नाही अशांनी काढलेले विद्रूप प्रयोग मराठीची काहीच हानी करणार नाहीत असे नव्हे. या शुद्धीवाल्यांनी आधीच मराठीचे सौंदर्य धोक्यात आणले आहे आणि ही शुद्धी

अनुक्रमणिका

नसून विद्रुपता आहे हे वेळीच सांगण्याचे नैतिक धैर्य जबाबदार व तत्त्वनिष्ठुर व्यक्तींनी न दाखविल्यास मराठी भाषेचे वाटोळे होईल.

प्रचारवेडाने वेडावलेल्यांचा आणखी एक दुराग्रह येथे सांगितला पाहिजे. ते मोठ्या भविष्यनिष्ठेने सांगतात की,''लोकहो! पैतृक निजस्व ','स्वागतिणे', 'सायकल विक्रम' वगैरे प्रयोग तुमच्या दुबळ्या भावनाप्रधान मनास आज कसेसेच वाटोत. पण आणखी पन्नास वर्षांनी तुमच्या नातवास यांतच ज्ञानेश्वरी ओव्यांचे माधुर्य प्रतीत होईल! '' ही निष्ठा खरोखर अतुलनीय आहे.कोणासही या भविष्यनिष्ठांचा हेवाच वाटेल. पण आम्हांसही आमची निष्ठा आहे आणि तिला स्पर्श करून आम्ही सांगतो की, ''ही भूते पन्नास वर्षांनी माणसांत येतील; म्हणूनच आज त्यांस गाडा!'' विद्रूप प्रयोग भाषेत रूढ झाल्याची उदाहरणे आहेत. एक रूढ प्रयोग दुसऱ्या तितक्याच रूढ प्रयोगइतका नेहमीच अर्थपूर्ण व नदयुक्त असेलच असे नसते; आणि म्हणूनच एक सबंध भाषाची भाषा दुसऱ्या भाषेहून अधिक नादगौरवसंपन्न असते. आणि म्हणूनच नवीन शब्द व प्रयोग तर्ककर्कश टांकसाळ्यांच्या हाती देऊन चालत नाही. ते भाषाप्रचाराचा मक्ता न घेता हृदयाचा ठाव घेण्याकरिता लिहिणाऱ्या प्रतिभावान व नैसर्गिक लेखणीतून नकळतच जन्मावे लागतात. वरील केवळ शब्दसोनारास कुठल्याही निरोगी समाजात कोणी क्षणभरही उभे करणार नाही. दुर्दैवाने परतंत्र देशात मात्र पारतंत्र्याचा रोग बरा करण्याच्या भ्रामक आशेवर या विषवल्ली तरारतात!

रा. सावरकर यांच्या अनेक लेखांतून व ग्रंथांतून हजारो विद्रूप शब्द विखुरले आहेत. ते पुरे न पडूनच की काय, त्यांनी आपल्या परवाच्या 'सरकारी राजवृत्तांतात' एक ताजी यादी प्रसिद्ध केली आहे! 'रेकॉर्ड मोडले म्हणजे रेकॉर्ड ऑफिसातील कपाट मोडले की...'' इ. याप्रमाणे रेकॉर्ड शब्द केवळ परकीय नव्हे तर अर्थहीन आहे. असे भासविण्यापर्यंत सावरकर यांची मजल गेली आहे. आणि त्यांनी सुचविले काय? तर ''उच्चांक मोडला!'' प्रतिपक्षियांस पोरकटपणा मानवत असेल तर तोही विचारील की, ''काय हो, त्या मनुष्याने एक उंच आकडा हातात घेऊन मोडला, की उंच अशा कोणा व्यक्तीची मांडी मोडली?'' सारांश तूर्त शुद्धीवाले टवाळी करीत असले तरी त्यांचे प्रतिस्पर्धी प्रतिकार म्हणून तरी टवाळीचा अवलंब करतीलच. बरे, याच 'रेकॉर्ड' शब्दाला आज किती शब्द चालू करण्यात आले आहेत, हे या शुद्धीवाल्यासच विचारावे! आता त्यातील सर्वच रा.सावरकरांच्या शब्दाइतके हास्यास्पद नाहीत हे कबूल केले पाहिजे. या मनानेच इतर भाषांतरी शब्द! 'कायदेपंडित' बद्दल 'निर्बंधपंडित' शब्द रूढ न कराल तर तुम्ही दास्यवृत्तीचे आणि सावरकरांच्या नावामागे 'बॅ.' हे उपपद ठळक ठशात छापणे मात्र शुद्ध मराठी! Maternity Home बद्दल 'प्रसूतीगृह' अथवा 'बाळंतघर' हे शब्द कोणीही अपंडिताने सहज वापरले असते. पण आज सावरकरी वळणाचे लोक 'मातृ-प्रसूति-गृह' हा समास रूढ करीत आहेत.कदाचित ते चुकून पितृप्रसुतिगृह असे वाटून भावी माता बिचकून परततील! ही संदिग्धता या पंडितांनी टाळली. आणि ही भाषा रूढ करणारे मनु, याज्ञवल्क्य, मुसोलिनी, कमाल आपल्या शूर शिष्यांस आश्वासितात, "नवा शब्द वापरा की तो अन्वर्थकच बनलाच!! '' अहो अन्वर्थकता! अहो वैदग्ध्यम्!

बरे ही अर्थशून्य नादशून्य अर्धसंस्कृत भाषा तरी हे कितपत टिकवितात! आजचा शब्द उद्या वापरला जाईलच असा नियम नाही. या पानावर निखालस इंग्रजी शब्द मूळ स्पेलिंगात तर त्याच पुस्तकाच्या पुढील पानावर त्याचे दुर्बोध भाषांतर! असे किती तरी वेळा दाखविता येईल. नवीन शब्द हा पाहुण्यासारखा किंबहुना पंथस्थासारखा असतो. तो प्रथमदर्शनीच औचित्यभंग करून प्रवेश करील तर त्याचे स्वागत होण्याची आशाच नको. ज्यांस भाषा-सौष्ठवाचे ज्ञान उपजत असते त्यांचे नवे प्रयोग इतक्या योग्य स्थली पडतात की ते भाषेच्या गाभ्यात (Idioms pregnant with associations and suggestions)

सहजच स्थान मिळवितात, या उलट "मी एका मुसलमान शब्दाची मुंडी छाटली आहे- मला तुमच्या डोक्यावर बसण्याचा हक्क आहे!" येवढ्याच जोरावर शिरणारे शब्द भाषासौष्ठवाचा इतकेच काय, पण नैसर्गिक वाढ हा जो भाषेचा प्राण त्याचाच घात करतात.

हा ओतीव शब्दांचा कारखाना काढण्याचा प्रयत्न कोणत्या भ्रामक कल्पनांनी चालविला आहे ते आपण पहिलेच पाहिजे. तथापि, पटवर्धन-सावरकर यांच्या ओतीव शब्दसंग्रहात असेही काही प्रकार आहेत की, ज्यांची मीमांसा त्यांच्या टूमशाहीचा मागोवा घेत जाऊनही हाती लागत नाही.

"चप्खल आणि अद्ययावत्" या सावरकरी प्रयोगातील 'नी'; तसेच सौंदर्य -समीक्षक अन् विचार-मंथन' या पटवर्धनी प्रयोगातील 'अन्'; यांचे प्रयोजन, औचित्य आणि कुलशील शोधता शोधता "कवयोप्यत्र मोहिता:" अशी स्थिती झाल्याचे प्रस्तुत लेखकाने अनेक ठिकाणी पाहिले आहे. पण आणखी एका शुद्धीवाल्या पिल्लासंबंधी अनेकांना अचंबा वाटला असेल. ते पिल्लू म्हणजे 'वा' हे अव्यय! 'किंवा,' 'अथवा,' ही विकाल्पार्थी अव्यय सोडून 'वा'हे नवेच पिल्लू सोडण्याचे कोणते कार्य साधले हे या मंडळींनी जाहीर करावे. नवीन शब्द आणि प्रयोग यांचा उपक्रम योग्य स्थळी भाषेचे सौंदर्य व अर्थगांभीर्य वाढवू शकेल. पण ज्यांच्या भाषेतील वाक्ये आधीच भट्टीकाव्यातील श्लोकांप्रमाणे व्याकरण-रुपसंपन्न झाली आहेत त्यांनी शुद्ध मराठी अव्ययांच्या तरी वाटेला जाऊ नये! तूर्त फक्त परकी शब्दांचा पाठलाग धामधुमीस पुरेसा नाही काय? उद्या, 'परंतु' हा शब्द फार लांब वाटतो, रशियन भाषेत किंवा जपानी भाषेत त्याच अर्थी एक अर्धस्वर 'नि' तोही ऱ्हस्व चालू शकतो असे म्हणून हे लोक स्पर्धेखातर आणि भाषाशुद्धीखातर 'अन्' बुद्धीखातर 'तु' हे अव्यय 'वा' या अव्ययाप्रमाणेच आपल्या संस्कृत बटव्यांतून काढतात की नाही पहा! आणि मग त्यांची वाक्ये पुढीलप्रमाणे 'चपखल' होतील. "मी त्यास स्वागतिले! 'नि' त्यांचे श्रम 'अन्' अध्वखेद नष्टविले! 'तु'(परंतु) तू मात्र शब्द-शून्य बसला होतास!"

ही अतिशयोक्ती नव्हे, हा उपहास नव्हे, या लेखात उद्‌धृत केलेली यांची वाक्ये याहूनही दुर्बोध आहेत की नाही हे वाचकांनी पाहावे.

हे सर्व खून कशाच्या जोरावर पचविण्याचा यांचा प्रयत्न आहे हे आपण वर पाहिलेच आहे. त्या सर्व समर्थनाबरोबरच आणखीही एक निरुत्तर समर्थन पुढे करण्यात येत असते. "अहो! पोलंड, जर्मनी, आयर्लंड यांनी याच मार्गाने आपल्या भाषांचा उद्धार केला." पण या बाबतीतही त्यांच्या भाषेची स्थिती शुद्धीचळवळीपूर्वी कशी होती व आता कशी आहे, हे ताडून पाहण्याइतके ज्ञान आपल्या वाचकांना नाही हे जाणूनच हे लोक या देशांकडे बोट करीत आहेत की काय असे वाटते. नाहीतर ज्या भाषेचा शब्दसंग्रह व ग्रंथसंग्रह स्वभाषेहूनही अधिक परिचित, अशा इंग्रजी भाषेचे उदाहरण प्रस्तुत प्रकरणी नेमके का आठवू नये! शुद्धीवाल्यांचे एकूणएक राष्ट्रीय, सांस्कृतिक, भाषाविषयक सिद्धान्त इंग्लंडच्या ढळढळीत उदाहरणांपुढे साफ खोटे ठरतात म्हणून त्यांनी इंग्रजी शब्दाप्रमाणे इंग्रजी राष्ट्रीय वस्तुस्थितीवर देखील बहिष्कार तर टाकला नसेल ना? पण बहिष्काराच्या टोपलीखाली चार परकी शब्दांची कोंबडीही गुपचूप बसेनात तर एका अखंड दिग्विजयी राष्ट्राचा सूर्य ते कसा डालून ठेवणार! असे कोणते भाषाविषयक संकट आहे की जे इंग्लंडवर येऊन गेले नाही? इंग्लंडवर परकी सत्ता आली आणि गेली. इंग्लंडवर ग्रीक आणि लॅटिन संस्कृतीचे आवरणही अनेक शतकापर्यंत होते. युरोप खंडाची नखरेबाज आणि दरबारी म्हणून गाजलेली, फ्रेंच भाषा तर इंग्रजीच्या दाराशीच बसलेली. अशा चोहोंकडून पेटलेल्या वणव्यात आणि फाटलेल्या आकाशाखाली इंग्रजीने आपला भाषावृक्ष निर्भयपणे वाढविला हा इतिहास भाषाशुद्धीवाले जाणून

अनुक्रमणिका

आहेत. आणि म्हणूनच इंग्रजीचे नाव घेण्याचे ते टाळतात. इंग्रज लोक फ्रेंच शब्दांवर बहिष्कार घालून लॅटिन शब्दांच्या आहारी जाऊ इच्छीत नाहीत. इतकेच काय पण इंग्रजीत एका शब्दास लॅटिन, ग्रीक, फ्रेंच, आणि शुद्ध इंग्रजी अथवा अँग्लो सॅक्सन याप्रमाणे अनेक पर्याय (synonyms) आहेत, याचा ते अभिमान बाळगतात. पण त्याचा अर्थ असाही नव्हे की, केवळ टूम म्हणून कोणी फ्रेंच किंवा लॅटिन शब्द आणू लागल्यास ते त्याची गय करतील! शब्दांची शिकार आणि शब्दांची शेती ही दोन्ही सारखीच पंडिती आणि अस्वाभाविक समजतात. एका विशिष्ट संदर्भात जो फ्रेंच प्रयोग सौंदर्यवर्धक समजला जाईल तोच अन्य ठिकाणी पांडित्यनिदर्शक नाही तर टूमबाजीचा म्हणून गर्ह्य ठरविला जाईल. सारांश, परद्वेषाहून स्वभाषा प्रेमास या बाबतीत ते अधिक प्रमाण धरतात. रा. पटवर्धन म्हणातात 'बंडोबस्ट', 'खटपट' वगैरे शब्दांस प्रतिष्ठित इंग्रजीत स्थान नाही. पटवर्धनांसारख्या तर्कजीवी गृहस्थाने एवढा हेत्वाभास पचवावा हे खरोखर एक नवल होय. काही परकीय शब्द अशिष्ट भाषेत (Slang मध्ये) पडतील हे उघडच आहे; पण 'पार्लमेंट' हा शब्द शुद्ध इंग्रजी नाही म्हणून त्यास कोशात स्थान नाही असे पटवर्धन दाखवू शकतात काय? ते तसे करू शकतील तरच इंग्रजी भाषा शुद्धीवाल्यांच्या सिद्धान्तास पोषक आहे असे ठरेल. उलट इंग्रजीत फाजील शब्दनिर्मितीची खोड (Neologism) हा एक मोठा भाषा-रोग गणला जातो.आज सावरकर, पटवर्धन बनवीत आहेत तसे अकारण शुद्धीकरण कोणी चालविल्यास त्यांचे ग्रंथ तिकडे कोणी हातीही धरणार नाहीत. बरे इतके असून त्यास शुद्ध अँग्लो-सॅक्सनचे सौंदर्य व सामर्थ्य समजत नाही असेही नाही. सारांश, शब्द संग्रहाच्या अनेक जातींचा योग्य उपयोग करून घेणे हाच या बाबतीत अखेरचा निर्णय त्यांच्या भाषाविशारदांनी मान्य केला आहे.

-आणि म्हणूनच हा इतिहास शुद्धीवाले मुद्दाम लपवितात. आणि पोलंड, जर्मनी वगैरे दूरच्या प्रांतात आपल्या भाषाबांधवास नेत असतात! बरे, ज्या पन्नास भाषांची हे प्रचाराच्या भरात नावे घेतात त्यांचे विकार आणि औषधयोजना स्वभाषेवर लादण्याइतकी बारीक अंतस्थ परिस्थिती या प्रचारपंडितांस तरी माहीत असणे शक्य आहे काय? जिज्ञासू मनुष्य जी माहिती दुरून ज्ञानकोशातून मिळवितो ती माहिती ती भाषा बोलणाऱ्या लोकांच्या माहितीइतकी अंतस्थ नसते. म्हणून या शुद्धीवाल्या देशांचे बाबतीत पुढील प्रश्न उपस्थित होतात. यांच्या या बहिष्काराने भाषेचे कल्याण झाले की निव्वळ काही परकीय भाषांवर सूड घेण्याकरिता त्यांनी स्वभाषेचे मातेरे करून घेतले? पण आपण तेथील लोकांस तारतम्य आहे असे धरून चालू. तरी त्या देशाचे तारतम्य हे या देशात तारतम्य ठरेलच असे नव्हे. विशिष्ट परिस्थितीबरहुकूम बदल हाच तर तारतम्याचा विशेष. त्यांच्या भाषेची व मराठीची आजची स्थिती एकच आहे काय? त्यांच्या भाषांवर आघात करणाऱ्या भाषा मराठीवर आघात करणाऱ्या भाषांच्याच प्रकृतीच्या आहेत काय? आघाताच्या परिणामाचे प्रमाण तिकडे व इकडे एकच आहे काय! पहिल्या दोन प्रश्नांची उत्तरे देण्याइतपत त्या शब्दांची माहिती कोणाच शुद्धीवाल्यास असणे शक्य नाही. शेवटचा प्रश्न केवळ आकड्यांचाच असल्यामुळे त्याची माहिती सुलभ आहे. आणि ती सावरकरांनी दाखविलीही आहे. सावरकर म्हणतात, "आमच्या भाषेत काही चारशे-पाचशे शब्द घुसले आहेत तेवढे देखील काढणे आम्हास कोण जड जाते! तुर्कांच्या वाङ्मयात काही परकीय शब्दच तेवढे घुसले नव्हते तर परकीय भाषाची भाषाच घुसली होती.स्वत:ची तुर्की ही केवळ चालचलाऊ बोली! साहित्य नी वाङ्मय असे तिच्यात मुळीच नव्हते!" एकूण सावरकरांच्या तुर्की नमुन्यात आणि ते सुधारू पाहत असलेल्या बिचाऱ्या मराठीत एवढी तफावत आहे तर! ज्यास सर्पदंश झाला, तो बोट कापीत आहे म्हणून ज्यास ढेकूण चावला त्यानेही चिडून हात कापावा ना? वीरश्रीच्या भरात सावरकरांसारखे वीर आत्मघात देखील करावयाचे! म्हणूनच या तारतम्यशून्य लोकांचे हाती निदान पुढारीपणाचे तरी हत्यार देऊन उपयोग नाही.

अनुक्रमणिका

प्रस्तुत प्रकरणी तारतम्य आणि सौष्ठवबुद्धी यांचाच सर्व भाषाकोविद कसा आश्रय करतात हे पुढील एका सर्वमान्य संदर्भग्रंथातील उताऱ्यावरूनही स्पष्ट होईल :-

"There are many occasions when an expression in English is not only inadequate but even lacking for the rendering : of certain ideas" (and hence) "a large class of words exists which have been given ready hospitality whereupon they have acquired a recognised position in the language...So many foreign elements exists in the English language that it makes no fuss over the entry of additional strangers." (e.g. Seraph, Caravan,Cherub, not to speak of Parliament, Saloon etc...)

याच बाबतीत बेन जॉन्सनचे प्रख्यात धोरण प्रत्येक लेखकाने ब्रीदवाक्य ठरविण्यास योग्य होय.

"We must not be too frequent with the mint nor fetch words from the extreme and utmost ages; but the eldest of the present and newest of the past language is best."

ज्यांचा स्वाभिमान सावरकर-पटवर्धन यांच्याहून खासच कमी नाही असे विष्णुशास्त्री चिपळूणकर काय म्हणतात ते आता पहा :- " 'इष्टेट', 'पाइंट', 'रजिस्टर' वगरे पुष्कळ मंजुळ शब्द इतक्यात घरोघर होऊन बायकांपर्यंत व पोरांपर्यंतसुद्धा गेले आहेत. पण आमचा मुख्य रोख त्यांवर नव्हे. वरील शब्द कितीही मराठीत आले तरी त्यापासून तीस तादृश भय नाही. एक तर ते बोलून चालून परकीय पडले. तेव्हा त्यास खुद्द मराठी असे कोणीही म्हणणार नाही व त्यांचीही तीत घुसण्याची इच्छा नाही. शिवाय दुसरे असे की त्यातून कित्येकांचे मराठीत असणाऱ्या शब्दांनी कामही होणारे नव्हे. यास्तव लांबलचक नवे शब्द उगीच श्रम घेऊन काढावे त्यापेक्षा हेच का असेनात? इंग्रजांस जर आमचे 'खटपट', 'बंडोबस्त', 'पक्का', 'घी' असे शब्द चालतात तर आम्हासही 'बुक', 'टेबल' वगैरे शब्द खुशाल चालून घेता येतील. पण याविषयी आम्हास विशेषतः बोलणे नाही. तर ते धड इंग्रजी नव्हेत धड मराठी नव्हेत, ज्यांचा अर्थ इंग्रजी आणि उच्चार मराठी, असे अर्धेकच्चे मराठीत उतरलेले जे शेकडो शब्द सध्या मोठाल्या ग्रंथांतून, मासिकपुस्तकांतून, वर्तमानपत्रांतून, हजारो नवीन तरुण लोकांच्या भाषणात हमेशा आढळतात अशा शब्दांवर आमचे मुख्यतः धोरण आहे."

वरील अभिप्रायावरून प्रस्तुत भाषाशुद्धीच्या वादात जातिद्वेष अथवा अभिनिवेश याहून तारतम्य, उपयुक्तता व भाषासौष्ठव यांसच सर्व सुज्ञांनी अग्रस्थान दिलेले आढळेल. आणि महाराष्ट्र देखील हेच करीत आला आहे हा प्रश्न सावरकर-पटवर्धनांहून फारच जुना आहे. विष्णुशास्त्र्यांनी त्याचा विचार करूनही आपल्या लिखाणातून फारशी शब्द निवडून काढण्याचा निरुद्योगी व आत्मघातकी उद्योग केला नाही. इतर अनेक स्वाभिमानी व देशोद्धारक म्हणून पूज्य झालेल्या लेखाकांनीही फारशीचे योग्य प्रमाण मान्यच केले; इंग्रजीचेही प्रत्येक ठिकाणी हटातटाने भाषांतर केले नाही; काही ठिकाणी मूळच्या संपूर्ण अर्थाचा नाद सोपा पर्याय पत्करला, कित्येकदा एका शब्दाचीच कल्पना वाक्याने सांगितली, तर प्रसंगी मूळ इंग्रजीही वापरले. आजचेही प्रख्यात नवे जुने लेखक अशा सर्वमान्य व कार्यक्षम शब्दसामुग्रीवरच कार्य चालवीत आहेत. कारण कोणासच सावरकर-पटवर्धन पसरवीत आहेत ती भाषाशुद्धीही वाटत नाही व भाषाही वाटत नाही. मात्र आत्मसंतुष्टतेच्या लहरीवर आरूढ होत्साते 'भाषाशुद्धीची आंदोलने' पाहत आहेत. प्रतिमेतील त्यांच्या लेखांतील पुढील उद्‌गार पाहा : "आज भाषाशुद्धीस तत्त्वतःच आणि सर्वस्वी

प्रतिकूल असा पक्ष मोजण्यासारखा उरलेला नाही. अनेक रुढावलेल्या परकीय शब्दांचे उच्चाटन गेल्या दहा वर्षात झालेले असून...” इ.इ.

यांतील वल्गाना व वंचना यांस तोंड देणे मुष्कील आहे! कारण त्यांस विरोध करणे म्हणजे भाषाशुद्धी नको म्हटल्याचे पाप लागणार! आतापर्यंतचे विवेचन ग्रहण करणारास समजलेच असेल की, आम्ही भाषाशुद्धीच्या विरुद्ध नाही. आणि म्हणूनच सावरकर यांच्या, वरील आत्मसंतुष्टतेच्या उद्गारांवर आमचे उत्तर म्हणजे “-(१) भाषाशुद्धीचा प्रारंभ आपण केला नाही. (२) तो वर सांगितल्याप्रमाणे विष्णूशास्त्र्यांपासून झाला. (३) आपण केलेला उपक्रम भाषाशुद्धीचा नसून शब्दशुद्धीचा अथवा त्याहूनही वास्तविक म्हणजे शब्दबहिष्काराचा होय. आणि त्याचा स्वीकार एकाही ग्रंथकाराने किंवा वृत्तपत्राने केलेला नाही. खऱ्या भाषाशुद्धीची चळवळ ह्यापुढे विचारी लोक हाती घेतील व त्याचा पहिला प्रहार आपल्या बेडौल व दुर्बोध भाषेवर होईल.”

‘गेल्या दहा वर्षांत ’ काय झाले याचे चित्र विस्तारभयास्तव येथे काढता येत नाही. पण लेखाच्या शेवटी दिलेल्या उताऱ्यावरून गेल्या पन्नास वर्षांत विचारी लेखकांच्या भाषेत काहीच फरक पडला नाही असे सहज दिसून येईल. जो फरक पडला तो हुल्लडी व अपक्व लेखकांच्या भाषेत पडला आणि त्या फरकाने इंग्रजी’ फारशी शब्द कमी करण्याचे काम मुळीच केलेले नाही. कृष्णशास्त्री आणि केळकर, विष्णुशास्त्री आणि माडखोलकर, लोकहितवादी आणि पोतदार, लो. टिळक आणि अत्रे या भिन्न पिढ्यांतील प्रातिनिधिक लेखकांच्या लेखनांतील शब्दसामुग्री भाषाजातिदृष्ट्या एकच आहे. सावरकर म्हणतात त्याप्रमाणे उर्दू-इंग्रजीचे आक्रमण कोणासच परतवावे लागले नाही. मध्ये थोडी गडबड उडाली. पण ती सध्याच्या एका शुद्धीप्रचारकाने म्हणजे पटवर्धनानीच उडविली! आणि ती सर्रास फारशी शब्द पेरून!!

एवंच बहुजनसमाज त्यातही नव्हता आणि यातही नाही. इंग्रजी शिक्षणाबरोबर वाढीस लागलेल्या मराठी गद्याची शब्दसामुग्री, लोकहितवादींपासून विद्यमान प्रमुख गद्यलेखक श्री. न. चिं. केळकर यांचेपर्यंत एकच आहे. आमच्या म्हणण्याचा अर्थ असा की, कालमानाने भाषा बदललेली असेल, पण सावरकर म्हणतात त्याप्रमाणे इंग्रजी शब्दांची धाड परतविण्याकरिता गेल्या दहा वर्षांत भाषा बदलली असे मुळीच नव्हे.

सावरकर म्हणतात त्याप्रमाणे काही घडले आहे की काय आणि भाषा शुद्धीवाले शुद्ध लिहितात की शुद्धीचे नावही न घेणारे लिहितात हे स्पष्ट दिसून यावे म्हणून भाषेचे चार नमुने प्रत्यक्षच पाहू या.

(१) “त्या वेळचे ज्यू लोक अत्यंत धर्मवेडे होते. मनुष्य धर्मवेडा झाला म्हणजे त्याला सारासारविचार राहत नाही. उज्ज्वल ध्येयाची मातब्बरी वाटत नाही, त्याला परधर्मीयांची सुंदर कृती विद्रूप वाटू लागते. त्यांचे सुंदर बोल कटु लागतात. त्यांच्या उदार धारणेबद्दल संशय येऊ लागतो. एखाद्या सुंदर घटनेचा विध्वंस करण्याचे महत्पुण्य हेच धर्मवेडे आपल्या पदरी बांधून घेतात. हा विध्वंस करण्याकरिता परप्रांताच्या लोकांना वाटेल तसे सहाय्य करावयास त्यांना काडीमात्र शरम वाटत नाही. पण हा विध्वंस करताना आपलीही यात राखरांगोळी होणार आहे याचेही त्यांना भान राहत नाही...”

“हजरत महंमद पैगंबर जात्याच अतिशय सुंदर होते. सौंदर्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून मक्केतील कित्येक लोक त्यांच्याकडे अंगुलीनिर्देश करीत. त्यांचा बांधा मध्यम तऱ्हेचा असून रुंद खांदे, भरदार छाती

आणि मजबूत हाडपेर यामुळे ते बरेच सशक्त दिसत. त्यांचा चेहरा तेजस्वी असून त्यावर आत्मविश्वास उमटलेला असे.त्यांची दाढी त्या चेहऱ्याला उठावदार दिसत असे. त्यांच्या डोक्यावरील काळे कुळकुळीत केस मानेवर व्यवस्थित कापलेले असत. भव्य कपाळ, हरिणासारखे टपोर डोळे, चाफेकळीसारखे नाक, कुंदकळ्यांसारखी शुभ्र दंतपंक्ती आणि या सर्वांत उठावदार दिसणारा हसरा चेहरा यामुळे प्रत्येक माणसावर त्यांची छाप पडत असे. त्यांचे हात स्त्रियांसारखे नरम होते. आणि हातांची बोटे बारीक व लांब होती. त्यांचा आवाज गोड असल्यामुळे तासचे तास त्यांच्याशी संभाषण करीत राहावे असे प्रत्येकास वाटे.''

वरील शुद्ध, सहज, आणि ठसठशीत भाषा पैगंबरांचा अभिमान बाळगणाऱ्या व जन्मभाषा मराठी नसलेल्या एका मुसलमान गृहस्थांची आहे!

(२) "वरील सुंदर विवेचनावरून हेच नाही का सिद्ध होत की, ओष्ठ चुंबन हे सर्व चुंबनप्रकारात अधिक सुखदायी आहे? कारण स्पर्शसुख देण्याच्या किंवा घेण्याच्या बाबतीत ओठांची बरोबरी कुणीच करू शकत नाही. नेत्रचुंबनापासून सुख होईल. पण ओष्ठचुंबनापासून त्यापेक्षाही अधिक सुख होईल हेही वरील विवेचनावरून स्पष्ट होते. दुसरे असे की नेत्राचे चुंबन घेणाऱ्या व्यक्तीला ओष्ठ हे संवेदनसुलभ असल्यामुळे सुख होत असले तरी नेत्र हे तितकेच संवेदनसुलभ नसल्याकारणामुळे ज्या व्यक्तीच्या नेत्राचे चुंबन घेतले जाते त्या व्यक्तीला तितकेच सुख होणे शक्य नाही. यासाठीच ओष्ठचुंबनपासून होणारे सुख उभयनिष्ठ असते असे वर म्हटले आहे. ओष्ठचुंबनाच्या या विशेषामुळे सर्व चुंबनप्रकारामध्ये ओष्ठचुंबन हे अधिक सुखदायी आहे असे सिद्ध होते-''

प्रस्तुत उतारा कित्येक पिढ्या संस्कृत विद्येचे आगर समजल्या जाणाऱ्या गजेंद्रगडकर घराण्यातील, संस्कृत व इंग्रजी यांतील नैपुण्याबद्दल सुविख्यात अशा प्रोफेसर अश्वथामाचार्य गजेंद्रगडकर यांचा आहे.सावरकर-पटवर्धन यांच्या लेखनातील कृत्रिम संस्कृतचे दडपण यात दिसत नाही ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

(३) " आता हा रुपकालंकर पुरे. हिंदू लोकांचे शौर्य, पराक्रम नाहीसे होऊन हा देश मुसलमानांनी पादाक्रांत केला. कोणाचा हेतू परदेशांतील संपत्ती लुटून नेऊन आपल्या देशाची भर करावयाची असा असतो.परंतु जी मंडळी इकडे आली तीतील काही लोक शिवाय करून बाकीच्यांनी आपला देश भरण्याची खटपट कधीच केली नाही. ते या देशात आले ते येथेच लटकले व येथेच वस्ती करून राहिले. हा देश विस्तीर्ण, रसाळ आणि सुसंपन्न असल्यामुळे त्यांस येथे बहुत सुख झाले. कालांतराचा फेरा काही विलक्षण आहे. पूर्वी या देशाचे संरक्षक जे एतद्देशीय क्षत्रिय लोक होते त्यांचे जागी हे बाहेरून आलेले मुसलमान देशरक्षक झाले. त्यांनी या देशातील निरनिराळे प्रांत आपल्या ताब्यात घेऊन येथील राज्यभोक्ते ते झाले. परंतु सर्वदा ध्यानात ठेवण्याची गोष्ट हीच की, पदार्थमात्रास, राष्ट्रमात्रास अथवा व्यक्तीमात्रास उन्नतपतनावस्था ही नैसर्गिकच आहे....''

"पाच वर्षांच्या वयाचा राजा, नऊ वर्षांचा दिवाण, सात वर्षांचा फडणीस अशी राज्य मंडळाची स्थिती हिंदुस्थानात ठिकठिकाणी असल्याचे दाखले आहेत. त्याचे कारण त्या त्या चिमण्या अधिकाऱ्यांचे वाडवडील व बापजादे त्या त्या अधिकारावर होते म्हणून त्यांची त्यांची कामे त्यांच्या त्यांच्या वंशाकडेच चालवावयाची असा इकडचा दस्तूर आहे. परंतु या वहीवाटीने एकंदर देशातील राज्यास मोठा अपाय होऊन ती विस्कळीत झाली व हळूहळू डबघाईस येत चालली!''

अनुक्रमणिका

वरील उतारा अर्वाचीन मराठीतील पितामहांपैकी एकांनी म्हणजे प्रख्यात लोकहितवादी यांनी लिहिला आहे.

(४) "सध्या प्रचलित असलेल्या शिष्ट मराठीचे स्वरूप इंग्रजी अमदानीत ठरले. पेशवाई काळातील मराठी भाषेत फारशी व अरबी शब्दांचा जो बेसुमार भरणा होत होता तो कमी झाला व त्या ऐवजी संस्कृत शब्द वापरण्यात येऊ लागले. संस्कृताच्या आश्रयाने आंग्लकालीन मराठीला जे भारदस्त व पोक्त असे स्वरूप प्राप्त झाले ते नवीन इंग्रजी राज्यकर्ते फारशी शब्दांचे द्वेष्टे होते किंवा संस्कृताचे विशेष अभिमानी होते या कारणाने नव्हे. इंग्रजी अमलाच्या अव्वल अमदानीत विद्याखाते जे स्थापले गेले व त्याच्यामार्फत जी पुस्तके लिहिली गेली ती सर्व पुस्तके शास्त्री लोकांकडून लिहिली गेली व त्यामुळे त्यांच्या संस्कृतप्रचुर भाषेचा मराठीवर परिणाम झाला. जांभेकर, तळेकर, चिपळूणकर वगैरे कर्ती मंडळी शास्त्री होती आणि त्यांनी लिहिलेल्या अनेक प्राथमिक पुस्तकात उर्दू शब्दांस थारा मिळाला नाही. मराठी जुन्या पद्यात उर्दू शब्द कमीच होते व त्याच भाषापद्धतीचा त्यांनी स्वीकार केला; यामुळे इंग्रजी सत्तेचे धोरण निवळलेली मराठी लिहिण्याकडे गेले."

प्रो. कृ. पां. कुलकर्णी यांच्या उताऱ्यातील मताप्रमाणेच यातील फारशी शब्दांच्या प्रमाणाचेही रहस्य (significance) लक्षात घेण्यासारखे आहे.

(५) "इंग्रजांनी हिंदुस्थानात राज्य कसे मिळविले...निजामाकडून इंग्रजांना जो मुलूख मिळाला तो इंग्रजांना लढाई केल्याशिवाय मिळाला हे खरे; पण ...निजामाने तो त्यांना स्नेही म्हणून खुशीने बक्षीस म्हणून दिला नव्हता किंवा इंग्रज हे त्याचे धर्मगुरु किंवा ईश्वरीलीला दाखविणारे फकीर म्हणून त्यांना धर्मादाय दिला नव्हता! लॉर्ड डलहौसी यांच्या कारकीर्दीत बरीच राज्ये बेवारस झाली म्हणून इंग्रजांनी ती खालसा करून आपल्या मुलखास जोडली हे खरे आहे. पणे अधिराजे किंवा साम्राज्याचे धनी असा आपला हक्क सांगता आल्याशिवाय इंग्रजांना ही राज्ये खालसा कशी करता आली असती? इंग्रज ही काही मराठ्यांची अवलाद नव्हे की ते सातारच्या राजाचे वारस होऊ शकतील!"

वरील उतारा आजचे अग्रगण्य मराठी गद्यलेखक श्री तात्यासाहेब केळकर यांचा आहे. यातील फारशी शब्दांचे प्रमाण व योजनानैपुण्य लक्षात घेण्यासारखे आहे. विशेषतः 'अवलाद' शब्दाने या ठिकाणी केलेले कार्य भाषाशुद्धीच्या कार्याहून आम्हास तरी मोठे वाटते!

वरील पाच उताऱ्यांत परकीय शब्दांचा बागुलबोवा न करणाऱ्या जुन्या-नव्या प्रसिद्ध-अप्रसिद्ध, हिंदु-मुसलमान अशा सर्व प्रकारच्या लेखकांच्या गद्याचे नमुने दिले आहेत. यांतील चार लेखक हयात आहेत. "यांचे गद्य, इंग्रजी आणि उर्दू शब्दांनी अशुद्ध झाले आहे व त्यांच्या मानाने सावरकर व पटवर्धन यांचेच गद्य आम्हास अधिक शुद्ध वाटते," असे म्हणाणारे लेखक अगर वाचक सापडणे कठीण! अशा स्थितीत गेल्या दहा वर्षांत सावरकरांना कोणती क्रांती घडविणे अवश्य वाटले आणि जी घडली ती कोठे आहे?

असो. शेवटी सावरकरांच्या स्वपक्षाच्या वृथागौरावाप्रमाणेच पटवर्धनांच्या अवास्तव गाऱ्हाण्यांचाही विचार केला पाहिजे. आणि त्यांनी स्वत:च्या भूमिकेविषयी दाखविलेल्या वृथा अनुकंपेचे निराकरण करणे जरूर आहे. रा. पटवर्धन यांस, भाषाशुद्धीच्या व्रतामुळे आपला छळ होत आहे असे वाटत आहे! पटवर्धन

अनुक्रमणिका

म्हणतात, “आपली टवाळी होत आहे हे पाहूनही शिकविणाऱ्यांना त्या गोष्टी शिकविण्याचे व्रत चालू ठेवावे लागते.” आणि ज्या लेखात ते आपले हाल वरील करूण शब्दांनी वेशीवर टांगीत आहेत त्यातच त्यांचा द्राविडी पंच न स्वीकारणारांबद्दल ते पुढील दिलदारपणाचे शब्द काढीत आहेत! ते म्हणतात-

“दळणवळणाची अपरिहार्यता वा मराठीची निर्धनता ही या क्रांतीच्या या उत्क्रांतीच्या मुळाशी नसून या उत्क्रमणाचा दोष सर्वस्वी आमच्या शेळपट परधार्जिण्या अस्वाभाविक मनोवृत्तीकडे आहे.”

अनेक लोकमान्य लेखकांस शेळपट ठरविणाऱ्या क्रांतीकारांनी आपल्या हेमाडपंती वळणापुढे लोकांनी आरसा धरल्यास ‘टवाळ टवाळी’ म्हणून त्रागा तरी करु नये! एवढंच काय, सावराकरांना दिसत असलेली निर्भेळ मान्यता म्हणजे जेवढा भ्रम, तेवढाच पटवर्धनांस सलणारा छळही होय! क्रांतीही नाही, छळही नाही, आणि सावरकर म्हणातात तशी विरोधी सैन्यात दाणादाणही नाही. हुल्लड म्हणून सावरकरी-पटवर्धनी वळणाचे शब्द वळीत बसलेल्या नवथर लेखकांची काय ती तजवीज प्रथम करणे, हे निकडीचे होऊन बसले आहे. आणि खरी भाषाशुद्धी तूर्त याच बाजूने करावी लागेल.

प्रस्तुत विवेचन वाचणारास सावरकर-पटवर्धनांच्या भाषाविशेषांप्रमाणेच प्रचारवैशिष्ट्यांचीही ओळख झालीच असेल. हे दोघेही पंथप्रवर्तक आग्रही, दिर्घोद्योगी आणि धडाडीचे आहेत. ते जो प्रचार हाती घेतात त्यात, राष्ट्राचे कल्याण एकवटले आहे आणि त्यांच्या विरोधकांच्या ठायी देशद्रोह आणि शेळपटपणा भरून राहिला आहे असे त्यांस त्यांच्या एककल्ली वृत्तीमुळे सहजच दिसू लागते! आणि यामुळेच त्यांचे लेख एखाद्या झंझावाताप्रमाणे वाटू लागतात. त्यातच दोघांच्या विख्यात आणि आदरणीय व्यक्तिमाहात्म्याची भर पडते! आणि या सर्व परिस्थितीमुळेच त्यांच्या ज्वलजहाल लेखास निर्भीड आणि उघड उत्तर देण्याखेरीज गत्यंतर नाही. म्हणूनच प्रस्तुत महत्त्वाच्या प्रश्नांत कोणी त्यांच्या इतर मान्यतेची भीड धरू नये.

एरव्ही प्रस्तुत लेखक सावरकर-पटवर्धनांविषयीच्या आदरात कोणाही महाराष्ट्रीयांहून कमी ठरणार नाही असे म्हणण्यास त्यास सात्विक अभिमान वाटतो. दे. भ. विनायकराव सावरकर यांजसारखे तेजस्वी, प्रतिभावान, पराक्रमी पुरुष कोणत्याही राष्ट्राचे शिर उन्नत करतील. आणि तूर्त फक्त वाङ्मयासंबंधीच बोलावयाचे झाल्यास त्यांच्याएवढी प्रखर प्रतिभा अर्वाचीन वाङ्मयात कोणाच्याच वाट्यास आलेली नाही. पण कर्तृत्वात धाडस आणि लेखनात असामान्य प्रतिभा एवढ्यावरच त्यांचे मोठेपण संपत नाही. अर्वाचीन भरतखंडात ज्या थोड्याच महाभागांनी एक निश्चित आणि स्पष्ट तत्त्वज्ञान सांगितले अशा गांधी-टिळकांसारख्या तत्त्वप्रवर्तकांशेजारी सावरकर यांस त्यांच्या प्रतिकारयोगाच्या तत्त्वज्ञानाने अढळस्थान मिळवून दिले आहे. आणि हेच प्रखर आणि दुर्दम्य तत्त्वज्ञान त्यांच्या वाक्यावाक्यांतून निनादत आहे.

श्रीयुत पटवर्धन यांच्या विषयींच्या माझ्या आदराचा येथे निर्देश करण्याचेही कारण नाही. येथील कित्येक साहित्यभक्तांस माझे त्यांचे संबंध किती जिव्हाळ्याचे आहेत हे ठाऊक असेल आणि प्रस्तुत निबंधांत जेवढ्या स्पष्टपणे त्याच्या मतांचे खंडन केले आहे तेवढ्याच स्पष्टपणे मी अनेकवेळा त्यांच्या समक्षही केले आहे. यामुळे त्यांचा अथवा कोणाचाही या लेखामुळे गैरसमज होण्याचे कारण नाही.

आणि या दोघा मान्य महाराष्ट्रीयांच्या व्यक्तिमहात्म्यामुळेच मला महाराष्ट्रीय लेखक-वर्गास एक प्रार्थना केल्यावाचून राहवत नाही. हा प्रश्न उपेक्षेचा अथवा दाक्षिण्यप्रदर्शनाचा नाही. एखादा शब्द

वापरण्यापूर्वी तो विशिष्ट दोन परकी भाषांतील आहे की काय हे पाहण्यास सावरकर पटवर्धन सांगतात. मी म्हणतो, त्याऐवजी कुठलाही शब्द बनविण्यापूर्वी (१) त्या अर्थाचा शब्द मराठीत पूर्वी आहे की काय ? (२) मी बनवीत असलेला शब्द किती लोकांस समजेल ? आणि (३) मी वापरीत असलेल्या भाषेत तो कितपत शोभतो?- हे प्रश्न लेखकाने स्वत:च विचारावेत.

तसेच राष्ट्राचे अखिल व्यवहार इंग्रजीत चाललेले आहेत तोपर्यंत उगीच फावल्यावेळी हवे त्याने नवीन शब्दांची टांकसाळ काढून कितपत फायदा आहे याचाही विचार करावा. सावरकर-पटवर्धन मोठे पराक्रमी आणि उद्योगी पुरुष आहेत. म्हणून नुसत्या मुरवतीखातर त्यांच्या पराक्रमास आपल्या देशभाषेचे मातेरे करू द्यावे की काय?'

वर्तमानपत्रांच्या चालकांना माझी विशेष विनंती आहे. पेशवाईतील फारशीप्रचुर मराठी जशी अव्वल इंग्रजीतील शास्त्रशुद्ध आणि बाळबोध गद्य लिखणाने निवळवून दिली त्याप्रमाणे आपण आजची प्रत्यही विकृत होणारी भाषा शुद्ध राखून मराठीचे मराठीपण राखले पाहिजे. आपल्यामागे असलेली मजकुराची निकड प्रस्तुत लेखक जाणून आहे. तसा आपण वेळप्रसंगी एखादा इंग्रजी शब्द ठेवला तरी चालेल. पण रोज नवे विक्षिप्त पर्याय काढू नका. ते नवीन पर्याय एकमेकांस मारतील आणि जुनी जातिवंत मराठीही मरेल.

नवीन शब्द बनविण्यापेक्षा योग्य शब्द योग्य ठिकाणी योजणे यातच खरे नैपुण्य आहे आणि अर्थगांभीर्यहीन शब्द तयार करण्यात पुरुषार्थ तर काहीच नाही.

असो. ज्यास ज्यास सावरकर आणि पटवर्धन यांची क्लिष्ट भाषा मान्य नसेल ते ते लेखक मराठीचे स्वाभाविक व सुबोध वळण टिकविणे हे आपले पवित्र कर्तव्य समजतील असा मला दृढ विश्वास आहे.

आतापर्यंत आपण वाचलेले विवेचन सावरकर व पटवर्धन यांच्या जहाल लेखांस प्रत्युत्तर म्हणून असल्यामुळे जागजागी त्यांच्याप्रमाणे उपहास व वक्रोक्ती यांचा अवलंब करावा लागला आहे. म्हणून माझ्या लेखातील प्रमुख सिद्धांन्ताचा मी सूत्ररूपाने पुनरुच्चार करतो.

(१) सांप्रत परकीय शब्दांचे मराठीवर आक्रमण अधिक होत नाही.

(२) इंग्रजी राज्य असेपर्यंत खाजगी व्यवहारात नकळत इंग्रजी येणे अपरिहार्य आहे.

(३) तरी अशा परिस्थितीतच ग्रंथांतील शुद्ध मराठीची वाढ निर्विघ्नपणे झाली आहे.

(४) परकीय शब्दांपेक्षा धेडगुजरी प्रयोगानेच कोणत्याही भाषेची अधिक हानी होते.

(५) असे असून सावरकर-पटवर्धनांची चळवळ मात्र परकी शब्दांपुरतीच आहे.अतएव ती खरी भाषाशुद्धी नव्हे.

(६) फारशी प्राचुर्याचे उच्चाटन इंग्रजी आमलाच्या सुरवातीसच मराठी लेखकांच्या पहिल्या पिढीने केले.

(७) त्या लेखकांच्या भाषेतील अनेक निर्भेळ मराठी शब्द व सुबोध भाषासरणी यांचा या कृत्रिम, भाषाशुद्धीच्या चळवळीने घात होत आहे.

(८) युरोपातील छोट्या छोट्या राष्ट्रांच्या आपसातील यादवीमुळे विकोपाला गेलेल्या निष्फळ भाषाबहिष्काराचे वळण गिरविण्याने आपल्या भाषेचे हित होणार नाही.

(९) केवळ टूम म्हणून व "प्रत्येक इंग्रजी शब्दास मराठी शब्द नसल्यास भाषेस लांच्छन आहे" असे समजून नवे शब्द बनविणाऱ्या प्रवृत्तीमुळे मराठीचे स्वरूप अलीकडे विद्रूप व हास्यास्पद होत चालले आहे.

(१०) खऱ्या भाषाशुद्धीचा रोख आता या हास्यास्पद शब्दनिर्मितीकडे व धेडगुजरी प्रयोगांकडे वळला पाहिजे.

अनुक्रमणिका

३. खरी भाषा शुद्धी : माझ्या भूमिकेचा पुनरुच्चार

"खरी भाषाशुद्धी आणि तिचे खरे वैरी अर्थात सावरकर आणि पटवर्धन" हा मी शारदा मंदिरापुढे वाचलेला निबंध सुमारे सात महिन्यांपूर्वी सह्याद्रीतून प्रसिद्ध झाला तेव्हापासून त्या लेखाचे अनुकूल प्रतिकूल प्रतिध्वनी वर्तमानपत्रे, मासिके आणि परिषदा यांतून निघत आहे. सावरकर-पटवर्धन यांनी चालविलेल्या विशिष्ट तऱ्हेच्या भाषाशुद्धीच्या चळवळीस महाराष्ट्रात पुष्टी कधीच मिळालेली नव्हती. तरी त्यांच्या विचारसरणीचे सशास्त्र खंडन कोणीच केले नाही अशी त्यांची तक्रार होती. आणि माझ्या लेखांचा उद्देश अर्थात ही त्यांची तक्रार दूर करणे हाच होता. माझे मुख्य आक्षेप पुढीलप्रमाणे होते : १) हे दोघे प्रसिद्ध लेखक म्हणतात त्याप्रमाणे आधुनिक मराठी लेखक परकी शब्दांनी हुरळून जात नाहीत. २) अस्वाभाविक मार्गांनी शिरलेल्या फारशी शब्दांचे उच्चाटन गद्यलेखकांच्या पहिल्या पिढीने मागेच केले आहे. ३) मराठीत शेकडो वर्षे रूढ असलेल्या प्रत्येक फारशी शब्दाने समानार्थी मराठी शब्द मारला आहे हा सावरकर-पटवर्धन यांस केवळ प्रचारांधतेमुळे झालेला भ्रम आहे.

याखेरीज भाषेचे शुद्धीकरण (करावयाचेच म्हटल्यास) करण्यास सावरकर आणि पटवर्धन यांजसारखे तऱ्हेवाईक भाषा लिहिणारे कसे सर्वस्वी अपात्र आहेत हे दाखविण्याकरिता त्या दोघांच्याही भाषेतील दुर्बोध आणि मिशनरी वळणाचे प्रयोग मी दाखवून दिले होते. तसेच शिवाजी, चिपळूणकर आणि युरोपातील कित्येक राष्ट्रे यांनी हीच चळवळ केलेली आहे, ही सावरकर-पटवर्धनांची विधाने कशी सपशेल निराधार आणि अप्रस्तुत आहेत हेही सिद्ध केले होते.

माझ्या प्रमाणावलीपैकी पहिला भाग हाच या वादाचा मूलभूत भाग होय. तथापि या मुलभूत आक्षेपाच्या बाबतीत पटवर्धन- सावरकरांच्या लेखत काहीच उत्तर मिळत नाही, ही निराशेची गोष्ट आहे. अर्थात या बाबतीत मी मूळ लेखात केलेल्या विधानांचा पुनरुच्चार करण्याची कंटाळवाणी कामगिरी माझ्याकडे आली आहे. तरी तसे करताना थोडी अधिक उघड प्रमाणे देऊन शंकितांचे शंकानिवारण करणार आहे. पहिली आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'मेहेरबानी' या शब्दाने 'कृपा' हा शब्द, अथवा 'कमाल' शब्दाने 'पराकाष्ठा' हा शब्द मारला असे म्हणणे केवळ कविकल्पना होय व असे असून रा. पटवर्धन या असत्य गोष्टीचा वस्तुस्थिती म्हणून पुन:पुन्हा उच्चार करीत आहेत, हे त्यांच्या शास्त्रशुद्ध विचारसरणीस लांछन होय. 'कमाल' शब्दाऐवजी 'पराकाष्ठा' शब्द क्षीरसागर यांस आठवला नाही असे रा. पटवर्धन म्हणतात व लगेच तो शब्द मेला, मारला गेला असेही समजतात! या सर्व प्रकारास भ्रान्तीशिवाय दुसरे नाव नाही. कारण मराठीतील कोणताही लेखक 'पराकाष्ठे' बद्दल 'कमाल' वापरीत नसून पराकाष्ठा आणि कमाल दोन्ही शब्द वापरतो; कृपा आणि मेहेरबानी हे दोन्ही शब्द वापरतो. अर्थात हे सर्व मी माझ्या मागील लेखात इतक्याच स्पष्ट शब्दांत म्हटले होते.

इतक्यांतून रा. पटवर्धन यांस 'कमाल' शब्द वापरलेला दिसताच 'पराकाष्ठा' शब्द मेला असे म्हणून आक्रोश करावयाचा असल्यास नाइलाज आहे- निरुपाय आहे. पण प्रत्यक्ष वादभूत 'कमाल' शब्दाबद्दल पुरावाच हवा असल्यास, अनेक सर्वमान्य ग्रंथांत 'कमाल' आणि 'पराकाष्ठा' हे शब्द एकाच पानात योग्य ठिकाणी बसलेले त्यांना मी दाखवून देण्यास तयार आहे. इतकेच काय पण त्यातल्या त्यात समर्पकपणे त्यांस भिन्न संदर्भही लाभल्याचे दिसेल. 'यत्नांची 'पराकाष्ठा' म्हटलेले दिसेल तर 'मूर्खपणाची कमाल' म्हटलेले दिसेल. आणि ज्यांच्या ग्रंथातील उताऱ्यास अधिक शुद्ध व सुंदर करण्याचा रा. पटवर्धन यांनी प्रयत्न केला आहे त्या केळकरांच्या ग्रंथांतून पुराव्यादाखल उतारे देण्याची माझी तयारी आहे.तरीही

सावरकर पटवर्धनांखेरीज इतर लेखकांस फक्त फारशीच शब्द आठवतात आणि त्यामुळे मराठी शब्द मेले असे पटवर्धन म्हणत राहणार असतील तर प्रस्तुत वादातून त्यांच्या हेकेखोरपणाव्यतिरिक्त काहीच निष्पन्न होण्याची आशा नाही!

सावरकर पटवर्धनांची चळवळ भाषा शुद्ध करण्याची नसून एका दृष्टीने पाहता गाय मारल्याबद्दल वासरू मारण्याची आहे, तर दुसऱ्या दृष्टिने पाहता इतर प्रांत आणि इतर देश यांच्या अंध अनुकरणाची आहे. तसे नसते तर शब्दांपेक्षा प्रयोगाच्या (Idioms, Constructions) शुद्धतेकडे त्यांनी अधिक लक्ष दिले असते. तसेच माझ्या आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्यास त्यांनी नुसता स्पर्शही केला नाही आणि त्यांच्या दाखवून दिलेल्या इंग्रजी वळणाच्या प्रयोगाबाबत त्यांनी सोइस्कर मौन स्वीकारून त्याचा भाषाशुद्धीशी संबंध नाही असेही विलक्षण विधान केले आहे! आणि इतके असून त्यास विरोध करणारे भाषेसंबंधी सूक्ष्म विचार करीत नाहीत असे म्हणण्याचे ते धाष्टर्य करीत आहेतच. 'मी व्यायाम घेतला', मी आंघोळ घेतली', 'या विषयाला न्याय करण्यास एवढा वेळ पुरणार नाही. 'हे मिशनरी प्रयोग त्यांस शुद्ध वाटतात. पण 'हवा', 'मेहेरबानी' हे निरुपद्रवी शब्द मात्र अशुद्ध वाटतात!

याच अज्ञानमूलक विचारसरणीवर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी स्पष्ट शब्दांत हल्ला चढवून "शब्दबहिष्कार म्हणजे भाषाशुद्धी नव्हे... प्रयोग आणि वाक्प्रचार शुद्ध राखा" असे बजावले होते व त्याचा स्पष्ट आधारही मी माझ्या मागील लेखात उतरला आहे. तरी रा. सावरकर हे चिपळूणकरांनी आमचीच भाषाशुद्धीची चळवळ केली होती असे निराधार व धाष्टर्याचे विधान फिरून करीत राहिलेच आहेत! सावरकर यांस माझा लेख व त्यांतील चिपळूणकरांचा उतारा फिरून पाहण्यास सांगण्यात अर्थ नाही, तरी पण प्रांजल वाचकांनी तो स्वसमाधानार्थ वाचल्यास उपयोग होईल.

यापुढे प्रश्न इंग्रजी शब्द आणि इंग्रजीमय वातावरण यांचा. 'दुकानाच्या पाट्या इंग्रजी', 'बायकामुलांत इंग्रजी शब्द' हे सर्व इष्ट आहे असे म्हणणारा पक्ष अस्तित्वात नाही; निदान महाराष्ट्रात तरी नाही. पण या इंग्रजीमय स्थितीचे कारण न शोधता आपल्याहूनही स्वसंस्कृतीचे अभिमानी असणाऱ्या लोकमान्य लेखकांची 'परधार्जिणी वृत्ती' हेच या स्थितीचे कारण असे म्हणण्याचे निंद्य धाष्टर्य पटवर्धन-सावरकर अद्यापही करीत आहेत ही दु:खाची गोष्ट होय. सावरकर-पटवर्धनांव्यतिरिक्त लेखक इंग्रजी शब्दांनी हुरळणारे असते तर त्यांनी 'मिशन', 'अपील', 'रोमँटिक स्कूल' वगैरे भाषांतरास कठीण पण अर्थपूर्ण अशा शब्दांचा स्वीकार मागेच केला असता. किंवा 'अ-परधार्जिण्या (?) रा. पटवर्धनांप्रमाणे रोमँटिक शब्द प्रौढ संस्कृतप्रचुर काव्यपंक्तीत बसविला असता! पण तसे आजचे लेखक करीत नाहीत. त्यांचे मत त्याविरुद्ध आहे. त्यांस शुद्ध भाषा कोणती हे कळते. पण हेअरकटिंग सलूनवाल्या अज्ञ नापित बंधूंस अपटुडेट पोशाख केलेले आपले साहेबी भाषाबांधव पाहून आपल्या दुकानास मराठी नाव देऊन चालणार नाही असे वाटल्यास आश्चर्य काय! अथवा दे. भ. सावरकरांचे संस्कृतिविध्वंसक लेख वाचून दुसऱ्या एखाद्या देशभक्तास देवनागरी ऐवजी रोमनलिपी स्वीकारून राष्ट्रऐक्य करा असे म्हणण्यास उमेद आल्यास आश्चर्य कसचे? सारांश, संस्कृतीच्या इतर बाबतीत साहेबी कित्ता, जुन्या संस्कृतीतील हरएक संस्कारांची टवाळी, अहोरात्र शाळाकॉलेजांतून इंग्रजी पठण हे सभोवार चालू असता इंग्रजी घरात घेतल्याचा आरोप लेखकांच्याच माथी कसा येतो? ज्यांनी परकीय संस्कृतीचे गोडवे गद्यांतच नव्हे तर पद्यांतही गाइले, जे स्वकीय धर्मसंस्थांची व पूर्वजांची टवाळी मासिकांतून सतत करीत आहेत आणि जे आपले मिशनरी प्रयोग शुद्धीच्या नावाखाली घरात आणीत आहेत त्यास शब्दसंग्रहात मात्र परधार्जिणेपणा दिसावा हे एक अजब कूट आम्ही प्रो. फ्रॉयडसारख्या मनोविकृती चिकित्सकांस पृथक्करणार्थ बहाल करतो!

घरी दारी इंग्रजी नको असेल तर इंग्रजी विद्येला तरुण पिढीच्या शिक्षणक्रमात वेदतुल्य स्थान देण्याचे बंद करा. स्वकीय शब्दसंग्रह, हा जप सोडून स्वकीय संस्कृती, स्वकीय संस्था, हा जप सुरू करा. नेकटाय गळ्यात घालू लागल्यानंतर 'गळपट्टी' शब्द न वापरणारांच्या परधार्जिणेपणावर व्याख्यान देणे हे फारसे शोभिवंत तर नाहीच पण प्रचारदृष्ट्या उपयुक्त ही नाही! आमच्या कॉलेजात ऋक्संहितेचे आणि उत्तररामचरिताचे अध्ययनही इंग्रजीतून चालत असता आमचे पटवर्धन त्याच कॉलेजातील विद्यार्थ्यांस घरी येताच "मला 'प्रोफेसर' म्हणू नको, 'प्राध्यापक' म्हण" असे म्हणणार! आपल्या लेखक बांधवांस बहिष्काराची धाबळी नेसावयास सांगूनही इंग्रजी शब्दांची गटारगंगा थांबणार नाही. तुमच्या मतात प्रामाणिकपणा असेल, तुमचा आवेश प्रहसनवजा नसेल तर जन्मभाषा, पितृभाषा या दोहोंसही पदच्युत करणारी व आमचा जन्मच्या जन्म खाणारी इंग्रजी भाषा केवळ परदेश व्यवहाराची भाषा या दुय्यम पदावर आणण्याची चळवळ हाती घ्या आणि त्यास जे विरोध करतील त्यांस परधार्जिणे म्हणा. पण जे इंग्रजी 'मिडियम' देखील मराठीत जशीच्या तशी वळावी म्हणणार आणि पाश्चात्य संस्कृती म्हणजे वेदतुल्य मानणार त्या शुद्धीवाल्यांस इंग्रजीचे हे उच्चाटण कितपत रुचेल याची आम्हास मोठीच शंका आहे. प्रचलित शिक्षणक्रमातील इंग्रजीच्या अवास्तव स्तोमाविरुद्ध सावरकर-पटवर्धन ब्र ही काढीत नाहीत. यावरून वरील शंकेस बळकटीच येते! भारतीय संस्कृतीशी सावरकर-पटवर्धनांचा संबंध तिच्या अनेक पवित्र शाखा-पल्लवांवर वीरश्रीने घाव घालण्याहून अधिक असल्याचे ऐकिवात नाही. आपण शेवटी दु:खाची गोष्ट म्हणजे हा एककल्ली, शब्दवेडा, स्वभाषाभिमान देखील संस्कृतिप्रेमाइतकाच खोटा आहे! कारण परकीय शब्दांवर बहिष्कार घालावयास सजलेले हे शुद्धीवादी त्याबरोबरच अनेक जातिवंत चिरपरिचित शब्द मारण्याचीही 'चळवळ' गुप्तपणे करीत आहेत. पण इकडे त्यांच्या स्वाभिमानाच्या गोंगाटात कोणाचेच लक्ष जात नाही! मी माझ्या लेखात ते सप्रमाण सिद्ध केले असून त्या महान आरोपाबद्दल या दोघांनी अर्थात एक अक्षरही काढले नाही. 'मेहेरबानी' शब्दाने 'कृपा' शब्द कितपत मारला आहे हे आपण पाहिलेच आहे. पण 'आंदोलन' हा सर्वस्वी अज्ञानमूलक शब्द चळवळ या अर्थी वापरून 'चळवळ' या समर्थांच्या कालापासून आलेल्या शुद्ध मराठी शब्दास कोण मारीत आहे? 'मथळा' मारून 'शीर्षक' शब्द वापरण्याने क्लिष्टतेखेरीज कोणते व्रत साधत आहे? 'नमस्कार' शब्द अव्हेरून 'नमस्ते' (-अरे, तुला नमस्कार!) हा ग्राम्यप्रयोग कोण रूढ करीत आहे? Appropriate Word याअर्थी 'समर्पक शब्द' हा रूढ शब्दप्रयोग आवर्जून टाळून त्या जागी 'समुचित शब्द' असे कोण म्हणत आहे? शब्दनिर्मिती केवळ परकीय शब्दच मारण्याकरिता चालली नसून स्वकीय शब्द मारण्याचेही कार्य ती दुष्ट दक्षतेने करीत आहे, हे सावरकर-पटवर्धनांस 'स्वाभिमानाबद्दल' सर्टिफिकिटे देण्याची घाई करणाऱ्यांच्या दिलदार डोळ्यांस अद्याप दिसले नाही काय? समानार्थी मराठी शब्दाशेजारी गरीबपणे आणि सेवकवृत्तीने नांदणाऱ्या फारशी शब्दांच्या यादीहून स्वभाषेच्या सुबोधतेच्या मुळावर जन्मलेल्या या सावरकरी शब्दांची यादी खास लहान नाही. शुद्धीवाल्यांच्या धेडगुजरी प्रयोगाप्रमाणेच या गोताला काळ झालेल्या शब्दांची यादी पुरविण्यास माझी तयारी आहे.

सारांश, ज्यांस स्वसंस्कृतीविषयी तिरस्कार आहे, ज्यांस परकीय शब्दांची टोळधाड सोडणारे सार्वत्रिक व बेसुमार इंग्रजी शिक्षण हे भाषेवर संकट वाटत नाही, जे लहरीखातर नवे शब्द बनवून शुद्ध मराठी शब्दांची गळचेपी करीत आहेत, त्यांच्या बहिष्कारप्रधान भाषाशुद्धीच्या बुडाशी स्वभाषा प्रेम नसून तऱ्हेवाईकपणा आणि निष्फळ सूडबुद्धी आहे असे म्हणण्यावाचून दुसरे कोणते निदान ठरविता येईल ? आणि परकीयांच्या अनेकविध वर्चस्वाचे गोडवे गाऊन स्वकीयांस ते स्वीकारा म्हणून म्हणणारांनी शब्दकोशापुरताच प्रतिकाराचा आव आणावा हे तरी हास्यास्पदच नव्हे काय!

अनुक्रमणिका

सारांश, सावरकर पटवर्धनांच्या तऱ्हेवाईक शब्दसंग्रहात्मक चळवळीने तिला चिकटविण्यात आलेल्या स्वभाषाभिमानाच्या पार्श्वभूमीमुळे किंचित्काल फसणारांनी पुढील गोष्टी लक्षात ठेवाव्या :

१) भाषा हे संस्कृतीचे एक अंग असल्यामुळे स्वसंस्कृती व स्वकीय संस्था यांवर हल्ला चढविणारांचा भाषाभिमान शंकास्पद समजला पाहिजे.

२) बेसुमार इंग्रजी अध्ययनामुळे सध्या व्यवहारात (लेखनात नव्हे) इंग्रजी शिरलेले दिसते; तरी या मूळ कारणाविषयी अवक्षर न काढणारांची दृष्टी व चळवळ विकृत म्हटली पाहिजे.

३) फारशी शब्दांनी मराठी शब्द नष्ट केले आहेत हे जोर्यंत सावरकर-पटवर्धनांस सिद्ध करता येत नाही तोपर्यंत त्यांच्या भ्रांतिमूलक ओरड्याने चिंताग्रस्त होण्याचे कारण नाही.

४) मराठी शब्दांचा नाश होत आहे असे त्यांनी सिद्ध केले तरीही ते आपला तऱ्हेवाईक शब्दसंग्रह रूढ करण्याच्या लहरीमुळे सुंदर चिरपरिचित जातिवंत मराठी शब्द मारीत आहेत, या गोष्टीचाही त्यांस जाब विचारलाच पाहिजे.

५) सावरकर-पटवर्धन यांस स्वभाषेतील शब्दसंग्रहाहून इतर कशाचेच रक्षण अवश्य वाटत नाही आणि शब्दसंग्रहाचे रक्षणही त्यांच्या चळवळीने होत नाही; अतएव संस्कृतीचा द्वेष करणाऱ्या व केवळ शब्दसंग्रहाबद्दलच जिव्हाळा दाखविणाऱ्या या दोघा भाषाशुद्धिवाद्यांच्या चळवळीस तऱ्हेवाईकपणा व हेकेखोरपणा यांखेरीज कशाचाच पाया नाही.

माझ्या आणि सावरकर-पटवर्धनांच्या मूळ भूमिकेबद्दल एवढे पुरे आहे. या वादातून निघालेल्या भाषाशास्त्रविषयक व इतिहासविषयक प्रश्नांचा खल मी माझ्या पहिल्या लेखात केला तसाच, आणखी थोडा सविस्तर, सवडीनुसार अन्यत्र करणार आहे.

अनुक्रमणिका

४. सोवळेपणाची चळवळ

भाषाशुद्धीची म्हणजे, मराठीत रूढ झालेल्या फारशी शब्दांऐवजी व नित्यव्यवहारातून मराठीत आलेल्या शब्दांऐवजी बोजड भाषांतरे करण्याची चळवळ मुळीच मूळ धरीत नाहीसे पाहून, तात्याराव सावरकरांनी एक नवीनच टूम काढली आहे! ती म्हणजे दुकानदार, खाजगी संस्था वगैरेंच्या मागे लागून त्यांना आपली इंग्रजी नावे काढून मराठी (संस्कृत सामासिक!) नावे अंगीकारावयास लावण्याची. 'हेअर कटिंग सलून' या पाटीने भाषा अशुद्ध होते ती 'केशकर्तनमंदिर' असे म्हटल्याने शुद्ध होऊन जाईल; 'लकी रेस्टॉरंट' या पाटीचे 'सौभाग्यशाली उपहारगृह' या पाटीत रुपांतर होईल व 'कौन्सिल हॉल' चे 'विधिमंडळागार' होईल!

ते काय होईल, कधी होईल व कितपत होईल याचा विचार करण्याचे तूर्त करण्याचे कारण नाही. पण पहिली गोष्ट म्हणजे या चळवळीत नवीन असे काहीच नसून ती शुद्धीच्या चळवळीचेच एक अंग आहे. चळवळीबरोबर गेली आहे. हिरिरीने विरोध निदान केवळ हसे करण्यात आपले विपुल सामर्थ्य खर्च करणारे एक सन्मान्य साहित्यिक आज सावरकरांचे 'लाउड स्पीकर' (आक्रंदक?) बनले आहेत हे पाहून एका गोष्टीचे मात्र विशेष वाईट वाटते- ती म्हणजे या नूतन भाषाशुद्धीचे विडंबन करण्यास आता दुसरे अत्रे उरले नाहीत!

या सोवळ्या चळवळीस विरोध करणारांविषयी पहिला गैरसमज म्हणजे, त्यांना हे इंग्रजीचे पदोपदी आक्रमण हवे आहे. अर्थात ज्यांस हेतुपूर्वक हा समज पसरवावयाचा आहे ते हा आरोप करीत राहणारच. तथापि, कुठल्याही हुल्लडीस बळी पडण्यापूर्वी व तिच्या नूतन म्होरक्यास गुरु करण्यापूर्वी वस्तुस्थितीचा थोडा निर्विकारपणे विचार केल्यास राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनेच ही हुल्लड किती फोल व कुचकामी आहे हे कोणासही दिसून येईल.अर्थात राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनेच आणि संस्कृतिरक्षणाच्या दृष्टीने शुद्धीच्या पोटी जन्मलेले हे पिलू मुळीच उपयोगी नसूनही काही पुढाऱ्यांस त्याचा काही नाटकी उपयोग (Stage effect) दिसत असल्यास त्यांनी तसे कबूल करून टाकावे!

थोडा विचार केल्यास या इंग्रजी वातावरणाचे मूळ कारण काय दिसेल? या पाट्या कोणी भाषाशुद्धिविरोधकाने रंगविल्या काय? हे 'स्टोअर्स', हे 'इन्शुरन्स लिमिटेड', हे ज्ञानप्रकाश ऑफिस', ही 'केसरी-कचेरी' कोठे निर्माण झाली? आपल्या भाषेच्या डोक्यावर व पुढाऱ्यांच्या डोक्यात ही धेडगुजरी नामाभिधाने एकदम कोठून आली! सावरकरादी मंडळींचे म्हणणे, भाषाशुद्धीवाले खेरीजकरून बाकी सर्व लोक वर उद्धृत केलेली धेडगुजरी नावे मधुर समजतात! व या प्रचंड परकीय शब्दांच्या धाडीवर त्यांचा इलाज म्हणजे दारोदार हिंडून सावरकरी समासांचा व भाषांतरांचा घरपोच पुरवठा करणे! हातमागाने गिरण्यांशी टक्कर देण्याला हसण्याचे आता कारणच उरले नाही!

भाषेच्या उत्पत्तीविषयी व प्रसाराविषयी या मंडळीचे विचार फारच पुस्तकी- केवळ साहित्यिक आहेत! थोडा समाजशास्त्राच्या दृष्टीने, थोडा ऐतिहासिक दृष्टीने, थोडा मानसशास्त्राच्या दृष्टीने, विचार करतील तर या विद्वानांस असे दिसून येईल की, भाषेचे कर्ते साहित्यिक नसून राज्यकर्ते हे होत. त्यांना असेही दिसून येईल की, साहित्यिकांपेक्षाही व्यापारी, कारखानदार हेच भाषा अधिक घडवीत असतात आणि या सर्वांहून अधिक म्हणजे तुम्ही विद्यालयरूपी क्षेत्रात बालमनात आज जे पेरता ते उद्या बरीवाईट फळेफुले धारण करते! आमच्या न्यायालयात कोणती भाषा बोलावी लागते किंबहुना आम्हाला न्यायालय

आहेच कोठे? आम्हाला न्यायालय नाही कोर्ट आहे. आमचे सुशिक्षित समाजकघटक कार्यालयात जात नसून ऑफिसमध्ये जात आहेत! आणि आमचे तरुण विद्यालयात जात नसून कॉलेजात जात आहेत. कॉलेजच्या सर्वथा इंग्रजी वातावरणात रममाण होऊन बसण्या उठण्याची, आभार मानण्याची, आनंदाची-दु:खाची (ग्लॅड-सॉरी) तऱ्हाही बिनचूक इंग्रजी येते की नाही? यावर आपली संस्कृती ठरविणाऱ्या आणि सिनेमा नट हे पेहेरावाचे आदर्श मानणाऱ्या तरुणांची शुद्धी फक्त प्रोफेसरांस प्राध्यापक म्हटल्याने होईल काय? कात्रजच्या तळ्याचे रखवालदार मूळ साठाच अशुद्ध करीत असता सावरकर घरोघरचे नळ शुद्ध करणार काय?

भाषेचा (व्यावहारिक भाषेचा ग्रंथ, निविष्ट भाषेचा नव्हे) आहे. इंग्रजी भाषा आत्मसात करणारे सुशिक्षित व मुंबई बंदराच्या बकाली धकाधकीत व्यापाऱ्यांचे तारू हाकणारे व्यापारी यांनी प्रगतीचे चिन्ह म्हणून शेकडो शब्द, कल्पना व संस्था इंग्रजीपासून जवळ जवळ लगीनघाईने उचलल्या! राज्यकर्त्यांनी तात्पुरत्या सोयीकडे नजर दिली; जनतेने पोरकटपणाने इंग्रजी राज्याबरोबर इंग्रजी राहणीही डोक्यावर घेतली; आणि आमचे एक डोळ्याचे पुढारी तूर्त शुद्धी, प्रायश्चित्त आणि क्षौर एवढ्यावरच संतुष्ट आहेत! इंग्रजी भाषेच्या वर्चस्वाचे, इंग्रजी भाषेला गीर्वाण भाषेचे स्थान देण्याचे मात्र त्यांस पूर्ण मान्य आहे! आम्हाला त्यांस एवढेच सांगावयाचे आहे की, जोपर्यंत इंग्रजी भाषा ही वेदभाषा म्हणून पढविली जात आहे व इंग्रजी राहणी हेच प्रगतीचे चिन्ह, हे मत ठाम आहे तोपर्यंत तुम्हास ही सोवळेपणाची चळवळ यशस्वी करणेच अशक्य आहे!

भाषेच्या व्यवहाराचे हे मूलग्राही आकलन असल्यामुळे लोकहितवादी, लोकमान्य टिळक, यांसारख्यांनी असली तकलुपी चळवळ हाती घेतली नाही. भाषेच्या प्राणतत्त्वाचे (genius) उपजत ज्ञान असल्यामुळेच चिपळूणकरांनी शब्दबहिष्कार म्हणजे भाषाशुद्धी नव्हे असे बजावले व समाजाचे व संस्कृतीचे शास्त्रशुद्ध ज्ञान असल्यामुळेच डॉ. केतकर यांजसारख्या संस्कृतिरक्षक तज्ज्ञाने या चळवळीस काडीमात्र सहकार्य दिले नाही! सावरकरांदिकांचे म्हणणे, महाराष्ट्राच्या या तीन पहिल्या प्रतीच्या बुद्धिमंतांनी 'खोल' विचार केला नव्हता! अर्थात खोल विचार म्हणजे हेकटपणा एवढेच त्यातून निष्पन्न होते!

भाषाशुद्धीची अथवा मराठीकरणाची अशी वेगळी चळवळ असूच शकत नाही. 'आपले' राज्य, 'आपल्या' संस्था, 'आपले' शिक्षण व आपल्या पुढाऱ्यांचे विविध व्यवहार यांतूनच 'आपली' भाषा निघत असते. रंग मात्र असा दिसतो की, परकीयांची सत्ता जाऊन आपली सत्ता येणार ; पण पोशाखाने, आचाराने आणि मानाने परकीय असे पुढारी सत्ताधीश होणार! अशा पुढाऱ्यांस भाषेपुरता सोवळेपणा दाखवून गांधी-टिळकांहूनही आपण संस्कृतीचे अधिक रक्षण करतो असे दाखविण्याचा हक्क पोहोचतो काय? ... की इतर बाबतीत केलेल्या संस्कृतिनाशाचे हे सवंग प्रायश्चित्त?

महाराष्ट्र आपले पुढारी पारखून घेईलच आणि पारखलेल्या पुढाऱ्यांचेही प्रत्येक कृत्य पारखून घेईल अशी आम्हांस खात्री आहे.

ज्यांस खरी भाषाशुद्धी हवी असेल ते स्वभाषेतून शिक्षण व स्वयंसंकृतीचे मार्मिक अध्ययन व पुनरुज्जीवन हाच त्याचा मार्ग ठरवतील. खऱ्या स्वाभिमान्यास सावरकरवादी मंडळींचा शिक्का नको आहे. जनता जागरूक राहील; पण कित्येक पुढारी मात्र 'जबरदस्ताचे मत मान्य' या न्यायाने स्वत:चेच मत विसरू लागले आहेत त्याची वाट काय ?

अनुक्रमणिका

प्रस्तुत विषयाच्या अंगोपांगात येथे शिरता येत नाही. तरी एकदोन हास्यास्पद विसंगतीचा निर्देश मात्र करतो.

(१) ‘तात्याराव’ सावरकर असे म्हणून ‘राव’ या पदाचा उद्धार करण्याचा आव घालणारांस आम्हास असे सांगावयाचे आहे की, आम्ही ‘विनायक साहेब सावरकर’ असे कधीच म्हणत नव्हतो! अर्थात ‘साहेब’ या फारशी शब्दाने ‘राव’ हा मराठी शब्द मारला असे म्हणणे खुळचटपणाचे होय.

(२) प्रोफेसरचे प्राध्यापक बनविणारी मंडळी सावरकरांच्या मागे ‘ब्या.’जोडणे मात्र शुद्ध समजतात! आम्हास ‘ब्यारिस्टर’ या पदाहून ‘देशभक्त’ हे पदच सावरकर यांस अधिक शोभेलसे वाटते.

(३) इंग्रजीतील पाट्या मराठी केल्या की झाले, ही कल्पनाही गुलामगिरीचेच द्योतक आहे. गुलामगिरी भाषांतरातही टिकू शकते. उदाहरणार्थ ‘आयुर्विमा’, ‘मातृप्रसृतिगृह’. ज्यांस खरी भाषाशुद्धी हवी त्यांचे समाधान शुद्धीच्या कारखान्यातील त्या मालाने होणार नाही.

अनुक्रमणिका

५. भाषाशुद्धीची अनौरस संतती

सुमारे दहा वर्षांमागे सावरकर आणि पटवर्धन यांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीला विरोध करताना मी दोन तीन गोष्टी प्रामुख्याने मांडण्याचा यत्न केला होता. जे जुने फारशी शब्द वाक्प्रचारात (Idiom मध्ये) शिरले व खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचले, ते खणून काढण्यात अर्थही नाही आणि यशही नाही; फारशी शब्द शिरले तसे इंग्रजी शब्द लेखी भाषेत शिरत आहेत असे नाही; आणि नवे शब्द तयार करणे सोपेही नाही आणि नेहमीच भाषेला हितकर असते, असेही नाही.

या शेवटच्या मताच्या दृष्टीने मी थोडे अशुभ भाकीतही केले होते; आणि ते म्हणजे नव्या शब्दांची टांकसाळ अशीच चालू राहिल्यास भाषा शुद्ध होण्याऐवजी अधिकाधिक अशुद्ध, विद्रूप आणि दुर्बोध होत जाईल. आजच्या नियतकालिकांतील भाषा वाचल्यास माझे हे भाकीत दुर्दैवाने कल्पनेहून खरे ठरत आहे असे म्हणावे लागेल. भाषाशुद्धीला झालेली अनौरस आणि 'कडू' अपत्ये ती हीच.

मी मागे लेख लिहिले तेव्हाच, प्रत्यही शल्याप्रमाणे बोचणाऱ्या या शब्दांची यादी करावी असे मला वाटले होते; पण असे शब्द प्रत्यहीच निर्माण होऊ लागल्यावर ते निवडण्याचे प्रयोजनच उरले नाही. प्रस्तुत लेखात मी ज्या शब्दांचा उदाहरणादाखल उल्लेख करीन ते केवळ या आठपंधरा दिवसांत सहजगत्या आढळलेले होत. माझ्या मूळ लेखातही अशा अशुद्ध, अर्थशून्य आणि बेडौल शब्दांवरच माझा रोख अधिक होता.

त्यावेळी मी, 'मातृप्रसूतिगृह' या अवजड शब्दांत, 'मातृ' शब्दाची आवश्यकता काय ? असे विचारले होते; आणि 'मॅटर्निटी होम' हा शब्द निर्बुद्धपणे भाषांतरणे एवढेच हा शब्द बनविणारांपुढे ध्येय कसे होते, ते दाखवून दिले होते, शिवाय या काळात आपण वेळी अवेळी 'लोकभाषा', लोकवाङ्मय', 'जनता' वगैरे घोष करतो, त्याच काळात रोजच्या वाङ्मयात अत्यंत अवजड शब्द पेरले जावेत, याबद्दल खेद व्यक्त केला होता. पण त्यानंतर दहा वर्षांनी भाषाशुद्धीचे खास वारस ठरलेल्या एका दैनिकात, मि. क्रिप्स हे आजारी पडल्यामुळे एका 'सुतिकागृहा'त दाखल झाल्याचे जेव्हा वाचले, तेव्हा मला हसावे की रडावे हेच समजेना! बिचाऱ्या उपसंपादकाने भाषाशुद्धीच्या दंडकाला आणि दंडुक्याला भिऊन दैनिकाच्या कचेरीत एका अपरात्री 'Nursing Home' याचे, जे प्रथम डोक्यात आले ते भाषांतर करून टाकले!

काही दिवासांपूर्वी पुण्याच्या साहित्य परिषदेत प्रचलित वादासंबंधी बोलत असता एक विद्वान मला म्हणाले, "भाषाशुद्धीचा वाद? आता तो वाद कुठे आहे? तो तर मागेच निकालात निघाला!!"तो निकालात निघाला; पण आपल्या अनौरस संततीची अशी शेकडो सूतिकागृहे उभारून मग निघाला!

मराठी भाषेचे नुकसान होईल, असे मी मागे म्हणालो; आणि अपरिमित अहित होऊन चुकले आहे असे मी आज म्हणत आहे; पण माझे दु:ख कळण्यास आजच्या पिढीने काही ठाम आणि प्रिय असे सिद्धान्त सोडून दिले पाहिजेत. त्यापैकी पहिला म्हणजे हव्या त्या माणसास नवीन शब्द बनविण्याची पात्रता असते ; आणि दुसरा म्हणजे एखादा शब्द 'रूढ झाला' हा त्या शब्दाच्या लायकीचा पुरावा होय!

आणि या दोन अडाणी समजुतींमुळेच आज शेकडो विद्रूप शब्द तयार होत आहेत आणि खपवून घेतले जात आहेत. वाईट शब्द देखील अनेकदा वापरल्याने रूढ होतोच! 'बँकाय'च्या मुली, 'उन्रा'ची

अनुक्रमणिका

(U.N.R.R.A.) बैठक वगैरे शब्दसुद्धा आमची दैनिके रूढ करीत आहेतच! पण याचा अर्थ हे शब्द भाषेत येण्याच्या लायकीचे आहेत असा नव्हे. पण हेच 'सिद्ध' असे धरून एका गृहस्थांनी मला विचारले, "अहो! प्राध्यापक हा शब्दच घ्या! झालाच की नाही आता रूढ?"

वास्तविक वाटेल त्या शब्दाला 'प्र' लावून दिला की त्याच जातीतील वरच्या श्रेणीचा बोध व्हावा, इतका संस्कृत उपसर्गाचा उपयोग सोपा नाही. पण आमची वृत्तपत्रे मात्र 'प्राचार्य', 'प्राध्यापक', ('प्राध्यक्ष' देखील!) 'उपभारतमंत्री', 'उपकुलगुरू' वगैरे शब्द धडाक्याने तयार करीत आहेत; आणि रोजच छापल्यावर त्यांना ते रूढ, उपयुक्त, आणि भूषणावहही होऊन गेलेसे वाटत आहेत! वास्तविक प्रोफेसर या शब्दाचा अर्थ पंडित अगर आचार्य या शब्दांनी अधिक व्यक्त होईल. पण हे शब्द बनविताना इंग्रजीतील 'प्रो.' या संक्षेपाला जास्तीत जास्त सदृश असा संक्षेप उपलब्ध करून देणे, हा हेतू नजरेसमोर ठेवल्याने शब्दाच्या अर्थाकडे लक्ष देण्याची जरूर वाटली नाही! 'समिती' शब्दाची स्थिती तीच आहे. स्वागत 'मंडळ' अगर 'मंडळी' या शब्दाने जे कार्य उत्तम तऱ्हेने होते, तेच स्वागतसमिती या दुर्बोध नवीन शब्दाने करण्याचे कारण एवढेच, की उच्चार देखील मूळ इंग्रजी शब्दाशी म्हणजे 'कमिटी' शी जवळ असा! वास्तविक अयोध्या प्रान्त या शब्दाने देखील यू.पी.चा बोध झाला असता; निदान 'संयुक्त प्रांत' हा नवा पण बरेच दिवस चाललेला शब्द बदलण्याचे तरी कारण नव्हते. त्याला अलीकडे 'युक्तप्रांत' हा शब्द मराठी लेखक वापरू लागले आहेत. त्याचाही हेतू 'यू. पी.' हे खिळे जुळविण्याऐवजी 'यु. प्रा.' हे खिळे जुळविण्याने काम भागावे एवढाच असावा! वास्तविक सरळ 'भाषांतर' केले, की तो आपला शब्द झाला, ही कल्पनाच गुलामी मनोवृत्तीची आहे, असे मी मागे प्रतिपादिले होते व त्याचे उदाहरण म्हणून 'मधुचंद्र' हा शब्द दिला होता. 'Honey moon' ही पद्धत आपली नसल्यावर 'मधुचंद्र' या शब्दाने काय होणार? पण आज केवळ भाषांतराच्याही पुढे ही अनुकरणवृत्ती गेली आहे. मूळ इंग्रजी शब्दासारखा उच्चार होणारे प्रतिशब्द निवडण्यात हे लोक धन्यता मानीत आहेत. क्रिकेटमधील L.B.W. ऐवजी 'ल. ब. व.' वापरले, की तुमचे समाधान होईल, असे मागे एकदा एका शुद्धीवाल्यास थट्टेने म्हटले होते. पण ती आता थट्टा राहिली नसून वस्तुस्थिती म्हणून पाहण्याची पाळी आली, असे दिसते!

या विद्रूप, अर्थशून्य आणि कृत्रिम शब्दनिर्मितीच्या बुडाशी शब्दासंबंधींचा यांत्रिक (Mechanistic) दृष्टीकोन आहे. शब्दांतील अर्थवाहकता, साहचर्य, ध्वनी, संगीत वगैरेचे उपजत ज्ञान तर नाहीच; पण उलट या सर्वांची उपेक्षा करून दडपून तयार केला, आणि छापून वज्रलेप केला, की कोणताही शब्द पावन होतो, ही अडाणी आणि आडमुठी कल्पना याच्या बुडाशी आहे. पुष्कळदा भाषा ही उच्चारण्याकरिता आहे हे विसरून ती छापण्याकरिता आहे, हेच फक्त लक्षात ठेवले जाते. 'नू.म. वि.' (हायस्कूल) 'एस. पी.' (कॉलेज) 'वाय. एम. सी. ए.' यांसारखे जे अनेक अक्षरगण आजच्या यांत्रिक युगात लोकांच्या तोंडी नाचत आहेत, ते फक्त छापण्यात सोय आहे, उच्चारण्यात सोय नाही, हे लोकांच्या ध्यानी येत नाही. कारण अशा तुटक्या अक्षरांनी त्यांच्या मूळ नावातील संगीत अगर संलग्न कल्पना यांचा मागमूसही राहत नाही. आणि तीन अक्षरे तुटक उच्चारावी लागल्याने तीन वेगळे शब्द उच्चारण्याइतका वेळ लागतो. संक्षेप तयार करतांनाही याहून अधिक कल्पकता दाखवणे शक्य आहे. पण इंग्रजीतील संक्षेप पद्धतीचे अंध अनुकरण या खेरीज संक्षेपातही आपल्याकडे दृष्टी राहिलेली नाही. मागे एकदा हायस्कूल-चालकांच्या बैठकीत बक्षिसाच्या पदकावर अक्षरे कोरण्याचा प्रश्न निघाला. बक्षीस वक्तृत्वाबद्दलचे होते. "आन्तर-शालेय वक्तृत्व-स्पर्धा" हे नाव लहानशा पदकावर अर्थातच कोरणे शक्य नव्हते. आणि एवढा तीन मजली शब्द बिचाऱ्या शालेय बटूंच्या डोक्यात घालणे, म्हणजे तर जवळ जवळ बालहत्याच होत होती. पण त्याच्या ऐवजी तेथे त्या सुंदर सुवर्णपदकावर कोणता मंजुळ शब्द कोरला जाणार होता? तर 'आ. व. स्प.!' या

अनुक्रमणिका

'आवस्प' ने कोणता बोध होणार? पण तितकाच लहान आणि अधिक प्रसंगोचित असा 'वक्तृत्व' एवढा एकच शब्द कोरण्याने ते काम भागण्यासारखे होते. पण स्वभाषेतून शिक्षण देणाऱ्या विद्यापीठाला देखील जर 'गृहीतागमा' या पदवीचे बी. ए. या इंग्रजी अर्थशून्य अक्षरांशी लग्न लावण्याकरिता 'जी. ए.' हे रूप करणे मानवते, तर इतर यांत्रिक संक्षेपांची कथा काय?

नेहरूंनी बनविलेल्या मंत्रिमंडळाची निवड करताना लीगच्या मतांशी जास्तीत जास्त जवळ असणे, हे एक लायकीचे गमक समजण्याची चूक होत आहे, अशी टीका 'फ्री प्रेस जर्नल' या पत्राने केली होती, त्याची येथे आठवण होते!

परभाषेतील शब्द टाळण्याकरिता जी चळवळ निघाली तिनेच परभाषेचे यांत्रिक भाषांतर करण्याची गुलामी वृत्ती वाढीला लावली, हा एक दैवदुर्विलास म्हटला पाहिजे! पण म्हणून इतर गुन्हे या सत्रात कमी होत आहेत, असे नव्हे. त्यांपैकी फार मोठा पण पटविण्यास कठीण असा गुन्हा म्हणजे एकाच इंग्रजी शब्दाला प्रत्येकाने नवा शब्द निर्माण करण्याचा. वास्तविक हा 'गुन्हा' आहे हे पटविण्यास अवघड पडू नये. Neologism अथवा नवशब्दनिर्मिती हा भाषेला एक रोगच कसा होऊ शकतो, हे मी मागे दाखवून दिलेले होते. Prime Minister ही साधी संज्ञा घ्या. हे पद आपल्याकडे पूर्वी होतेच; त्यामुळे लोकांना नवीन कल्पना, संस्था अगर रूढी ज्ञात करून देण्याकरिता नवा शब्द काढावयाचा अशी स्थिती नव्हती. आणि तरी त्याचेऐवजी सर्व-परिचित अशी एक संज्ञा रूढ होऊ शकली नाही. 'मुख्य-प्रधान' हे याचे सोपे आणि स्वाभाविक असे मराठी रूप ठरण्यास हरकत नव्हती; पण 'सचिवोत्तम', 'पेशवे', 'पंतप्रधान' , 'प्रधान-मंत्री' याप्रमाणे सात दैनिकांत सात शब्द; किंबहुना एकाच दैनिकात एका आठवड्यात सात शब्द, याप्रमाणे हवे ते शब्द वापरण्यात येत आहेत.व याचे कारण, भाषेत नवीन शब्द पेरणे हा एक हवा त्याने करण्यासारखा खेळ आहे, त्यात जबाबदारी, नफानुकसान यांचा प्रश्न नाही, ही अडाणी समजूत होय.

इंग्रजी 'पार्लमेंट' अथवा 'म्युनिसिपॅलिटी' या संस्थांना एखादा मनुष्य दररोज नव्या शब्दाने उल्लेखू लागला, तर 'तो नवा शब्द परकीय भाषेतील नाही,' एवढ्याने त्याची गय होईल, असे नाही. आणि तो भाषेत भर घालीत आहे, असे समजण्याइतका मूर्ख तर कोणीच सापडणार नाही. पण आमच्याकडे मात्र अशा सार्वजनिक संस्थांचे आणि संज्ञांचे रोज नवे भाषांतर करणे हा दैनिकांतील लेखक आपला हक्क समजत आहेत. म्युनिसिपॅलिटी या शब्दाचे भाषान्तर काही दिवसांपूर्वी 'स्थानिक स्वराज्य'या शब्दाने करीत. तालुक्यांच्या गावी तिजबद्दल नुसता 'कमिटी' हा शब्दही रूढ झाला होता. तिला 'नगरपालिका' बनविताना बहुधा 'पालिटी' ला 'पालिका' जवळ, हाच विचार मनात वागत असला पाहिजे. आणि तिच्या सभासदांना 'नगरपिते' म्हणण्यात तर एका पाश्चात्य संकेताचे भाषांतर करण्याचा यत्न आहे. साधा सभासद शब्द घ्या, तो रूढ होता; शुद्ध होता; उच्चारास सोपा होता. त्याऐवजी 'सदस्य' हा उच्चारास अवघड आणि मराठीस अपरिचित असा शब्द वापरण्यात, रिकामटेकड्या संस्कृतज्ञाखेरीज कुणाचीच हौस फिटण्याचा संभव नव्हता!

पण निष्कारण नवे शब्द निर्माण करून कोणतीच संज्ञा निश्चित होऊ न देणे, एवढाच अपराध हे लोक करीत आहेत, असे नाही. उघड उघड चुकीचे शब्दही ते रूढ करीत आहेत. 'वक्तृत्व' या ऐवजी अनेक लोक 'वक्तव्य' हा शब्द आज वापरीत आहेत. हा शब्द प्रथम Statement याचे भाषांतर म्हणून बाहेर पडला.पण 'स्टेटमेंट' याला त्याच्या पूर्वीच 'पत्रक' शब्द रूढ होता. तो असून, अथवा बाजूला टाकून, 'वक्तव्य' रूढ करण्याचे कारण नव्हते. आणि प्रत्यक्ष व्यवहारात तर 'शनवारवाड्यापुढील दणदणीत

वक्तव्य’ अशा स्वरुपात तो शब्द ‘वक्तृत्व’ या अर्थाने तो वापरला जाऊ लागला! आता, ‘केलेले भाषण’ या अर्थाने ‘वक्तव्य’ (म्हणजे ‘जो बोलावयाचे आहे ते’ या अर्थानेच मराठीत परिचित) हा शब्द वापरणे किती हास्यास्पद आहे, हे सांगावयास नकोच. पण हा शब्द हिंदीत या अर्थाने रूढ होता, एवढे कारण या मंडळींस पुरले असावे!

अशा अनेक अनावश्यक, बोजड आणि (कित्येकदा) अशुद्ध शब्दांचे मूळ इतर भारतीय भाषांत सापडते. अर्थात आपणास इतर भाषा येत आहेत हे दाखविण्याच्याभरात, हे पोरकट शब्दबहाद्दर भाषेचे हाल करीत असतात, तर कित्येकदा इतर भाषांतील, हिंदी-गुजरातीतील, शब्द मराठीत आणण्याने राष्ट्राच्या एकीकरणास आपण मदत करीत आहोत; असेही यांस वाटते. पण प्रत्यक्ष परिणाम मात्र मराठीतील रूढ आणि सुटसुटीत शब्दांऐवजी एखादा जाडजूड अपरिचित शब्द वापरणे एवढाच होतो. पण हा ढळढळीत दोषही यांना पटविणे का कठीण जाते? तर इंग्रजी शब्द वापरणे – एवढे एकच पाप त्यांनी पाठ केलेले असते; अशुद्ध अगर बोजड शब्द वापरणे नव्हे, बनविणे, हा गुन्हा आहे याची त्यांस वार्ता नसते; आणि सांगूनही समजत नाही.

मी १९३६ सालच्या माझ्या लेखात पत्रांच्या अंती ‘आपला’ म्हणून सही करण्याऐवजी ‘भवदीय’ म्हणणारे लोक; ‘नमस्कार’ ऐवजी ‘नमस्ते’ (अरे, तुला नमस्कार) म्हणणारे लोक ग्राम्य अनुकरणाच्या पलीकडे काही साधत नाहीत, हे दाखविले होते. पण त्याच्यासारखेच ‘षडयंत्र’ (कट?), ‘उपन्यास’, ‘अनुवाद’, ‘संचालक’, ‘तंत्री’ हे शब्द मराठीत वापरले जात आहेत. मराठीत रूढ असलेला ‘कादंबरी’ हा शब्द आबालवृद्धांपर्यंत पोहोचलेला असून व बाणभट्टाच्या कादंबरीची सुंदर परंपरा त्या शब्दाने सूचित होत असून, ‘उपन्यास’ हा शब्द वापरण्यात हेतू कोणता? ‘चालक’ शब्दाने देखील ‘संचालक’चे कार्य झाले असते. आणि ‘संचालक’ शब्दाने आधी कार्य तरी कोणते करावयाचे होते? तर संपादकाच्या वरचे एक पद निर्माण करावयाचे होते. मला वाटते, ‘सह्याद्री’ ने हा शब्द प्रथम वापरला. पण ‘मुख्य संपादक’ या शब्दानेही ते कार्य होऊ शकले असते.

याबाबत मी सुप्रसिद्ध साहित्यिक काकासाहेब कालेलकर यांचे मत एकदा विचारले होते. पुण्याच्या ‘लोकशक्ती’ कार्यालयात त्यांची राष्ट्रभाषेसंबंधीची कल्पना समजावून देण्याकरिता काही साहित्यिकांना पाचारण करण्यात आले होते, त्यात मी होतो. काकासाहेबांचा मुख्य विषय अर्थात एक सोपी, सर्वांना समजेल अशी, हिंदुस्तानी भाषा बनविण्यावर होता व त्या दृष्टीने ‘मला पंडितांची पर्वा नाही; सामान्य जनतेची काळजी आहे.’ अशा प्रकारची भूमिका ते मांडीत होते. त्यावरून थोडे विषयांतर करून, मला बरेच दिवस डाचणारा प्रश्न मी त्यांना विचारला.

मी त्यांना विचारले, “एखाद्या अर्थाचा वाचक, सोपा आणि सुपरिचित शब्द मराठीत रूढ असता, त्याच्याऐवजी अन्य प्रांतिक भाषांतील शब्द केवळ संस्कृत आहेत म्हणून वापरणे ते तुमच्या लोकभाषेच्या धोरणात कसे काय बसेल?”

काकासाहेबांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, “हे मला कधीच मान्य होणार नाही!”

मग मी त्यांना ‘साक्षर’ , ‘अस्मिता’ या शब्दांचे उदाहरण दिले. ‘साक्षर’ शब्दाचा मराठी रूढ अर्थ ‘Literate’-अक्षर ओळख असलेला, हा होय, त्याचा गुजरातीतील अर्थ ‘विद्वान’. मराठीत हा अर्थ व्यक्त

करण्यास नवीन शब्द हवा आहे, असेही नाही. "अशा स्थितीत 'साक्षर' हा शब्द 'विद्वान' या अर्थी मराठीत वापरणे तुम्हास मान्य आहे काय?" असे मी त्यांना विचारताच त्यांनी साफ 'नाही' असे उत्तर दिले. आणि त्यांच्या लिखाणाच्या मराठी रुपांतरात जर असे काही शब्द असले, तर ते भाषांतर-कर्त्याचा 'शहाणपणा' होय असेही त्यांनी जाहीर केले. पण हिंदी, गुजराती, बंगाली या भाषांतील वाङ्मय मराठीत आणणारी मंडळी मात्र असे शब्द योजणे हे एक पुण्यकृत्य म्हणून ते मोठ्या ते भाविकपणे करीत आहेत!

शरदबाबूच्या बंगालीचे मराठी, कालेलकरांच्या गुजरातीचे मराठी आणि अनेक हिंदी लेखकांच्या हिंदीचे मराठी करताना, मराठीची विटंबना प्रत्यही होत आहे. रवींद्रनाथांचे 'प्रति-भाषण' म्हणण्याने काय बोध होणार? 'टीका' शब्द रूढ असून 'समीक्षा', आणि 'समीक्षा' परिचित होतो न होतो तोच 'विमर्षवाङ्मय' हा शब्द वापरणे, अशाने कोणती निश्चित परिभाषा निर्माण होणार?

आणि सर्वात मौजेची गोष्ट म्हणजे या पोरखेळाचा आणि शब्दावडंबराचा मुख्य उद्देश जो परकीय शब्द मारणे, तोही साध्य होत नाही, हे तर मी मागेच दाखवून दिले होते! 'नि' हे बायकी आणि कोकणी अव्यय, प्रतिष्ठित भाषेत आणूनही 'व' हे अरबी अव्यय जिवंत आहे; आणि 'आणि' हे मराठी अव्यय तर आधीच तयार होते!

या सर्व प्रकारांत शुद्ध अज्ञानालाही चांगलीच मुभा मिळाली आहे- माफी मिळाली आहे! माफी म्हणण्याचे कारण एकदा एखादा शब्द, इंग्रजी शब्द टाळण्याकरिता, अथवा प्रांतिक शब्द रूढ करण्याकरिता, वापरला असे ठरले, म्हणजे मग व्याकरणाचे आणि अर्थाचे खून माफ! अशी ही अडाणी देशभक्तीची भावना आहे. प्रेताची 'उत्तरीय' चौकशी हा शब्द या वृत्तीनेच वापरला जातो. 'उत्तरीय' म्हणजे 'उपरणे'; पण 'Post mortem' मधील 'पोस्ट' हे लॅटिन पद अलगत 'संस्कृत' बनविण्याचा हा दैनिकाच्या कचेरीतील प्रयत्न होय! प्रेताचा 'पंचनामा' हा शब्द रूढ आणि सोपा होता; आणि 'उत्तरीय' चौकशी हा शब्द शुद्ध विदूषकी आहे, हे देखील विसरण्याला कारण म्हणजे वर निर्देशिलेले हास्यास्पद देशभक्तीचे व्रतच होय. पण 'ट्रस्टी' शब्दाला देखील ज्यांना 'विश्वस्त' हा नवा शब्द करावा लागला आणि 'पंच' हा रूढ शब्द आठवला नाही, त्यांना 'Post mortem' ला तितकाच लांबलचक शब्द वापरल्याशिवाय कसे राहवणार? या सर्व प्रकारात वेडपट देशभक्तीइतकाच विदुषकी वृत्तीचा प्रकार आहे. पण हसे होत आहे भाषेचे! आणि हानी होत आहे सुबोधतेची – म्हणजेच जनतेची.

मुंबईच्या एका दैनिकाने मोठ्या ठशात छापलेल्या संस्कृतप्रचुर मथळ्यात 'मृत्यूच्या कटोहात' असा शब्दप्रयोग कलकत्त्यातील कत्तलीसंबंधी केला होता. वास्तविक कलकत्त्याच्या कत्तलीसंबंधी कितीतरी सोपे, पण अर्थवाहक मथळे, योजता आले असते. पण लेखकाच्या डोळ्यांपुढे इंग्रजी तारेतील 'Holocaust Cauldron' हे शब्द होते; आणि 'कटाह ' शब्द वापरण्याची त्याने धडपड केली; व दैनिकाच्या धांदलीत त्याचे 'कटोह' असे रूप छापून टाकले. एखद्या संस्कृत शब्दाचे रूप चुकीचे छापले आणि अगर वापरले जाणे, या अपराधापेक्षाही कोशाच्या कानाकोपऱ्यातील संस्कृत शब्दाकडे वेळीअवेळी धाव घेणे, हा मी अधिक मोठा अपराध समजतो. थोडी कल्पकता वापरल्यास कितीतरी सोपे आणि जोरदार शब्द येथे वापरता येण्यासारखे होते. साधा 'यमपुरी' शब्द देखील चालला असता.

अनुक्रमणिका

पुण्यातील एका भाषाशुद्धीवादी दैनिकात पुढील अर्थाचा मथळा होता : “पुण्याच्या स्थानकावर बारा भटक्यांना अटक; पैकी महंमद याकूब यावर अभियोग भरला!!” यातील दुर्बोधता, अनौचित्य, आणि कर्णकटुता याचे प्रमाण ठरविणे आम्ही वाचकांवर सोपवितो.

जेथे व्याकरण आणि उघड अर्थ यांचेही खून पडत आहेत, तेथे अर्थाच्या बारीक छटांची रवानगी कचऱ्याच्या पेटीत झाल्यास नवल नाही. ‘इन्कार’ शब्द मराठीत एखादी बातमी बरोबर नाही, असे जाहीर करणे, Contraict करणे या अर्थाने रूढ झाला होता. तो साधा ‘नकार’ या अर्थानेही हल्ली वापरला जातो; कलकत्यास ‘आश्रितांचा’ शिरच्छेद झाल्याच्या बातम्या अलीकडे छापल्या गेल्या आहेत. दंगलीत ‘आश्रयाला आलेले लोक’ आणि ‘आश्रित’ यांत अंतर आहे.

‘शफात अहंमदखानच्या आक्रमकास अटक’ अशा अर्थाचा मथळा पुण्याच्या भाषाशुद्धीवादी दैनिकाने छापला होता. आक्रमण हा शब्द मराठीत Aggression या अर्थाने रूढ आहे. Aggression आणि Attack यांत अंतर आहे.

मला हे पुन्हा उघड सांगितले पाहिजे की हे मिशनऱ्यांनाही बरे म्हणविणारे प्रयोग या लोकांना आठवण्याचे आणि आवडण्याचे कारण एकच; आणि ते म्हणजे इंग्रजीऐवजी एखादा प्रयोग करणे हे मुळातच पुण्यकर्म असल्याने, ते करताना मराठीचा खून झाला तरी हरकत नाही, ही समजूत! ‘दग्धभू धोरण’, ‘नौदलातील बंड ‘ यासारखे क्लिष्ट आणि कर्णकटु प्रयोग तर दर आठवड्यास शेकडोंनी तयार होत आहेत. (मध्ये काही दिवस एका दैनिकात-जाहिरातीत-आठवड्याबद्दल ‘सातवडा’ असे छापले जात असे. यात तर मला पोरकटपणापलीकडे काहीच दिसत नाही!) ‘स्थगित’ शब्द प्रथम ‘तहकूब’ (अरबी, तवक्कुफ) हा शब्द मारण्याकरिता बाहेर पडला. पण दैनिकांच्या अग्रलेखातही कित्येकदा ‘आम्ही तर ही बातमी वाचून स्थगितच झालो’ यासारखा, म्हणजे ‘चकित’ या अर्थी, त्याचा उपयोग वाचून बिचारे वाचकच ‘स्थगित’ (दैनिकी अर्थाने!) झाल्यास नवल नाही!

दे.भ.सावरकर यांचे मॅझिनी-चरित्र कितीही वर्षे ‘प्रक्षिप्त’ राहिले असते तरी ताजेच राहिले असते, अशा अर्थाचे विधान माझे मित्र शिवरामपंत करंदीकर यांचे तोंडी पुण्याच्या एका दैनिकाने घातले होते! याच शब्दाचा उपयोग ‘Broadcast’ केलेले या अर्थानेही झालेला आहे. मराठीतील त्या शब्दाचा रूढ अर्थ मात्र “रामायणातील ‘प्रक्षिप्त’ भाग” वगैरे प्रयोगात असलेलाच काय तो (म्हणजे Interpolated हाच) आहे. ‘दिग्दर्शन’, ‘मध्यंतर’, ‘आवाहन’, ‘साहित्यिक’, ‘आंदोलन’, ‘श्रेष्ठी’, ‘नेत्रदीपक’, ‘अल्पसंख्यांक’ वगैरे असंख्य शब्दांच्या जन्मकाळच्या आणि पुढील प्रवासाच्याही अनेक गंमती आणि गफलती सांगता येतील. ‘मध्यंतर’ शब्दाची पदे कशी पाडायची? (‘मध्यंतरी’ शब्द रूढ आहे; त्याची आम्ही चौकशी करीत नाही; पण नवा शब्द करताना त्याची चौकशी जरूर झाली पाहिजे.) ‘आवाहन’ शब्द माझे मित्र माडखोलकर यांनी प्रथम संचारार्थ सोडला असावा. पण हल्ली कित्येक उत्साही लेखक ‘आव्हान’ देतानाही आपल्या या आवडत्या लेखकाचा ‘आवाहन’ हा शब्द दडपून देत आहेत. ‘साहित्यिक’ शब्द माझे मित्र खानोलकर यांनी सुमारे चौदा वर्षांपूर्वी प्रथम वापरला. (अर्थात शेजारच्या एका प्रांतातून तसाच घेतला.) लेखक यापेक्षा त्या शब्दाला अधिक अर्थ नाही. ‘केसरी’ मध्ये हा शब्द असंख्य वेळा ‘साहित्तिक’ (अडकित्त्यातील ‘त्त’!’) असा छापला जातो. ‘आंदोलन’चा अर्थ हेलकावा असा आहे. ‘चळवळ’ हा शब्द मराठीत चांगलाच रूढ होता; त्यार्थी हा भलत्याच अर्थाचा शब्द केवळ हिंदीत सापडला म्हणून घेतला गेला असावा. (चळवळ,

Moverment वगैरेमध्ये हेलकाव्याचा अर्थ नाही.) 'नेत्रदीपक' शब्द डोळ्यांना दिपविणारा या अर्थी वापरला जात आहे. 'दीपक' च अर्थ दिपविणारा होईल काय?

अशा दृष्टीने असंख्य शब्द गेल्या दहा वर्षांत मराठीत आले आहेत. शुद्धीकरिता हे चालले आहे म्हणावे, तर 'आयुर्विमा', 'निर्लष्कर' वगैरे हिंदु-मुसलमान विवाहही याच शुद्धीच्या सपाट्यात लावले गेले आहेत ('आयुर्विमा' चांगलाच रूढ झाला आहे; आणि 'निर्लष्कर' शब्द नुकताच पुण्याच्या एका दैनिकाने घडविला आहे!). 'श्रेष्ठी' हा शब्द शेटजी या अर्थाने मराठीत ज्ञात होता; तो काँग्रेस हायकमांडचे भाषांतर करताना योजण्यात, काँग्रेस भांडवलवाल्यांच्या हाती गेली असे तर सुचवायचे नव्हते? पण गांधी, जवाहरलाल यांच्यासारख्या विरक्त आणि निरिच्छ पुढाऱ्यांना शेटजी म्हणण्याचे कारण "High" शब्दाचे काही तरी अजब भाषांतर करण्याची प्रवृत्तीच असावी!

शब्द बनविण्याला सर्वांनी कंबर बांधली की भाषाशुद्धी झाली असे समजणे; आणि मजसारख्याने त्यांतील अर्थशून्य शब्दनिर्मितीसंबंधी गाऱ्हाणे गायिल्यानंतरही, "जे चांगले असतील तेच रूढ होतील" असे म्हणणे, किती धोक्याचे आहे, हे वरील शब्दवैभावावरून ध्यानी येईलच. चार नवीन प्रतिशब्दांपैकी चांगला तोच रूढ होईल, याला कोणतीही हमी नाही. वाईटच केवळ विदुषकीपणामुळे आणि लक्ष वेधणारा म्हणून! —रूढ झाला, याचीही उलट उदाहरणे आहेत आणि आवश्यक नसतानाही केवळ हुल्लड म्हणून असे शब्द बनविले आहेत ते वेगळेच!

अशा स्थितीत केवळ शुद्धीकडे लक्ष देणारे लोक भाषेच्या इतर रोगांसंबंधी अज्ञान दाखवीत आहेत व तशा अज्ञानास उत्तेजन देत आहेत.

मला कोणत्याही व्यक्तीला अगर वर्गाला दोष द्यावयाचा नाही. वृत्तपत्रव्यवसायात दैनिकांच्या क्षेत्रातही माझे उत्तम स्नेही आहेत. दैनिकांच्या संपादकांच्या जागी तर कित्येक अत्यंत कर्तबगार, आणि कुशाग्र बुद्धीची माणसे महाराष्ट्रात काम करीत आहेत. उपसंपादकवर्गात पुष्कळदा अगदीच अननुभवी मंडळी असली, तरी ती मंडळी देखील पुष्कळदा हुशार व होतकरू असतात, हे मला माहीत आहे. त्यांच्यापैकी अनेक जणांना मी या लेखात वर्णिलेली बेबंदशाही जाणवतही असते, ही त्यांच्याशी झालेल्या संभाषणावरून मी सांगू शकतो. परंतु अत्यंत घाईने इंग्रजी तारांची भाषंतरे करण्याची आवश्यकता- आणि तशाच तारांवर आणि बहुतांशी पाश्चात्य देशात उगम असलेल्या घडामोडींवर अत्यंत तातडीने भाष्य करावे लागणे, यातच या अनवस्थेचा थोडाफार उगम आहे. पण परिस्थितीमुळे उपरिनिर्दिष्ट सर्वच दोषांची संगती लागेल, असे मात्र नाही. मुख्य दोष भाषाशुद्धीत रूढ केलेल्या पापपुण्य कल्पनांत आहे. शब्दनिर्मितीतील 'शुद्धाशुद्ध' आणि 'पापपुण्य' यांसंबंधीच्या कल्पना बदलण्यास दैनिकांच्या घाईतही त्यातील कित्येक दोष टाळता येतील. (शिवाय केवळ दैनिकेच या पापाची धनी आहेत, असेही मला म्हणायचे नाही. ज्यांना कसलीच घाई नाही, ते लोकही केवळ 'चूष' म्हणून हे उद्योग करीत असतात!)

आरब मनुष्य आपली भाषा हे एक संगीत मानतो, असे एक ग्रंथकार म्हणतो. तसेच इंग्रज मनुष्य भाषा हे एक अत्यंत सुक्ष्म असे यंत्र मानतो, असे म्हणता येईल. मराठी मनुष्य भाषेला काय मानतो ? भाषेत गबाळेपणा, अवडंबर, विदूषकीपणा शिरणे, हे ते दोष समाजमनातच शिरण्याचे चिन्ह होय. मराठीत 'लोकमान्य टिळक' यांचासारखे अत्यंत निर्दोष आणि ओजस्वी भाषा लिहिणारे होऊन गेले आहेत. चिपळूणकरांपासून गडकऱ्यांपर्यंतच्या भाषाप्रभूंनी तिला गोडी आणि वैभव दिले आहे. केतकर, राजवाडे,

गो. म. जोशी. यांजसारख्या अनेक शास्त्रे पढलेल्या पंडितांनी सुंदर पारिभाषिक शब्द बनविण्याचे आदर्शही घालून दिले आहेत. अशा स्थितीत केवळ भाषाशुद्धीच्या विकृत कल्पनांनी आणि दैनिक कार्यालयाच्या ‘लगीनघाई’ मुळे आपल्या सामर्थ्यवती आणि सौंदर्यशाली मायभाषेचे रूप बिघडू द्यायचे की काय, हा प्रश्न आजच्या गद्यलेखकांनी गंभीरपणे सोडविला पाहिजे.

या क्षेत्रात सोवळेपणा आणि हुल्लडबाजी यांना स्थान नसावे.

अनुक्रमणिका

६. भाषाशुद्धी प्रवर्तक सावरकर : एक विलक्षण चमत्कार

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव महाराष्ट्रातील भाषाशुद्धीच्या चळवळीशी कायमचे निगडित आहे. तथापि, भाषाशुद्धीची कल्पना महाराष्ट्रात तरी त्याहूनही जुनी आहे. ती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या 'राज्यव्यवहार-कोशा' इतकी जुनी आहे.

सावरकरांनी आपल्या भाषाशुद्धीविषयक लिखाणात रघुनाथ पंडितांच्याद्वारे महाराजांनी केलेल्या उपक्रमाचा आदरपूर्वक उल्लेखही केला आहे. तथापि शिवाजी महाराजांनी केलेला उपक्रम आणि सावरकरांनी जन्मठेपेतून परत आल्यावर हाती घेतलेली चळवळ यांत काही बाबतीत फरक आहे. शिवाजी महाराजांचा उपक्रम मूलतः राज्यकारभारापुरताच मर्यादित होता असे दिसते; म्हणजे तो आजकालच्या सरकारी पदनाम कोशासारखा होता. तर सावरकरांचा उपक्रम राज्यव्यवहारापुरता नसून अखिल सामाजिक व्यवहारांना व्यापणारा होता.

दोन्हीही उपक्रमांचा उगम अपरिहार्यपणे राजकीयच आहे.कारण भाषाशुद्धीची आवश्यकताच मुळी राजकीय परिस्थितीमुळे निर्माण झालेली होती. वेगवेगळ्या देशांच्या प्रवासादिकातून होणाऱ्या संपर्कात जे परकीय शब्द एखाद्या भाषेत प्रविष्ट होतात, त्यांना निपटून काढण्याच्या मागे सावरकर लागले असते असे वाटत नाही. कारण असा भाषा-संपर्क ही एक अपरिहार्य घटना आहे. तिजमध्ये अनैसर्गिक किंवा उद्वेगजनक असे काही नाही. पण जेव्हा एखादे आक्रमक राष्ट्र आपली सत्ता दुसऱ्या राष्ट्रावर लादते, तेव्हा जो भाषिक संपर्क घडतो तो स्वाभाविक नसतो. तो प्रायः बलात्काररूप असतो. इंग्रजी किंवा अरबी-फारशी शब्द जेव्हा हिंदी –बंगाली-मराठी या सारख्या संस्कृतोद्भव भाषांत गर्दी करतात, तेव्हा तो संपर्क सर्वस्वी अस्वाभाविक असतो. इतकेच नव्हे तर गुलामगिरीची खेदजनक आठवण करून देणारा असतो. शिवाय, परराज्यामुळे जेव्हा परभाषिक शब्द एखाद्या भाषेत घुसतात, तेव्हा त्याचे प्रमाणही इतके मोठे असते की मूळ भाषेतील विभक्ती-प्रत्यय आणि क्रियापदे या पलीकडे फारच थोडे शिल्लक उरते! शिवकालीन पत्रव्यवहारातील भाषा अर्वाचीन हिंदीचे उर्दू या नावाने झालेले रुपांतर, यांजकडे पाहिल्यास ह्या भाषिक बलात्काराचे स्वरूप लक्षात येईल. या राजकीय बलात्काराची प्रतिक्रिया म्हणून आधुनिक हिंदुस्थानात भाषाशुद्धीची चळवळ प्रथम उत्तर प्रदेश आणि बंगाल या विभागांत सुरू झाली.

उत्तर प्रदेशात तर केवळ अरबी-फारशी शब्दच तत्रस्थ भाषेत शिरले होते असे नव्हे; अत्यंत हास्यास्पद आणि संतापजनक गोष्ट म्हणजे तेथे भारतीय लिपीच उच्छेदून अरबी-फारशी लिपीने ठाण मांडले होते. म्हणजे या देशातील ब्राह्मण कायस्थादी विद्योपजीवी जाती आपल्या जगद्‌विख्यात पूर्वजांची लिपी सोडून उर्दू (म्हणजेच अरबी-फारशी) लिपी वापरू लागल्या होत्या. तुळशीदासाच्या वंशातील स्वामी रामतीर्थ, काश्मीरी ब्राह्मणवंशातील पंडित मोतीलाल, जवाहरलाल, ह्यांच्या बाल्यात उत्तर प्रदेशातील ब्राह्मण मुले देखील एखाद्या मौलवीच्या दारी जाऊन 'अलिफ', 'बे' ही मूळाक्षरे गिरवीत असत! म्हणून उत्तर प्रदेशात प्रथम वाडवडिलांची लिपी पुन्हा स्थापित करण्याची चळवळ करावी लागली. 'नागरी प्रचारिणी सभा' म्हणून जी विख्यात झाली, तिला प्रथम नागरी लिपीचा प्रचार हाती घ्यावा लागला. अर्थात उत्तर प्रदेशात भाषाशुद्धीची चळवळ महाराष्ट्रापेक्षाही अधिक अपरिहार्य होती. सिंधमध्ये तर सर्व व्यवहार उर्दू लिपीतूनच होत. म्हणजे सिंधी भाषेची लिपी उर्दू हीच ठरून गेली! ती इतकी की घरेदारे सोडून स्वतःच्या जन्मभूमीतून पाकिस्तानच्या निर्मितीमुळे देशोधडीला लागल्यावरही सिंधी लोक, निदान

त्यांच्यातील बहुसंख्य लोक आपल्याला देशोधडीला लावणाऱ्या लोकांची, उजवीकडून डावीकडे लिहिली जाणारी लिपी अद्यापही आपली लिपी समजतात!

सावरकरांच्या लेखनावरून असे दिसते की, त्यांना भाषाशुद्धीची अपरिहार्यता उत्तर प्रदेशातील शुद्धी-चळवळीवरूनच मनात भरली. या संग्रहातील पहिल्याच लेखात सावरकरांनी या सत्याचे कथन केले आहे. उत्तर हिंदुस्थानातील लोक जागृत होऊन अरबी-फारशी शब्द खड्यासारखे वेचून काढीत असता, मराठी भाषेत मात्र, शिवाजी महाराजांसारखा मोहरा साडे तीनशे वर्षांपूर्वीच होऊन गेला असूनही अद्याप निदान शेकडा चाळीस तरी अरबी- फारशी शब्द भक्कमपणे राहावेत, याचे सावरकरांना वैषम्य वाटणे अगदी साहजिकच होते. त्यातून त्यांना राजकीय कार्यापासून काही काळ सक्तीने अलिप्त राहावे लागल्याने, भाषाशुद्धी आणि अस्पृशोद्धार या दोन चळवळींवरच लक्ष केंद्रित करता आले.

सावरकरांचा स्वभाव हा असा क्रांतीकारकाचा आहे, तसाच तो कमाल पाशासारख्या सद्धेतुप्रेरित हुकुमशहाचाही आहे.एखादी गोष्ट त्यांनी हाती घेतली म्हणजे 'शक्याशक्य' , 'व्यवहार्य वा अव्यवहार्य' यांचा विचार ते करीत बसत नसत. भाषाशुद्धीच्या बाबतीत काय, की पतितपावन चळवळीच्या बाबतीत काय, 'अशक्य' हा शब्द सावरकरांच्या कोशात नव्हता! "शब्द वापरा की तो रूढ झालाच!", "अनेक पर्याय प्रचारात आले, तर अखेर चांगले तेच टिकतील ." – यांसारखी त्यांची आग्रही सूत्रे पाहिली म्हणजे त्यांची अप्रतिहत कार्यपद्धती लक्षात येते. पण भाषा ही नदीच्या प्रवाहाप्रमाणे स्वत:ची वाट कापते. पाटवणाप्रमाणे कृत्रिम तटबंदीतून वाहत नाही.त्यामुळे सावरकरांच्यासारख्या, अशक्य हा शब्दच माहित नसलेल्या, नेपोलियन-सदृश वीरालासुद्धा रूढ शब्द काढून लावताना ज्या अनेक अडचणी आल्या त्या पाहण्यासारख्या आहेत.

सावरकरांच्यापूर्वी भाषाशुद्धीचा झालेल्या प्रख्यात प्रयत्न जरी शिवाजी महाराजांचा राज्यव्यवहार कोश हा असला, तरी त्या नंतरही कारभाराच्या भाषेकरिता स्वभाषेतील कोश करण्याचे प्रयत्न झालेले आहेत. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, महाराजांच्या मंत्रिमंडळातील विख्यात पंडित रघुनाथ हणमंते यांचा कोशही आजच्या विद्यालयांतून आणि ग्रंथशाळांतून फारसा आढळत नाही. या प्रस्तावानेकरिता मी एका प्रख्यात ग्रंथालयात राज्यव्यवहार कोशाची चौकशी केली असता, तेथील त्रिपदवीधारी ग्रंथाधिकाऱ्याने माझ्यापुढे अर्वाचीन सरकारने करविलेला 'पदनाम कोश' आणून ठेवला! राज्यव्यवहार कोशाच्या आतापर्यंत केवळ दोन आवृत्त्याच निघाल्या आहेत ही गोष्टही अशुभसूचक आहे. एक आवृत्ती शके १८०२ मध्ये म्हणजे इ.स.१८८० मध्ये निघालेली आहे; तर दुसरी इ.स. १९५६ मध्ये निघालेली आहे. ही दुसरी आवृत्ती पुण्या-मुंबईच्या एखाद्या प्रसिद्ध विद्वत् संस्थेने काढलेली असेल अशी आपली कल्पना साहजिकच होते, पण ही सुंदर आवृत्ती, उर्दू आणि तेलुगू भाषेने वेढलेल्या 'मराठवाडा साहित्य परिषदे' ने काढलेली आहे! त्यांनी केंद्र सरकारच्या 'शिक्षण मंत्रालयाकडे' या संबंधात विनंती केली होती. परंतु 'दिल्ली शिक्षण मंत्रालया'ने या कमी आपली असमर्थता प्रकट केली. पत्र क्रमांक D-2772-M-2/23, November 1955. मराठवाडा साहित्य परिषदेने वीस वर्षांपूर्वी काढलेल्या या आवृत्तीला श्री. रामचंद्र गोविंद काटे यांची उपयुक्त प्रस्तावनाही आहे. या नव्या आवृत्तीमुळे तरी हा ऐतिहासिक महत्वाचा कोश सर्व विद्यालये आणि विद्यापीठे यांच्या संग्रहात आणि वापरात असावा, अशी साहजिकच अपेक्षा होते. पण वस्तुस्थिती मात्र दुर्दैवाने तशी नाही.

या नंतरचा असाच राज-पुरस्कृत प्रयत्न म्हणजे विख्यात विद्याप्रेमी नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड, यांच्या प्रोत्साहनाने स्थापन झालेल्या कोश मंडळाचा प्रयत्न होय. हा प्रयत्न केवळ महाराष्ट्रापुरता नसून अखिल भारताला उपयुक्त असा आहे. या कोशाचे नाव ‘ श्रीसयाजीशासनशब्दकल्पतरू’. यात इंग्रजी, गुजराती, मराठी, संस्कृत, उर्दू, फारशी, हिंदी आणि बंगाली अशा आठ भाषांतील समान शब्द एकापुढे एक दिले आहेत. या ग्रंथाची उपयुक्तता वेगळी सांगण्याची गरजच नाही. अशा तऱ्हेचा प्रयत्न त्या पूर्वीही झाला नव्हता आणि त्यानंतरही त्या तोडीचा झालेला नाही. रघुनाथपंत हणमंत्यांचा कोश आणि श्री सयाजीमहाराज-पुरस्कृत कोश यांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही कोशांनी सोपेपणाला आणि सुटसुटीतपणाला दिलेले प्राधान्य हे होय. सयाजीमहाराज-पुरस्कृत ग्रंथ आकाराने आणि पृष्ठ संख्येने प्रचंड आहे. त्याची प्रस्तावना साहजिकच गुजरातीत आहे. तीत म्हटले आहे... “लांबा शब्दोने बदले टूंका शब्दोने पसंदगीनो प्रथम अंक आपवामा आव्यो छे; कारण के व्यवहारमां ते रूढ थवामां सरळ पडे छे.”

रघुनाथ पंडितांच्या कोशामध्येही सुगमतेला प्राधान्य देण्याचे हेच धोरण अवलंबिलेले दिसेल. दुर्दैवाने हिंदी आणि बंगाली भाषांत झालेल्या शुद्धीच्या चळवळीने सुगमतेला प्राधान्य दिले नाही. ‘वार्ताहर’ या ऐवजी ‘संवाददाता’, ‘सामना’ या ऐवजी ‘प्रतियोगिता’, ‘सेना’ किंवा ‘सैन्य’ या ऐवजी ‘वाहिनी’ हा (कित्येक संस्कृतज्ञांसही झटकन न समजणारा!) शब्द, यांसारखे शेकडो क्लिष्ट शब्द भाषाशुद्धीच्या निमित्ताने बंगाली व हिंदी पंडितांनी आपापल्या मुळच्या सुगम भाषांत आणून सोडले.त्यांनी जर शिवाजी महाराजांचा राज्यव्यवहार कोश आणि सयाजीराव महाराजांचा ‘शासनशब्दकल्पतरू’ डोळ्यांपुढे ठेवला असता तर त्या दोन्हीही भाषा सामान्य लोकांच्या तोंडी सहज रुळल्या असत्या. पण ते कहीही असले तरी राज्यव्यवहाराकरिता दोन विख्यात राज्यकर्त्यांनी मुद्दाम करवून घेतलेले हे कोश अव्हेरून आज यांत्रिक पद्धतीने बनविलेले जे क्लिष्ट शब्द रूढ करण्याचा प्रयत्न होत आहे तो अनिष्ट आहे. जे शब्द सुगम नाहीत, ते रूढ होण्याचा संभव नसतो.

सावरकरांच्या डोळ्यांपुढे असलेला दुसरा महान प्रयत्न ‘अतातुर्क’ कमाल पाशा यांचा होता. सावरकर आणि कमाल पाशा यांचा व्यक्तिमत्त्वातील आणि पराक्रमातील साम्य शोधणे मनोरंजक होईल. या दोघांपैकी सावरकर हेच अधिक व्युत्पन्न आणि सुसंकृत होते. कमाल पाशाच्या विद्याव्यापासंगासंबंधी त्याचा चरित्रकार लॉर्ड किनरॉस् म्हणतो –

‘Kemal’s own cultural background was scrappy. He had studied subjects ad-hoc, in periodic bursts of concentration-skimming through them, on occassion. to rationalize some intuitive preconceived notion But he had never acquired the habit of systematic reading,”

यातील काही वर्णनच सावरकरांना लागू होण्यासारखे आहे. सावरकरही आपले स्वयंस्फुर्त विचार सर्वमान्य करण्याकरिताच वाचन करीत. पण त्यांची मूळची बुद्धी अत्यंत तीव्र आणि व्यासंगी होती. कमाल पाशा,सम्राट अकबराप्रमाणे, भोवताली पंडित गोळा करून त्यांच्याकडून आपल्याला हवे ते ज्ञान ओरबाडून घेण्यात तरबेज होता! त्याच्या भोवताली गोळा झालेल्या पंडितांत दोन पक्ष होते. एक पक्ष, ‘तुर्की भाषा सोपी केली म्हणजे झाले’असे म्हणणारा होता, तर दुसरा पक्ष ‘तुर्की भाषेतील अरबी –फारसी शब्द काढून टाकून त्यांच्या जागी नवे तुर्की शब्द तयार करून योजावेत’ असे म्हणणारा होता. स्वत: कमाल भाषाशुद्धीच्या बाजूचा होता. पण त्यास अनुभव मात्र वेगळाच आला. त्याचा चरित्रकार लॉर्ड किंनरॉस् म्हणतो-

"In time he realised that his linguistic operations were leading the Turkish language into a blind alley. It threatened to become a mandarin language as artificial and incomprehensible to the ordinary Turk as that of the old Ottoman ruling class. A halt was finally called..."

पण कमालपुढील समस्या सावरकरांच्या पुढील समस्यांहून फारच बिकट होत्या. भारतात भाषाशुद्धीकरणाला संस्कृतचा खजिना पाठीशी आहे. भारतातील सांस्कृतिक वाङ्मय संस्कृतात आहे. आणि नागरी उर्फ बाळबोध लिपी त्या वाङ्मयाची लिपी म्हणून अनेक शतके प्रतिष्ठा पावली आहे. बिचाऱ्या कमालने परकीय शब्द उपटून काढले तरी परकीय लिपीतून त्याची सुटका नव्हती.पण तो सावरकरांच्याप्रमाणे अप्रतिहतपणे स्वत:चा मार्ग चोखाळणारा होता.परक्यांचीच लिपी घ्यावयाची, तर मग रोमन लिपी घ्यावी, असे ठरविले. कारण त्याजोगे त्याचे मागासलेले तुर्की राष्ट्र अत्यंत पुढारलेल्या म्हणून विख्यात अशा युरोपीय राष्ट्र-कुटुंबात जाऊन दाखल होत होते! कमालने केलेली ही लिपी-सुधारणा महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, यांत तरी करण्याचे कारण नाही. महाराष्ट्राने तर नागरी अथवा बाळबोध लिपी हीच आपली वाङ्मयीन लिपी अनेक शतकांपासून ठरविलेली आहे. पण दाक्षिणात्य भाषांचे काय? राष्ट्रैक्याकरिता देखील जेथे बंगाल आणि गुजरात आपापल्या लिप्या सोडावयास तयार नाहीत, तेथे तामीळ, तेलुगू, मल्याळी या भाषा आपल्या लिप्या सोडायला कसच्या तयार होतात!

पण लिपी -सुधारणेतही सावरकरांनी लक्ष घातले असते, तरी मुख्य प्रश्न लिपीचा नाही. भाषा-शुद्धीचा प्रश्न हा अखेरीस परकीय शब्द, विशेषत: परकीय राज्यकर्त्यांचे शब्द, स्वभाषेतून काढून टाकण्याकरिता नवीन शब्द बनविण्याचा ठरतो. ज्या परकीय शब्दांना स्वकीय शब्द उपलब्ध आहेत, त्यांचा प्रश्नच नाही. पण ज्यांना मूळ भाषेत प्रतिशब्द नाहीत, त्यांच्याकरिता नवे शब्द तयार करण्याचा हा मुख्य प्रश्न ठरतो. हे शब्द तयार करताना मराठीचे मराठीपण आणि नित्याच्या भाषेचे सोपेपण नष्ट न करणे हे यातील मुख्य पथ्य होय. नुसता परकीय शब्द घालविला आणि त्याच्या ऐवजी संस्कृत कोश आणि व्याकरण यांच्या बळावर नवीन शब्द बनविला, एवढ्याने शुद्धीकरणाचे पुण्य पदरात पडेल असे नव्हे! भाषेचे मूळ वळण न सोडता नवे शब्द तयार करणे हे अलबत्या गलबत्यांचे काम नव्हे, हे सत्य विसरल्यास भाषेची स्थिती काय होते, ते आजच्या वर्तमानपत्री भाषेवरून पदोपदी दिसते. प्रत्येक इंग्रजी किंवा फारसी शब्दाला अगदी त्याच स्वरूपाचा,कधीकधी तर त्याच उच्चाराला जवळचा शब्द तयार केलाच पाहिजे, हा हिंदी लेखकांचा आग्रह तितकासा ग्राह्य नाही.उदाहरणार्थ Survey याला 'सर्वेक्षण' हा शब्द तयार करण्यात मूळ इंग्रजी शब्दाच्या जवळ जाण्याच्या हास्यस्पद उद्दिष्टाव्यतिरिक्त कोणतेच उद्दिष्ट दिसत नाही! मराठीत तर साध्या 'पाहणी' शब्दाने या विचित्र 'सर्वेक्षणा'चे काम भागेल. हिंदीतील काही नवीन बनविलेले शब्द तर दुर्बोधही आहेत आणि अशुद्धही आहेत. उदाहरणार्थ 'उप-अभियंता' हा शब्द पहावा. पहिली गोष्ट म्हणजे यात संधी करण्याची जागा असूनही संधी केलेला नाही; आणि शिवाय, शब्द उच्चारल्याबरोबर अर्थ लक्षात येत नाही, हे वेगळेच. आणखी एक चमत्कारिक गोष्ट म्हणजे, कोणताही उपसर्ग कोठेही लावून आपल्याला हव्या त्या अर्थाचा शब्द बनविता येईल ही कल्पना! उदाहरणार्थ 'अधि-नियम' हा हल्ली वापरात असलेला शब्द पाहा. हा शब्द Bylaws ह्या अर्थी तयार केलेला दिसतो. पण 'अधि' या उपसर्गाचा अर्थ येथे अपेक्षित असलेल्या अर्थाच्या अगदी विरुद्ध आहे. हिंदी पंडितांनी काहीही केले तरी मराठी वृत्तपत्रांनी ते लगेच उचलण्याचे कारण नाही. पण आज प्रवृत्ती मात्र तशी दिसत आहे. याच्या मुळाशी, किंबहुना या शब्द-निर्मात्यांच्या सुप्त मनात, एक कल्पना आहे; ती म्हणजे निदान सर्व संस्कृतोद्भव भाषांत तेच शब्द चालू करणे! या देशातील प्रादेशिक भाषा या प्रतिष्ठित आणि वाङ्मयसंपन्न भाषा आहेत. त्यांना एकमेकींच्याजवळ

ओढण्याच्या प्रयत्नात या सर्वांचेच रूप आणि डौल बिघडणार असेल, तर फायदा संशयित राहील आणि तोटा मात्र पदरात पडेल! अर्वाचीन मराठी गद्याला टिळक, चिपळूणकर, महादेव शिवराम गोळे, गडकरी, केळकर, फडके, अत्रे, खांडेकर यांच्या भाषाप्रभुत्वाने जे स्वाभाविक, पण अर्थवाही रूप आले आहे, ते हिंदी आणि बंगाली या दोघींनाही नाही. बंगालीत उच्च दर्जाचे ललित आणि वैचारिक साहित्य आहे. पण मराठी गद्याचा नैसर्गिकपणा त्याला नाही. आजच्या हिंदीची स्थितीही तीच आहे.आणि हिंदीतील शब्द उचलण्याच्या प्रवृत्तीमुळे मराठीची शुद्धता आणि 'मराठीपण' नष्ट होत आहे.

नवशब्द निर्मितीच्या या समस्येत येथे याहून अधिक शिरता येत नाही. पण 'नवे शब्द तयार करणे हे मुळातच पुण्यप्रद आहे आणि ते कोणीही अपक्व लेखक करू शकतो' या कल्पनेने अलीकडच्या मराठी गद्यात थैमान घातले आहे! या धोक्यासंबंधी भाषाशुद्धीच्या दोघा महाबुद्धीमान आणि समर्थ प्रवर्तकांनी परकीय शब्द बहिष्कृत करण्याइतकीच काळजी घेतली असती, तर हा धोका टळला असता.

पण या संदर्भात लेखकांचे आणि भाषा-शुद्धी-प्रवर्तकांचे शैलीसंबंधीचे विचार, आहेत-त्याहून अधिक कडक आणि सूक्ष्म हवेत. हे विचार भाषाशुद्धीच्या काळाच्या पूर्वीपासूनचे असावेत तितके शास्त्रशुद्ध नाहीत. "भाषा अलंकारिक आणि संस्कृतप्रचुर असेल, तरच तिला शैली आहे. आणि साधी, सरळ. टोकदार असेल, तर तिला शैली नाही." अशी कल्पना मराठीत निदान गेल्या दोन पिढ्या तरी रूढ आहे. "टिळकांचे विचार तेजस्वी होते पण केळकरांच्याप्रमाणे त्यांना शैली मात्र नव्हती." **[एखाद्या पंडिताने याच्या विरुद्धही मत दिलेले सुदैवाने आढळले.टिळक लेख संग्रहाला (ॲकॅडमी पुरस्कृत) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेली सुंदर प्रस्तावना हे त्याचे एक उदाहरण होय.]** ही समजूत मराठीत कित्येक वर्षे रूढ आहे, आणि पुन:पुन्हा व्यक्त केली जात आहे. शैलीसंबंधीची ही कल्पना कृत्रिमतेकडेच झुकणारी आहे आणि तेजस्वितेला कमी महत्व देणारी आहे तेजस्विता आणि डौलदारपणा या दोहोंचे एकत्र वास्तव्य चिपळूणकरांच्या भाषेत आढळे. पण कधीकधी विचारांचे व त्यांच्या मागील कळकळीचे महत्व एवढे असते की अलंकारिकता ही त्यांच्या संगतीत विसंगतच ठरते. टिळकांची भाषा अलंकारिक असती तर ती इतकी परिणामकारक राहिलीच नसती, असे देखील म्हणता यईल. साधेपणा, तळमळ आणि टोकदार शब्दयोजना यांचे महत्व आमच्या टीकाकारांनी तरी घ्यावे तितके लक्षात घेतलेले नाही. या बाबतीतील बेन जॉन्सन १५७२ ते १६३७) याचे सूत्र लक्षात घेण्यासारखे आहे. तो म्हणतो,

"We must not be too frequent with the mint nor fetch words from the extreme and utmost ages; but the eldest of the present and newest of the past language is best,"

बेन जॉन्सनचे हे सूत्र सुमारे चार शतकांपूर्वीचे व म्हणून कालातीत म्हणावे, तर अगदी अलीकडे अमेरिकेतील ॲसोसिएटेड प्रेसने आपल्या पत्रकारांसाठी जे 'स्टाइल बुक' प्रसिद्ध केले आहे, त्यातही नेमका या सूत्रावरच भर दिला आहे. "सर्वसाधारणपणे जो शब्द सर्वांना समजतो तो मान्य करावा." यावर भाष्य करताना पुण्याच्या 'सकाळ' पत्राने म्हटले आहे, "शब्द क्लिष्ट, बोजड, दुर्बोध नकोत, पण त्यात केवळ नादमाधुर्यही नको, नादमधुर शब्द कानाला गोड लागतात, पण आपल्याला जे सांगावयाचे आहे ते त्यातून प्रभावीपणे व्यक्त होत नसेल, तर थोडा वेळ कानाला आनंद देण्यापलीकडे त्यातून काहीही साध्य होत नाही. बेन जॉन्सन् आणि अमेरिकन असोसिएटेड प्रेसचे अगदी अलीकडचे 'स्टाइल बुक' या दोहोंतही युक्त झालेले तत्त्व लक्षात घेतले, तर टिळकांची भाषा ही आदर्श भाषा ठरते. दोन पिढ्या दुर्लक्षिल्या गेलेल्या या सत्याकडे येथे लक्ष वेधण्याचे मुख्य कारण म्हणजे परकीय शब्द हाकलण्याच्या नादात नेमके या

तत्त्वाकडेच दुर्लक्ष होण्याचा धोका आहे. अशा प्रकारचे दुर्लक्ष आजच्या हिंदीने सर्वात जास्त केले आहे. पण हिंदीतील शब्द जसेच्या तसे उचलण्याकडे आजच्या मराठी लेखकांचा विशेष कल दिसून येतो! आपल्याकडे विष्णूशास्त्र्यांच्या काळापासून 'टीका' हा शब्द 'क्रिटिसिझम' ह्या अर्थी वापरला गेला आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नरसिंह चिंतामण केळकर, वामन मल्हार जोशी यांनाही हा शब्द पुरेसा समर्पक वाटत असे. त्याच्या ऐवजी 'समीक्षा', 'विमर्ष ', 'आलोचना' हे शब्द केवळ हिंदीत वापरतात म्हणून आम्ही वापरण्यास सुरुवात केली! नवीन शब्द करणे अथवा अन्य भाषेत केलेला दिसताच उचलणे, या प्रवृत्तीकडे भाषाशुद्धीचा आढावा घेताना लक्ष वेधल्याशिवाय गत्यंतर नाही. म्हणूनच, या मुद्याचा एवढा विस्तार करावा लागला. कारण परदेशी शब्द वापरणे एवढाच काय तो भाषेसंबंधीचा गुन्हा होय अशी कल्पना झाल्यानेच वर दर्शविलेले भाषिक दोष वाढत आहेत.

बेन जॉन्सनच्या सूत्राला आजच्या मराठीपुरते पुढील रूप देता येईल. भाषाशुद्धीची समस्या ही केवळ राजकीय प्रतिकाराची समस्या नव्हे की संस्कृत पंडितांकडे सोपविण्याचीही कामगिरीही नव्हे. ज्याला भाषेच्या नाद-वैशिष्ट्यासंबंधी आणि परंपरेसंबंधी हळुवार जाणीव आहे, तोच अवश्य तेथे योग्य शब्द तयार करू शकेल. म्हणजे हा विद्वत्तेचा आणि परकीयांच्या प्रतिकाराचा प्रांत नसून, भाषाविषयक हळुवारपणाचा किंवा Sensitivity चा प्रांत आहे. परकीय मिशनऱ्यांच्या किंवा अँग्लो-इंडियन अंमलदारांच्या भाषेला आपण हसत होतो, ते त्यांच्या भाषेत परकीय शब्द होते म्हणून नव्हे, तर त्यांच्या भाषेचे वळणच परकीय होते म्हणून होय. मराठीचा मराठीपणा नुसत्या शब्दसंग्रहात नाही; तर एकंदर वळणात आहे, या सत्याचा विचार करणे म्हणजे भाषाशुद्धीचा निषेध नव्हे, तर भाषाशुद्धीचा विस्तार होय.

भाषाशुद्धीच्या चळवळीत भाषाशुद्धीखेरीज काही चळवळी शिरल्या. त्या भाषाशुद्धीला खरोखरच आवश्यक आहेत की नाहीत, याचाही फेरविचार व्हावयास हवा. हिंदीतील किंवा बंगालीतील शब्द जसेच्या तसेच घेण्याने अखिल भारताची एक भाषा निर्माण करण्यास मदत होईल, ही कल्पना त्यापैकीच होय. आपली मूळ भाषा या चळवळीने क्लिष्ट किंवा 'अमराठी' होत असली तरी अन्य भारतीय भाषांतील शब्द घ्यावेत की काय, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. काही लोकांची कल्पनाशक्ती तर इतकी पुढे धावते की, काही काळाने प्रादेशिक भाषा लुप्त होऊन हिंदुस्थानात एकच भाषा उरेल! अशी त्यांची वेडी आशा असते. हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशात प्रादेशिक भाषा राहणारच; नव्हे त्या राहणे इष्टही आहे. 'बारा कोसावर भाषा बदलते' अशी एक जुनी म्हण आहे. आणि ज्यावेळी प्रवास-साधने कमी होती आणि कमी वेगवान होती, त्या वेळी तर या म्हणीतील सत्य आजच्याहून कितीतरी पटींनी अधिक अनुभवास येत असे, हे भाषिक आणि भौगोलिक सत्य आहे. 'एकराष्ट्रीयत्व' कितीही अगत्याचे असले तरी भौगोलिक वस्तुस्थितीवरून ते उड्डाण करू शकणार नाही. या देशात आंतरप्रांतीय व्यवहाराची एक भाषा अवश्य हवी-नव्हे हिंदी ही तशी भाषा अनेक शतके आहेही, पण त्याचा अर्थ ती भाषा प्रादेशिक भाषांची जागा घेऊ शकेल असा नव्हे. युरोपात आमच्या एक दोन जिल्ह्यांएवढे देशही आपल्या भाषा व आपले वाङ्मय जतन करताना दिसतात व ते रास्तही आहे. समजा आपण राजकीय फायद्याकरिता प्रादेशिक भाषांचा बळी देण्याचे ठरविले, तरी त्यात आहे त्या वाङ्मयाचे आपण काय करणार? की त्याचाही बळी देणार? अखिल भरतखंडाला राज्यव्यवहाराकरिता किंवा उच्च अध्यापनाकरिता एकच भाषा ठेवण्याची कल्पना ' एस्परँटो' सारखी कृत्रिम भाषा निर्माण करण्याइतकीच हास्यास्पद आहे. प्रादेशिक भाषा जिवंत राहूनही आंतरप्रांतीय व्यवहाराकरिता हिंदीचा उपयोग अपरिहार्य आहे. आज इंग्रजीचे स्थान आणि काही शतकांपूर्वी संस्कृतचे स्थान विद्वानांपुरते तरी तेच होते. पण संस्कृत पंडितांनी किंवा इंग्रजी-शिक्षितांनी प्रादेशिक भाषा नष्ट करण्याचे ध्येय कधीच समोर ठेवले नाही. हिंदीच्या अभिमान्यांनीही ते ध्येय समोर ठेवलेले नाही.

अनुक्रमणिका

या सर्वांच्या मुळाशी एक मुलभूत भाषिक प्रश्न आहे. भाषा ही पंडितांनी बनवायची असते, की नदीच्या प्रवाहाप्रमाणे ती आपोआप वळण घेत असते? डॉ. रघुवीर यांनी भाषेकडे केवळ यांत्रिक दृष्टीने पाहिले असे खेदाने म्हणावे लागते. कचेरीच्या एका खोलीत बसून , संस्कृत कोश आणि व्याकरण शेजारी ठेऊन तयार केलेले शब्द कोणत्याच भाषेचे शब्द होणार नाहीत! धड संस्कृतचेही नाहीत, हिंदीचेही नाहीत, आणि मराठी-गुजराती यांसारख्या प्रसिद्ध प्रादेशिक भाषांचेही नाहीत. त्यांच्या क्लिष्टतेमुळे आणि कृत्रिमतेमुळे ते रूढ होण्याचा संभाव बेताचाच आणि रूढ झालेच तर त्या भाषांचे सौंदर्य वाढविण्याऐवजी कुरुपताच वाढविण्याचे कार्य ते शब्द करतील.

आणखी एक धोका अनेकदा दाखवून देण्यात आला आहे. मूळ भाषेत सुंदर, रूढ स्वदेशी शब्द असूनही, शब्दनिर्मितीच्या उत्साहात नवीन शब्द तयार करण्याचा वा हिंदीतून उचलण्याचा सोस गेली काही वर्षे वाढत आहे! ‘चिरंजीव’ शब्द रूढ आणि कर्ण-मधुर असूनही त्याऐवजी ‘सुपुत्र’; ‘तीर्थरूप हा काव्यात्मक शब्द अशिक्षीतांसदेखील परिचित असूनही त्याऐवजी ‘पिताजी’ शब्द वापरणे; परिक्षेच्या प्रश्न-पत्रिकेत ‘पुढील शब्दांचे व्याकरण सांगा’ म्हणण्याऐवजी ‘निम्न-लिखित शब्दांचे व्याकरण सांगा’ असे लिहिणे; ‘समारंभ’ या ऐवजी ‘समारोह’; ‘साजरा झाला’ या ऐवजी ‘संपन्न झाला’; असल्या नावीन्याने मराठी भाषा सुंदर होत आहे की बिघडत आहे, याचा विचार नाविन्य आणि अनुकरण यांच्या वेडाने आपण विसरत चाललो आहोत. अखिल भरत खंडाची भाषा कधी काळी एक होणे शक्य आहे असे गृहीत धरले तरीही, आपल्या इतिहासप्रसिद्ध भाषा क्लिष्ट आणि कुरूप करणे क्षम्य ठरणार नाही.

या भाषा-शुद्धीच्या आढाव्यात भाषाशुद्धीच्या मार्गातील काट्याकुट्यांचाही विचार करणे अपरिहार्य झाले. भाषाशुद्धीचे प्रवर्तक स्वातंत्र्यवीर सावरकर आणि डॉ. माधवराव पटवर्धन हे दोघे जितके बुद्धिमान तितकेच आग्रही होते. ॲलोपाथीच्या शास्त्रात ज्याप्रमाणे एक रोग बरा करताना दुसरा एखादा रोग उद्‌भवण्याचा धोका उघड्या डोळ्यांनी पत्करतात, तशीच त्यांची कार्य-पद्धती होती. एक ऐतिहासिक प्रमाद दूर करीत असता इतर काही भाषिक तोटे झाले तरी त्याची हे उभय विद्वान क्षिति बालगीत नसत. या त्यांच्या स्वभावात जसा एक पराक्रम होता तसेच अन्य काही धोकेही होते. त्या धोक्यांचा विचार केल्याखेरीज मराठीतील भाषाशुद्धीचा आढावा पूर्ण होणार नाही. पण म्हणजे त्याचा अर्थ सावरकरांच्या धडाडीचे आणि कुशाग्र बुद्धीचे भाषेच्या क्षेत्रातील कार्य कोणी कमी लेखतील असा नव्हे. या लेख-संग्रहातील एकेक लेख म्हणजे जणू जळता पलिता आहे. त्यातील प्रतिपादनाने कोणाही भाषाभ्यासकाला आपल्या मतांचा आणि समजुतींचा पुनर्विचार करावा लागेल. मराठी भाषेतील, शुद्धी चळवळीला जेवढे झुंजार नेते लाभले तेवढे हिंदुस्थानातील अन्य कोणत्याही भाषेला क्वचितच लाभले असतील. आणि मदनलाल धिंग्रासारख्या निधड्या छातीच्या वीराला स्फूर्ती देणारा, भारतातील अनेक ‘धींग्रां’ना पुस्तकाच्या वेष्टणातून पिस्तुले पाठविणारा, काळ्या पाण्यावरील अंधार कोठडीतही भिंतीवर महाकाव्य लिहिणारा हा असामान्य वीर, अंदमानातून सशर्त सुटका होताच एखाद्या भाषेचा प्राध्यापकाला शोभावी अशी चळवळ तितक्याच एकनिष्ठपणे हाती घेतो, हा एक विलक्षण चमत्कारच मानवा लागेल! शिवाजी महाराज, लेनिन, कमाल पाशा यांच्यासारखे अनेकांगी प्रतिभेचे वीरच सावरकरांच्या तुलनेसाठी आठवावे लागतील आणि अशा असामान्य क्रांतीकारकांच्या कर्तृत्वातही सावरकरांचे कर्तृत्व असामान्य ठरेल. भाषाशुद्धीच्या समालोचनाच्या निमित्ताने सावरकरांच्या ऐतिहासिक कर्तृत्वाचेही स्मरण झाल्याशिवाय राहणार नाही.

सावरकरांच्या भाषा शुद्धीविषयक लेखांचे पुनर्मुद्रण करून ‘साहित्य संस्कृती मंडळा’ने केवळ भाषा-शुद्धीच्या कार्यालाच हातभार लावला आहे असे नव्हे, तर एका असामान्य महाराष्ट्रीय वीराच्या

अनुक्रमणिका

चरित्राचे पुन:स्मरण करून दिले आहे. त्याबद्दल साहित्य संस्कृती मंडळाचे अभिनंदन करणे जरूर आहे. त्यांच्या ह्या पुण्यकर्मात त्यांच्या हाताला हात लावण्याची संधी मला त्यांनी दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

अनुक्रमणिका

७. मराठी भाषेचे सरकारी शिल्पकार

काही आठवड्यांपूर्वी मराठी भाषेच्या आज होत असलेल्या नाशासंबंधी एक लेख मी 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये लिहिला होता. त्यात संस्कृतच्या अभ्यासाचा ऱ्हास, (सावरकारी भाषाशुद्धीपासून) प्रत्येक नवथर लेखकाला नवशब्द निर्मितीचे लागलेले वेड, हिंदीतील बोजड आणि क्वचित अर्थशून्य शब्दांचा मराठीवरील परिणाम वगैरे अनेक कारणांचा त्रोटक उल्लेख केला होता.उल्लेख त्रोटक करण्याचे कारण मी या विषयावर गेल्या चाळीस पंचेचाळीस वर्षांत अनेक वेळा लेख लिहिले असतील व परिषदांतून भाषणे केली असतील. शब्दांच्या दुर्बोधतेची कारणे देताना मला मुंबईच्या भाषा सल्लागार मंडळाच्या कार्याचाही उल्लेख करावा लागला होता. हे मंडळ अलीकडेच निघाले आहे आणि माझे भाषाविषयक लेखन जवळजवळ पन्नास वर्षे चालू आहे.

अनेक वर्षे ही ओरड चालू असतानाच सरकारचे कार्यक्षेत्रही वाढले आहे. सरकार म्हणजे केवळ मामलेदार कचेरी, कलेक्टर कचेरी यांचा कारभार राहिला नसून रेडिओसारखी लोकरंजनाची आणि लोकशिक्षणाची खातीही सरकारने खोलली आहेत. म्हणजे सरकारी ध्वनियंत्रातून सकाळ-संध्याकाळ मराठी भाषणे, गाणी, आणि नाटके प्रसृत होत आहेत. एका दृष्टीने मराठीचा हा फायदा आहे, तर दुसऱ्या दृष्टीने तोटाही आहे. घरोघरी पाण्याचे नळ होणे हा फायदा, पण नळातून अशुद्ध पाणी पुरविले जात असेल तर तो मात्र फायदा नव्हे.सरकारी कारभार मराठीतून हवा, ही मागणी पुरविली जाण्यापूर्वीच सरकारने रंजनाचे व शिक्षणाचे माध्यमही हाती घेतले. 'सरकारी मराठी' च्या या विस्ताराने मराठीचा फायदा झाला की तोटा झाला, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरकारच्या कारभारात जे थोडेफार मराठी आहे, त्यावरही टीका होत आहे. त्यात क्लिष्ट आणि अपरिचित शब्दाचा भरणा आहे. साधा 'सरकार' हा शब्द घ्या. लोकहितवादी, लोकमान्य टिळक यांनाही तो बदलण्याचे कारण वाटले नाही. आज त्याऐवजी 'शासन' शब्द वापरला जात आहे. त्या शब्दाला मराठीत 'शिक्षा' हा अर्थ आहे! याचा उल्लेख नुकताच एका दैनिकाने केला आहे.

यंदाचे वर्ष महाराष्ट्र सरकारने 'राजभाषा वर्ष' म्हणून जाहीर केलेले असून त्या निमित्ताने अलीकडेच पुण्यात सरकारी परिसंवादही झाला. त्यात बहुतेक भाषणे (विशेषतः शिक्षणमंत्र्यांचे) संयमी आणि मुद्देसूद झाली असली, तरी एक भाषण प्राय: माझ्या लेखाला उत्तर म्हणून, पण तोल सोडून झाले. ते भाषण करणारांनी आपली ओळख 'भाषा सल्लागार मंडळाचा एक सभासद' अशी करून दिली. माझ्या लेखातील भूमिका बहुरंगी होती व सामान्यतः भाषाविकास करू पाहणाऱ्या विद्वानांच्या भूमिकेपेक्षा सर्वस्वी वेगळी होती. गेली पंचेचाळीस वर्षे मी ती भूमिका तशीच मांडीत आलो आहे. भाषेचा विकास विद्वानांनी एका खोलीत बसून, नवे शब्द बनवून करायचा नसतो, तर लेखनाच्या ओघात सहज शब्द वा वाक्यप्रयोग लिहिले जाऊन व्हायचा असतो, ही माझी शब्दनिर्मिती बाबतची प्रमुख भूमिका म्हणून सांगता येईल.

सावरकर आणि पटवर्धन यांनी फारशी आणि इंग्रजी शब्द काढून टाकण्याकरता १९२५ ते १९३५ च्या दरम्यान नवीन शब्द बनविण्याचा सपाटा चालविला होता. आज सरकारी भाषा संचालनालयाने कारभारातील इंग्रजी शब्दांना प्रतिशब्द म्हणून नवीन शब्द तयार करण्याचा कारखाना काढला आहे. असे बनविलेले शब्द भाषेत रुळत नाहीत आणि जबरदस्तीने रुळविले तरी भाषेचे स्वाभाविक रूप बिघडवितात, हा माझा जुनाच आक्षेप मी नवीन संदर्भात मांडला होता. माझ्या लेखनाचे मूळ मराठी भाषेसंबंधीच्या प्रेमात आणि चिंतेत होते. पण वर निर्देशिलेल्या सरकारी परिसंवादातील एका वक्त्यांनी भाषाज्ञानाचा आणि

भाषाविकासाचा मक्ता केवळ आपल्याकडेच आहे अशा आविर्भावात, माझ्या टीकेचा विपर्यास केला. आणि माझ्या टीकेतील हेतू सरकारी प्रयत्नांचा उपहास करणे एवढाच आहे असे भासविले. आपल्या टीकाकारांवर दुष्ट हेतूचा आरोप करणे, हे आत्मकेंद्रित अहंकाराचे तर लक्षण आहेच, पण त्याहून अनिष्ट गोष्ट म्हणजे अशा अहंकारामुळे आणि हेतूंच्या आरोपामुळे विद्वान वक्त्यांच्याही डोक्यात प्रतिपक्षाचे म्हणणे शिरत नाही. आपण गृहीत धरला आहे, त्यापेक्षा भाषेकडे पाहण्याचा आणखी एखादा दृष्टिकोन असू शकेल, हे या सरकारी समितीतील विद्वानांच्या डोक्यातच शिरत नाही. ते ज्या पद्धतीने भाषेचा विकास करू पाहत आहेत ती भाषेसंबंधीची यांत्रिक आणि निर्जीव दृष्टी होय. त्यांचे शब्द क्लिष्ट आहेत एवढाच आक्षेप त्यांना माहीत आहे.पण ते शब्द निर्जीव आणि उपरे आहेत असाही आक्षेप आहे. 'आम्ही बनविलेल्या शब्दांऐवजी तुम्ही सोपे शब्द सुचवा' या त्यांच्या म्हणण्यालाही अर्थ नसतो. संदर्भाशिवाय शब्द बनविणे हेच भाषेच्या स्वभावाच्या विरुद्ध आहे. आधी लेखन आणि त्या लेखनाच्या ओघात निर्माण होतील ते शब्द, असा क्रम असावयास हवा.

जमीन, इनाम, सरकार, कारकून यांसारखे रूढ शब्दही काढून त्याऐवजी एका पंडिताने बैठकीत तयार केलेले क्लिष्ट 'टांकसाळी' शब्द वापरण्याचा प्रयोग सुरु झाला. तो प्रयोग तर यशस्वी झाला नाहीच, पण क्लिष्ट शब्द केवळ नावीन्याच्या मोहाने नवथर लेखक वापरू लागले. 'तारीख' शब्द, अगदी व्रत म्हणून टाळून, 'दिनांक' घालू लागले! स्वभाषेतील 'मिती' शब्दही त्याऐवजी चालेनासा झाला. माधवराव पटवर्धन तर 'राजश्री' याऐवजी 'राजमहाशय' वापरीत असत! म्हणजे ही चळवळ भाषाशुद्धीची राहिली नव्हती, तर टूमबाजीची बनली होती. 'व' हे अव्यय मारण्याकरिता सावरकरांनी लिखित भाषेतही 'नि' हा शब्द वापरण्यास सुरुवात केली.पण 'व' ही भाषेत राहिला. केवळ नवीन एक शब्द वापरण्याचा आनंद मात्र काही लेखकांना मिळू लागला. शेकडो वर्षे मराठी भाषेत रूढ असलेले शब्द काढण्यात यश येणार नाही व आलेच तरी त्याने भाषेची प्रकृती बिघडून जाईल ही धोक्याची सूचना मी सुमारे चाळीस वर्षांपूर्वी लेखमाला लिहून दिली होती. त्यावेळी 'सावरकरांच्या भूमिकेमागे देशभक्ती आहे', अशी त्या भूमिकेची तरफदारी काही लोक करीत. आजही तीच तरफदारी शास्त्रीय म्हणविणाऱ्या लिखाणातही खपविली जाते. पण या 'देशभक्ती' च्या चळवळीतून अखेर उरले काय? तर केवळ नावीन्याच्या प्रेमाने क्लिष्ट शब्द वापरणे, अशुद्ध शब्दही वापरणे!

हिंदुस्तानसारख्या खंडप्राय देशातील चौदा-पंधरा प्रमुख भाषांत तेच पारिभाषिक शब्द आणि तेच प्रतिशब्द रूढ करणे हा सरकारी समित्यांचा एक उद्देश आहे. पण अगदी साध्या 'शिक्षा' व 'शासन' या शब्दांवरुनही हे अशक्य आणि हास्यास्पद आहे असे दिसून येईल. सर्व भाषांत एकच शब्द रूढ करणे म्हणजे भाषाच बदलून टाकण्याचा विदूषकी (डॉन क्विक्झोटी धर्तीचा) उपद्व्याप करणे होय! हिंदीत तर नवशब्दनिर्मिती करताना कधी कधी आणखी एक हास्यास्पद धोरण अवलंबिलेले दिसते. नवीन तयार केलेला संस्कृत शब्द, उच्चारात मूळ इंग्रजी शब्दासारखा शक्य तो असावा, ही धडपड ! अशा धडपडीचे त्यातल्या त्यात हास्यास्पद उदाहरण 'सर्वेक्षण' (Survey) हे होय. रोमॅन्टिक याला 'रोमांचक' असा शब्दही आपल्याकडील काही विद्वानांनी सुचविल्याचे मला माहित आहे. पण 'ट्रॅजेडी' या प्रसिद्ध शब्दाला 'त्रासदी' हा शब्द हिंदीत रूढ केला जात आहे. याच्याइतके खुळचटपणाचे दुसरे काय असू शकेल? आणि आमच्या भाषाविकास मंडळाची धडपड हिंदीतील शब्द त्यातल्या त्यात सामावून घेण्याची आहे. पण हिंदीतही ते मूळचे शब्द नसतात व त्यांचा उपयोगही प्रमाणभूत ग्रंथात फारसा झालेला नसतो. हिंदी लोक बहुतेकदा बंगालीतून शब्द उसने घेतात आणि बंगाली लोकांना संस्कृतप्रचुरतेची हौस दांडगी! आपण जिथे 'सामना' म्हणू, तिथे ते 'प्रतियोगिता' म्हणतील. आम्ही जिथे 'बातमीदार' किंवा 'वार्ताहर' म्हणू तिथे ते 'संवाददाता' म्हणतील! आपण जिथे 'मुक्तिसेना' म्हणू तिथे बंगाली लोक 'मुक्तिवाहिनी' म्हणतात. हिंदीत 'ऋतू', 'मृत्यू

' हे शब्द (फारशीमूळे) स्त्रीलिंगी आहेत. सर्व भारतीय भाषांना सामान्य शब्दसंग्रहाच्या नादाने आपणही 'ती ऋतू', 'ती मृत्यू', 'तो देवता' असे प्रयोग करायचे काय? अर्थात सर्व भारतीय भाषांना सामान्य शब्दसंग्रह निर्माण करण्याची कल्पना अशास्त्रीय, अव्यवहार्य आणि हास्यास्पद आहे.

आणखी एक गोष्ट शब्दनिर्मितीचे भोक्ते विसरत असतात. लोकहितवादींपासून ते चिपळूणकर, टिळकांच्या अखेर, मराठी गद्याची वाढ स्वाभाविक, सुगम आणि डौलदार झाली आहे. आजच्या हिंदी, बंगालीप्रमाणे ती पुस्तकी संस्कृत शब्दांनी भारावलेली नाही, की इंग्रजीपूर्व कालातील गद्याप्रमाणे फारशी शब्दांनीही भारावलेली नाही. विचारांच्या बाबतीत ती प्रौढ आणि अर्थवाहक असूनही ती हिंदी, बंगालीप्रमाणे पंडिती मात्र झालेली नाही.मराठीच्या निकोप व स्वाभाविक विकासाची ही परंपरा खंडित करून हिंदीच्या नावाखाली दिल्ली कडील काही पंडितांनी भाषेत सोडून दिलेले उपरे शब्द केवळ दिल्लीचा हुकूम पाळण्याकरता स्वीकारायचे की काय, याचा भाषासल्लागार मंडळाने विचार करायला हवा. माझ्या म. टाइम्स मधील लेखात, संपादकांनी हास्यास्पद सरकारी शब्दांची जी पुरवणी जोडली आहे ती पाहता, मूळचे स्वाभाविक मराठी नष्ट होऊन कृत्रिम हिंदीची अनुचर असलेली मराठी भाषा लवकरच सरकारमान्य म्हणून रूढ होणार असा धोका दिसत आहे.

नवशब्दनिर्मितीला आणखी एक समर्थन दिले जाते. इंग्रजी शब्दांतील बारकावे मराठीत आणायचे म्हणजे नवीन शब्द करायलाच हवेत. आणि बारकाव्यांची या सरकारी विद्वानांची कल्पना कोणती? तर 'प्राध्यापक', 'पाठक', 'प्रपाठक' यांसारखे शब्द तयार करून लेक्चरर, प्रोफेसर, रीडर यांचे अर्थ मराठीत व्यक्त करायचे ही कल्पना जुन्या काळात 'कॉपी टु कॉपी' करणारा जो कारकुनांचा वर्ग होता त्याच्या कल्पनेइतकीच निर्बुद्ध आहे. आधी मूळ इंग्रजी शब्द खरा सूक्ष्म अर्थभेद दाखवण्याकरिता नाहीत, तर कॉलेजच्या कचेरीतील पगाराच्या याद्यांतील कारकुनी भेद दाखविण्याकरिता आहेत. ते भेद मराठीत दाखविण्याकरिता नवीन अर्थशून्य शब्द मराठीवर लादण्याची गरज आहे काय? होय, अर्थशून्यच! 'अध्यापक' याला 'प्र' लावला की लगेच त्याचा कॉलेजमधील प्राध्यापक तयार होतो; शाळा या शब्दाला 'प्र' हा उपसर्ग लागला की लगेच त्याचे हायस्कूल तयार होते! भाषण याला 'अभि' हा उपसर्ग लावला, की लगेच परिषदेतील 'ॲड्रेस' हा अर्थ तयार होतो. या भाषानिर्मितीच्या कल्पना पाहून पाणिनीनेदेखील या विद्वानांपुढे हात टेकले असते! बरे, हे शब्द तयार करताना भाषेत मुळातच त्या अर्थाचे शब्द आहेत की नाहीत, याची तरी चौकशी करावी?

आजच्या क्लिष्ट सरकारी भाषेचे मूळ भाषाशुद्धीच्या अविवेकी चळवळीत आहे. भाषाशुद्धीची चळवळ ही नवशब्द निर्मितीची चळवळ होणार असे भाकीत मी १९३५ सालीच केले होते. नवीन शब्द निर्माण करणे वा दिसेल तो नवीन शब्द वापरणे हे एक पुण्यकर्म आहे, ही कल्पना एकदा मान्य पावली, की भाषा अडाणी आणि पोरकट लोकांच्या ताब्यात गेलीच म्हणून समजावे. पण या खंडप्राय देशातील प्रांतांच्या सरहद्दी नष्ट करण्याचा कार्यक्रम डोळ्यापुढे ठेवून भाषेची मोडतोड चालू आहे! 'दक्षिणी अमेरिका' यातील दक्षिण हे विशेषणच आहे. पण हिंदीत 'दक्षिणी अमेरिका' म्हणतात, म्हणून महाराष्ट्रानेही दक्षिणी अमेरिका म्हणायचे काय? महाराष्ट्रात वायव्य, ईशान्य वगैरे पोटदिशा अगदी परवापर्यंत पोरा-सोरांकडूनही प्राथमिक शाळेत घोकून घेतल्या जात. पण आता हिंदीमुळे दक्षिण-पूर्व, उत्तरपूर्व असले भाषांतरी, अडाणी शब्द रेडिओवरून ऐकू येत आहेत.

प्रत्येक इंग्रजी शब्दाचा अर्थ मराठीत एकाच शब्दात व्यक्त झाला पाहिजे, ही मराठीकरणवाल्यांची कल्पना खुळी आहे. ज्या इंग्रजीचे मराठी करावयाचे त्याचा मतलब आपण स्वत:च्या भाषेत सांगितला तरच तो मराठीत होईल. नाहीतर ते मराठीत लिहिलेले इंग्रजी होईल. म्हणून एक एक इंग्रजी शब्द समोर धरून संस्कृत कोशाच्या साहाय्याने त्याचे मराठी करणे हा मराठीकरणाचा मार्ग नव्हे; एखादा इंग्रजी मजकूर स्वतंत्रपणे आपल्या भाषेत व्यक्त केला, तरच ते खरे मराठी होईल. त्यात शब्दाला प्रतिशब्द तयार करण्याचा आजचा सरकारी कार्यक्रम साधणार नाही; पण शब्दाला प्रतिशब्द म्हणून किती हास्यास्पद शब्द तयार होत आहेत ते आपण वर पहिलेच.

पुण्याच्या परिसंवादातील एक वक्ते म्हणाले, आम्ही या लोकांकडे वेळोवेळी शब्दांच्या याद्या धाडीत होतो, त्यावेळी हे गप्प राहिले. ज्यांना शब्दाला शब्द तयार करणे ही पद्धतच अशास्त्रीय वाटते ते तुमच्या ‘कॉपी टू कॉपी’च्या कार्यक्रमात काय म्हणून सामील होतील? तुमच्या याद्या आणि दुरुस्त्या आम्ही तारीखवार वाचाव्या अशी तुम्ही अपेक्षा करता, पण वेळोवेळी लेखांतून आमच्यासारखे लोक ज्या सूचना करतात, त्यांची तुम्ही कितपत दखल घेता? सारांश, सरकार आज जे काम करीत आहे ते शब्द निर्मितीचे न समजता शैलीनिर्मितीचे समजले, तरच त्याला अस्सल मराठी वळण येईल. ज्यांनी गेल्या संपूर्ण शतकात वेगवेगळ्या विषयांवर स्वत: च्या शैलीत ग्रंथ लिहिले त्यांनी न कळत लेखनाच्या ओघात अनेक सुंदर शब्द तयार केले. ते मांडीवर डिक्शनरी घेऊन बसले नव्हते, तर तळमळीने विषयप्रतिपादन घेऊन बसलेले होते. कृष्णशास्त्री चिपळूणकर,विष्णूशास्त्री चिपळूणकर, विसूभाऊ आणि अहिताग्नि राजवाडे, महादेव शिवराम गोळे, पं. के.ल. दप्तरी, पं. अप्रबुद्ध यांसारख्या भाषाप्रभूंच्या ग्रंथात कितीतरी सुंदर शब्द व वाक्प्रचार धूळ खात पडलेले आहेत. पण शैली व शैलीच्या ओघातील शब्द हा सरकारी भाषामंडळाचा विषयच नाही. त्यांना शब्दाला शब्द तयार करायचे आहेत. अर्थातच निर्जीव शब्द तयार होत आहेत. ज्यांना भाषेसंबंधी भावना आणि Sensitivity आहे, त्यांना सरकारी शब्दांतील प्रत्येक शब्द क्लेश देत आहे. ज्यांना भाषेची ‘भावना’च नाही, अशांच्या हाती यांत्रिक शब्दनिर्मितीच्या रूपाने भाषाविकासाचे कार्य गेले आहे. ज्यांना शैलीची जाणीव आहे, शब्दांच्या जिवंतपणाची जाणीव आहे, त्यांना या जीवन्मृत नवीन शब्दांनी केवढे दु:ख होते याची या तांत्रिक भाषानिर्मात्यांना कल्पनाच येणे शक्य नाही. म्हणून ते आम्हा भाषाप्रेमी लोकांचा जाणूनबुजून अधिक्षेप करीत आहेत व आमच्यावर बेजबाबदार आरोप करीत आहेत. हा आमच्या तळमळीचा आणि भाषाप्रेमाचा उपमर्द आहे.

या सरकारी पंडितांनी लक्षात ठेवावे की त्यांचे टीकाकारही क्षुद्र-मनस्कपणे त्यांच्यावर खोटेनाटे आरोप करू शकतील. आमची टीका केवळ द्वेषमूलक म्हणणाऱ्यांवर आम्ही, ‘अनेक समित्यांचे भत्ते उकळणे व एका समितीतून दुसरी समिती निर्माण करणे’ हा स्वार्थी उद्देश लादू शकू! पण सरकारी खुर्चीच्या घमेंडीत जसले आरोप केले जातात, तसले आरोप भाषा-प्रेमाने जन्मभर विनावेतन काम करणारे लोक कधीच करणार नाहीत. आम्हाला दु:ख आहे ते आमच्यावरील क्षुद्र आरोपांचे नाही, तर गेल्या शंभर वर्षांत सुंदर विकास झालेल्या मराठी भाषेच्या नाशाचे आहे.

हा नाश होऊ न देणे हे सर्व जातिवंत भाषाप्रेमी लोकांना आव्हान आहे.

[युगवाणी वर्ष ३५, अंक ८ व ९, नोव्हेंबर-डिसेंबर १९९९, पृ. १३०-१३२ व १३७.]

अनुक्रमणिका

८. हरवले आहे मराठीचे मराठीपण

चालू वर्ष हे 'राजभाषा वर्ष' म्हणून साजरे करण्यात येत आहे त्यानिमित्त अलीकडे दादर येथे, 'मराठी भाषाविकासाच्या समस्या' या विषयावर एक परिसंवाद झाल्याचे प्रसिद्ध झाले आहे.

राज्यकारभारात आणि उच्च शिक्षणात प्रादेशिक भाषा उपयोगात आणण्याचा पुकारा स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधीपासूनच होत आहे. पण दुर्दैवाने प्रादेशिक भाषाच, निदान मराठी तरी, स्वातंत्र्यकालात निश्चितपणे विनाशाच्या मार्गाला लागली आहे असे दिसून येईल. मराठीच्या वापराचे क्षेत्र महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर पंचवीस वर्षांत जास्तीत जास्त मोठे झाले पाहिजे असा संकल्प परवाच्या परिसंवादात सोडला गेला. शिक्षण व राज्यकारभार यात मराठीचा उपयोग कदाचित वाढला तरी जी भाषा त्यात वापरली जाईल ती 'मराठी आहे की नाही' याची मात्र महाराष्ट्रीयांनाच शंका पडेल!

मराठीचा नाश स्वातंत्र्यकालात दोन तीन दिशांनी होत आहे. टिळकांच्या काळी राजकारणात व वाङ्मयात सोपे, स्वाभाविक, सुटसुटीत मराठी शब्द जे काम देत असत त्याकरिता आता दुर्बोध, आणि कधी कधी अर्थशून्य,असे दिल्लीकडून आलेले संस्कृत शब्द वापरले जात आहेत. 'महाराष्ट्र सरकार' याऐवजी 'महाराष्ट्र शासन', 'निवडणूक' या अनेक वर्षे रूढ असलेल्या शब्दाऐवजी 'निर्वाचन' हा, (मराठीत तरी अर्थशून्य असणारा) शब्द! या सारखेच 'अभिभाषण', 'उपअभियंता' , पाठक (लेक्चरर), 'प्रपाठक' (रीडर) तानपुरा (तंबोरा) यांसारखे शेकडो शब्द सरकारी कचेऱ्या आणि वृतपत्रे कुणाच्या समाधानाकरता वापरीत आहेत देव जाणे! आज तरी या शब्दांचा अर्थ, वापरणारांखेरीज दुसऱ्या कोणालाच समजत नाही. परवाच्या परिसंवादात, कारभारातील व शिक्षणक्षेत्रातील भाषा सामान्य लोकांना सहज समजेल अशी करण्यावर सर्वच वक्त्यांचा कटाक्ष होता. पण 'सामान्य लोक' हा शब्द आजच्या मराठीतून समूळ उपटून काढून त्याऐवजी 'जनसामान्य' हा पंडिती शब्द वापरण्याकडे विद्वानांचा कल आहे! नुसते 'संस्कृतिकरण' हेच आजचे धोरण आहे असे नव्हे. अखिल हिदुस्तानात एक परिभाषा रूढ करण्याच्या भ्रमानेही मराठीचा नाश केला जात आहे. 'हुतुतू' 'आट्या-पाट्या', 'खो-खो', हे शब्द महाराष्ट्रात थोरांपासून पोरांपर्यंत सर्वांच्या वापरात आहेत.त्यातला 'हुतुतू' शब्द काढून त्याऐवजी 'कबड्डी' हा कानडी शब्द मराठी मुलांवर लादण्यात, अखिल भारतीय परिभाषा निर्माण करण्याचाच भ्रम राज्यकर्त्या पंडितांच्या डोक्यात असावा!

'लोकभाषे'ची चळवळ नव्हे

या भाषिक अरेरावीत भाषा सोपी करण्याचा हेतू नसून रूढ फारशी-उर्दू शब्दांऐवजी नवीन निर्माण केलेले संस्कृत शब्द रूढ करण्याचाच हेतू आहे. म्हणजे ही, 'लोकभाषे'ची चळवळ नसून सावरकरी भाषाशुद्धीची चळवळ आहे! महाराष्ट्रात ज्यांनी सावरकरांना सहकार्य दिले नाही ते आता उत्तरेतून आलेल्या रघुवीरी लाटेपुढे लोटांगण घालीत आहेत. या सर्व उलथापालथीच्या मुळाशी दुसरा एक फारच मोठा भ्रम आहे तो म्हणजे 'भाषा-संचालनालया'तील पंडित लोक व भाषा-शास्त्रज्ञ भाषा 'निर्माण करू' शकतील हा होय. वास्तविक भाषा ही भाषाशास्त्रज्ञांनी 'निर्माण'करायची नसते; ती लोकव्यवहारात व ग्रंथलेखनात 'निर्माण' व्हायची असते. सरकारी 'भाषा-संचालनालया'त खरे काम भाषा-शास्त्रज्ञांचे नसून सर्वमान्य, सुंदर गद्य लिहिणारांचे आहे. एखादा असा गद्यलेखक भाषा संचालनालयात वावरताना दिसेलही पण भाषाशास्त्रज्ञांच्या आवाजात त्याचा आवाज ऐकूही येत नाही! फार काय, मंत्रालयातील शिपाईदेखील, आजचे गद्य वाचून दाखवल्यास त्यांना त्यातील नवनिर्मित शब्दांऐवजी अस्सल मराठी शब्द

सुचवू शकतील. मग दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाचे अधिकारी तर खासच सुचवू शकतील.पण सामान्य माणसाकरता नवीन भाषा बनविण्याचे कार्य, सरकारी कचेरीत आज संस्कृत पंडित करीत असतात! आणि तेही स्वत:ची बुद्धी वापरीत नाहीत तर दिल्लीकडून येणाऱ्या राघुवीरी शब्दापुढे मान लववीत आहेत.

या भाषा-नाशाच्या आणखीही काही वाटा आहेत. 'हिन्दी भाषेत आणि अन्य भारतीय भाषांत' हे शुद्ध मराठी होय. त्याऐवजी 'अन्य भारतीय भाषेत' असा प्रयोग आजचे विद्वान करीत आहेत. 'भाषांत' हे अनेकवचनी रूप, पुल्लिंगाच्या रुपासारखे वाटल्यामुळे की काय कोण जाणे, विद्वान लेखकदेखील ते टाळीत असतात! 'रोमहर्षण' हे मुळात विशेषणच आहे; पण ते नामासारखे वाटल्यामुळे 'रोमहर्षक' हे नवीन (संशयास्पद) रूप विद्वान लोकांनी बनविले आहे, बऱ्याच वर्षांनी एकदा मुंबईच्या एका प्रसिद्ध दैनिकात जाड मथळ्यात परवा 'रोमहर्षण' हा शब्द मला दिसल्यावर, मी त्या पत्राला अभिनंदनपर पत्र धाडले! मराठीतील 'सामान्य रुपासंबंधीही असाच बुजरेपणा दिसून येईल. पुण्याच्या रेडिओवरून मी टिपलेला पुढील शब्दप्रयोग या बुजरेपणाची कल्पना देईल.

"बियाणासाठी पुरात वाहिलेली जमीन योग्य करून देऊ"- या वाक्यातील इतर घोडचुकांकडे तूर्त कानाडोळा करू; पण 'बियाणे' या शब्दाचे सामान्य रूप 'बियाण्या'असे व्हायला हवे. त्याऐवजी 'बियाणासाठी' असे रूप मी कानांनी ऐकले व टिपले. अशा सामान्य रूपाच्या डझनावारी चुका वृत्तपत्रांत व रेडिओवर पाहायला व ऐकायला सापडतात. हिंदीचं अनुयायित्व करताना काही लोकांना मराठी सामान्य रुपेही उडविण्याचा मोह होत आहे असे दिसते! 'विटे' या नावाऐवजी 'विटा', 'लोणावळे' याऐवजी 'लोणावळा', हे ग्राम-नामामध्ये चाललेले प्रयोग, हिंदीचीच वाट चालत आहे! आणखी काही रूपे पाहा. 'काकाकूवाचे घरटे', 'दोन्ही सीमेवर'(सीमांवर पाहिजे), 'पाऊल' याचे अनेक वचन 'पावले' हे शुद्ध व रूढ आहे. ते अशुद्ध समजून 'पाऊले' हा जावई-शोध वापरण्याचा हल्ली सपाटा आहे.

पुण्याच्या एका दैनिकात 'संसारकरू स्त्री' हा शब्दप्रयोग केलेला पहिला. 'संसारी स्त्री' हा शब्दप्रयोग टाळून 'संसारकरू 'हा नवीन शब्द तयार करून लेखकाने काय साधले? 'दोन्ही', 'तिन्ही' ही रूपे शुद्ध आणि रूढ आहेत; त्यांची दुरुस्ती करून 'दोनही', 'तिनही' अशी रूपे वापरणारे बरेच लेखक हल्ली आहेत. संस्कृतच्या अज्ञानानेही काही चुका होत आहेत व त्यातील काही रूढही होत आहेत. याला कारण संस्कृतमधील संधीचे नियम आज शिकविलेही जात नाहीत आणि जे पूर्वी शिकलेले ते आता विसरत आहेत.

'भारतीय मौसम विज्ञान संस्थान' हे एखाद्या ऑफिसचे नाव म्हणून आपण ऐकले आहे काय? पुण्यातील एका केंद्रीय कार्यालयावर तुम्हाला ही पाटी दिसेल. 'साठी आणि 'पासून' यांसारख्या शब्दयोगी अव्ययांचे आजकाल विचित्र उपयोग पाहायला सापडतात. 'तो सहा महिन्यासाठी दिल्लीला गेला आहे,' आणि 'गेल्या बारा वर्षांपासून ही संस्था बंद आहे' यातील 'साठीचा' उपयोग हिंदीतील 'के लिये' याच्या वळणावर आहे. आणि 'गेली बारा वर्षे' बंद आहे' एवढ्यानंच काम भागत असल्याचे "बारा वर्षांपासून' हे अनावश्यक आहे. शिवाय 'मे महिन्यापासून ' 'बारा तारखेपासून' अशा निश्चित कालदर्शक प्रयोगांतच 'पासून' चा उपयोग करणे योग्य आहे. 'वर्षानुवर्ष' हा क्रियाविशेषणासारखा प्रयोग रूढ आहे. पण तो उपयोग माहीत नसल्याने आज काही विद्वान या क्रियाविशेषणाचेच अनेकवचन करतात आणि 'वर्षानुवर्षे असा प्रयोग करतात! ज्यांना मराठीतील शब्दप्रयोगच माहीत नाहीत, त्यांच्याकडून आज त्या प्रयोगांची 'दुरुस्ती' केली जात आहे! म्हणजे एकीकडून सपाटा, तर दुसरीकडून अज्ञानामुळे रूढ प्रयोगाच्या हास्यास्पद दुरुस्त्या करण्याचा सपाटा!

या सर्वांच्या मुळाशी प्रत्येक इंग्रजी शब्दाचे मराठीत एकाच शब्दाने भाषांतर करण्याचा अट्टाहास आहे. 'लोकसभा' हा शब्द सर्वांना समजतो. पण 'संसद' हा शब्द पूर्वी संस्कृत पंडितांच्याही बोलण्यात ऐकू येत नसे. त्याची योजना का झाली? तर त्याच्यापासून विशेषणे वगैरे ' डेरिव्हेटिव्ह' शब्द तयार करता येतात म्हणून! 'पार्लमेंट' या इंग्रजी शब्दापासून 'पार्लमेंटरी ', पार्लमेन्टेरिअन' वगैरे शब्द तयार करता येतात. 'लोकसभा' या शब्दापासून तसे शब्द तयार करता येत नाहीत. म्हणून 'संसद' हा शेकडो वर्षांत मराठीत न वापरलेला शब्द आज वापरावयास काढला आहे! आजच्या शब्दनिर्मितीचे मूळ डोळ्यांसमोर असलेल्या 'इंग्रजी' शब्दांत आहे. अशा भाषांतरी हेतूने जी भाषा निर्माण होईल, ती मराठी न राहता एक नवीन बेडौल भाषा बनेल. चुकीचे मराठी प्रयोग आणि नवीन तयार केलेले क्लिष्ट भाषांतरी शब्द यांची गेल्या काही वर्षांत एवढी गर्दी झाली आहे की, यशवंतराव चव्हाणांनी जो अवधी मराठीच्या सार्वत्रिक उपयोगाला दिला आहे तेवढ्या अवधीत टिळक, लोकहितवादी, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या काळातील शुद्ध आणि सुबोध मराठी अजिबात नष्ट झालेली दिसेल!

मूळ इंग्रजी शब्दाला प्रतिशब्द तयार करणे हे आजच्या क्लिष्ट शब्दांचे एक समर्थन झाले. तर दुसरे समर्थन म्हणजे 'हिंदीमध्ये तो रूढ आहे'! वास्तविक हिंदीतही तो 'रूढ' नसतो, तर 'बनावट' असतो. मी तर शब्दाचे भाषिक मूल्य ठरविताना त्याचे 'वय काय?' हाच प्रश्न विचारतो. ज्या शब्दाचे वय दहा वर्षेदेखील नाही तो वापरणाराची भाषा सामान्य लोकांपर्यंत पोचणारच नाही. आपल्याला 'सुबोधते'चे पुण्य जोडायचे आहे, की शब्दनिर्मितीचे पुण्य जोडायचे आहे याचा विचार भाषासंचालनालयाने करायला हवा. 'लोकशाही', 'आगगाडी' हे सोपे मराठी शब्द ज्या काळात निर्माण झाले त्या काळात संस्कृत पांडित्याचा दुष्काळ होता असे नव्हे.त्या काळात टिळक आणि विठ्ठल रामजी होते, पण सावरकर आणि डॉ. रघुवीर नव्हते, एवढाच याचा अर्थ आहे!

आज जी हिंदी भाषा निर्माण होत आहे, ती लोकभाषा होणे अशक्य आहे, आणि राजभाषाही होणे अशक्य आहे. आजच्या हिंदीपेक्षा आणि राजभाषेपेक्षा संस्कृतात व्यवहार करणे अधिक सोपे ठरेल! कारण आज निर्माण होत असलेली भाषा संस्कृतही नव्हे, हिन्दीही नव्हे की मराठीही नव्हे. 'अवरसचिव' म्हणजे काय? एका संस्कृत शास्त्र्यालाही ते सांगता आले नाही व दुसऱ्या हिंदी मातृभाषा असलेल्या माणसालाही सांगता आले नाही.

या सर्व दुर्बोधतेचे मूळ भाषाशुद्धीच्या चळवळीत आहे. त्या चळवळीला विरोध करताना चाळीस वर्षांपूर्वीच मला लिहावे लागले होते की, शब्द पंडितांनी तयार 'करायचे' नसतात, बोलण्याच्या व लिहिण्याच्या ओघात ते तयार 'व्हायचे' असतात. आता तर कोणीही अलबत्या गलबत्या लेखक शब्दनिर्मिती हे सत्कर्म आहे व तो प्रत्येकाचा अधिकार आहे असं समजत आहे. त्यामुळे मूळची मराठी भाषा शिल्लक राहील की नाही हाच प्रश्न आहे. सर्व क्षेत्रांत मराठीचा वापर त्वरित हवा, हे मान्य. पण ते 'भाषांतर मराठी' नको. अस्सल मराठी पाहिजे. आजची रेडीओवरची वार्तापत्रे ऐकली म्हणजे कानात बोटे घालावेसे वाटते! पण याला कारण ती मूळ मराठी नसून ते इंग्रजी वार्तापत्राचे भाषांतर असते हेच आहे. आणि ते भाषांतरही मराठी लेखनात निपूण अशा माणसाने केलेले नसून रेडिओच्या, 'घरच्या कलावंता'ने (स्टाफ आर्टिस्टने!) केलेले असते. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या कारकीर्दीत बडोद्यात रूढ झालेली कारभाराची सुगम परिभाषा पाहावी आणि आजचा सरकारी पदनामकोश पहावा. सयाजीरावांनी ती परिभाषा प्रत्यक्ष कारभाराकरता केलेली होती, तर आजची परिभाषा इंग्रजी कायद्यांचे व फर्मानांचे मराठी

भाषांतर करता यावे म्हणून तयार केलेली असते. इंग्रजीचा पदर धरून चालणे प्रथम बंद झाले पाहिजे. तरच सोपी स्वाभाविक मराठी वापरता येईल आणि सोपी मराठी भाषा कारभारात रूढ झाली तरच ती सामान्य लोकांपर्यंत पोचेल.

येथे लिखित भाषेपुरताच विचार केला आहे. पण रेडिओवरील वार्तावाचन आणि 'अनाऊन्समेन्टस' ऐकल्यास मराठी उच्चारांचे वळणही केवळ वैयक्तिक ढंगाकरता मारले जात आहेसे दिसेल. पण ते दोष दैनिक वृत्तपत्राच्या छपाईत दाखवून देणे जिकीरीचे होईल. म्हणून त्याकडे वळणे मुद्दाम टाळले आहे. काही विधायक सूचना पुढीलप्रमाणे :

(१) शब्दशः भाषांतर टाळावे. इंग्रजीतील विचार स्वतंत्रपणे व अवश्य तर शाब्दिक बदल करून (पॅरॉफ्रीज करून) सांगावा

(२) संस्कृतच्या अभ्यासाशिवाय शुद्ध मराठी लिहिता येईल ही कल्पना सोडावी.

(३) अल्पवयात (वेगळ्या अर्थाने संस्कृत शब्द वापरणारा) हिंदी भाषा शिकल्याने, मुलाच्या मराठी भाषेत गोंधळ उडतो. म्हणून खालच्या वर्गात संस्कृत शिकवावे व हिंदी शिकवू नये.

(४) रूढ फारसी शब्द व इंग्रजी शब्द कटाक्षाने टाळून त्याऐवजी क्लिष्ट आणि अपरिचित शब्द योजल्याने सोवळेपणा साधेल पण सुबोधपणा साधणार नाही.

९. मराठी माध्यमाला मुहूर्त

जी पिढी वयाच्या चौदाव्या वर्षी इंग्रजीतून संस्कृत शिकत असे, त्या पिढीतच माझा अंतर्भाव होतो.

'रीडुप्लिकेशन', 'एओरिस्ट, 'इनिश्यल', 'कॉन्सोनंट्' 'टू व्हॉवेल्स', कोअॅलीज्' इ.घशात काड्या अडकल्याप्रमाणे वाटणारे इंग्रजी शब्द आम्हाला संस्कृत व्याकरणाकरिता घोकावे लागत. वास्तविक इतके अवघड शब्द खुद्द इंग्रजीच्या व्याकरणातही भेटत नसत. पण अनेक भाषाकोविद डॉ. भांडारकर यांनी संस्कृत व्याकरण तयार करताना इंग्रजीतून, ग्रीक, लॅटिन व्याकरणांतील संज्ञाही धुंडाळल्या असल्याने, संस्कृतचे व्याकरण इंग्रजीहूनही इंग्रजी बनले होते! पण 'सुखार्थिन: कुतो विद्या' हे वचन आमच्या वाडवडिलांनी आमच्या कानात इतके दुमदुमविले होते की, कष्ट वाढले म्हणजे आम्हाला विद्याच वाढल्यासारखी वाटे! इंग्रजीचे आणि संस्कृतचे आम्ही मनोमन लग्न लावून दिले होते की, जर इंग्रजीतून व्यक्त करता आला नाही, तर संस्कृत काव्याचा अर्थच कळला नाही, असे आम्हाला वाटे! अन् त्या दृष्टीनेच आजच्या जगन्नाथ शंकरशेट पटकावणाऱ्यांपेक्षाही त्या काळचे सामान्य विद्यार्थीही मला कधी कधी अधिक विद्वान वाटतात.

आजचा विद्यार्थी 'कमल-नयना' या विशेषणाचे मराठीत करून करून काय करणार? पुष्कळसे विद्यार्थी तर तोच शब्द मराठीत कायम ठेवतील. अन् मग मराठीतही ज्या विद्यार्थ्याने 'ती कमलनयना' असेच लिहिले त्याला संस्कृत कळले असे विद्वान परिक्षकांनी समजायचे तरी कसे? उलट आमच्या वेगळ्या संस्कृत ज्ञानाचा पुरावा किती खणखणीत होता पहा! " The Lotus-eyed one" हे होते आमच्या वेळचे सुंदर भाषांतर ! 'गजानन', 'लंबोदर', 'गुडाकेश', 'परन्तप' यासारख्या सर्वपरिचित संस्कृत शब्दांची आमची इंग्रजी भाषांतरेही अशीच मोठी प्रकाशदायक असत! हे इंग्रजी अनुपानातले संस्कृत आमच्या बालबुद्धीला इतके मानवले होते की आजही गीतेच्या संस्कृत श्लोकांपेक्षा त्या श्लोकांचे इंग्रजी भाषांतरच आमच्या मेंदूला अधिक भिडल्यासारखे वाटते!

मी असे ऐकतो, की आज प्रवेश-परिक्षेपर्यंतचे इतिहास, भूगोल, गणित, पदार्थविज्ञान इ. सर्व विषय मराठीतून शिकविले जातात.आमच्या वेळच्या सरकारी हायस्कूलच्या बड्या पगाराच्या, हेडमास्तरांना शिक्षणाची ही स्थिती कळती तर त्यांची हृदयक्रिया बंदच पडली असती! आज कॉलेजचे विषय मराठीतून शिकविणे जितके अशक्य वाटते तितकेच त्याकाळी हायस्कूलचे विषय मराठीतून शिकविणे अशक्य वाटे! वास्तविक त्यातील बहुतेक विषय ट्रेनिंग कॉलेजमध्ये मराठी शिक्षकांना किंवा मराठी शाळेत 'व्हर्नाक्युलर फायनल' परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना, उत्तम मराठीत शिकविले जातही होते! परंतु केवळ हायस्कूलमध्ये काही विषय इंग्रजीतून शिकविले गेल्यामुळे एका पिढीतच आम्हाला इंग्रजीची इतकी सवय झाली की ते विषय मराठीतून शिकविणे जवळ-जवळ अशक्य वाटू लागले.

जी स्थिती काही वर्षांपूर्वी हायस्कूलच्या शिक्षणासंबंधी होती तिच आज कॉलेजच्या शिक्षणासंबंधी होऊन बसली आहे. "बाकी सर्व तुम्ही स्वभाषेतून करा, पण कॉलेजचे शिक्षण स्वभाषेतून देऊ नका." असे म्हणणारे विद्वान स्वतंत्र हिंदुस्थानातही पुढे येत आहेत! (प्रिं. डी. डी. कर्वे यांचा ता. २४ जुलैच्या केसरीतील लेख या दृष्टीने पाहण्यासारखा आह.) एकेकाळी, 'धार्मिक कृत्यांना व उपासनेला गीर्वाण भाषाच पाहिजे कारण ती देवांची भाषा आहे'-असे म्हणणाऱ्या लोकांना हेच लोक हसत असत. परंतु आता संस्कृतच्या ऐवजी इंग्रजीला तिच्या काल्पनिक अखिल जागतिकत्वामुळे, हेच लोक देवांची भाषा बनवू

पाहत आहेत! हिंदुस्थानातील बंगाल, महाराष्ट्र, अयोध्या प्रांत यांच्याहून लोकसंख्येने कमी असलेले जगातील देशही, आपापल्या भाषातून राज्यकारभार व शास्त्रीय संशोधन यांसारखे उच्चतम व्यवहार करीत असून; मराठी, बंगाली, यांसारख्या परिणत भाषा कर्व्यांच्यासारख्या शिक्षणतज्ज्ञांना केवळ स्वयंपाकघरातील व्यवहाराला योग्य वाटाव्या हे कशाचे फळ? शंभर वर्षे इंग्रजीची सवय लागल्याचेच हे फळ होय, असे म्हणणे प्राप्त आहे.

प्रांतिक भाषांसंबंधीच्या त्यांच्या या वाईट ग्रहामुळे, इंग्रजी अमलात त्या भाषांची जी स्थिती होती, त्याहून वाईट स्थिती होणार आहे, याची कदाचित या लोकांस कल्पना नसावी, पण एकीकडून, 'शिक्षण इंग्रजीतून द्यावे,' 'निदान सर्व देशांत एकाच भाषेतून द्यावे', असे सुचवीत असूनही दुसरीकडून प्रांतिक भाषांच्या विकासाला सरकारने भरपूर मदत करावी, असेही ते सुचवितात. या सर्व वैचारिक गोंधळाला कारण जुन्या जमान्यात इंग्रजी शिक्षितांना ज्या खास सोयीची सवय लागली, त्या सोयी गेल्या तर कसे होईल, अशी या मंडळींना धास्ती वाटते! पण त्या सोयी किती टक्के लोकांसाठी होत्या, शिवाय त्या खऱ्या सोयी होत्या की इंग्रजांच्या चष्म्याने पाहत राहिल्यामुळे गैरसोयीच्या सोयी वाटू लागल्या होत्या, याचाही कोणी विचार करीत नाही. याचे एक हास्यास्पद आणि ओंगळ असे उदाहरण येथे दिल्याशिवाय या सर्व भ्रान्तिष्ट प्रकारापुढे आरसा धरल्यासारखे होणार नाही आणि केवळ त्यामुळेच नाईलाजने मी ते उदाहरण येथे देतो. इंग्रज या देशात असता, रेल्वेचे वरच्या वर्गाचे डबे आणि राजधानीतील कचेऱ्या यांमध्ये युरोपमधल्यासारखे 'कमोड' असलेले शौचकूप बांधण्याची पद्धत पडली. आज ज्या ठिकाणी एकही युरोपियन अधिकारी नाही, अशा कचेऱ्यांतूनही आमचे सरकार मोठ्या भाविकपणाने 'कमोड' तयार ठेवीत आहे! या 'कमोड' प्रकरणाचे' ही अखिल भारतीय भूमिकेतून विद्वत्ताप्रचूर समर्थन करणे अशक्य नाही!

सुदैवाने शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्रात तरी कर्व्यांचा मताचे फार थोडे उरले आहेत. नुकत्याच बाहेर पडलेल्या डोंगरकेरी समितीनेही स्वभाषेतून शिक्षण देणे हे निश्चित उद्दिष्ट गृहीत धरूनच आपल्या शिफारसी केल्या आहेत. 'काय करायचे' ते ठरले आहे, ते 'कसे करायचे' एवढाच प्रश्न आहे. पण काय करायचे ते ठरल्यानंतरही जुन्या कृत्रिम सोयींच्या सवयीमुळे गैरसोयींनाच सोयी समजण्याचा प्रकार घडणे अशक्य नाही. निदान चालढकल तरी होणे अशक्य नाही. स्वभाषेत उच्च शिक्षणाकरिता पाठ्यपुस्तके नाहीत, म्हणून इंग्रजी काही दिवस चालू ठेवणे आणि इंग्रजी चालू आहे म्हणून पाठ्यपुस्तकांची तयारी लांबणीवर पडणे, असा हा प्रकार चालू आहे. या संबंधात काही व्यवहार्य पण तातडीचा मार्ग शोधून काढण्याकरिता पुणे विद्यापीठाचे प्रा. शिरसीकर हे या आठवड्यात संबंधित लोकांची एक सभा बोलावणार आहेत असे कळते. आधी अध्यापन व नंतर त्यातून पाठ्यपुस्तके, असा त्यांनी स्वीकारलेला क्रम अर्थातच अधिक व्यवहार्य आहे. पण या कार्यक्रमात याहूनही अधिक व्यवहार्य दृष्टी सुचविणे शक्य आहे असे मला वाटते. जे अध्यापक स्वत: इंग्रजीतून शिकलेले असून मराठीतून शिकविण्याचा किवा पाठ्यपुस्तक लिहिण्याचा प्रयत्न करतील तर त्यांना अडचणी येणारच. एवढेच नव्हे, तर त्यांची निष्ठा दुर्दम्य नसेल तर ते आपल्या अडचणींतून काही निराशावादी निष्कर्षही काढणे स्वाभाविक आहे. "ज्याअर्थी मला हा विषय मराठीतून मांडता येत नाही, त्या अर्थी तो मराठीतून मांडणे अशक्य आहे." असाही निष्कर्ष काही अध्यापक काढताना दिसतात.

एखादा विषय इंग्रजीसारख्या अगदी परक्या पण परिणत भाषेतून अभ्यासिल्यानंतर तो स्वभाषेतून मांडणे सोपे नाही हे उघडच आहे. त्याकरिता तीन गोष्टींची तरी आवश्यकता आहे- १) त्या विषयाचे उत्कृष्ट आकलन २) स्वभाषेवर चांगले प्रभुत्व ३) तो विषय स्वभाषेतून - अस्सल, सुगम मराठीतून- शिकविण्याची

जिद्द. या तिन्ही गोष्टी ज्या अध्यापकाच्या किंवा ग्रंथकाराच्या अंगी आहेत, त्याचाही प्रत्येक प्रयत्न निदोष होईल असे नव्हे. नवीन निर्माण होत असलेल्या शास्त्रीय भाषेशी त्याला झगडावे लागेल. पण हे आज दुर्दैवाने वा सुदैवाने इतरही अनेक क्षेत्रांत करावे लागत आहे.

आमच्या संपादकांचे व उपसंपादकांचे सर्व ज्ञान इंग्रजीतूनच मिळवलेले असते-नव्हे, त्यांच्याकडे येणाऱ्या बातम्याही इंग्रजीतूनच येत असतात. पण म्हणून त्यांनी मराठीतून वृत्तपत्र चालविणे अशक्य आहे, असे कधी म्हटले आहे काय? उलट बऱ्यावाईट मराठीत बातम्या पुरवीत; सामान्यतः उत्तम मराठीत संपादकीय लिहीत, गेल्या शंभर वर्षांतील वृत्तपत्रांनी मराठीच्या विकासाला फार मोठे साहाय्यच केले आहे.निदान, 'मला मराठीतून संपादकीय लिहिता येत नाही', 'बातमीला मथळा देता येत नाही' असे रडगाणे तरी कोणी संपादकाने गाइलेले ऐकिवात नाही. कारण उघडच आहे. संपादकांचा संबंध रोजच्या गिऱ्हाइकांशी असतो. त्यांना तो अटी सांगू शकत नाही. उलट आजची कॉलेजे, गरजू विद्यार्थ्यांना कॉलेजच्या दारातच काही अटी सुनवू शकतात !

पण माझी व्यवहार्य सूचना वेगळीच आहे. अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, इतिहास इ. विषय आज मराठीतून शिकवण्याला अर्धवट सुरुवात झालीही आहे. हे मराठीकरणाचे काम, केवळ त्या त्या विषयांच्या प्रोफेसरांवर न सोपवता त्यांच्या जोडीला मराठीच्या प्रभुत्वाबद्दल नाणावलेले मराठीचे प्रोफेसर, संपादक किंवा लेखक द्यावेत. एक पुस्तक अर्थशास्त्राच्या एखाद्या प्रोफेसरने मराठीत लिहिल्यावर त्याच्या खऱ्या मराठीकरणाकरिता ते मराठीच्या एखाद्या प्रोफेसरने किंवा एखाद्या पटाईत मराठी लेखकाने वाचून पाहावे इतकेच नव्हे, तर ज्यांनी अर्थशास्त्र, मानसशास्त्र यांसारखे विषय मराठीतून शिकवण्यास नवीन प्रारंभ केला आहे, त्यांच्या तासाला मराठीवर प्रभुत्व असलेल्या लेखकाने वा प्रोफेसरने जाऊन बसावे व मुद्दाम टिपणे घेऊन मराठीकरणाच्या दृष्टीने त्यांस सूचना कराव्यात. असा चिकाटीचा प्रयत्न व तोही उभयतांच्या सहकार्याने अनेक दिवस केल्यास, विविध विषयांच्या प्रोफेसरांना मराठीतून शिकवण्यात नैपुण्य प्राप्त होईल व ते मराठीत चांगले ग्रंथही लिहितील.

आज मराठीतून शिकवताना केवळ इतर विषयांच्या अध्यापकांनाच अडचण होते असे नाही; तर खुद्द मराठीच्या अध्यापकांनाही अडचण होते. केशवसुत संप्रदायी कवितेचे वेगळेपण समजावून सांगताना,ते मराठीतूनच सांगण्यापेक्षा इंग्रजीतून सांगणे अधिक सोपे आहे, असे मला अनेकवेळा वाटले आहे व एम.ए च्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत मी क्वचित तसा प्रयोगही केला आहे. पण म्हणून एकेकाळी इंग्रजीतून मराठी शिकवीत (निदान मराठीची परीक्षा घेत), तसे करावे, असे कोणी म्हणणार नाही.

मराठीकरणाच्या बाबतीत मराठीवर प्रभुत्व असलेल्यांची मदत द्यावी, असे जेव्हा मी म्हणतो, तेव्हा एक पथ्य मात्र पाळायला सांगितले पाहिजे. मराठीवर प्रभुत्व म्हणजे केवळ इंग्रजीचे वावडे असणे नव्हे, तर मराठीचे खरेखुरे हृदय माहीत असणे! मराठीकरणाच्या प्रांतात 'सावरकारी' आणि 'रघुवीरी' शब्द शिरल्यास मराठीकरण अधिकच दूर जाईल!

आणखी एका वेडगळ आणि हट्टी गैरसमजाचे निराकरण येथे केले पाहिजे. मराठीतून सर्व विषय शिकविणे याचा अर्थ इंग्रजी व हिंदी यांचे अभ्यासक्रमांतून उच्चाटन करणे असा काही लोक करतात. शिक्षणाचे माध्यम मराठी केल्यावर या प्रांतातून त्या प्रांतात नोकरीकरता जाणारांचे कसे होणार? ही मोठी अडचण उभी करण्यात येते. पण शिक्षणक्रमात सातसात वर्षे हिंदीसारखी अगदी शेजारची भाषा असल्यावर

आणि बाराबारा वर्षे इंग्रजी शिकल्यावर दुसऱ्या प्रान्तात गेलेल्या महाराष्ट्रीयांना मराठीशिवाय कोणतीच भाषा वापरता येणार नाही, असे लोक का गृहीत धरतात कोण जाणे! सारांश, इंग्रजांच्या गुलामगिरीच्या काळात लागलेल्या वैचारिक सवयीखेरीज दुसरे कोणतेही तर्कशास्त्र मराठीच्या विरोधकांच्या प्रतिपादनात दिसून येत नाही.

अनुक्रमणिका

१०. विद्यापीठे काय करू शकतील

सुमारे अठरा वर्षांमागे निजाम कॉलेजच्या निमंत्रणावरून मी हैद्राबाद येथे गेलो होतो. उस्मानिया विद्यापीठातही माझे व्याख्यान झाल्यामुळे, शिष्टाचार म्हणून माझी आणि (उस्मानिया विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरु) नबाब अलीयावर जंग यांची गाठ घालून देण्यात आली. पुणे विद्यापीठ त्या वेळी अगदी अर्भकावस्थेत असल्याने नाबाबसाहेबांनी मला आमच्या विद्यापीठाची हालहवाल विचारली. बोलणे साहजिकच अध्यापनाच्या भाषेकडे वळले. पुणे विद्यापीठाचेही उद्दिष्ट स्वभाषेतून शिक्षण देण्याचेच आहे हे कळल्यावर अलीयावर जंग यांनी जे उद्‌गार काढले ते माझ्या कायमचे लक्षात राहिले आहेत. ते म्हणाले , "जयकरसाहेबांना सांगा, उस्मानिया विद्यापीठाने केलेला एक मूर्खपणा मात्र तुम्ही करू नका! इंग्रजी पाठ्य-पुस्तकांची उर्दू भाषांतरे करण्यात आम्ही पंचवीस लाख रुपये वाया घालवले! अन् उपयोग काय म्हणाल तर..."

विद्यापीठाच्या वर्गांतून हिंडताना मला 'उपयोग काय तो' दिसलाच होता. एकाही फळ्यावर उर्दू अक्षरे दिसली नाहीत. सर्वत्र इंग्रजी दिसले! इंग्रजीतून देशी भाषांकडे वळताना पाठ्यपुस्तकांचे दुर्भिक्ष्य नष्ट करण्याकरिता सरकारने काही कोटी रुपये भाषांतर मोहिमेकरिता काढून ठेवले आहेत, अशी वार्ता अलीकडेच वृत्तपत्रांत येऊन गेली. त्यावरून मला वरील प्रसंग आठवला.

'इंग्रजी घालवायची' याचा अर्थ काही लोक असा करतात की,जे जे इंग्रजीतून उपलब्ध आहे, त्या सर्वांचे भाषांतर करीत बसायचे! 'प्लीज' बद्दल 'कृपया', 'थँक्स'बद्दल 'आभार' किंवा 'धन्यवाद', 'एक्स्क्यूज मी'बद्दल 'क्षमस्व', असे सारखे भाषांतर करीत असणे, म्हणजे इंग्रजी घालवणे, ही कल्पना हास्यास्पद आहे! 'गुड नाईट' बद्दल 'शुभरजनी' (किंबहुना शिवरात्र!) म्हणणे' 'हनिमून' बद्दल 'मधुचंद्र' म्हणणे, म्हणजे स्वभाषा नव्हे. तर ते नुसते 'स्वभाषांतर'होय! इंग्रजीचे रिवाज, व्यवहार आणि वाक्‌प्रचार मराठीत आणणे म्हणजे मराठीत व्यवहार करणे नव्हे. इंग्रजीचा संपर्क होण्यापूर्वी आपण याच कल्पना कशा व्यक्त करीत होतो, याचे स्मरण करणे म्हणजे मराठीत व्यवहार करणे होय. आपल्याकडे 'गुड नाइट'ची पद्धत नसताना 'शुभरजनी' हा शब्द वापरणे म्हणजे एका धेडगुजरी भाषांतराबरोबरच एक परकीय रिवाजही घरात घेणे आहे.

विद्यापीठाच्या क्षेत्रातही इंग्रजी पुस्तकांची मराठी किंवा हिंदी भाषांतरे करणे म्हणजे देशी माध्यमाचा विकास करणे असे नव्हे.विद्वानांचा जो वर्ग गेली शंभर वर्षे इंग्रजीतून अध्ययन-अध्यापन करीत आहे; त्याने आता आयत्या पिठावरच्या या रेघोट्या बंद करून स्वत: कामाला लागणे, म्हणजे स्वदेशी माध्यमाचा विकास होय. विद्यापीठांतील विद्वानांनी आजवर कॉलेजात शिकवणे आणि परिक्षेचे पेपर तपासणे यांच्या पलीकडे काय केले, याची आता परीक्षा आहे. वर्षानुवर्षे अर्थशास्त्र शिकवणाऱ्यांनी स्वभाषेत अर्थशास्त्रविषयक ग्रंथांची किती भर घातली? जन्मभर पाश्चात्य तत्त्वज्ञान शिकविणाऱ्यांनी ॲरिस्टॉटल, स्पायनोझा, कान्ट, हेगेल यांच्यावर किती ग्रंथ लिहिले? याचा हिशेब प्रादेशिक भाषांच्या माध्यमांच्या निमित्ताने होणार आहे आणि गेल्या शंभर वर्षांत जर विद्यापीठांतील विद्वानांनी आपापल्या विषयावर स्वभाषेत स्वतंत्र रचना केली नसेल तर ती गोष्ट विद्यापीठांना फारशी भूषणास्पद नाही.

आता स्वभाषेतून शिक्षण देण्याच्या या क्रांतीकालातही सरकारने कोट्यवधी रुपये जर भाषांतराकरताच खुले होणार असले, तर विद्यापीठाच्या इतिहासात एक नवे 'भाषांतरयुग' उजाडण्याचा

संभव आहे. देशी भाषांत उत्तम पाठ्यपुस्तके तयार होणे हे केवळ सरकारी ग्रँटवर अवलंबून नाही. विद्यापीठांच्या क्षेत्रांत स्वतंत्र ग्रंथरचना करणारे वा करण्याच्या पात्रतेचे विद्वान अगदीच नाहीत असे नाही. पण त्यांच्या पात्रतेचा उपयोग करून घेणे हे विद्यापीठांना आपले कामच वाटत नसेल तर त्यांना उत्तेजन मिळणार कसे ? केवळ कॉलेजचे तास घेणे आणि वर्षांअखेरच्या सुट्टीत वेगळे वेतन घेऊन परीक्षांचे पेपर तपासणे एवढेच काम करणारे प्रोफेसर, आणि स्वतःच्या विषयावर स्वतंत्र लेखन व व्याख्यान करणारे प्रोफेसर यांत आमच्या शिक्षणसंस्था फारसा फरक करीत नाहीत, असे दुर्दैवाने म्हणावे लागते. इतकेच काय, आपल्या विषयाचा आजन्म व्यासंग करून कॉलेजच्या बाहेरच्या जगालाही आपल्या ज्ञानाचा उपयोग करून देणाऱ्या प्रोफेसरांना कॉलेजने जाब विचारल्याचीही उदाहरणे आढळतील! स्वतःच्या विषयावर स्वतंत्र ग्रंथरचना करणाऱ्या अध्यापकापेक्षा जो परीक्षेच्या दिवसांत जादा तास घेऊन मुलांची तयारी करून घेतो, तो अध्यापक कॉलेजचे अधिक हित करतो, अशीही समजूत दिसून येईल! जो विद्यापीठाच्या परीक्षांना परीक्षक आहे, त्या अध्यापकाचा कॉलेजला जेवढा उपयोग आहे, तेवढा तो स्वतंत्र ग्रंथ लिहितो, त्याचा नाही, अशीही कॉलेजांची दृष्टी दिसून येते. प्रोफेसरांच्या कामाचे मूल्य ते आठवड्यात किती तास शिकवितात यावरून ठरविणे, त्यांच्या सुट्टया कमी करण्याची शिफारस करणे, या सर्वांच्या मुळाशी ही एकच दृष्टी आहे. आणि अशी दृष्टी असल्यावर शंभरांतले पंचवीस का होईनात, जे ग्रंथरचना करण्यासारखे प्रोफेसर असतील त्यांनाही 'नको हा व्यर्थ खटाटोप!' असे झाले तर नवल नाही. यामुळेच एखाद्या विषयाचा 'प्रोफेसर' म्हणजे 'त्या विषयातला अधिकारी विद्वान' असं म्हणण्यासारखी परिस्थिती आपल्याकडे क्वचितच असते.

प्रोफेसर मंडळींकडे या दृष्टीने पाहण्याची परंपरा जर आपल्या विद्यापीठांतून असती व स्वभाषेतून शिक्षण देण्याचे उद्दिष्ट जर आपण सतत गंभीरपणे डोळ्यांपुढे ठेवले असते, तर आग लागल्यावर विहीर खोदण्याचा आजचा प्रसंग आला नसता.

पण विद्यापीठात नाही, तरी विद्यापीठाबाहेर अनेक विषयांत मराठीत विपुल ग्रंथरचना झाली आहे. ते ग्रंथ एखाद्या परिक्षेचा अभ्यासक्रम डोळ्यांपुढे ठेवून लिहिलेले नसले तरी त्यांचाही विद्यापीठांच्या स्वदेशीकरणाच्या कार्यक्रमाला उपयोग मोठाच आहे. साधा परिभाषेचा प्रश्न घेतला, तरी एक समिती नेमून तिच्याकरवी परिभाषेची 'फॅक्टरी' खोलण्यापेक्षा, प्रत्येक भाषेत पारिभाषिक शब्द आधीच किती आहेत, याची नोंद व्हायला हवी. आह परीक्षेत पहिला वर्ग मिळण्याकरिता केलेल्या वाचनापलीकडे ज्यानं चार ग्रंथही वाचले नाहीत, असा तरुण विद्वान जेव्हा प्रत्येक इंग्रजी शब्दाला स्वतःचा नवा शब्द तयार करीत बसतो, तेव्हा मला त्याची कीव येते. घरातली कपाटं आणि कोठारं न उघडताच बजारांतून नवे जिन्नस आणायला निघणाऱ्या नव्या सुनेसारखी त्यांची स्थिती असते. केतकरांच्या ज्ञानकोशात शेकडो विषयांसंबंधीचे सुंदर समर्पक मराठी प्रतिशब्द तसेच पडून आहेत. किती तरूण लेखक तो ज्ञानकोश उघडतात? इतिहासचार्य राजवाडे, अहिताग्नी राजवाडे, ज्ञानकोशकार केतकर व इतर भाषाप्रभू यांनी योजलेले शेकडो शब्द ज्यांनी कधी पाहिलेही नाहीत असे लोक जेव्हा नवे भिकार प्रतिशब्द बनवितात तेव्हा मला त्यांची कीव येते.

स्वभाषेत उच्च शिक्षणाची सामग्री तयार करणे म्हणजे पैसे घेऊन नुसती भाषांतरे करणेही नव्हे,की हातोडा घेऊन प्रतिशब्द बनविण्याचा कारखाना काढणेही नव्हे. पण आजकाल तर सर्वत्र 'वर्कशॉप' ची भाषा ऐकू येते! नुकतेच मुंबईला भाषांतराचे सरकारी वर्कशॉप भरले होते म्हणे! विद्वत्ता आणि सौंदर्यदृष्टी

अनुक्रमणिका

एकत्र नसता, मायभाषेची व्यर्थ मोडतोड करणे हा गुन्हा मानला पाहिजे. विद्यापीठांच्या क्षेत्रांत देशी भाषांचे महत्व वाढविताना, त्या भाषांना बेडौल, धेडगुजरी रूप येणार नाही , अशी खबरदारी घ्यायला हवी.

पण या भीतीने इंग्रजीरूपी पूतनामावशीचा मुक्काम मात्र या देशात वाढविण्याला माझी संमती नाही! गांधींनी म्हटले आहे.

I would prefer temporary chaos in higher education to the criminal waste that is daily accumulating.

अनुक्रमणिका

११. “हिच्या एक ताटात आम्ही बसू”

आज १ मे हा महाराष्ट्रदिन. या दिवशी महाराष्ट्र जन्माला आला असे नव्हे, तर एकत्र आला. महाराष्ट्रियांसारखे राजकीयदृष्ट्या कर्तबगार लोक एकत्र आले, तर राष्ट्रीय ऐक्याच्या इमारतीला बुलंद रूप लाभेल ही सर्व पुढाऱ्यांची आशा. ही आशा खरी होती का? ती सफल झाली का?

ती आशा खरी होती. राज्यशास्त्रदृष्ट्या शास्त्रशुध्द होती. स्वभाषेत दिलेले शिक्षण हे सर्वात उत्तम शिक्षण होय, हे जसे शिक्षणक्षेत्रातले सर्वमान्य तत्त्व आहे तसेच भाषावार प्रांतरचना ही सर्वात स्वाभाविक रचना होय, हेही शासनशास्त्रातले तत्त्व होय. निवडणुकीवर नजर ठेवून तत्त्वज्ञान सांगणाऱ्या स्वातंत्र्योतर पुढाऱ्यांनीच केवळ या तत्त्वाचा जप चालू केला असे नाही. ज्ञानकोशकार केतकरांसारख्या सर्वथा निर्लोभ अशा शास्त्रज्ञाने जर कोणती पहिली चळवळ केली असेल तर ती भाषावार प्रांताची. त्यांनी बावन्न वर्षांपूर्वी मद्रास कॉँग्रेसमध्ये भाषावार प्रांतरचनेचे महत्त्व प्रतिपादणारी पत्रके वाटली. त्यात त्यांचा हेतू निवडणूक जिंकण्याचा नव्हता, की इंग्रजी राज्यकारभारातील दोष कढण्याचा नव्हता.वर्गाच्या वा जातीच्या नावाने एकत्र येण्यापेक्षा भाषेच्या नावाने एकत्र येणे अधिक स्वाभाविक आणि पुरोगामी आहे, असे त्यांचे तत्त्व होते.

मराठी भाषिकांचे एक राज्य झाल्यावर मराठी मुसलमान आणि मराठी हिंदू हे अधिक जवळ येतील. इंग्रजीच्या जोरावर पुढे सरकलेला (म्हणजेच दूर गेलेला!) ब्राह्मण, पुन्हा मराठी बोलू लागून पूर्वीसारखा मराठ्यांच्या जवळ येईल, ही केतकरांना आशा होती. सारांश, केवळ ‘एका सचिवालयातून कारभार’ हे त्यांचे स्वप्न नव्हते-तर एकभाषी एकविचारी, धर्मनिरपेक्ष, जातिनिरपेक्ष अशा पुरोगामी आणि लढवय्या लोकांचा प्रांत, ही त्यांची प्रमुख आकांक्षा होती. केतकरांसारखे वैचारिक नेते आणि गांधी-नेहरूंसारखे राजकीय नेते यांपैकी कुणालाच केवळ नकाशातील सरहद्दीचे एकभाषिकत्व नको होते. त्यांना त्या त्या सरहद्दीत राहणाऱ्या लोकांच्या हद्दीचे एकभाषिकत्व हवे होते. पण आज ही हृदये एक भाषा बोलत आहेत का?

आज जेव्हा संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न निघतो, तेव्हा बेळगाव, कारवार गोमंतक हे मराठी भाषिक विभाग अद्याप महाराष्ट्राबाहेर ठेवण्यातील अन्यायाचाच फक्त उल्लेख होतो. हा राजकीय अन्याय दूर झाल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्र पूर्ण होणार नाही हे तर खरेच; पण त्यानंतरही काही गोष्टी राहतील हे विसरून चालणार नाही.

भाषिक प्रांताचे मुख्य उद्दिष्ट जाती आणि धर्म यांच्यावर आधारलेले सामाजिक गट मोडून विशिष्ट प्रदेशावर आधारलेले समाज निर्माण करणे हे होय. श्री. केतकर यांच्या ज्ञानकोशाच्याच भाषेत सांगायचे झाले तर ‘जातीबद्ध समाजाला क्षेत्रबद्ध अथवा प्रदेशनिष्ठ समाज बनवणे’ हे भाषिक प्रांताचे पहिले उद्दिष्ट होय. एकदा एकेका प्रांतात जातिनिष्ठेऐवजी प्रदेशनिष्ठा उत्पन्न झाली म्हणजे संपूर्ण हिंदुस्थानातही जातीच्या अभिमानाऐवजी देशाचा अभिमान उत्पन्न होईल आणि हिंदुस्थानातील जातिमूलक भेदभावाचे आणि बेकीचे बंड मोडेल.

हे शास्त्रशुद्ध ध्येय साध्य होण्याच्या मार्गात अडचणी आहे, असे आता आढळून येत आहेत. महाराष्ट्राचे ऐक्य एकभाषेवर अवलंबून, पण मुळात महाराष्ट्रात मराठी भाषा चालू होण्यालाच अडचणी शिल्लक आहेत! कोर्टकचेऱ्या, रेल्वे, विद्यापीठे यांमध्ये अद्यापही इंग्रजीचे राज्य चालू आहे. आजच मला

एका मराठीच्या अभिमानी विद्वानाच्या मुलाच्या लग्नाचे निमंत्रण आले आहे. ते इंग्रजीत आहे! स्वायत्त अशा पुणे विद्यापीठाचे दप्तर आजही इंग्रजीतच असलेले आढळेल. आपल्याकडील विमाकंपन्या वा इतर मोठाल्या कंपन्या यांचे दप्तर तर इंग्रजीत असतेच; पण त्यांची नावेही इंग्रजीत असतात. डेक्कन जिमखान्यासारख्या वा लक्ष्मीरोडसारख्या निर्भेळ मराठी वस्तीतून फेरफटका केल्यास, दुकानांवरील सर्व पाट्या संपूर्ण इंग्रजीत वा देवनागरी लिपीतील इंग्रजीत असलेल्या आढळतील. फार कशाला? 'डेक्कन जिमखाना' हे नावही मराठी नाही! अशा स्थितीत सरकारने मराठीत कारभार करावा या ओरडीला वजन कसे यावे?

मूळ कायदा इंग्रजीत, म्हणून कोर्टाची भाषा इंग्रजी; पोस्टाचे नियम व छापील फॉर्म इंग्रजी, म्हणून पोस्टाची भाषा इंग्रजी; 'टेलिप्रिंटर' वर बातम्या इंग्रजीत येतात, म्हणून वृत्तपत्राचे 'मराठी' इंग्रजीवरून घाईत आणि झोपेत केलेले! मुंबईतील मोठाल्या व्यापारी कंपन्या इंग्रजी भाषेत व इंग्रजी अक्षरांत पाट्या लावतात, म्हणून इतर गावांतील टीचभर दुकानांवरही पाट्या न समजणाऱ्या लठ्ठ इंग्रजीत! 'सायकल मार्ट', आटोमोबाईल एम्पोरियम', 'मोटर स्पेअर पार्टस', 'कॉमनवेल्थ इन्शुअरन्स', 'कॉन्टिनेंटल बुक सर्व्हिस', 'पॅरॅमाउण्ट टॉकीज'- यांसारख्या पाट्या एकेका इमारतीवर चार चार! आणि एकेका रस्त्याला चारचारशे लटकत आहेत! यांतील एका शब्दाचाही अर्थ रस्त्यावरून जाणाऱ्या शंभरांपैकी पाचांना सांगता येणार नाही! 'मार्ट म्हणजे काय?' 'पॅरॅमाउण्ट' म्हणजे काय? 'अपोलो' म्हणजे काय?

अशा इंग्रजी नावांनी दोन मानसिक विकृती वाढीला लागतात. 'मराठी नावाच्या दुकानापेक्षा इंग्रजी नावाचे दुकान मोठे वा आधुनिक' ही पहिली विकृत कल्पना आणि दुसरी म्हणजे न समजणारा इंग्रजी शब्द हा समजणाऱ्या मराठी शब्दांपेक्षा अधिक 'मोठा' ही कल्पना!

या मनोरचनेला खेडवळ अथवा न्यूनगंडात्मक मनोरचना हे एकच नाव आहे. आणि इंग्रजीला आपल्या सामाजिक-राजकीय व्यवहारांतून हाकालल्याशिवाय आमचा हा खेडवळपणा संपणे शक्य नाही. आमचा कायदा मराठी झाल्याशिवाय, आमची वार्तायंत्रे (टेलिप्रिंटर्स) मराठी झाल्याशिवाय, आमच्या कचेऱ्या मराठीतून चालल्याशिवाय इंग्रजी संबंधीचा हा खेडवळ दबदबा संपणार नाही. राज्यकारभार भारतीय भाषांतून उत्तम चालू शकतो हे अगदी परवापर्यंत जिवंत असलेल्या संस्थांचा स्वराज्याचा ताजा इतिहास पाहिला, तरी समजून येईल. बडोदे राज्याचा कारभार सदर 'सुबोध गुजराती'त चालत होता. ग्वाल्हेरचे हायकोर्टही अगदी परवापर्यंत उर्दूमिश्रित हिंदीत चालत होते. (स्वराज्यात ते इंग्रजीत चालू लागले!) इंग्लंड-स्कॉटलंड मिळून होईल तेवढ्या मोठ्या हैदराबाद राज्याचा कारभार उर्दूत चालू होता.

सुशिक्षित महाराष्ट्र आणि अशिक्षित महाराष्ट्र यांच्यामधील परकेपणा नष्ट करणे हीच संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या प्रक्रियेतील या पुढची पायरी होय.

अनुक्रमणिका

१२. महाराष्ट्रीय समारंभातील मराठीचे स्थान

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे पुण्यात खळबळजनक आगमन झाले. त्या संदर्भात निर्माण झालेले अनेक वाद आता थंडावले असले, तरी एका वादाला अधिक काळ टिकणारे महत्त्व आहे. महाराष्ट्रात होणाऱ्या मोठमोठ्या समारंभात मराठी भाषेला कोणते स्थान असावे ? विशेषत: ज्या समारंभात अन्य प्रांतीय आणि अन्य भाषिक व्यक्तींना बहुमानाने पाचारण केले आहे अशा समारंभात समारंभाची भाषा म्हणून कोणती भाषा वापरली जावी ? केवळ मराठीतच, असे समारंभ आम्ही साजरे करणार, हा आग्रह योग्य होईल काय ?

इंदिरा गांधींच्या परवाच्या भेटीच्या वेळी पुण्यातील संस्थांनी दोन्हीही टोके गाठून दाखवली ! पुणे विद्यापीठातील समारंभात बहुतांशी इंग्रजीच वापरले गेले आणि मराठीत तर एकही वाक्य उच्चारले गेले नाही. विद्यापीठाच्या बहुतेक वक्त्यांनी इंग्रजीत भाषणे केली. त्यापैकी एकच भाषण इंग्रजीत झाले नाही, म्हणजे ते मराठीत झाले काय ? छे ! ते झाले संस्कृतात । मुख्य अतिथी इंदिराजी व समारंभाचे मुख्य यजमान जनाब अलीयावर जंग, यांना ते कितपत समजले । ...पण या ठिकाणी एक गोष्ट सांगितली पाहिजे. हा समारंभ पदवीदानाचा होता आणि पुणे विद्यापीठाच्या पदवीदानाची अधिकृत भाषा संस्कृत आहे.

त्या समारंभात आणखीही एक भाषा वापरली गेली. स्वत: पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे भाषण साफ संस्कृतप्रचुर हिंदीत झाले. म्हणजे समारंभात भाषा वापरल्या गेल्या तीन, पण मराठी भाषा मात्र वापरली गेली नाही ! यासंबंधी आमचे मित्र कवी शिरवाडकर यांनी महाराष्ट्र टाइम्समध्ये पत्र लिहून खेद व्यक्त केल्याचेही कळते. श्री. शिरवाडकर हे पुणे विद्यापीठाच्या `सिनेटचे मेंबर' आहेत. यामुळे त्यांच्या या निषेधाला अधिकच अर्थ प्राप्त होतो. तसेच `आपला कारभार मराठीत चालेल', ही पुणे विद्यापीठाची प्रतिज्ञाही या ठिकाणी आठवते.

आता याचे दुसरे टोक ! ज्या दोन तीन महत्वाच्या कार्यक्रमांकरता पंतप्रधान इंदिरा गांधी दिल्लीहून पुण्याला आल्या होत्या, त्यांपैकी एक समारंभ महाराष्ट्र साहित्य परिषदेचा होता. पुण्यातील अस्वच्छतेच्या वातावरणामुळे असो, की अन्य कारणामुळे असो, मराठी वाङ्मयेतिहासाचे खंड प्रकाशित करण्याचा हा समारंभ अखेर साहित्य परिषदेत झालाच नाही. तो झाला पुण्यातील राजभवनावर ! या समारंभात परिषदेच्या वतीने तीन वक्ते बोलले. पण तिघांनीही मराठी भाषणे वाचली. दिल्लीहून पंतप्रधानांना बोलवायचे, त्यांना सवड नाही म्हणून प्रकाशन दोन वर्षे खोळंबून ठेवायचे आणि अखेर त्यांना न समजणाऱ्या भाषेत तिन्ही भाषणे करायची, हा मराठी भाषेच्या अभिमानाचा एक अजब नमुना म्हटला पाहिजे ! इंदिराजींनी अर्थात या समारंभातही हिंदीत भाषण केले. त्यांच्या हिंदी भाषणात संस्कृत शब्द पुष्कळच असतात. पण म्हणजे त्यांना मराठी भाषण समजले असेच काही नाही. त्यावेळचे दुसरे पाहुणे अलीयावर जंग यांना कदाचित इंदिराजींपेक्षा मराठी अधिक समजत असेल. काही वर्षांपूर्वी मी हैद्राबाद येथील निजाम कॉलेज संमेलनाचा पाहुणा म्हणून गेलो असता, मला याचे प्रत्यंतर येण्याचा योग आला. त्यावेळी अलियावर जंग हे उस्मानिया विद्यापीठाचे व्हाईस चॅन्सेलर होते. "मी आपल्या भाषणास येणार आहे.'' असे जेव्हा ते मला म्हणाले, तेव्हा आश्चर्य व्यक्त केले व माझे भाषण मराठीत आहे असे सांगितले. त्यावर ते म्हणाले, "I can follow it a bit' पण ते काहीही असो, मुख्य पाहुण्यांची भाषा मराठी नसताना त्यांच्यावर 'संपूर्ण मराठी भाषणे लादणे म्हणजे मराठीचा अभिमान,' ही कल्पना बरोबर आहे काय ? तसे असल्यास मराठी न समजणारे पाहुणे वा अध्यक्ष बोलवायचेच नाहीत असे तरी ठरवून टाकाचे ! पण दिल्लीहून

कोणीतरी बोलावल्याशिवाय विद्यापीठालाच काय, पण मराठीचे आद्यपीठ असलेल्या साहित्य परिषदेलाही धन्यता वाटत नाही ! अशा स्थितीत समारंभातील भाषेचा हा प्रश्न सोडवायचा कसा ?

मला वाटते अन्य भाषिक पुढारी बोलवायचे नाहीत, हा निर्णय स्वत:चाच हात तोडून घेण्यासारखा होईल. पुण्यातील चळवळी आणि पुण्यातील समारंभ जर अखिल भारतात गाजायचे असतील, तर अखिल भारतातील पुढारी आळीपाळीने अशा समारंभास बोलावणेच फलप्रद होईल. केवळ मोठ्या अधिकारावर असलेले इंदिराजींसारखे, वा उमाशंकर दीक्षितांसारखे लोकच आज बोलावले जातात, पण जे अधिकारावर नाहीत, किंबहुना सरकारविरोधी आहेत, असे विद्वानही परप्रांतातून बोलावण्यास हरकत नाही. गुजरातचे उमाशंकर जोशी, बंगालचे सुनीतिकुमार चतर्जी, मध्य प्रदेशातील अटलबिहारी वाजपेयी, यांच्यासारखे प्रतिभावंत लोक महाराष्ट्रातील समारंभात सन्मान्य पाहुणे म्हणून जरूर बोलावले जावेत. पण त्या समारंभांची भाषा केवळ मराठी नसावी. त्यातील काही भाषणे हिंदीत ठेवता यावीत, इतका हिंदीचा प्रसार महाराष्ट्रात खासच झालेला आहे. हिंदीच्या प्रसारार्थ महाराष्ट्रात लाखो रुपये खर्ची पडलेले आहेत. पण पंतप्रधानांनी राजभवनातील समारंभात वाङ्मयेइतिहास प्रकाशन केल्यावर, त्यांचे व अलीयावर जंग यांचे दहापाच हिंदी वाक्यांत आभार मानण्याचीही योजना नव्हती हा 'मराठीचा अभिमान म्हणायचा, की मराठी साहित्यिकांचे 'हिन्दीचे अज्ञान' म्हणायचे ? मराठीचा अभिमान म्हणायचा तर साहित्य परीषदेसंबंधी माहिती देणारे एक इंग्रजी पत्रकही त्या सभेत वाटण्यात आले होते ! बरं, इंग्रजी पत्रक वाटण्याला जर हरकत नव्हती, तर त्या तीन भाषणांसारखे एक चौथे भाषण इंग्रजीत करण्याला कोणती हरकत होती ? आमच्या साहित्यिकांना इंग्रजीत भाषण करता येत नाही, ही अडचण असेल असेही वाटत नाही. कारण इतर भाषणांप्रमाणेच त्या पत्रकांतील इंग्रजी केवळ वाचण्यानेच कार्यभाग होणार होता. इतर प्रांतियांना हसू येणार नाही अशा 'ॲक्सेन्टस्' मध्ये इंग्रजी वाचण्याचीही अडचण वाटली की काय ?

पण याचा परिणाम मात्र असा झाला की, साहित्य परिषदेचा हा राजभवनातील रेखीव समारंभ म्हणजे बहिऱ्या मुक्यांचा संवाद झाला ! प्रा. रा. श्री. जोग यांच्या भाषणास काही हृदयस्पर्शी वैयक्तिक उल्लेख होते, तर काही ठिकाणी 'शिवरामपन्ती' उपरोधही होता. सभेच्या चर्येवर कोठे रोमांच उठत, तर कोठे वक्त्याच्या भेदकपणामुळे हास्यही उमटे. बिचाऱ्या इंदिराबाई समोरच्या सद्गदित वा सस्मित चेहऱ्यांकडे प्रसंगानुरुप पाहत आणि गोंधळून जात ! जणू आपल्या शेजारचे लोक एखाद्या मिष्टान्नाचा आस्वाद घेत आहेत, पण आपणास मात्र तो घेता येत नाही, असा त्यांचा चेहरा होई ! हा सर्व परिणाम मराठीच्या वेड्या अभिमानाचा म्हणायचा की, अन्य भाषांच्या खास 'महाराष्ट्रीय' अज्ञानाचा म्हणायचा ? मला वाटते, ज्या समारंभांना अखिल भारतीय स्वरूप द्यायचे असेल, त्यांतील एकदोन भाषणे तरी हिंदीत करणारे वक्ते आमच्या प्रत्येक संस्थेच्या निदान साहित्य परिषद आणि विद्यापीठ यांसारख्या विद्वसंस्थांच्या संग्रही असलेच पाहिजेत. ज्या अनेक किरकोळ दोषांमुळे महाराष्ट्र दिल्लीत आपली प्रतिमा उजळवू शकत नाही, त्यात स्वभाषेचा अभिमान आणि इतर भाषांचे अज्ञान हा प्रमुख आहे! पुण्यातील विद्वान ही स्थिती कधी लक्षात घेणार व सुधारणार?

१३. मराठी भाषा आणि वृत्तपत्रे

सुमारे वीस वर्षांपूर्वी बडोद्याच्या चौदाव्या वाङ्मय परिषदेत मी अध्यक्षीय भाषण केले त्यात वृत्तपत्रांतील भाषादोषांचा ऊहापोह केला होता. कौतुकाची गोष्ट म्हणजे बहुतेक वृत्तपत्रांनी त्या भाषणातील विचारांचे मोठ्या दिलदार वृत्तीने स्वागतच केले होते. याचे कारण वृत्तपत्रांच्या संपादकांनाही या दोषांची जाणीव असते. पण ते अनेक कारणांनी त्यासंबंधी परिणामकारक उपाययोजना करू शकत नाहीत. पण सर्वच साहित्यिक वा संपादक या प्रश्नाकडे इतक्या मोकळ्या मनाने पाहतात असे नाही.

एकदा या विषयावरील परिसंवादात भाग घेणारांत एका प्रसिद्ध दैनिकाचे उपसंपादकही होते.मला वाटते, मी अध्यक्षस्थानी होतो. संपादकांनी आपल्या वर्गातर्फे कैफियत देताना म्हटले. "या प्रोफेसर लोकांप्रमाणे आम्हाला वर्षातून सहा महिने सुट्टी नसते. रात्री बाराच्यापुढे काम करणाऱ्या पत्रकारास भाषेचा बारीक विचार करणे शक्य नसते." दुसऱ्या एका चर्चेत एका साहित्यिकांनी जी भूमिका घेतली, ती पत्रकारांना आवडेल की नाही याची शंकाच आहे. ते साहित्यिक म्हणाले, "लोक भाषा शिकतात, ती वृत्तपत्रांवरून शिकत नाहीत.सर्वमान्य Standard ग्रंथकारांकडून शिकतात." अर्थात हे मत एखादे लहान मूलही खोडून काढू शकेल. लोकांच्या, किंबहुना साहित्यिकांच्याही, नित्य वाचनात थोर ग्रंथकार नसतात. तर दैनिक वृत्तपत्रेच असतात! व सात्यत्याच्या किंवा 'Frequency' च्या परिणामामुळे दैनिकेच अधिक परिणामी ठरतात.

'अस्सल मराठी'संबंधीच्या अग्रलेखातील (सकाळ, ६ फेब्रुवारी) विचार भाषाविषयक व्यवहारवादाला धरूनच आहेत. यासंबंधातील थोडा इतिहास आणि एखाददुसरी घटना आपल्या प्रतिपादनाला पोषक ठरेल म्हणून देत आहे. कविवर्य बोरकर ज्या वाङ्मयपरिषदेचे अध्यक्ष होते, त्याच बडोदे वाङ्मयपरिषदेच्या अध्यक्षपदावरून १९५१ साली मला करावे लागलेले भाषण, वृत्तपत्रांच्या भाषेलाच वाहिलेले होते. ते भाषण करताना वृत्तपत्रांचा राग होईल अशी माझी कल्पना होती (आणि त्या परिषदेच्या संयोजकांचा राग झाल्याचेही कळते.) पण आनंदाची गोष्ट म्हणजे वृत्तपत्रांचा मात्र राग झाला नाही. सर्वांत आधी 'सकाळ'ने त्यासंबंधी अग्रलेख लिहून त्यातील विचारांना संपूर्ण दुजोरा दिला होता.

काही वर्षांपूर्वी झालेल्या चर्चेत एका विद्वानांनी, "तरुणांच्या भाषेवर परिणाम होतो तो प्रमाणभूत ग्रंथांचा होतो, दैनिकांचा नव्हे," असे प्रतिपादन केले होते. खुद्द वृत्तपत्रांची अशी कल्पना नाही ही आनंदाची गोष्ट आहे. उलट मी म्हटले होते, "प्रमाणभूत ग्रंथ तरुण मंडळी परिक्षेला नेमले असतील तरच वाचतात, दैनिके मात्र विद्वान-अविद्वान, वृद्ध-तरूण, बायका, मुले या सर्वांच्या नित्यपाठात असतात. पुण्यातील एका प्रमुख दैनिकाला त्या दैनिकातील चुकांचे प्रमाण फार वाढले आहे, असे मी कळविले होते. त्या दैनिकाने ('सकाळ'ने नव्हे) माझ्या पत्राची पोचही दिली नाही, उलट दिल्लीच्या एका इंग्रजी साप्ताहिकाने 'मातृभूमी' या नावाचे इंग्रजी स्पेलिंग चुकीचे केल्याचे केरळमधील एका वाचकाने कळविताच, पुढील अंकात खुद्द संपादकाने केलेली क्षमायाचना प्रसिद्ध झाली! सारांश, केवळ सामाजिक आणि कौटुंबिक वर्तानातच नव्हे, तर भाषेच्या क्षेत्रातही एक 'विवेकबुद्धी' (भाषिक कॉन्शस म्हणा न) तयार व्हावी लागते, नाहीतर, 'चालायचेच! काही दिवसांनी हेही रूढ होईल आणि तुम्हाला डाचणार नाही.' अशी उत्तरे ऐकू येतात. १९५० च्या मुंबई साहित्य संमेलनात याच विषयावर परिसंवाद झाला. त्यात माझे मित्र कै. ह. रा. महाजनी मला उद्देशून म्हणाले, "संपादकांच्या हाताखाली काम करणारे लोक तुम्ही कॉलेजमधील प्रोफेसरांनीच पढवून पाठविलेले असतात. तेव्हा दोष तुमच्याकडेच येतो."

अनुक्रमणिका

पण हा प्रश्न एकमेकांवर दोष परतविण्याचा नाही. तसेच केवळ वृत्तपत्रेच भाषादोष रूढ करतात असेही नाही. पण वृत्तपत्र हे प्रसाराचे मोठे साधन आहे, हे एकीकडे अभिमानाने मान्य केल्यावर, भाषादोषांचा प्रसारही त्यातूनच अधिक होणे शक्य आहे, हे अमान्य करता येणार नाही. वृत्तपत्रांतील भाषादोषांची कैफियत मी पत्रकारांहूनही अधिक जोराने व तळमळीने देऊ शकेन. वृत्तपत्रांतील लिखाण फार घाईने लिहावे लागते, ही पहिली गोष्ट; आणि भाषादोष वृत्तपत्राच्या ज्या विभागात मुख्यतः होतात, तो विभाग मूळ इंग्रजी तारांवर अवलंबून असतो, ही दुसरी गोष्ट. पण हा प्रश्न दोषांच्या समर्थनाचा नसून दोष टाळण्याचा आहे.आणि दोष टाळण्याची पहिली पायरी म्हणजे त्या दोषांकडे डोळे उघडून पाहणे ही होय. पण तेच टाळले तर पुन:पुन्हा तेच सदोष शब्द व प्रयोग वाचण्यात आल्याने ते बरोबर वाटू लागतात. म्हणून पुन:पुन्हा ते दोष दाखविण्याचे अप्रिय काम करावे लागते. यातील कित्येक भाषादोषांचे जनक वृत्तपत्रकार नसून अन्य क्षेत्रांतील साहित्यिक वा विद्वान आहेत, याची मला जाणीव आहे. पण त्या दोषांचा प्रसार मात्र वृत्तपत्रांतून होतो. कारण वृत्तपत्रे लोकांच्या नित्य पाठात असतात. दोषप्रसाराचे काम अलीकडेच वृत्तपत्रांहूनही रेडिओ अधिक समर्थपणे करू लागला आहे! कारण वृत्तपत्रे फक्त लिहू शकतात, उच्चार करून दाखवू शकत नाहीत. रेडिओला तोही अधिकार नाही!

मराठी साहित्याचा उत्तरोत्तर विकास होत आहे किंवा नाही हा वादाचा विषय होऊ शकेल. परंतु मराठी वृत्तपत्रांनी बोजड, दुर्बोध आणि अन्य भाषांचा प्रभाव असलेली मराठी भाषा वापरण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः संस्कृत, इंग्रजी, हिंदी या भाषिक शब्दांचे अनुकरण होत असल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रभाषेचा अभिमान प्रत्येकाला असावा परंतु तेवढ्यासाठी स्वभाषेच्या अस्तित्वाला धक्का देणे समर्थनीय ठरणार नाही. किंवा अन्य भाषांचा मराठी शब्दांबरोबरचा वापरही संयुक्तिक नाही. वृत्तपत्राचा वाचक हा सामान्य असतो. तो जास्त सुशिक्षित असेलच असे नाही. परंतु तरुण लेखकांना आणि वृद्ध संपादकांना नेमक्या ह्याच जाणिवेचा विसर पडतो आणि व्यापक व जाडे भरडे (भारदस्त) शब्द शोधून वापरण्याचा ते प्रयत्न करतात. मग ते शब्द मराठीतील असोत, वा इंग्रजीतील असोत त्याचा विचार त्यांच्या मनात नसतोच. आयात-चोरांच्या धरपकडीला सुरुवात झाल्यापासून इंग्रजी शब्दांचे अनुकरण करून 'मिसा खाली अटक'अशी शीर्षके वृत्त पत्रांतून दिसू लागली.'मिसा' चा अर्थ विद्वान प्राध्यापकांनाही जेथे माहीत करून घ्यावा लागतो तेथे सामान्य वाचकांची काय कथा? कदाचित प्रतिशब्दाचा हव्यास सोडून काही वेगळ्या शब्दांत सांगण्याचा प्रयत्न केला तरच ते वाचकांना समजू शकेल.

वृत्तपत्राचा वाचकवर्ग अन्य वाङ्मयीन वाचकवर्गापेक्षा संख्येने मोठा असतो. म्हणजे, वृत्तपत्रातील छापलेले शब्द बहुसंख्य वाचक वाचतात. ते शब्द त्यांना माहीत होऊन रूढही होतात. म्हणून सर्व वृत्तपत्रांनी सुबोध आणि अचूक शब्द वापरण्याची दक्षता घेतली पाहिजे. मराठी भाषेचे रक्षण करण्याच्या दृष्टीने तर अन्य भाषिक शब्द टाळले पाहिजेत. इंग्रजी वा इतर भाषांची रूपांतरे काळजीपूर्वक केली पाहिजेत. 'वक्ता' न लिहिता 'प्रवक्ता' लिहिणे व प्रदर्शन, दिग्दर्शन, निदर्शन यांसारखे शब्द वृत्तपत्रात वापरण्याने अर्थाचा गोंधळ वाचकांच्या मनात तयार होतो. हा उपद्व्याप वृत्तपत्रांनी टाळला पाहिजे. अनेक पर्यायी शब्दांपैकी चांगले सुटसुटीत व सुबोध शब्दच वृत्तपत्रात वापरण्यात यावेत. अवजड, बोजड शब्दरचना अलंकारिक भाषा बनविण्याच्या कमी एकवेळ मान्य करता येईल; पण बहुसंख्यांना समजणे आवश्यक आहे अशीच मराठी भाषा वृत्तपत्रांनी वापरली पाहिजे. 'लोकमान्य टिळकांची बंधमुक्तता' या शीर्षकाचा वाचकांना अर्थबोध होणार नाही म्हणून स्वतः टिळकांनीच वरील अग्रलेखाचे शीर्षक 'टिळक सुटले' असे लिहिल्याचे उदाहरण आहे.

'महत्त्वपूर्ण' हा हिंदी शब्द! पण आजही आपण महत्त्वपूर्ण कार्यक्रम किंवा महत्त्वपूर्ण निर्णय अशा अर्थाने हा शब्द वापरतोच. यामुळे मराठी भाषेचे स्वतंत्र अस्तित्व टिकेल की नाही कुणास ठाऊक! भाषा जितकी कृत्रिम, पंडिती वळणाची होईल तितकी ती बहुजन समाजापासून दूर जाईल. या उलट भाषेला सुबोधता आली तरच त्या भाषेची वृद्धी होईल. स्वभाषेच्या प्रकृतीचे सूक्ष्म ज्ञान व त्या भाषेतील अन्य शब्दांची रूपे बनविण्याचे ज्ञान भाषांतरकाराला आवश्यक आहे. आज अद्यावत, नेत्रदीपक यांसारखे अशुद्ध व अर्थशून्य शब्द बाहेर पडताहेत.

मासिकांची वाढती संख्या, ग्रंथांची तिरंगी वेष्टणे, वृत्तपत्रांचा प्रचंड खप आणि नवीन शब्दांची अखंड टांकसाळ एवढ्या बाह्य आणि संख्यात्मक पैदाशीकडे पाहून चालणार नाही. याशिवाय निकोप वाढीची बीजे ही तपासली पाहिजेत. आज शब्दांच्या अन्वर्थकतेपेक्षा अपरिचिततेलाच अधिक तेजी आहे. अन्य भाषिक शब्द मराठी भाषेला अपरिचित असल्याने तो स्वीकारणेच घातक आहे. उदा, गुजरातीतील 'साक्षर' हा शब्द ज्या अर्थी वापरला जातो त्याच अर्थाने मराठीत तो आपण वापरतो. म्हणून गुजरात व महाराष्ट्राचे ऐक्य साधू पहाणारे काही महाभाग आहेत.

भाषेत नव्याने शिरलेले अशुद्ध व बोजड शब्द कोशाच्या मदतीने काढून टाकता येतील पण उच्चाराच्या शुद्धतेचा ऱ्हास एकदा झाला की त्याची शुद्धता करणे कठीण. तेव्हा 'निकोप गद्य आणि स्वाभाविक सुगम शब्दसंग्रह' ह्या वृत्तपत्रांच्या प्राथमिक गरजा होत. हा विषय आज पुन्हा काढल्यावर, अनेकदा सदोष म्हणून दाखविले असूनही जे शब्द मराठीत रूढ होत आहेत, त्यांची तापदायक आठवण होणे अपरिहार्य आहे. असा एक ठळक शब्दप्रयोग म्हणजे 'नमस्ते' हा होय. नमस्ते याचा अर्थ "तुला नमस्कार" असा आहे. वडिलांना, गुरूंना, किंवा मान्यवर पुढाऱ्यांना 'नमस्ते' म्हणजे चुकीचे होय. उदाहरणार्थ, इदिराबाईंना किंवा मुरारजीभाईंना नमस्ते म्हणणे, म्हणणे "अरे मुरारजीभाई, किंवा अगे इदिराबाई, तुला नमस्कार!" असे म्हणण्याइतके हास्यास्पद होय. पण हिंदीतील चुकीचे शब्दप्रयोग पटकन उचलण्याची जी प्रवृत्ती आज बळावली आहे, तिच्यामुळे हा शब्दप्रयोग मराठीत रूढ होत आहे. अर्थात या शब्दापुरता तरी दोष वृत्तपत्रांकडे नसून राजकीय सभासंमेलनांकडे आहे. अनेक शब्द केवळ हिंदीच्या संसर्गाने आणि नावीन्यासंबंधीच्या अडाणी आवडीमुळे रूढ होत आहेत. त्याहून वाईट म्हणजे रूढ मराठी शब्द मरत आहेत!

नुसते शब्दच नव्हेत, तर वाक्प्रचार आणि प्रयोगही चुकीचे रूढ होत आहेत.'शेख अब्दुल्ला यांच्यावर हद्दपारीचा आदेश...ठेवण्याकडेच बहुतेकांचा कौल', 'महाराष्ट्र सर्व चाळीस जागा लढविणार", "बार्शीचे नवले 'सर्व' प्रथम." "मिश्र संकराच्या (?) गाईची प्रतिकृती," यांतील बहुतेक अवतरणे विविध दैनिकांतील जाड ठशाच्या मथळ्यांतून घेतली आहेत. 'ठेवण्याकडे कौल', 'यांच्यावर आदेश' यांत वाक्प्रचाराच्या चुका आहेत व आदेश व कौल यांचेही उपयोग बरोबर नाहीत. लेखकाने 'कल' ऐवजी 'कौल' वापरला आहे, अशी शंका येते! 'सर्व चाळीस जागा' हे 'All the forty seats' यांचे शब्दशः, पण मराठीशी विसंगत असे भाषांतर आहे. मराठीत 'चाळीसच्या चाळीस' असे म्हणतात. जाड ठशाच्या मथळ्यात जागेची बचत करावी लागते, हे मला माहीत आहे. पण म्हणून मराठीशी विसंगत भाषांतर क्षम्य ठरत नाही. जागेची बचत करूनही वेगळे भाषांतर करता आले असते. 'परिक्षेत पहिला आला' याऐवजी 'सर्वप्रथम' हा शब्द वापरण्याइतके हास्यास्पद तर काहीच नाही. 'पहिला' या शुद्ध मराठी शब्दाचा अर्थही 'सर्वांत पहिला' हाच आहे. शिवाय 'पहिला येणे' हा 'वाक्प्रचार' (Idiom) आहे. परीक्षेत प्रथम येणे असा 'वाक्प्रचार' नाही.

अनुक्रमणिका

अलीकडे ‘समर्थन’ या शब्दाचा उपयोगही हिंदीच्या अकारण अनुकरणाने मराठीशी विसंगत असा होऊ लागला आहे. निवडणुकीत धारीयांचे किंवा म्हाळगींचे ‘समर्थन करणे’ हा प्रयोग बरोबर नाही. हिंदीत ‘समर्थन’ हा शब्द ‘पाठिंबा’ या अर्थी वापरत असले, तरी मराठीत ‘समर्थन’ याचा अर्थ वेगळा आहे. एखाद्या दोषाचे, मताचे, किंवा दुर्वर्तनाचे समर्थन, असे मराठीत म्हणतात. पण निवडणुकीत ‘एखाद्याचे समर्थन’ असे म्हणत नाहीत. इंग्रजी Support करणे आणि Defend करणे या दोहोत जो फरक आहे तोच हिंदीतील समर्थन आणि मराठीतील समर्थन यात आहे. वाक्प्रचार किंवा Idiom हा भाषेचा गाभा होय. त्याला धक्का लावून राष्ट्रभाषेची जवळीक करणे हा तोट्याचा सौदा होय. हिंदीतील ‘निंदा’ या शब्दाचा उपयोग अलीकडे मराठीत काही वृत्तपत्रे जसाच्या तसा करू लागली आहेत. उदा. “कोणत्याही लोकशाही प्रेमी व्यक्ती या कारवायांची निंदाच करतील” अशा ठिकाणी आपण ‘निषेध’ हा शब्द वापरतो. ‘निंदा आणि ‘निषेध’ या दोन शब्दांना मराठीत दोन वेगळे अर्थ आहेत. हिंदीतील अर्थाने निंदा शब्द मराठीत वापरणे म्हणजे भाषेची नासधूस होय!

‘रायगडाला जेव्हा जाग येते’ ही रचना इंग्रजीत बरोबर असेल, पण मराठीत चूक आहे. ‘जेव्हा-तेव्हा’ यातील एक अध्याहृत ठेवायचे असेल तर इंग्रजीत ‘Then’ ठेवले जाते, तर मराठीत ‘जेव्हा’ अध्याहृत ठेवता येते. अशा अनेक इंग्रजी रचना आता दुरुस्त करण्याच्या पलीकडे गेल्या आहेत. हिंदी अल्पवयात शिकल्याने कोणत्या चुका शिरत आहेत याचा विचार मी संमेलनाध्यक्षीय भाषणात प्रथम १९५९ मध्ये केला व त्यानंतर अनेक लेखांतून, व्याख्यानांतून केला आहे. वृत्तपत्रातील चुकांचे प्रमुख कारण घाईने करावे लागणारे भाषांतर हे तर आहेच, पण शिवाय इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांचे अपुरे ज्ञान, हेही आहे. दिल्ली येथील एक रेडिओ अधिकारी पुणे रेडिओवर आले असता, त्यांनी माझ्या तक्रारीला ‘दोन्ही भाषांचे चांगले ज्ञान असलेली माणसे मिळत नाहीत’ असे उत्तर दिले होते. लायक माणसे असून निवड मात्र अयोग्य माणसांची होते हेही शक्य आहे! वृत्तपत्रांच्या अग्रलेखाच्या पानांपेक्षा वार्तांच्या पानात अशा चुका अधिक असतात हे साहजिकच आहे.

प्रचलित भाषा-दोषांचे मूळ असे अनुकरणाच्या प्रवृत्तीत आहे. तसेच नाविन्याच्या हव्यासातही आहे. कधी कधी यातील कित्येक दोष भाषाशुद्धीच्या म्हणजे परकीय शब्द टाळण्याच्या पुण्यकर्मातही जमा होतात. या सर्व प्रवृत्तींचा सविस्तर विचारही वेगवेगळ्या प्रसंगांच्या निमित्ताने वेगवेगळ्या जागी केला आहे. या लहानशा लेखात केवळ पुन्हा एकदा या विषयाकडे लक्ष वेधणे एवढाच उद्देश आहे. दोष, केवळ शब्द आणि वाक्प्रचार यांच्या बाबतीतच होतात असे नव्हे. काही वृत्तपत्रांत वाक्यरचनेतील ढिसाळपणाही दिसून येतो. अर्थात तो बहुधा वार्तांच्या स्तंभात असतो. आज ‘वृत्तपत्रविद्या’ हा विद्यापीठातला स्वतंत्र विषय झाला आहे. त्यांत केवळ संपादन, सजावट, वार्तांची निवड यावरच भिस्त ठेवून चालणार नाही. नित्याच्या वृत्तपत्रीय भाषेत जे दोष व जो सैलपणा शिरत आहे त्यावरही विद्यापीठांतील वृत्तपत्र – विभागाचे लक्ष हवे, दैनिकांचे ज्येष्ठ संपादकही मनात आणतील तर हे दोषनिर्दालनाचे काम करू शकतील. वर उद्‌धृत केले आहेत, तसे शेकडो दोष दाखविता येतील. मराठी गद्याच्या विकासात सकस, शुद्ध आणि नेमक्या (Precise)शब्दप्रयोगाचा विकास वृत्तपत्रांनीच केला आहे. त्याच गद्याची अवनती केल्याचे पाप वृत्तपत्रांकडे येऊ नये!

१४. आजची मराठी भाषा : वाढ आणि बिघाड

इंग्रजीच्या संपर्कापूर्वी मराठी गद्य सामान्यतः बखरी आणि पत्रव्यवहार यांच्यापुरतेच मर्यादित होते.त्यापूर्वी महानुभव लेखकांनी त्याचा सांप्रदायिक वाङ्मयाकरिताही उपयोग केलेला होता. इंग्रजी संपर्कानंतर,गद्य हेच प्रमुख वाङ्मयीन माध्यम बनले. चरित्रे, इतिहास, कादंबऱ्या, नाटके, इत्यादी वाङ्मयप्रकार त्यात वाढीला लागले. सार्वत्रिक शिक्षणाबरोबर पाठ्यपुस्तकेही तयार होऊ लागली. सर्वांच्या नित्याच्या वाचनात येणाऱ्या साप्ताहिकांत, मासिकांत व दैनिकांत मराठी भाषेचा जो उपयोग होऊ लागला, त्याने भाषेच्या विकासावर विशेषच परिणाम केला.

या नियतकालिक वाङ्मयाच्या द्वारेच सामाजिक आणि राजकीय चळवळीचे पोषण होत असल्याने, त्याचे महत्त्व ग्रंथगत गद्याहूनही अधिक वाढले. साप्ताहिकांतील व दैनिकांतील या गद्यविकासाचा वेग १९२० पर्यंत म्हणजे पहिल्या महायुद्धाच्या अंतापर्यंत मर्यादित होता. त्यानंतर तो अधिक वाढला व दुसऱ्या महायुद्धानंतर, म्हणजे १९४६ नंतर तो फारच झपाट्याने वाढला. वाचक व नियतकालिके यांच्या वाढीबरोबरच अनेक शास्त्रांचा व राजकीय चळवळींचा संपर्कही भाषेवर परिणाम करीत होता. मार्क्सवाद, गांधीवाद, मनोविश्लेषण, विज्ञान आणि यंत्रशास्त्र या सर्वांमुळे नियतकालिक लिखाणात शेकडो नवे विचार आणि शब्द येत होते. त्या मूळ इंग्रजी कल्पनांचे मराठीत प्रकटीकरण करण्याचा ताण सर्वाआधी वृत्तपत्र व्यवसायातील लोकांवर पडत होता. ग्रंथातील राज्यशास्त्र, मानसशास्त्र व विज्ञान विद्यापीठांद्वारे लोकांपुढे येण्याआधीच वृत्तपत्रातील वार्तांच्या निमित्ताने त्यातील परिभाषा तयार करण्याचे काम उपसंपादकांना करावे लागत होते. १९२० ते १९४५ आणि १९४५ ते १९६५ या दोन कालखंडात जे शेकडो, नव्हे हजारो शब्द आणि वाक्प्रचार मराठीत नव्याने तयार झाले, ते वृत्तपत्रांच्या कचेरीत व वृत्तपत्रांच्या घाईत तयार झालेले आहेत हे लक्षात घेतले पाहिजे व त्याबद्दल वृत्तपत्रांचे आभार मानले पाहिजेत .

भाषाशास्त्र, भाषेच्या घटनेचे व भाषेत होणाऱ्या बदलांचे अवलोकन करते व त्यातील शास्त्रीय प्रवृत्तींची नोंद करते. परंतु जेव्हा शास्त्रांच्या, राजकारणाच्या व सामाजिक प्रगतीच्या दडपणामुळे भाषेत शेकडो नवीन शब्द आणि वाक्प्रचार एकदम रूढ करण्याची गरज निर्माण होते, तेव्हा त्यांकडे एक नैसर्गिक बदल म्हणून पाहणे योग्य होणार नाही. होणारे बदल समर्पक, सुबोध आणि सुंदर आहेत की विपर्यस्त, दुर्बोध आणि बेडौल आहेत, हे पाहणेही भाषाशास्त्राचे काम आहे. आमचे क्षेत्र केवळ descriptive आहे, असे म्हणून भाषाशास्त्राज्ञ तटस्थ राहू शकत नाहीत. आजकाल भाषाशास्त्राज्ञ मंडळींना आपले नाते अभिरुचिप्रधान सौंदर्यशास्त्राशी नसून Anthropology, समाजशास्त्र, यांसारख्या रुचिनिरपेक्ष रुक्ष शास्त्रांशीच काय ते आहे, असे समजण्यात अभिमान वाटतो. पण शैलीविचार आणि भाषाशास्त्र यांची फारकत करणे अनैसर्गिक व अशास्त्रीय आहे, हे अलीकडे पाश्चात्य भाषाशास्त्राज्ञांना जाणवू लागले आहे. आजकाल परिभाषासमित्या नेमताना आमच्या शासनाची अशी कल्पना दिसून येते की, हे क्षेत्र केवळ भाषाशास्त्राज्ञांचे आहे. परंतु नवीन शब्द आणि वाक्प्रचार रूढ करताना शास्त्राच्या ज्ञानाबरोबरच सौंदर्याची दृष्टीही नसेल, तर भाषा बोजड, अर्थहीन आणि कुरूप बनेल. नियतकालिकांमुळे आज भाषेचा असा प्रचंड विकास होत आहे, तसेच तिचे स्वरूप बिघडूनही जात आहे. 'जे चांगले असेल तेच टिकेल' ही भूमिका म्हणजे वस्तुस्थितीकडे केलेली अक्षम्य डोळेझाकच होय. अनेक चुकीचे शब्द, चुकीचे प्रयोग, अर्थशून्य शब्द, बेढब शब्द यांची मराठीत प्रतिवर्षी शेकड्यांनी भर पडत आहे. मी असे शेकडो प्रयोग टिपून ठेवले व अखेर वैतागून अडगळीत फेकले. आणि तरीही आज पुन्हा मजजवळ असे शेकडो प्रयोग टिपलेले आहेत. ह्यावरून काढलेले निष्कर्ष असे-

१)शब्दांच्या लिंगांसंबंधी साशंकता. २) सामान्यरूप वापरण्यासंबंधी घाबरटपणा. ३) सर्वनामांचा इंग्रजीच्या धर्तीवर उपयोग. ४) कर्मकर्तरीप्रयोग उठल्या सुटल्या वापरण्याचा हव्यास व त्यामुळेच – ५) अकर्मक क्रियापदांचाही कर्मकर्तरी (passive) प्रयोग करणे. ६) अकारण आणि अनाधिकृत नवीन शब्द (Neologism) तयार करणे. ७) इंग्रजी प्रयोग मनात धरून लिहिताना अर्थशून्य मराठी लिहिणे. ८) संस्कृतचे अज्ञान व संस्कृतचा हव्यास, हे दोन दोष एकत्र येण्याने अशुद्ध असूनही पंडिती असलेली भाषा लिहिणे. ९) हिंदीच्या वळणावर लिहून आणखी वेगळ्या प्रकारच्या चुका भरीस घालणे.

पुढे दिलेल्या अगदी थोड्या नमुन्यांवरून चालू भाषादोषांची कल्पना येईल. "ती लेणी अजंठा लेणीहून पुरातन" (आहेत) (सामान्यरूप). "पुण्याच्या आसपास हवा कोरडी होती; इतरत्र ती तशीच होती." (मुंबईस पाऊस पडला, पुण्यातही तो पडला.) (सर्वनामाचा उपयोग इंग्रजी धर्तीवर) "आज कदान्नही मिळणे कठीण, तेथे...फलाहार, दुग्धाहार यांचे मांडे मनातच जिरतात." (वाक्प्रचाराच्या चुकीचा उपयोग.) "ही प्रथा पन्नास वर्षे जुनी आहे." (इंग्रजी प्रयोग). "माओविरुद्ध उठावणी" (चिथावणींच्या धर्तीवर नवा शब्द; रूढ शब्द 'उठाव'). "त्या काळी विद्यालये नव्हती; ते म्हणून पदवी घेऊ शकले नाहीत." (विद्यालयाऐवजी 'विद्यापीठे' हवे; 'ते म्हणून' या ऐवजी 'म्हणून ते' असे हवे. 'ते म्हणून'चा अर्थ, त्यांच्या ऐवजी दुसरा कोणी असता तर अन्य प्रकार घडता, असा होतो. हल्ली हा चुकीचा प्रयोग मुंबईच्या काही गटांची जोराने चालू केला आहे. यात फक्त 'He therefore' या इंग्रजी वळणाचे अंध अनुकरण आहे!) "कोल्हापूर गादीबद्दल अनुद्गार काढले नाहीत" (Neologism चे अजब उदाहरण!) हे दोन प्रकार एकदुसऱ्यांशी संलग्न आहेत" ("एकमेकांशी" असे हवे. हिंदीचे अनुकरण). "सर्व दहा हजार मजूर सामील." ('दहा हजारच्या दहा हजार' असा खरा वाक्प्रचार).

"नर्सने पोलिसांची गाडी पाहताच ओरड मारली व ती तेथेच कोसळली." पहिली चूक स्पष्ट आहे. 'कोसळणे' हे collapse याअर्थी वृत्तपत्रांनी रूढ केले आहे. 'कोसळणे' हा शब्द 'उंचावरून पडणे' या अर्थीच फक्त वापरणे बरोबर होईल. collapse मध्ये तसा अर्थ नाही. वरील सर्व प्रयोग व शब्द, पुणे-मुंबई येथील वृत्तपत्रे व रेडिओ भाषणे यांतून घेतले आहेत. माझ्या संग्रही वृत्तपत्रांची नावे व तारखा आहेत. यांतील सर्वच रूढ झाले नाहीत. तरी सदोष, बेडौल व अर्थशून्य भाषा आज मोठ्या प्रमाणावर लिहिली जात आहे, हे सिद्ध करण्यास ते पुरेसे आहेत. असे प्रयोग केवळ वृत्तपत्रांतच राहतात असे नव्हे. ग्रंथकार व व्यासपीठावरील वक्ते यांच्या भाषेवर त्यांचा मोठाच परिणाम होतो आहे.

अनुक्रमणिका

१५. स्वतंत्र हिंदुस्थानची भाषा आणि लिपी

स्वतंत्र हिंदुस्थानची भाषा आणि लिपी लवकरच ठरविली जाईलसे दिसते. वास्तविक हा प्रश्न अगदी नवा आहे असे नाही, बरीच वर्षे या प्रश्नाचा तज्ज्ञांच्या दृष्टीने आणि राष्ट्रीय भूमिकेवरून विचार चालू आहे. इंग्रजीला यापुढे स्थान नाही; प्रांताप्रांतातील व्यवहाराला व अखिल भारतीय कामकाजाला भाषा तर हवी आहे. आजच या भूमिकेवर ज्या भाषेला महत्त्व आले आहे, अशी एक लवचिक, म्हणजे बऱ्याचशा स्थानिक रुपभेदांनी वापरली जाणारी, भाषा उपलब्ध आहे. अर्थात ती भाषा, म्हणजे हिंदुस्थानी भाषा, ही उद्याची राष्ट्रभाषा होणे अपरिहार्य आहे.

या उघड गोष्टीतही कित्येकांचे काही गैरसमज आणि दुराग्रह दिसून येतात. उदाहरणार्थ, अखिल हिंदुस्थानची राष्ट्रभाषा याचा अर्थ कित्येकदा काही लोक आजच्या प्रांतिक भाषांना वाङ्मय क्षेत्रातूनही हुसकावून लावणारी भाषा असा घेतात. आणि मग आमच्या मराठीचे काय होणार?-बंगाली मरेल काय? यांसारखे प्रश्न उपस्थित करतात. पण इंग्रजीसारख्या परकीय राजाश्रय असलेल्या भाषेमुळेही ज्या भाषा मेल्या नाहीत, उलट फोफावल्या, त्या भाषांना हिंदुस्थानीचे भय बाळगण्याचे कारणच नाही. ज्या क्षेत्रात गेली शंभरसवाशे वर्षे इंग्रजीखेरीज व्यवहार होत नसे, त्या क्षेत्रांतच हिंदुस्तानीचा वापर होत असल्याने, प्रांतिक भाषांच्या भवितव्याला धोका नाही.

शिवाय, राष्ट्रभाषेसोबत आतापर्यंत वेळोवेळी विचारपूर्वक निर्णय घेण्यातही आले आहेत. कॉंग्रेस वर्किंग कमिटीने १९२१ सालीच हिंदुस्तानीचा, आपल्या कारभाराची अधिकृत भाषा म्हणून, स्वीकार करण्याचा ठराव केला. त्यानंतर चार वर्षांनी कॉंग्रेस आपल्या घटनेतच या निर्णयाचा अंतर्भाव केला. पण त्यानंतरही या भाषेच्या स्वरूपासंबंधी व लेखनसाधनासंबंधी वाद चालूच होता आणि ते स्वाभाविकही होते. अनेक प्रांतांना आणि समाजांना समजणारी भाषा हेच या भाषेचे वैशिष्ट्य असल्याने, तिच्या स्वरूपात व लेखनप्रकारातही विविधता होती. त्यांतील कोणत्या प्रकारास राष्ट्रीय मान्यता द्यायची हा महत्त्वाचा प्रश्न होता. १९३८ साली कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीने एक ठराव करून या बाबतीतही मार्गदर्शन केले. "उत्तर हिंदुस्थानच्या बहुसंख्य प्रजेच्या वापरांत जी हिंदुस्थानी उर्फ 'खडी बोली' आहे, ती भाषा म्हणजे कॉंग्रेसने मंजुरी दिलेली भाषा." असेही स्पष्ट करण्यात आले.

उरता उरला प्रश्न लिपीचा. त्याही बाबतीत कॉँग्रेसने प्रथमपासूनच 'दोन्ही लिप्यांत लिहिली जाणारी (Written in both scripts) असे पुन:पुन्हा म्हटले आहे. अर्थात हे धोरण थोडे गैरसोयीचेही होते आणि थोडे विसंगतही होते. संबंध राष्ट्राला समजण्यासारखी एक भाषा स्वीकारायची ठरल्यानंतर तिला लिप्या दोन कशाला? समजा उद्या इंग्रजी भाषा हीच आंतर-प्रांतीय व्यवहाराची भाषा करावयाची असे ठरले; तर ती उर्दू लिपीतही लिहावी असा पर्याय थोडाच देता येईल? मग हिंदुस्थानीच्या बाबतच हा पर्याय कशाला? आणि तो पर्याय देऊनही द्राविडी भाषासमूहाची पुन्हा गैरसोय राहते ती राहतेच. मुसलमानांना देवनागरी शिकण्याचा खटाटोप नको म्हणून उर्दू लिपीला स्थान दिले. मग तामिळ, तेलुगु, कानडी, मल्याळी या भाषा बोलाणारांची या सर्व व्यवस्थेत सोय कोणती? हिंदुस्थानी भाषाही त्यांना कळत नाही; आणि देवनागरी लिपी ही त्यांची लिपीही नव्हे.

पण हिंदुस्थानी भाषेत उर्दू आणि हिंदी यांचे मुळातच मिश्रण असल्याने, ती भाषा दोन्ही लिप्यांत लिहिल्यास तिचीही दुहेरी चाल पुढेही चालू राहील; आणि हिंदू व मुसलमान या दोघांनाही 'आपली'

वाटणारी भाषा त्यातून वाढीला लागेल अशी ही विचारसरणी होती. आणि द्राविडी प्रांतसमुहाविषयीच विचार करावयाचा म्हटल्यास, त्यांना उत्तरेकडची एखादी भाषा शिकल्याखेरीज चालण्यासारखेच नसल्याने; व देवनागरी लिपी त्यांना संस्कृतकरता तरी शिकावी लागतच असल्याने देवनागरीत त्यांचीही सोय होते, असे मानण्यात आले.

अखिलराष्ट्रीय तडजोड म्हटल्यावर ती अशीच असायची; आणि ती बहुधा अखिल हिंदुस्थानने मान्यही केली असती. पण आज प्रश्न वेगळाच उपस्थित झाला आहे. ज्या एका राष्ट्रीयत्वाखातर आपण भाषेच्या आणि लिपीच्या बाबतीत तडजोड केली त्या एकराष्ट्रीयत्वावर आपण आपल्या हातानेच उदक सोडले आहे. मग आता पुन्हा लिपीबाबत तडजोड कशाकरिता? व्यवहारात हिंदी आणि उर्दू यांच्या मिश्रणामुळे सुगम ठरणारी हिंदुस्थानी वापरणे हे सोयीचे आहे. पण उर्दू लिपीलाही सरकार मान्यता देऊन प्रत्येक ठिकाणी दुहेरी दप्तर – सरकारी कचेऱ्यांवर, रेल्वे स्टेशनवर. दुहेरी पाट्या हा द्राविडी प्राणायाम कशाला? आणि थोडी हास्यकारक विपरीतता (Comic Irony) म्हणायची ती ही की प्रत्यक्ष द्राविडी प्रांतसमूहाला अडचणीत पाडून मुसलमानांच्याकरता हा 'द्राविडी' प्राणायाम करावयाचा आहे!

अलाहाबाद येथील हिंदुस्तानी कल्चर सोसायटीच्या पंडित सुंदरलाल आणि डॉ. ताराचंद यांनी घटना समितीस जे अधिकृत पत्र पाठविले आहे, त्यात ते या करुणास्पद विपरीततेसंबंधी (Tragic irony संबंधी) म्हणतात- "त्यानंतर असे ठरले की, हिंदुस्तान व पाकिस्तान ही दोन वेगळी राज्ये व्हावी. या नव्या व्यवस्थेमुळे अनेक हिंदू मुसलमान देशभक्तांच्या मनाला दु:ख झाले. काही हिंदू मिश्रांनी,साहजिकच असा ओरडा करण्यास सुरवात केली की दोन लिप्यांत लिहिल्या जाणाऱ्या हिंदुस्तानी ऐवजी एक लिपीत-म्हणजे देवनागरीत- लिहिली जाणारी हिंदी हीच या फाळणीनंतर आता राष्ट्रभाषा व्हावी आणि म्हणून आम्हाला हे पत्र आपणास (घटना समितीच्या सभासदांस) उद्देशून लिहावे लागत आहे."

बहुसंख्य लोकांना कळणारी; आणि मानवी वाणीतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक वर्णोच्चाराला चिन्हबद्ध करणारी, जगद्विख्यात देवनागरी लिपी असताही अशास्त्रीय आणि अवघड अशा उर्दू लिपीस स्थान का द्यावयाचे ठरविले? तर देशातील दुफळी टाळण्यास त्यामुळे मदत होईल म्हणून! आता दुफळी प्रत्यक्ष सृष्टीत उतरल्यावर पुन्हा उर्दू लिपीचा उपद्व्याप कशाला? हिंदुस्थानी कल्चर सोसायटीच्या विद्वान अधिकाऱ्यांनी घटनासमितीतील 'भारत-भाग्यविधात्यां' ना उद्देशून लिहिलेल्या पत्रात यासंबंधी स्पष्ट खुलासा आहे. अद्याप एकराष्ट्रीयत्वाची आशा आपण सोडलेली नाही; तसेच जावापासून तुर्कस्तानपर्यंतच्या बाहेरच्या जगाशी व्यवहार करण्यास अरबी लिपीचा अधिक उपयोग आहे. हिंदुस्थानातही अद्याप पाच कोट मुसलमान बांधव आहेत; आणि फाळणीकरिता जेव्हा दोन्ही समाजांचे पहिल्या दर्जाचे पुढारी एकत्र बसले, तेव्हा, दोन्ही राज्यांतील अल्पसंख्य समाजांचे हक्क रक्षण करण्याचे त्यांनी वचन दिले आहे. या सर्व परिस्थितीचा उल्लेख या पत्रात केला आहे.

वास्तविक आज हिंदुस्थान-सरकारपुढे भाषा, लिपी, राष्ट्रीय पेहेराव, ग्रामपंचायत, यांचा प्रश्न नसून, लोकांना अन्नवस्त्र; पाकिस्तानातील घरे दारे सोडून आलेल्या लाखो लोकांची सोय; सरहद्दीचे रक्षण; आणि पाकिस्तानातील अल्पसंख्य जमातीतील पुरुषांची कत्तल आणि स्त्रियांची बेइज्जत थांबविणे; आणि त्यामुळेच हिंदुस्थानातही त्याचा सूड म्हणून होणारे भीषण प्रकार थांबविणे, हा आहे.

अशा वेळीच भाषा आणि लिपी यांचा प्रश्न विचारात घेण्याची घाई का? ब्रिटीश राजवटीच्या अनेक निशाण्या आज कायम आहेत. इंग्रजी भाषा देखील केवळ ठराव केल्याने आजच पूर्णपणे नष्ट होईलसे नाही. आणि या बंडाळीच्या काळातच हा प्रश्न सोडवून घ्यायचा असा मानस असल्यास, जुनीच विचारसरणी घोकण्याने आता भागण्यासारखे नाही, ही गोष्ट या उदारमतवाद्यांनी लक्षात घेणे जरुर आहे.

हिंदुस्थानातील लोक काही बाबतीत तरी मुळातच राष्ट्रनिरपेक्ष (cosmopolitan) दृष्टिकोन स्वीकारणारे आहेत. दोन लिप्याच काय, पण मागे एकदा पं. नेहरू यांनी सूचित केल्याप्रमाणे ते दोन्ही लिप्या टाकून रोमन लिपी स्वीकारावी की काय याचाही गंभीरपणे विचार करतील. हिंदुस्थानबाहेरच्या जगाशी संबंध ठेवण्याकरता ऊर्दू लिपीचा उपयोग होईल असा विचार जर हिंदुस्थानी कल्चर सोसायटीच्या विद्वान सभासदांच्या डोक्यात खरोखरच येत असेल, तर अगदी शेजारच्या आणि प्रचंड लोकसंख्येच्या चीनशी संबंध ठेवण्याकरिता ज्या लिपीचा उपयोग नाही, ती अवघड व अशास्त्रीय लिपी कायम ठेवण्यात आंतरराष्ट्रीय संबंधाची तरी सोय आहे, असे कसे म्हणता येईल?

आम्हाला तर ही सर्व केविलवाणी धोरणे पाहून टेनिसनच्या एका काव्यातील दुर्दैवी नायिकेची आठवण होते. अनेक वर्षे परागंदा झालेल्या आपल्या पतीच्या कधीही न येणाऱ्या जहाजाकडे (A ship that never came) डोळे लावून ती आपले कार्यक्रम ठरवीत असे!

उदार राष्ट्रवाद म्हणजे अशीच एक दुर्दैवी 'प्रोषितभर्तृका' ठरणार काय? —की जगद्विख्यात हिंदू गृहिणीचा आदर्श आमच्या या स्वप्नाळू राष्ट्रवाद्यांनी पुढे ठेवला आहे? भटक्या आणि बेईमान नवरा कधीच वेळेवर घरी परतायचा नाही, हे माहीत असूनही ती बिचारी नित्यनेमाने त्याची शेज सजवून ठेवीत असते!

'आम्ही काय करायला तयार आहोत' याची पत्रके आमचे पुढारी —कृपलानी, नेहरू, गांधी- दररोज काढीत आहेत. त्याऐवजी 'तुम्ही काय करायला तयार आहात' असे विचारणारे खलिते पाकिस्तानला पाठविण्यास ते कधी सुरुवात करणार आहेत? आणि या प्रश्नाचे विश्वसनीय उत्तर आल्यावर दोन काय तीन लिप्यासुद्धा हिंदू लोक पत्करतील!

अनुक्रमणिका

१६. बालबोध लिपीवर गंडांतर

मला वाटते १९५५-५६ मधील गोष्ट असेल. भाषाविषयक खेर कमिटीपुढे मला साक्ष द्यावयाची होती. कमिशनमधील दिल्लीचे सभासद डॉ. अबीद हुसेन यांनी मला प्रश्न विचारला, "लिपीसुधारणेबद्दल आपले मत काय आहे?"

लिपीसुधारणा म्हणजे जिचा उल्लेख आज देवनागरी लिपी असा होतो, त्या बालबोध मराठीची लिपीची सुधारणा! वास्तविक या लिपीइतकी सर्व ध्वनी चिन्हबद्ध करणारी व एकेका उच्चाराला एकेका अक्षरातच बद्ध करणारी लिपी जगतात नाही. तिची आणखी सुधारणा ती आजचे पंडित काय करणार? अशीच माझी कल्पना. पण दे. भ. सावरकर, विनोबा भावे, काका कालेलकर यांच्यासारख्यांचे या बाबतीतील प्रयोग माझ्या कानावर होते. सावरकरांच्या वैयक्तिक चिटणीसांचे सावरकरी लिपीत आलेले पत्र वाचण्याचे संकटही माझ्यावर एकदा आले होते. त्यामुळे लिपी सुधारणेसंबंधीही मला थोडाफार विचार करावा लागला होता. समितीच्या सन्मान्य सभासदांना मी म्हटले, "देवनागरी लिपीची सुधारणा करण्याची गरज मला भासत नाही. पण यंत्राची सोय पाहण्याकरिता- छापखान्याच्या व टंकलेखनाच्या यंत्राची सोय पाहण्याकरिता – जेव्हा ही सर्वपरिचित लिपी बदलण्याचा प्रयत्न होतो, तेव्हा मात्र माझा लिपी सुधारणेला विरोध असतो!"

दुर्दैवाने आज छापखान्यातील खिळे जुळविण्याची वा बनविण्याची सोय पाहण्याकरिता या वडिलार्जीत लिपीशी अयोग्य दंगामस्ती केली जात आहे. टंकलेखनातही (टाइप रायटिंगमध्ये) या लिपीचे रूप बरेच विद्रूप आणि वाचण्याला दुर्बोध बनते, लिपीचा उपयोग व्यक्तीच्या हस्तलेखनाकरिता नसून केवळ छापखाने आणि टंकलेखनाची यंत्रे यांकरिताच आहे असे तर नाही ना? शिवाय यंत्र वापरण्याच्या सोयीइतकीच यंत्रातून बाहेर पडलेली अक्षरे वाचण्याची सोयही लक्षात घ्यायला हवी. पण आज मात्र यंत्राची सोय आणि यंत्राने होणारा खर्च एवढ्याच गोष्टी लिपीसुधारक लक्षत घेतात की काय अशी शंका येते. जुन्या काळी घाईच्या हस्तलेखनाकरिता मोडी लिपी असे. त्या लिपीत कित्येक अक्षरांकरिता व अक्षरे जोडण्याकरिता बरेच वैयक्तिक विकल्प असत. त्यामुळे फारशीतील 'शिकस्ता' लिपी वाचणे जसे जिकीरीचे पडते, तसेच एकाचे मोडी वाचण्यास दुसऱ्याला जिकीर पडत असे.इंग्रजी अमलात वैयक्तिक पत्रव्यवहारातही मोडी लिपी मागे पडली. ग्रंथांची अथवा नियतकालिक लेखांची हस्तलिखिते तर बालबोध लिपीत करणेच सोयीचे ठरले. त्यामुळे हस्तलिखित वाचण्यातील अडचणही दूर झाली. त्याऐवजी सुधारलेली सावरकरी लिपी व कालेलकरी लिपी वापरायची ठरविल्यास हस्तलिखितात तरी ती मोडीपेक्षाही दुर्बोध ठरेल. पण आजची सुबोध बालबोध लिपीही ज्याला दुर्बोध वाटते, असा एक वर्ग आज निर्माण होत आहे. त्यात आरंभापासून इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये जाणारी बालके जशी आहेत, तसेच कॉलेजात शिकणारे प्रौढही आहेत!

आमच्या आप्तांपैकी एका चुणचुणीत बालकाची हकीकत मला नुकतीच समजली. त्याला वयाच्या तिसऱ्या वर्षीच इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये ए, बी, सी, डी, शिकविण्यात आली होती. नंतर एकदोन वर्षांनी जेव्हा त्याला हिंदी (मराठी) मुळाक्षरे शिकविण्यात येऊ लागली तेव्हा त्याला ती प्रारंभीच थोडी अवघड वाटू लागली. बाराखड्यांचे तर त्याला प्रयोजनच कळेना. सव्वीस ऐवजी बावन्न अक्षरे शिकल्यावर पुन्हा त्यातील व्यंजनांच्या बाराखड्यांची वेगळी अक्षरे गिरवीत बसणे ही त्याला मोठीच कटकट वाटू लागली! याच्या पुढेही जेव्हा त्याच्याकडून ष्ट, भ्र, प्त यांसारखी जोडाक्षरे घटवून देण्याचा प्रयत्न होईल, तेव्हा तर

त्याला ‘नकोत ही देशी भाषेतील अक्षरे!’ असेच वाटेल, आज संस्कृतला हायस्कूलातच सोडचिठ्ठी दिलेल्या बी. ए., एम. ए. च्या विद्यार्थ्यांनाही जोडाक्षरांची कटकट वाटते. छापखान्यांनाही बावन्न अक्षरे शिवाय बाराखड्या यांचे खिळे तयार केल्यावर पुन्हा जोडाक्षरे जुळविणे ही आफत वाटते. म्हणून त्यांनी आधीच ‘विद्‌वान’, ‘संकल्‌प’ ‘हया (ह्या)’ या प्रमाणे छापून जोडाक्षरांच्या जोड्या फोडायला आरंभ केला आहे व जोडाक्षरे विसरलेले प्रौढ विद्यार्थी अशा छापखान्यांचे अनुयायी बनत आहेत. कित्येक परदेशी लेखक तर “काय ती संस्कृत लिपी ! ती शिकायची म्हणजे मुलांना सुमारे चारशे अक्षरे घटवावी लागतात!” असे लिहितात. पण याच लोकांना त्यांच्या अर्धवट मुळाक्षरमालेमुळे व उच्चारानुसारी लेखनाच्या अभावामुळे, हजारो स्पेलिंगे पाठ करावी लागतात, हे मात्र लक्षात येत नाही. आमची इंग्रजी मिडियमची मुलेही Laugh (लाफ्) Walk (वॉक) हे शब्द लिहिणे सोपे मानतात, आणि संस्कृतोद्‌भव भाषांतील सरळ उच्चारानुसारी लेखन अवघड मानतात! मी तर म्हणेन, वृत्तपत्रांच्या वार्तांतील परदेशी नावांपुरती तरी आमची बालबोध लिपी (देवनागरी लिपी) वापरावी. म्हणजे आज परदेशी नावांचे दररोज, दर वृत्तपत्रात, जे वेगवेगळे उच्चार छापले जातात, ते बंद होतील. अलीकडेच दक्षिण अमेरिकेतील क्रांतीत बळी पडलेल्या चिलीच्या अध्यक्षांच्या नावाबद्दल विद्वान वाचकांना घोटाळा पडून अखेर स्पॅनिश कौन्सिलपर्यंत त्या नावाच्या उच्चारासंबंधी चौकशा गेल्या. आजच्या इंग्रजीतील तारांमुळे परदेशातीलच काय, पण स्वदेशातील विशेषनामांचे उच्चारही वृत्तपत्रांत विचित्र छापले जातात, रेडिओवर विचित्र उच्चारले जातात, आज ‘काश्मिर’ छापले जाते, उद्या ‘काश्मीर’ छापले जाते; आज ‘पाटणा’ छापले जाते, उद्या’पटणा’ छापले जाते. रेडिओवरून बरेच दिवस ‘दुर्गाप्रसाद धार’ असे ऐकल्यावर मधेच एक दिवस ‘दुर्गाप्रसाद धर’ असे नाव ऐकू येऊ लागते!

हा सर्व परिणाम इंग्रजीतील भिकार, अर्धवट आणि अशास्त्रीय वर्णमालेचा आणि तिजवर अवलंबून राहणाऱ्या आमच्या करंट्या मनोवृत्तीचा करंट्या राज्यकारभाराचा होय! आणखी काही वर्षे इंग्लिश मिडियमचे आणि मुद्रण सौकर्याचे स्तोम चालू राहिल्यास जोडाक्षरांना (व बाराखड्यांनाही!) फाटा देऊन इंग्रजीप्रमाणे मराठीतही ‘स्पेलिंग’ करून लिहिण्यास सवलत असावी, अशी मागणी तयार होईल. म्हणजे ‘क्लेश’ हा शब्द लिहायचा असेल तर ‘कलएश’ असा लिहिणे सोपे, असे मानणारी पिढी तयार होईल! ही कोणाला अतिशयोक्ती वाटेल, पण जोडाक्षरे, संधियुक्त शब्द, सामासिक शब्द, यांच्या लेखनात, आजच गोंधळ चालू आहे लेखनात म्हणजे केवळ हस्तलिखितात नव्हे तर छापून, तयार झालेल्या प्रतिष्ठित पुस्तकातही! आजच सामासिक शब्द हस्तलिखितात माझ्यासारखे जोडून लिहिले तरी कोणत्याही मासिकात वा दैनिकात ते जोडूनच छापले जातील अशी शाश्वती नाही. नव्हे, ते तोडूनच छापले जातील! समजा, ‘गृहजीवन’ हा शब्द लेखकाने, लिहिला, तर तो तोडून ‘गृह जीवन’ असाच छापला जाईल. संधियुक्त शब्दांची गत त्याहून शोचनीय आहे. अलीकडे दररोज छापावे लागणारे ‘इस्रायल’ शेकडा पन्नासदा ‘इस्त्रायल’ असे छापलेले आढळते.

बी.ए.,एम.ए. च्या विद्यार्थ्यांनाही जोडाक्षरे येत नाहीत, असे आढळल्यास त्यांच्याकरिता मराठी (देवनागरी) लिपी सुधारणे (इंग्रजीसारखी अशास्त्रीय करणे) एवढाच मार्ग आहे. असे ठरणार की काय ? मला तरी आपल्या नितान्त शास्त्रीय आणि कार्यक्षम अशा लिपीवर गंडांतर येत आहे. असे वाटू लागले आहे!

अनुक्रमणिका

१७. मराठी शुद्धलेखनाचे गुऱ्हाळ

लोकांची अशी कल्पना होती की साहित्य परिषदेऐवजी साहित्य महामंडळ अखिल महाराष्ट्राच्या वतीने कारभार करू लागल्यावर तरी शुद्धलेखनाचा प्रश्न चटकन सुटेल.साहित्य परिषद आणि साहित्य महामंडळ या दोघांच्याही कारभारातून मी अलीकडे मुक्त झाल्यावर तर माझी अशी कल्पना होती की, हा प्रश्न मागेच सुटला आहे! आणि खरोखरीच मला असे आठवते की, मी साहित्य परिषदेचा अध्यक्ष व महामंडळचा सदस्य होतो, तेव्हाच हा प्रश्न निकालात निघून शुद्धलेखनाच्या नव्या नियमांची पुस्तिकाही छापून बाहेर पडली होती. माझ्या माहितीप्रमाणे त्या पुस्तिकेच्या हजारो प्रतीही प्राथमिक व दुय्यम शाळांतील शिक्षकांनी मोठ्या औत्सुक्याने विकत घेतल्या आहेत! पण अद्यापही महामंडळ नियम करीतच आहे असे दिसते.

अर्थात कोणत्याही भाषेच्या लेखनपद्धतीचा काही भाग व्याकरण आणि व्युत्पत्ती यांवर अवलंबून असतो, तर काही भाग केवळ रिवाजावर अवलंबून असतो. आणि 'रिवाज'तर बहुतांशी प्रादेशिक असतात, कधी कधी ते जातीय आणि वर्गीयही असतात. अशा स्थितीत, ज्या शुद्धलेखन समितीचे अध्यक्ष भगवान पाणिनी आहेत व उपाध्यक्ष दादोबा पांडुरंग आहेत, त्या समितीने जरी नवे लेखन नियम केले, तरी त्यांवर एक पंडित शंभर शंभर आक्षेप घेऊ शकेल! शुद्धलेखन महामंडळाने सुमारे नऊ-दहा वर्षांपूर्वी संमत केलेल्या नव्या नियमांवरही साहजिकच अनेक आक्षेप घेण्यात आले होते. पण ते आक्षेप पाहिले म्हणजे मला मनातल्या मनात हसू येई. कारण आम्ही ज्या औरंगाबादच्या बैठकीत नव्या नियमांचा आराखडा मंजूर केला, त्या बैठकीत महामंडळाच्या सदस्यांपैकी कोणी ना कोणी हेच वा असेच आक्षेप घेतले होते, त्यांवर चर्चा झाली होती वसर्वसमंत तडजोडही झाली होती.

"शास्त्रात तडजोड नसते" असे या संदर्भात पुन:पुन्हा सांगितले जाते. अलीकडेच एका वृत्तपत्राने, मला वाटते नागपूर 'तरूण भारत' नेच – या संदर्भात अखिल भारतीय ज्योतिर्विदांच्या परिषदेचा वा त्या परिषदेत डॉ. के. ल. दप्तरी यांनी दाखविलेल्या शास्त्रनिष्ठेचा हवाला दिला आहे. पण शुद्धलेखन हे ज्योतिषशास्त्राप्रमाणे गणितावर किवा दृक्प्रत्ययावर आधारलेले नाही. त्या स्थानभेद आणि रुढीभेद जमेस धरून लिखित भाषेचे सर्वसंमत नियम ठरवावे लागतात व ठरवता येतात. तसेच सर्वसंमत नियम महामंडळाने एकदा ठरविले आहेत. पण गेल्या २४,२५ मार्च रोजी मुंबई येथे भरलेल्या महामंडळाने फिरून लेखननियम करण्याला सुरुवात केली आहे, हे वाचून मौज वाटली! मला वाटते, १९६१ साली औरंगाबाद येथे महामंडळाच्या ज्या सभेत नव्या नियमांची ठळक रूपरेषा ठरली, तिने प्रथम फक्त अनुच्चारित अनुस्वार काढणे व काही संदिग्ध रूपांची निश्चित रूपे ठरविणे एवढेच फेरबदल सुचविले होते. महामहोपाध्याय पोतदार हजर नसल्याने सभेचे नियंत्रण करण्याचे काम माझ्याकडेच आले होते. आज निघणारे सर्व आक्षेप, आज सुचविले जाणारे सर्व पर्याय, त्यावेळीही निघाले होते. "अनुस्वरांच्या बाबतीत उच्चारानुसारित्वाचे तत्त्व स्वीकारल्यावर तुम्हाला तत्सम शब्दांच्या बाबतीतही, म्हणजे संस्कृत शब्दांच्या अंत्य इकार-उकारांच्या बाबतीतही उच्चाराप्रमाणे लेखनपद्धती स्वीकारावी लागेल", असे मी सुचविले व प्रोफेसर जोगांसारख्या संस्कृतप्रेमी सदस्यांनीही त्यातील संयुक्तिकता मान्य केली, असे मला स्मरते. परिणामी निष्पन्न झालेले नियम स्थूलमानाने सांगायचे झाले, तर दोन किंवा तीनच नियमात सांगता येतात :

१) अनुच्चारित अनुस्वरांना फाटा.
२) याला अपवाद : अनेकवचनी सामान्य रूपावरील अनुस्वार अनुच्चारित असताही देणे.
३) अंत्य इकार आणि उकार सर्वत्र दीर्घ लिहिणे.

एवढे तीन ढोबळ नियम लक्षात ठेवले तरी आजचे शुद्धलेखन नियम लक्षात ठेवल्यासारखे होईल. म्हणजे सोपेपणा आणि उच्चारानुसारित्व एवढे तरी महामंडळाच्या नियमांनी साधले होते. पण प्रत्येकाच्या शंका आणि सूचना मानावयाच्या म्हटल्या, तर सर्वसंमत नियम कधीच तयार होणार नाहीत. गेल्या मार्चअखेर मुंबईच्या सभेत योजलेल्या नियमावलीवरही शंभर लोक शंभर आक्षेप काढू शकतीलच. पण आजची मराठी शुद्धलेखनाची 'शोकांतिका' वेगळीच आहे. आजच्या शिक्षणात संस्कृत वैकल्पिक (म्हणजेच त्याज्य!) झालेले! सर्व पाठ्यपुस्तके देखील अशुद्ध लेखनाने भरलेली, वृत्तपत्रांना तर दररोजच्या लग्नघाईमुळे मुद्रणदोषांचा परवानाच! अशा स्थितीत लेखनाचे 'नियम' सुधारणे ही समस्या नसून जे असतील ते 'नियम अमलात कसे आणावयाचे'ही खरी समस्या आहे. 'विद्वानांतच मतभेद आहेत' (जे महामंडळावर निवडून गेले ते विद्वान!) या बोभाट्यामुळे शुद्धलेखनातील या अराजकाचे चांगलेच फावले आहे.

परवाच्या बैठकीत विद्वानांनी ज्या सूचना केल्या होत्या, त्या पाहिल्या म्हणजे आतापर्यंत झालेल्या चर्चा कचऱ्याच्या पेटीत गेल्या असेच म्हणावे लागेल. या विद्वानांना 'गति', 'मति' यांसारखे तत्सम शब्द मुळाप्रमाणेच लिहायला हवे आहेत. पण आजचा मराठीचा पदवीधरही 'वधू', 'श्रीमती' यांसारख्या शब्दांत अनुक्रमे उकार आणि इकार 'ऱ्हस्व की दीर्घ' हे सांगू शकत नाही. मग मुळाप्रमाणे लिहिण्याचा हा आग्रह करून उपयोग काय? काही विद्वानांना लिंगचन ओळखण्याकरिता अनुस्वार कायम ठेवणे जरूर वाटते! 'गोरे मूल', 'गोरी मुले' यात अनुस्वारानेच लिंगवचन ओळखते असे त्यांचे म्हणणे आहे! पण बोलताना आपण या अनुस्वारांचा उच्चार करीत नाही. मग त्यामुळे लिंगवचनांचा घोटाळा होतो, असे म्हणायचे की काय? की बोलतानाही या अनुस्वारांचा उच्चार करण्याची एखादी नवी सूचना हे विद्वान आणणार आहेत? यांनी उल्लेखिलेल्या अडचणीतील एकच अडचण आपणा सर्वांना जाणवलेली आहे. ती म्हणजे शुद्ध शब्दयोगी अव्यय 'ही' याच्या संबंधीची. पण 'ही' हे शुद्ध शब्दयोगी अव्यय दक्षतेने संबंध शब्दाला जोडून लिहिले, म्हणजे ते दर्शक सर्वनाम आहे असे वाटणार नाही व या अडचणीचा परिहार होईल.

पण मुख्य गोम ती इथेच आहे ! आज सामासिक शब्द तरी जोडून लिहिले जातील (छापले जातील) अशी शाश्वती आहे का? आपण आपल्या लेखकाला वा लेखिकेला 'भावनाप्रधान' हा सामासिक शब्द तोंडाने सांगितला, तर 'भावना प्रधान' असा तोडून लिहिला जातो! आणि तो त्यांनी जरी आपल्या उच्चाराप्रमाणे जोडून लिहिला, तरी तोडूनच छापला जातो! आज सर्वत्र 'भारत इतिहास संशोधक मंडळ' असे तोडून छापले जाते या पाटीवर रंगवले जाते. आमचे संस्कृतप्रेमी पंडित या संधिविरहित समासाचे समर्थन कसे करणार?

या अराजकाकडे पाहून तरी महामंडळातल्या पंडितांनी जुन्या सूचना आणि शंका उगाळण्याचे आता बंद करावे. नव्या चुकांकडे लक्ष पुरवीत तेच 'नवे शुद्धलेखन' असे म्हणायची आता वेळ आली आहे!

अनुक्रमणिका

१८.   आंतरभारतीचा उपक्रम

गेल्या आठवड्यात आचार्य भागवत यांनी साहित्य परिषदेचे कार्यकर्ते व इतर साहित्य-प्रेमी लोक यांस साहित्य परिषदेत बोलवून घेऊन, ‘आंतरभारती’ च्या उपक्रमांसंबंधी माहिती सांगितली. पुण्यासारख्या ठिकाणी हिंदुस्तानच्या सर्व प्रमुख भागातील लोक नोकरीधंद्याच्या निमित्ताने स्थायिक झालेले पूर्वीपासून आढळत असत. गेल्या दहा वर्षांत तर पुण्याचे अस्सल मराठी आणि ‘ब्राह्मणी’ रूप पालटून, त्यास मुंबईसारखे बहुभाषी आणि संकीर्ण रूप प्राप्त झाले आहे. हिंदुस्थानच्या अन्य प्रांतातील वाङ्मयचा व संस्कृतीचा परिचय करून घेण्याला पुणेकरांना ही एक उत्तम संधी आयती चालून आली आहे. पुण्यासारख्या ठिकाणी आज वास्तव्य करीत असलेल्या बंगाली, कानडी, तेलुगु, गुजराती, हिंदी विद्वानांची पद्धतशीर सूची तयार करून, त्यांना एकत्र आणून, त्यांच्याशी चर्चा घडवून आणणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

अशाप्रकारची चळवळ करण्याची कल्पना प्रथम कै. साने गुरुजी यांनी महाराष्ट्रापुढे मांडली. त्यांनी ही कल्पना ‘आंतरभारती’ या नावाने पुणे येथील साहित्य संमेलनापुढे मांडून त्यासंबंधी एक ठरावही करवून घेतला होता. आज साने गुरुजी स्मारकाच्या निमित्ताने आचार्य भागवत हे आंतरभारतीची चळवळ पद्धतशीरपणे चालू करीत आहेत; व अशाप्रकारे विविध प्रांतांतील साहित्यभक्तांना व विद्वानांना एकत्र आणणारे केंद्र उभे करीत आहेत. साने गुरुजी आणि आचार्य भागवत यांनी अंगिकारलेले हे कार्य महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कारभाऱ्यांना समजावून देण्याचा व त्यांचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न सध्या चालू आहे. परिषदेच्या चालकांना ही कल्पना पटेल व कारभारासंबंधीच्या अडचणी उपस्थित न होता त्यांचे व आचार्य भागवत यांचे सहकार्य होईल असा विश्वास बाळगण्यास हरकत नाही.

उदासीन महाराष्ट्र

वास्तविक आचार्य भागवत यांनी हाती घेतलेली चळवळ इतकी महत्त्वाची व अगत्याची आहे, की ती यापूर्वीच साहित्य परिषदेने हाती कशी घेतली नाही, याचे आश्चर्य वाटते. खुद्द पुण्यात व अन्यत्र, इतर भाषा जाणणारे महाराष्ट्रीय अनेक आहेत. हिंदी, उर्दू, गुजराती, कानडी या भाषा जन्मभाषेप्रमाणे बोलणारे अनेक महाराष्ट्रीय पुण्यात व इतरत्र आहेत. तथापि, या मंडळींशी अनेक वर्षे परिचय झाल्यावरही त्यांच्या तोंडून त्या भाषासंबंधाने ओझरत्या उल्लेखापलीकडे, फारसे ऐकू येणार नाही! अर्थात ज्यांनी उघडपणे आंतरभारतीसारखी एखादी चळवळ काढली त्यांची गोष्ट वेगळी, परंतु सर्वसाधारण महाराष्ट्रीय विद्वान, अन्य भाषासंबंधी, प्रदेशासंबंधी, व संस्कृतीसंबंधी प्राय: अबोल व उदासीन असतो. असे आढळून येईल, सरहद्दीच्या ठिकाणी किवा प्रत्यक्ष अन्यप्रांती रहावे लागल्याने, त्यास पुष्कळदा अन्य भाषा येऊ लागलेली असते; त्याची वृत्ती मात्र ‘खुली’ नसून आतल्या ‘गाठी’ ची असते. पावसातून जावेच लागल्यास आपण ज्याप्रमाणे छत्री उघडून, अंग चोरून कसेबसे जातो. त्याप्रमाणे तो अन्य समाजात अंग चोरून वावरत असतो. अन्य प्रांतीयांकडे कुतूहलाने व एक प्रकारच्या नावीन्याच्या आवडीने पाहून त्यांच्या गोष्टी स्वजनांना सांगणे, ही वृत्ती आपल्या मंडळींत कमी आहे. नोकरीपेशामुळे जे काय हेवेदावे वाट्याला आले असतील, तेवढ्याच्याच अगर सार्वत्रिक आणि निराधार गैरसमजांच्याच गोष्टी, देशाटन आणि ‘भाषाटन’ केलेल्या या महाराष्ट्रीयांच्या तोंडून ऐकायला मिळतात!

अनुक्रमणिका

कै. माधवराव पटवर्धन हे फार्शी-अरबीचे पट्टीचे विद्वान होते. खाजगी संभाषणात न कळत त्यांच्या तोंडून त्या वाङ्मयातील जी वचने उद्‌धृत केली जात, त्यावरून श्रोत्याला त्या भाषांसंबंधी व स्वत: माधवराव यांचेसंबंधी आदरयुक्त कुतूहल वाटे, पण मुद्दाम माहिती विचारू गेल्यास मात्र, माधवरावांच्या तोंडून त्या भाषांसंबंधी तुच्छतेचे व अनास्थेचेच उद्‌गार ऐकायला मिळत! अनेक फार्शी-उर्दू जाणणारे लोक अर्वाचीन महाराष्ट्रात प्रत्येक पिढीत असूनही त्या भाषांसंबंधी जाहीर प्रसंगी मौन पाळणारांचीच संख्या अधिक! सुमारे पाच वर्षांमागे पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत, हैदराबाद संस्थानात बरीच वर्षे काढलेल्या श्री देशमुख नावाच्या गृहस्थांनी उर्दू कवितेसंबंधी व्याख्यान दिले. एरव्ही अनावर होणाऱ्या पुणेरी उपवक्त्यांचे लेंढार, त्या दिवशी नेमके अदृश्य झाले होते! वक्ते फार्शीचे पंडित आहेत, असे त्यांनीच बरोबर आणलेल्या मोगलाईतील अध्यक्षांनी सांगून टाकले होते. पण त्यांच्या भाषणात मात्र, ऊर्दू कवितेसंबंधी विकृत माहितीखेरीज काहीच हाती लागत नव्हते! ऊर्दू प्रेमकविता इथून तिथून Sadism ने आणि अत्याचारी प्रवृत्तीने भरली आहे, असा त्यांचा अभिप्राय पडला. सिनेमामुळे उशापायथ्याला आणि पोरीबाळींपर्यंत ऊर्दू शिरली असूनही बुद्धिमत्तेबद्दल प्रसिद्ध अशा आमच्या पुणेरी श्रोत्यांच्या तोंडाला मात्र अशा प्रसंगी कुलूप! जणू काय ऊर्दू कवितेसंबंधी पहिलीच बातमी त्या दिवशी त्या सभेत पुणेकरांच्या कानावर येत होती! उपवक्ता या नात्याने उठून, मी ऊर्दू कवितेत मला उदात्त प्रेमभावनाच अधिक आढळली हे सांगण्याचा यत्न केला. पण माझे मत, दोन विरुद्ध एक- (वक्ता, अध्यक्ष विरुद्ध एकटा उपवक्ता!) —असे प्रमाण पडल्याने अर्थातच 'नापास' झालो!

सुमारे सात आठ महिन्यांमागे नाट्योत्सवाच्या निमित्ताने हैदराबाद येथे गेलो असता मला तेथील चादरघाट कॉलेजातील मराठी मंडळापुढे व्याख्यान देण्याकरता जावे लागले. केवळ रीत म्हणून कॉलेजच्या 'प्रिन्सिपल' ची आणि माझी जाता जाता गाठ घालून देण्यात आली.कॉलेजातून बाहेर पडून आमची मोटर चालू झाल्यानंतर बरोबर आलेल्या मंडळींच्या तोंडून कळले की, ज्यांच्याशी मी केवळ विद्यार्थ्यांची संख्या, फीचे दर, वगैरे मामुली गोष्टींवर बातचीत करून बाहेर पडलो, ते मुसलमान प्रिन्सिपल उर्दूतील प्रख्यात कवी आहेत! पण ही गोष्ट कॉलेजच्या मराठी मंडळाला भेट देणाऱ्या पुणेरी पाहुण्याला महत्त्वाची वाटेल,असे त्याच्या यजमानांना वाटण्याचे कारणच नव्हते! कारण मराठीचा अभिमान याचा अर्थ धाबळी नेसून, मराठीच्या देवघरात डोळे मिटून बसणे!

सारांश, इतर प्रांतांतील वाङ्मयाशी महाराष्ट्रीय साहित्यिकांचा परिचय होत नाही याला कारण त्यांची ही खंदक खणून, स्वत:ला स्वत:च्या गढीत कोंडून घेण्याची वृत्तीच होय, यात शंका नाही. आचार्य भागवत व त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नाने पुण्यातील विविध प्रांतीय विद्वान मराठी साहित्यिकांना येऊन भेटतील; पण मराठी साहित्यिकांना त्या परस्थ समागमापासून ज्ञानलाभ होणे न होणे, आचार्यांच्या हाती नसून, त्या साहित्यिकांच्याच हाती आहे! आपल्या घोड्याला आपण पाण्यावर नेऊ शकतो; पण पाणी पाजू शकत नाही, हा इंग्रजीतील न्याय, या प्रकरणी लक्षात ठेवला पाहिजे. कौतुकाचा अभाव, कुतूहलाचा अभाव, खोटा स्वाभिमान आणि खोटा सोवळेपणा, हे दुर्गुण पुणेरी बुद्धिमंतांच्या अंगी चिपळूणकरांच्या वेळेपासून वाढीला लागलेले आहेत. त्यामुळे अंमळ चिंता वाटते!

खोट्या सोवळेपणाचे प्रत्यंतर परवाच्या अगदी प्राथमिक चर्चेच्या वेळीच आले.वेगवेगळ्या प्रांतांतील विद्वान साहित्य परिषदेत आल्यास त्यांच्याशी बहुधा इंग्रजीतून व्यवहार करावा लागेल आणि "तसे करणे प्राप्त झाल्यास ते 'आंतरभारती' चळवळीच्या प्रवर्तकांनी पत्करायचे की काय?" ही शंका एका पुरोगामी आणि मार्क्सवादी विद्वानांनी (के. नारायण काळे यांनी) जेव्हा काढली, तेव्हा मी तरी खरोखर हतबुद्धच

अनुक्रमणिका

झालो! अर्थात एक मात्र कबूल केले पाहिजे, की शास्त्रवचनांचा 'काथ्या कुटण्यात' आमचे मार्क्सवादी मित्र जुन्या पूर्व मीमांसावाल्या कर्मठांचीही शाबासकी मिळवतील! इतर प्रांतांतील देशबांधवांशी तूर्त चर्चेपुरता इंग्रजीतून व्यवहार केल्यास, इंग्रजीला भारतीय भाषांत स्थान दिल्याच्या प्रायश्चित्ताचाही दोष लागेल, असे सदरहू मार्क्सवादी साहित्यिक प्रतिपादित होते, हे पाहून बिचाऱ्या हेगेलने काढलेले अभिनव न्यायशास्त्र, मनातून खजील झाले असेल यात शंका नाही! अखेर पुणेरी राष्ट्रवादातून आमच्या सुशिक्षितांच्या हाती काय लागले? तर आणखी एक नवी धाबळी आणि एक नवे चातुर्मास व्रत!! तात्पर्य, आचार्य भागवत आणि मंडळी,यांना संस्कृतिसंगमाचा आपला गाडा इतक्या कुंपणांतून पुढे ढकलायचा आहे. आणि तरी 'अल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते' या न्यायाने त्यांच्या उपक्रमाचे मी मनापासून स्वागत करतो.

पण त्यातील एका गोष्टीचे मात्र मला मनापासून स्वागत करता येत नाही. ती गोष्ट म्हणजे 'आंतरभारती' हा शब्द. या शब्दाचा अर्थ जुन्या अगर नव्या, कोणत्याच विद्वानाला कळण्यासारखा नाही. इतकेच नव्हे, तर त्या शब्दातून काही अर्थ निघण्यासारखे नाही. अर्थात अर्धमागधी अगर फ्रेंच यासारखी एखादी असंस्कृत 'सेकंड लँग्वेज' घेऊन पदवी मिळवणाऱ्या नवथर साहित्यिकांच्या कृपेने, 'मराठीचिये नगरी' अनेक अर्थशून्य संस्कृत समासांची दाटी खपवून घेण्याची आमच्या सालस वाचकांना आजकाल चांगलीच सवय झाली आहे. हे तर खरेच! पण सकाळ संध्याकाळ निघणाऱ्या 'नेत्रदीपक' सारख्या अनेक अद्‌भुत शब्दांचे अर्थ , निदान मूळ इंग्रजी कल्पना अगर सदृश मराठी-हिंदी शब्द पाहून तरी थोडे फार कळतात, 'आंतरभारती' या शब्दाचे बाबतीत याही तोडग्यांचा उपयोग नाही असे आढळेल! प. पू. साने गुरुजी असे सांगत की, भारताच्या सर्व प्रांतांत एकाच संस्कृती आहे. हे या चळवळीच्याद्वारे लोकांना शिकवावयाचे आहे. त्यांच्या 'प्रांतभारती' या शब्दातून ही कल्पना प्रतीत होणे कठीण होते हे खरेच. पण 'आंतरभारती' या शब्दाने तर, लोकप्रिय शब्दांच्या मुखड्यावरील बुरखा ओढण्याचा 'विनयभंग' करणाऱ्या मजसारख्या नास्तिकांचा अधिकच घोटाळा उडत आहे.

अर्थात आजकाल नव्याने बाहेर पडणारे छापखान्यातील खिळ्यांच्या आधीन असतात, ही गोष्ट मी विसरलो नाही. व म्हणूनच 'अंतर्भारती' व 'आंतरभारती' या दोन्ही रूपांकडे मी बरेच न्याहाळून पाहिले पण त्यांच्या हृदयाचा ठाव लागत नाही. 'भारती' शब्दाचे प्रसिद्ध अर्थ 'वाणी' आणि 'वाग्देवी' (सरस्वती) हे आहेत. 'आंतर' या शब्दाचा अर्थ आतील किंवा मधील असा आहे. 'आंतर' या विशेषणाचा अर्थ 'अगदी आंतील' किंवा 'गुह्य' असा आहे. सारांश 'आंतरभारती' चा अर्थ 'गुह्यवाणी', 'गुह्यविद्या', 'गुह्य सरस्वती' असा होईल. 'भारताच्या विविध प्रांतांना साधारण अशी संस्कृती, असा अर्थ सूचित करण्याकरता हा शब्द गुरुजींच्या कसा काय मनात आला, हा एक प्रश्नच आहे!

पण साने गुरुजी, कलेत तंत्राविषयी उदासीन असत, तसेच भाषेत कोशव्याकरणादी उपाधीविषयी विरक्त असत. मिसेस हाथीसिंग यांच्या आठवणींचे भाषांतर करताना त्यांनी 'Upto-date room' या शब्दांचे भाषांतर 'अद्यतन (?) खोली' असे केले आहे!! वास्तविक गुरुजी काही आजच्या 'अर्धमागधी' पदवीधरांपैकी नव्हतेच. त्यांची पदवी संस्कृतची आणि 'सन्मानयुक्त' अशी होती; व ते कॉलेजमध्ये फेलोही होते असे वाचल्याचे स्मरते. तथापि त्यांनी देशकार्याच्या प्रेमाने (आणि साहित्यशास्त्राच्या तुच्छतेने !) बनविलेले असे अनेक शब्द असे 'जातिकुलहीन' निपजले आहेत. मला वाटते, गुरुदेव रवींद्रनाथ यांच्या विश्वभारतीने अनुकरण करून त्यांनी आपल्या नेहमीच्या नम्र आणि न्यून वृत्तीने, 'प्रांतभारती' शब्द बनविला असावा. आणि नंतर त्यांनी अगर त्यांच्या वारसदारांनी 'आंतरराष्ट्रीय' या शब्दांच्या चालीवर, 'आंतरभारती' शब्द बनविला असावा. पण विश्वभारती, आंतरराष्ट्रीय हे शब्द तरी आपापले मनोगत

'यथास्थित' व्यक्त करतात की नाही, हा प्रश्नच आहे. निदान आंतरराष्ट्रीय या शब्दावर तर, संस्कृत शास्त्र्यांनी आक्षेप घेतलेच आहेत. पण हे दोन्ही शब्द पावन आणि सार्थ समजायचे ठरवले, तरी 'आंतर-भारती' या शब्दातून (अगर अंतरभारती असा शब्द मानला तरी त्यातूनही) साने गुरुजींच्या मनातील अगर आचार्य भागवत यांच्या मनातील अर्थ व्यक्त होतो असे वाटत नाही. आणि इतरांच्या, आम्हां प्राकृत मंडळींच्या, मनात तर त्या शब्दांनी काहीच कल्पना उमटत नाही. बिचाऱ्या इतर प्रांतांतील विद्वानांना गुरुजींच्या पुण्याईचाही उपयोग या अर्थ-निष्पत्तीत होण्यासारखा नाही!

आचार्य भागवत हे साने गुरुजींहून अधिक अधीनही आहेत, आणि अधिक चिकित्सकही आहेत. हा महाराष्ट्रीय माल इतर प्रांतांत निर्यात होण्यापूर्वी आचार्य भागवत तो थोडा फोडून तपासून घेतील , तर मराठी 'भारती' संबंधी इतर प्रांतांत अनुकूल भावना होण्यास थोडी मदत होईल, असे सुचविल्यावाचून मात्र राहवत नाही!

अनुक्रमणिका

१९. आंतरभारतीने आंतरिक क्रांती घडावी

माझ्या एका मित्राच्या मुलीने तामीळ भाषी (मद्रासी) ब्राह्मणाशी प्रेमविवाह केला. अर्थात तिला सासरी-माहेरी तसा विरोध नसला, तरी तिचे सर्वच गणगोत तिच्याकडे काहीशा चमत्कारिक कुतूहलाने पाहत असे. आमच्या शेजारच्या महाराष्ट्र मंडळाच्या विहिरीत एखादी बाई कमरेला डबा बांधून पोहण्याकरिता शिरली म्हणजे ज्यांना पोहायला येतही नाही, अन् शिकायचेही नाही अशा बाया विहिरीच्या काठांवर नुसत्या पाहत बसतात, तशी काहीशी तिच्या नातेवाइकांची दृष्टी मला वाटली! एकदा एका सभेत तिची सासू मला भेटली. मी मुद्दाम तिच्या महाराष्ट्रीय सुनेची तिच्याजवळ चौकशी केली, 'मद्रासी' बाई, म्हणून मी तिला इंग्रजीत विचारीत होतो, तर पुण्याच्या एका वर्षाच्या मुक्कामातच मराठीचा बऱ्यापैकी सराव करून ती मराठीत बोलत होती. चुका होत होत्या, पण माझ्या इंग्रजीतही तितक्याच हास्यास्पद चुका बहुधा एखाद्या इंग्रज बाईला काढता आल्या असत्या! मला मात्र तिच्या चुका जाणवून हसे दाबावे लागत असले, तरी तिने इतक्या लवकर मराठी बोलण्याचा सराव केलेला पाहून मला खरोखर नवल वाटले. कारण तिच्या नवऱ्याला मराठीचे एक अक्षरही कळत नसे. मी तिच्या मराठी बोलण्याचे कौतुक केले; अन् सुनेचे कसे काय चाललेय म्हणून विचारले. तिच्या उत्तराचा तिच्याच गमतीदार मराठीत गोषवारा सांगायचा, तर-

'आमचं सून चांगलं आहे; पण तुमचं मराठी लोक चांगलं नाही!' असा सांगावा लागेल! ती म्हणाली, "याहीपेक्षा चांगले मराठी मी बोलू लागले असते, पण तुमचे लोक आमच्याशी मुद्दाम आमच्यासारख्या चुका करून बोलतात. बोलण्यापेक्षा हसणेच फार! अन् माझ्या महाराष्ट्रीय सुनेकडे तर ते जणू गुन्हेगारासारखे पाहतात!"

हा गमतीचा अन दु:खदायक संवाद मला परवा 'आंतरभारती' ने घडवून आणलेल्या एका महत्त्वाच्या आंतरप्रांतीय संपर्कामुळे आठवला. पुण्याच्या आंतरभारती केंद्राने गुजरातमधील साहित्यिक, पत्रकार व सांस्कृतिक पुढारी यांना पुण्यात बोलावून त्यांच्या द्वारे गुजरातमधील सांस्कृतिक प्रवाहांची ओळख पुण्यातील 'साक्षरां'ना करून दिली. साने गुरुजींच्या वाङ्मयाबद्दल माझे मत चांगले नसले तरी त्यांची 'आंतरभारती' ची कल्पना मला आरंभापासून मोलाची वाटली आहे. वास्तविक आंतरभारतीच्या कार्यात साहित्य परिषदेने आरंभापासूनच समरस होण्याचा योग आला होता. कै. माटे कार्याध्यक्ष असताना, तशी बोलणीही झाली होती, त्यावेळी 'आंतरभारती' ला स्वत:चे घर नव्हते. वास्तविक परिषदेत तिला आसरा देणे अवघड नव्हते. मला आठवते की, आचार्य भागवत त्यासंबंधी बोलणी करण्याकरिता आलेही होते. (मी त्या वेळीही परिषदेच्या कार्यकारी मंडळात होतो.) मी ती कल्पना उचलून धरली; पण माटे यांना ती कल्पना पसंत पडली नाही. म्हणून फिसकटले. अलीकडे काही वर्षे 'आंतरभारती' चा एखादा कार्यक्रम साहित्य परिषदेत होतो, ही गोष्ट सर्वस्वी उचित अशीच आहे.

पण आंतरभारतीच्या भाषा संपर्काप्रमाणे प्रत्येक प्रांतातल्या लोकांत आंतरभारतीची म्हणून एक वृत्ती एक 'स्पिरिट' निर्माण व्हायला हवे. अमेरिकेतली दहा-पाच मुले हिंदुस्थानांतल्या वेगवेगळ्या प्रांतांत चार दिवस राहून जातात त्या धर्तीवर आम्ही आणि आमचे गुजराती वा कानडी बांधव 'संपर्क साधू' लागलो, तर ते हास्यास्पद होईल. माझ्या भाच्याची, पुतण्याची, मावसबहिणीची ओळख जर एखाद्या लग्नाकार्यात 'मिस्टर अमुक', 'मिस तमुक' म्हणून कोणी करून दिली तर ते मला जितके चमत्कारिक वाटेल तितकाच हा प्रांतसंपर्क वस्तुत: वाटायला हवा!

याचा अर्थ ज्यांनी तो घडवून आणला त्यांचे आपण कमी ऋणी आहोत असा नव्हे. पण खटाटोपामुळे गुजरात न्यूयॉर्कइतका दूर आहे, असे मला उगीचच वाटू लागले! वास्तविक पुण्यात 'गुजरात' काही कमी नाही, की अहमदाबादेत 'महाराष्ट्र' ही कमी नाही. पण पुण्यात आमचा संपर्क मात्र म्हाराष्ट्रीयांशीच काय तो यावा, अशी आमची एकंदर राहणी असते! माझा आग्रह असा आहे की, ही राहणी, ही वृत्ती, हे 'Spirit' 'आंतरभारती चळवळीमुळे पार बदलून गेले पाहिजे!

आंतरभारतीची चळवळ देशाच्या दशदिशांना जशी पसरली पाहिजे तशीच ती व्यक्ती-व्यक्तींच्या अंतरंगात भिनली पाहिजे. एखादे कानडी किंवा तामीळ कुटुंब आपल्याच वाड्यात राहायला आले, तरी त्यांच्या भाषेचा, पोशाखाचा सणसमारंभाचा उपयोग आम्ही केवळ हास्यविषय म्हणूनच करतो-नव्हे त्यात एक गुप्त प्रौढी मानतो. पण ज्यांची राहणी आपल्यापेक्षा वेगळी आहे ते लोक विचित्र, हास्यास्पद, किंवा Abnormal आहेत असे मानणे, हा खेडवळपणा आहे, हे समजण्याइतके पुणे कधी सुधारणार? भिन्न जातींच्या अन् भिन्न भाषांच्या लोकांना हसण्याची, टाळण्याची, हेटाळण्याची ही वृत्ती आमच्या उच्चवर्णीय स्त्रियांत, पुरुषांहूनही अधिक दिसते. बिनबाह्यांचा ब्लाऊझ वापरण्यांतील पुढारलेपणा मी मान्य करीन; पण ब्लाउझमध्ये तेवढे पुरोगामित्व आणि शेजारधर्मात मात्र अठराव्या शतकातला खेडवळपणा, हे मी नाही मान्य करणार!

इंडो-अमेरिकन मैत्रीमंडळ, रुसो-इंडियन मित्रमंडळ यांची उपयुक्तता तर आहेच. पण आकाशाला गवसणी घालण्याच्या नादात आपण आपल्या तक्क्याला अन् तंबोऱ्याला गवसणी घालायला विसरू लागलो तर तो बावळटपणा होईल. मला वाटते हा बावळटपणा आज आम्ही भरपूर प्रमाणात करीत आहोत! हेमिंग्वेच्या पुस्तकांची नावे विचारली तर आमचे विद्वान संध्येतील चोवीस नावांसारखी पाठ म्हणतील; पण चार प्रमुख गुजराती वा कानडी ग्रंथकारांची नावे सांगा म्हटले तर दोनसुद्धा सांगता येणार नाहीत. पण आज भारतातली अशी एक भाषा नाही की जी बोलणारे शेपन्नास सुशिक्षित पुण्यात मिळणार नाहीत. पुण्यात कानडी, गुजराती, तर महाराष्ट्रीयांत सरमिसळच आहेत, पण मलबारी (केरळ प्रांतीय), तेलुगू, तामीळ अनेक पिढ्या राहत आहेत. अलीकडे पंजाबी, सिंधी, बंगाली हजारोंनी आले आहेत. त्यांच्या वाङ्मयाची माहिती सांगण्याकरिता त्यांच्या प्रांतातून सांस्कृतिक डेप्यूटेशनच मागविली पाहिजेत असे नाही. पण या स्थानिक भिन्नप्रांतीय लोकांचे अस्तित्वही आमच्या साहित्यिकांना आंतरभारतीच्या स्थापनेमुळे अधूनमधून जाणवू लागले. अन हेच आंतरभारतीचे मोठे श्रेय आहे.

तीच स्थिती मराठी शहरांतील मुसलमानांची आहे. आम्हाला मुसलमानी धर्माची, धर्मग्रंथांची, ग्रंथप्रकारांची, कवींची माहिती झाली तर इंग्रजीवरून व्हायची! पण रविवार पेठ ओलांडून गणेशपेठेत गेलो की अरबस्तान-इराणच्या संस्कृतीची झलक दिसू लागते. हिंदू-मुसलमानांचा इतिहास अंशतः झगड्याचा, वैरभावनेचा आहे, हे मीही जाणतो. पण नुसत्या बुजरेपणाने वैरही साधणार नाही की सलोखाही साधणार नाही. सानेगुरुजींच्या मुसलमानी संस्कृतीवरील ग्रंथाच्या निमित्ताने काही मुसलमान विचारवंतांची (राष्ट्रभाषा सभेत) झालेली भाषणे मला चांगली आठवतात ती भाषणे 'सर्वधर्मसमभावा'ची खासच नव्हती! पण तरीही आमच्या सर्वोदयी मंडळींच्या भाषणांपेक्षा अधिक उमदी आणि प्रामाणिक होती. भिन्नप्रांतीयांशी तुसडेपणा, भिन्नधर्मीयांशी (विशेषतः मुसलमानांशी) बुजरेपणा, आणि (गोऱ्या कातडीच्या) परदेशीयांशी न्यूनगंड, ही आम्हा सुशिक्षित हिंदूंची वर्तणूक मोठीशी भूषणास्पद नाही. जोपर्यंत आम्ही स्वजनांकडे आणि परकीयांकडे इंग्रजांच्या डोळ्यांनी पाहत राहू तोपर्यंत आम्ही स्वाभिमानी, धीट आणि शेजारधर्मी नागरिकांसारखे वागूच शकणार नाही!

अनुक्रमणिका

मी हल्ली पुणे विद्यापीठाच्या गाडीतून विद्यापीठाला जातो, तेव्हा आठवड्यातील काही दिवस माझ्याबरोबर विद्यापीठातील दोन-तीन मुसलमान सहकारी असतात. इकबालसारखा तत्त्ववेत्ता आणि मीर, दाग, गालिब यांच्यासारखे कवी यांच्याशी मी त्यांच्याइतकाच समरस होतो, हे पाहून त्यांना सानंद आश्चर्य वाटते. तर 'आपण महाराष्ट्रीय लोक', 'We Maharashtrians' हे शब्द त्या मुसलमान विद्वानांच्या तोंडी ऐकून मला साश्चर्य आनंद वाटतो. पुण्यातल्या पुण्यात अखिल हिंदुस्थानच्या भाषा आणि चालीरीती शिकणे, निदान जवळून पाहाणे, कठीण नाही.

पण आम्ही भारतीय इकबालच्या 'खुदी'च्या (Personality च्या) तत्त्वज्ञानापेक्षा फ्रेंच 'सार्त्र'च्या 'एग्झिस्टेंशियालिझम'च्या तत्त्वज्ञानाकरिता अधिक तडफडत असतो! आमचे इंग्रजांच्या संस्कारांमुळे गेली शंभर वर्षे जे पश्चिमेकडे तोंड वळले आहे, त्यामुळे आम्हाला आमचेच लोक परके वाटू लागले!

आंतरभारतीच ही आंतरिक क्रांती घडवून आणील, अन ती पुण्यातल्या पुण्यात घडवणे अशक्य नाही!

अनुक्रमणिका

२०. संस्कृत विरुद्ध मराठी

महाराष्ट्र राज्यातील शिक्षणखात्याचे सल्लागार आहेत तरी कोण? या खात्याचे इतर प्रयोग कोणतेही असले तरी हायस्कूलमधील संस्कृत विषयासंबंधीचे त्यांचे धोरण आश्चर्यकारक आहे. ब्रिटीश अमलात होते तेवढेही महत्व स्वराज्यातील शिक्षणक्रमात संस्कृतला राहू नये ही गोष्ट शोचनीयही आहे आणि हास्यास्पदही आहे. महाराष्ट्र प्रांत संस्कृत विद्येच्या बाबतीत पुढारलेला म्हणून लौकिक होता. हायस्कूलच्या व कॉलेजच्या शिक्षणाचा पाया महाराष्ट्रात घातला गेल्यापासून सर्व जातीची मुले अपरिहार्यपणे मॅट्रिकपर्यंत संस्कृत शिकत. जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप शेकडो विद्यार्थ्यांना संस्कृतचा अभ्यास झटून करण्याला प्रलोभन पुरवीत असे. संस्कृतच्या अध्ययनामुळेच इतर जातीतील मुले भाषाज्ञानाच्या बाबतीत ब्राह्मण, प्रभू वगैरे पुढारलेल्या जातीच्या बरोबरीला येत असत. संस्कृतच्या व्यासंगामुळेच डॉ. आंबेडकरांसारखे विद्वान जुन्या धर्मकल्पनांवर सप्रमाण आघात करू शकले. स्वत: ब्राह्मण नसलेल्या विठ्ठलराव घाट्यांच्यासारख्या विद्वान शिक्षण शास्त्रज्ञाचे तर असे मत आहे की, संस्कृतमधून पळवाट काढून दिल्याने ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांचेच नुकसान अधिक आहे. कारण, प्राचीन भारतीय विद्येच्या बाबतीत ब्राह्मणेतर मुले या नव्या धोरणाने फिरून मागे राहणार.

"विद्यार्थ्यांच्या डोक्यावर चार भाषांचे ओझे नको म्हणून संस्कृत वैकल्पिक किंवा गौण ठरवावे लागत आहे." असे एक समर्थन, शिक्षण खात्यातील तज्ज्ञ लोक करताना आढळतात. या मंडळींनी मराठी, हिंदी व संस्कृत यांच्या तौलनिक महत्त्वाचा आणि परस्पर संबंधाचा विचार केलेला असतो की नाही, याचीच शंका येते. आम्ही हायस्कूलमध्ये असता मराठी हा मॅट्रिकच्या परीक्षेतील विषयच नव्हता. म्हणजे मराठी शिकवले जाई; पण त्या विषयाला महत्व नसे. आमच्या पिढीचे मराठी आजच्या पिढीच्या मराठीपेक्षा कच्चे राहिले काय? आजच्या पिढीचे मराठी कच्चे राहण्याला कारण संस्कृतकडे दुर्लक्ष हेच होय, असे आढळेल.

शिक्षकांचा आणि शिक्षणाधिकाऱ्यांचा हा सर्व मानसिक अध:पात मी डोळ्यानं पाहिलेला आहे. संस्कृतचा अभ्यास मराठीच्या मुळावर येत आहे, ही कल्पना धरून बसलेले शिक्षणतज्ज्ञ मागासलेल्या वर्गातलेच होते अशी मात्र कल्पना करू नका! अगदी पुढारलेल्या वर्गातले, स्वत: संस्कृत घेऊन एम. ए. झालेले, पढे कॉलेजात संस्कृतचे प्रोफेसर बनलेले, माझे सहकारीही, 'हायस्कूलमध्ये संस्कृतमुळे मराठीची उपासमार होते', इतकेच नव्हे, तर 'मराठीच्या ज्ञानाला संस्कृत शिकण्याचा काडीमात्र उपयोग नाही,' असे प्रतिपादन करीत! कै. वा. दा. गोखले यांच्यासारख्या मराठी व संस्कृत या भाषांच्या मार्मिक विद्वानाने ही भूमिका साहित्य संमेलनातील ठरावाच्या चर्चेत उघडपणे घेतल्याचे मला स्मरते व ते मी, अशा संदर्भात नमूदही केले आहे.

माझ्या मते,मराठी गदय-पदय व मराठी व्याकरण यांचा पूर्वीच्या व्हर्न्याक्युलर फायनलपर्यंत जेवढा परिचय होईल तेवढ्यावरच हायस्कूलमधील मराठीचा अभ्यास थांबवावा. हा अभ्यास जुन्या तिसऱ्या इयत्तेपर्यंत, म्हणजे आजच्या सातव्या इयत्तेपर्यंत, पुरा होऊ शकतो.

त्यापुढे हायस्कूलमधील मराठीचे तास संस्कृतला दिले, तर मुलांच्या डोक्यावरचे एका भाषेचे ओझेही कमी होईल. अन मराठीला ज्या भाषेचा उपयोग मराठीहूनही अधिक आहे, त्या संस्कृत भाषेची उचलबांगडी करण्याचेही कारण पडणार नाही.

अनुक्रमणिका

आपल्या सध्याच्या शालान्त परिक्षेपर्यंतच्या अभ्यासक्रमात त्याच त्या अभ्यास विषयांची इतकी पुनरावृत्ती आहे की, हा बारा वर्षांचा अभ्यासक्रम सहज सात आठ वर्षांत आटोपता येईल, - नव्हे तसा उत्तम प्रकारे आटोपल्याची उदाहरणे आहेत. इतिहास, भूगोल, अंकगणित, मराठी, व्याकरण या विषयांचे आमच्या वेळचे अभ्यासक्रम अशा आवर्त क्रमानेच भरलेले होते. जो हिंदुस्थानचा इतिहास व भूगोल 'व्ह. फा.' ला पुरे, तोच मॅट्रिकच्या परीक्षेलाही पुरत असे. मराठी सातवीतील हुशार मुलगा जितपत मराठी व्याकरण व शुद्धलेखन जाणत असे, तितपत मॅट्रिकच्या वर्गातील मुलगाही जाणत नसे. अन् जो मुलगा भाषेची शुद्धता, शब्दार्थ आणि समास यांचे ज्ञान अधिक असल्याचा पुरावा देई, तो त्याच्या संस्कृतच्या जोरावर देई!

अशा स्थितीत हायस्कूलमधील आठवी ते अकरावी या चार वर्षांत आजचे मराठी गदय-पदय वेचे वाचून मुलं थोडीफार 'नवलेखक' बनत असली, तर कोण जाणे! पण लेखनातील शुद्धता आणि शब्दज्ञानातील नेमकेपणा आजकालच्या वेच्यांनी मुळीच वाढण्यासारखा नसतो. जिथे राज्य पारितोषिक विजेते लेखकही 'मनोकल्पना'सारखे शब्द लिहितात, जिथे 'मनश्चक्षु' या शब्दात विसर्गही कायम ठेवला जातो व 'श'ही ठेवला जातो, ('मनःश्चक्षु'), जिथे वृत्तपत्रे व रेडिओ यांत अल्पसंख्याक या 'क' प्रत्यायान्त विशेषणात सर्रास 'ख्या' वर अनुस्वार लिहिला जातो, उच्चारला जातो, तिथे चार वर्षे असल्या गद्याचे वेचे वाचून मराठीचे कोणत्या प्रकारचे ज्ञान प्राप्त होईल, त्याची कल्पना सहज करता येईल. शुद्ध भाषा लिहिणे हे मासिकात कथा लिहिणाऱ्या व मासिकांतील कथांचेच संग्रह काढणाऱ्या लेखकांच्या थिल्लर लकबा उचलण्यापेक्षा फार महत्वाचे आहे, हे अभ्यासक्रम आखणारांना सांगण्याची आता वेळ आली आहे. आणि वर निर्देशिलेल्या चुका संस्कृतचे ज्ञान नसलेल्या विद्यार्थ्यांना समजावूनही देता येणार नाहीत! संस्कृतच्या अभ्यासातच मराठी भाषाज्ञानाचे मूळ आहे; -तो अभ्यास मराठीच्या 'मुळावर' येतो, ही कल्पना वेडेपणाची आहे! मराठी या विषयाला आठवी ते अकरावी या चार वर्षांत फाटा देऊन त्याच्या जागी संस्कृत ठेवणे, हाच आजच्या हायस्कूल अभ्यासक्रमातील 'भाषाभार' हलका करण्याचा एकमेव मार्ग मला दिसतो. (हिंदी देखील आजच्याप्रमाणे सात वर्षे शिकविणे हा कालापव्यय आहे.)

अर्थात कॉलेजमध्ये गेल्यावर पहिल्या दोन वर्षांत आधुनिक मराठी गद्यपद्य आणि पुढे ऐच्छिक मराठी घेतल्यास, प्राचीन गद्यपद्याचा अभ्यासक्रम राहीलच. हिंदी व इंग्रजी या भाषांच्या अभ्यासातही वास्तववादी फेरफार सुचविण्यासारखे आहेत. या दोन्ही भाषांचे अभ्यासक्रम त्या ज्यांच्या जन्मभाषा आहेत त्यांच्या अभ्यासक्रमांसारखेच असले पाहिजेत, हा आग्रह वेडेपणाचा आहे. आपले बी. ए., एम.ए. चे हिंदी व इंग्रजी अभ्यासक्रम पाहिले, तर त्यात वास्तववादी उद्देशाचा आभाव दिसतो. त्या भाषांचे पंडित पैदा करणे हा अन्यभाषी विद्यापीठांचा उद्देश असणे हास्यास्पद ठरेल, हिंदी व इंग्रजी गद्य सफाईने लिहिणे-बोलणे व त्या भाषातील गद्यग्रंथ सहजपणे वाचू शकणे एवढाच आपला उद्देश हवा. या दृष्टीने पाहता पद्यापेक्षा गद्यावर, अन जुन्यापेक्षा नव्यावर भर हवा. चॉसर आणि तुलसीदास यांच्यापेक्षा बर्नार्ड शॉ आणि प्रेमचंद यांचा उपयोग परदेशी, परप्रांतीय विद्यार्थ्यांना अधिक आहे.

हिंदीही समजणे कठीण

पण शुद्धतेची बाजू क्षणभर दृष्टीआड केली तरी, संस्कृतच्या ज्ञानाखेरीज आजचे पंडिती हिंदी, विद्यार्थ्यांना समजणारच नाही. आजचे हिंदी संस्कृत शब्दांनी भरून गेलेले आहे. जाडजूड संस्कृत शब्दांनी भरलेली हिंदी भाषा वापरायची पण संस्कृतच्या अभ्यासाला मात्र फाटा द्यायचा, या अडाणी धोरणाचा

अनुक्रमणिका

परिणाम कोणता होईल?' 'उपअभियंता', 'अधिक्षक', 'निर्वाचन' यांसारखे दिल्लीहून आलेले दुर्बोध शब्द वापरायचे, आणि ते कसे बनले हे समजण्याइतपत संस्कृतचे अध्ययन मात्र झालेले नसायचे, असा आजचा प्रकार आहे. संस्कृतचे ज्ञान नसेल तर मुलांचे मराठीही कच्चे राहील व हिंदी त्यांना समजणारच नाही! उलट ज्याला संस्कृतचे ज्ञान असेल, तो हिंदी आणि मराठी जाताजाता हस्तगत करू शकेल.

अन आजच्या हिंदीलाही पुन्हा संस्कृतशिवाय चालणार नाही ते वेगळंच! पण एक गैरसमज मात्र दूर केला पाहिजे- 'शुद्ध मराठी' याचा अर्थ 'पंडिती मराठी' असा मी करीत नाही. 'बाग' न म्हणता 'उद्यान' म्हणणे, व्यापार म्हणता 'वाणिज्य' म्हणणे, 'आपला न म्हणता 'भवदीय' म्हणणे, ही शुद्धता नसून बोजडपणा होय!

आमच्या देशातील भाषासंबंधी अमेरिकन लोकांना जेवढी माहिती आहे, तेवढी आमच्या शिक्षणतज्ज्ञांनाही नाही! ज्या चार भाषांचा त्यांना भर वाटतो, त्यांतील संस्कृत हीच अनिवार्य आहे!

स्वतंत्र हिंदुस्तानात इतर भांडणांबरोबरच भाषांची भांडणेही सुरु झाली. ती भांडणे केवळ राजकारणाच्या क्षेत्रातच राहिली नाहीत. ती शिक्षणविषयक धोरणातही शिरली. इंग्रज या देशातून गेल्यानंतर भाषेच्या क्षेत्रात मुख्य फरक कोणता पडला? हिंदीचे महत्त्व वाढले, इंग्रजीचे कमी झाले. अर्थात ही झाली कागदोपत्रीची स्थिती. प्रत्यक्षात इंग्रजीचे महत्त्व काडीमात्र कमी झालेले नाही. परिणाम म्हणजे हिंदीचा अभ्यास हा एक नवा विषय शिक्षणात वाढला, एवढाच!

इकडे जन्मभाषांचे महत्त्वही धोरण म्हणूनच वाढले, -किंबहुना इंग्रजीचे महत्त्व कमी करण्याचे कारणच मुळी मराठी-गुजराती आदी भाषांना योग्य ते महत्त्व देण्याची गरज हे होय. प्रांतिक भाषा व राष्ट्रभाषा (हिंदी) यांचे महत्त्व हिंदुस्तानात ज्या प्रमाणात वाढले, त्या प्रमाणात इंग्रजीचे महत्त्व कमी झाले नाही, -नव्हे, ते मुळीच कमी झाले नाही. म्हणजे एक डोईजड परकी परभाषा तशीच राहून शिवाय दोन भारतीय भाषांचे महत्त्व अभ्यासक्रमात वाढले. आता ना. मधुकरराव चौधरी यांच्यासारख्यांपुढे पेच आहे तो म्हणजे राष्ट्रीयदृष्ट्या आवश्यक त्या भाषांचे महत्त्व कमी न करता बिचाऱ्या शाळकरी मुलांच्या डोक्यावरचे ओझे कमी कसे करायचे?

व्यासपीठावरून वक्तृत्व करणाऱ्या वक्त्यांनी हवेत सोडलेल्या काही कल्पना झिडकारल्या तर वरील पेच सोडवणे अवघड नाही. यातली पहिली कल्पना मराठीच्या अवास्तव महत्वासंबंधीची होय, असे जर मी म्हटले, तर बहुधा मी काही लोकांच्या दृष्टीने स्वभाषाद्रोही ठरेन! इतकेच नव्हे तर कृतघ्नही ठरेन! मराठीतला एक लेखक म्हणून एक विशिष्ट स्थान मिळवल्यावर, हा मनुष्य ज्या शिडीवरून वरपर्यंत गेला, तीच पायाने लाथाडीत आहे, असाही आरोप होईल. हे सर्व माहीत असूनही आज हायस्कूलमध्ये मराठी शिकविण्यावर जो वेळ खर्च होतो, त्यातला निम्मा वेळ वाचवता येण्यासारखा आहे, असे मी म्हणतो.

मी स्वत: काही वर्षे हायस्कूलमध्ये मराठी, इंग्रजी व संस्कृत हे तिन्ही विषय शिकविलेले आहेत. तो काळ मराठीच्या समान स्थानाकरिता झगडण्याचाच होता. त्या काळातही 'मराठीतील एक लेखक' ही माझी भूमिका माझ्या सहकाऱ्यांना माहीत होतीच. माझे सहकारी हायस्कूलमधील मराठीचे तास वाढविण्यात मराठीची सेवा आहे असे मानीत; तर उलट 'साहित्यिक' म्हणविला जाणारा मी, ते तास कमी

करण्यात मुळीच नुकसान नाही, असे म्हणे! अखेर मराठीसंबंधीच्या त्यांच्या या ‘संख्यात्मक’ (तासवाढरुपी) अभिमानाचे पर्यवसान संस्कृतला अर्धचंद्र देण्याच्या मानसिक तयारीत झालं!!

अनुक्रमणिका

२१. ....म्हणजे रामाशिवाय रामायण

हिंदी ही या देशाची पूर्वीपासूनच आंतरराष्ट्रीय व्यवहाराची भाषा आहे. पूर्वी विद्येच्या क्षेत्रातील अखिल भारतीय व्यवहार संस्कृतातून होई, तर यात्रा, बाजारहाट वगैरेंतील व्यवहार हिंदीतून होई. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मध्यवर्ती सरकारची भाषा हिंदी व्हावी हे अपरिहार्य होते. पण ते घडले मात्र नाही. म्हणजे आंतरप्रांतीय व्यवहाराची भाषा, मग ती सरकारी असो की खासगी असो, हिंदीच व्हावी हे वस्तुतः स्वाभाविक होते. मग या उचित उपक्रमात विघ्न कोणी आणले? आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आता जवळ जवळ तीस वर्षांनी हिंदी पुन्हा विवाद्य अवस्थेतच का राहिली?

पहिले विघ्न इंग्रजीचे होते. बाराबारा वर्षे इंग्रजी शिकण्यात घालवूनही मोडके तोडकेच इंग्रजी बोलणारांना व लिहिणारांनादेखील हिंदीपेक्षा इंग्रजीच सोयीचे वाटू लागले. त्यातही दाक्षिणात्य विद्वानांना हिंदी आपल्याइतके जवळचे नसल्याने, त्यांच्यातील काहींनी विशेषतः तामीळभाषी बांधवांनी हिंदीला विरोध केला. पण आणखी दोन विघ्ने हिंदीच्या अभिमान्यांनीच उभी केली. हिंदीचे आपण काही नवीन 'प्रमोशन' करीत आहोत अशा कल्पनेने व हिंदी सर्वार्थाने इंग्रजीची जागा घेणार आहे या कल्पनेने, या मंडळींनी शिक्षणक्रमात हिंदीचे अधिकाधिक तास द्यायला सुरवात केली. जणू काय हिंदी ही भाषा इंग्रजीइतकीच परकी असल्याने तिला आम्ही महाराष्ट्रीयांच्या शिक्षणक्रमातही इंग्रजी भाषेइतकेच अगडबंब स्थान द्यायला हवे!

वास्तविक हिंदीत उत्तम प्रकारे अखिल भारतीय व्यवहार आणि ग्रंथरचना करणारे अन्य प्रांतीय लोक हिंदीच्या परीक्षा निघण्यापूर्वीच होऊन गेलेले आहेत! शिवाजी महाराज आणि राजा जयसिंग यांची बोलणी हिंदीतच झाली होती. जयसिंगाच्या तोफखान्यावरील इटालियन अधिकारी 'मनूची' याच्या आणि शिवाजी महाराजांच्या गप्पागोष्टी हिंदीतूनच चालत. गुजरातेत जन्मलेले आर्य समाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती प्रारंभी संस्कृतातून प्रचार करीत असले तरी, नंतर केशवचंद्र सेन यांच्या सांगण्यावरून हिंदीतून व्याख्याने देऊ लागले, ग्रंथ लिहू लागले. स्वामी विवेकानंद दाक्षिणात्य विद्वानांशी इंग्रजीतून आणि वेळप्रसंगी संस्कृतातून बोलत असले तरी, तितक्याच सफाईने अखिल हिंदुस्थानातील सामान्य जनांशी हिंदीतून बोलत. दयानंद व विवेकानंद यांच्या वेळच्या शिक्षणक्रमात हिंदीला स्थान नसूनही या गोष्टी घडल्या! म्हणजे मग शाळा-कॉलेजांच्या वेळापत्रकात हिंदीला सक्तीचे तास मिळावेत म्हणून ओरड करणारे लोक हिंदी व इंग्रजी अवघडपणातही बरोबरीच्या समजतात की काय देव जाणे!

हिंदीच्या याच पुस्तकी अभिमान्यांनी हिंदीच्या प्रत्यक्ष व्यवहारात आणखी एक विघ्न उभे करून ठेवले आहे.

त्यांनी एक खास पंडिती हिंदी निर्माण करून हिंदीच्या सार्वत्रिक स्वीकारास आणि प्रसारास मोठाच अडथळा निर्माण केला आहे. सध्याचा वाद सुरु झाल्यावर माझ्याकडे काही हिंदी नियतकालिकांनी आपले जे अंक धाडले आहेत, त्यांतील शब्द पाहण्यासारखे आहेत. हिंदी का महत्त्व एवं **उपादेयता**', 'राष्ट्रीय **धरातल** से उठकर आंतरराष्ट्रीय धरातल पर', किसी भी **संरचनात्मक** कार्य की सफलता', 'एक दूसरे का **पारस्परिक** मिलन होगा' या अवतरणांतील जाड ठशाचे शब्द आकारण बोजड आहेत. त्यांचाच अर्थ सोप्या सुटसुटीत शब्दांत व्यक्त करणे सहज शक्य आहे, हे मराठी वाचकांच्या सहज लक्षात येईल. पण याच्याही पुढे जाऊन पंडिती हिंदीचे हे भोक्ते 'अन्ततोगत्वा' या सारखे संस्कृत प्रयोग जसेच्या तसे

उचलतात! हिंदीचा जन्मभर प्रचार करीत असलेल्या एका पंडितला मी विचारले, "पत्राच्या खाली आम्ही मराठी लोक 'आपला' लिहून सही करतो. तुमच्या हिंदीत 'आपका' असे लिहिले तर चूक होईल काय? मग तुम्ही 'भावदीय' हा इरसाल संस्कृत शब्द का घालता? बरे हे लोक संस्कृतचे पंडित असल्याने हे होते असे म्हणावे, तर जास्तीत जास्त अशुद्ध, संस्कृत शब्द हिंदीतच वापरलेले आढळतात! गांधींच्या हिंदीचा, प्रेमचंदांच्या हिंदीचा, आचार्य रजनीशांच्या वक्तृत्वातील खुसखुशीत हिंदीचा स्वीकार केल्यास, हिंदी आजच्या इतकी बोजड आणि अशुद्ध होणार नाही. आणि अप्रियही होणार नाही. बारा बारा वर्षे परीक्षेकरता हिंदी शिकविणाऱ्या आमच्या लोकांतील कितीशा वक्त्यांनी परप्रांतांतील सभा जिंकल्या आहेत? त्यांच्या हिंदीला 'मराठी-हिंदी' किंवा 'पूने की हिंदी म्हणून हिंदी लोक नाक मुरडतातच! म्हणजे आपल्याला हवी आहे ती हिंदी, परीक्षेच्या पेपरातील हिंदी नको असून, प्रत्यक्ष वापरातील हिंदी हवी आहे. म्हणूनच त्रिभाषा सूत्रात म्हणजेच प्रत्यक्ष शिक्षणक्रमात हिंदीला दिलेले स्थान अवास्तव आहे.

पण अलीकडे हिंदीसंबंधी वाद उभा राहिला आहे तो हिंदीच्या उपेक्षेमुळे नसून, 'संस्कृत' च्या अक्षम्य व अडाणी उपेक्षेमुळे उभा राहिला आहे. आपला महाराष्ट्र देश संस्कृतातील नैपुण्याकरता ब्रिटिश अंमलापूर्वी तर विख्यात होताच, पण नंतरही इतर प्रांतांच्यापुढे होता. विशेषत:, उच्चारांच्या शुद्धतेबाबत महाराष्ट्राचा फार मोठा लौकिक होता व आहे.

स्वामी विवेकानंदांना जेव्हा 'पातंजल महाभाष्या' चे पाठ घ्यायचे होते तेव्हा, त्यांनी एका महाराष्ट्रीय पंडिताची निवड मुद्दाम केली होती असे नमूद आहे. ज्या प्रांताने संस्कृत विद्येचे वैभव वाढवले, तोच प्रांत आता त्या विद्येच्या नाशाचा कार्यक्रम आखीत आहे, किंवा त्या कार्यक्रमास निमूट मान्यता देत आहे, हे पाहून इतर प्रांतातील विद्यापीठे अचंबा करीत आहेत! या संबंधात मला साताऱ्याकडून आलेल्या एका सविस्तर पत्रात, 'सामान्य लोकांत शिक्षणाची वाढ होत आहे आणि त्यांना तर संस्कृत अवघड जाते' या परिस्थितीचा बाऊ केलेला आढळला. ज्यांच्या रोजच्या भाषेत शेकडा साठ शब्द संस्कृत किंवा संस्कृत वंशाचे आहेत, 'त्यांना इंग्रजी अवघड जात नाही, पण संस्कृत मात्र अवघड जाते' ही कल्पना केवळ खोटीच नव्हे तर कोणी मतलबी लोकांनी मुद्दाम पिकवलेली आहे! वस्तुत: इंग्रजी तर त्याहून अवघड जाते, पण आज नोकरीत तिचे महत्त्व आहे, तसे संस्कृतचे महत्त्व कशात आहे? अर्थात ते ज्यांना कळत नाही त्यांनीच संस्कृत ही 'नंबर चारची' भाषा ठरविली आहे! काही विद्वानांनी सध्याच्या वादात स्वभाषेला (जिला हे नवे विद्वान 'प्रादेशिक भाषा' म्हणतात!) पहिले स्थान दिले आहे. (अलीकडे दिल्लीस झालेल्या संमेलनात उपराष्ट्राध्यक्ष श्री. जत्ती, पंतप्रधान इंदिरा गांधी यांसारख्या राज्यकर्त्यांनी 'राष्ट्रभाषा' हा शब्द वापरलेलाही नाही. कोणी 'राजभाषा'हा शब्द वापरलेला आहे, कोणी 'संपर्क भाषा' हा शब्द वापरला आहे, तर कोणी 'जनभाषा' हा शब्द वापरलेला आहे.) मुख्य गोष्ट ही आहे की, संस्कृतला पहिले स्थान कोणीच दिले नाही. आपल्या इकडील एका प्राध्यापकाने तर 'आपण हिंदी' आहोत, म्हणून हिंदीला शिक्षणात, पहिले स्थान हवे असाही अजब कोटिक्रम लढवला आहे!

म्हणजे यांपैकी कोणालाच संस्कृतचे भाषिक किंवा सांस्कृतिक महत्त्व कळत नाही, किंवा कबूल नाही असे दु:खाने म्हणावे लागते. या संबंधात मी अनेकदा लिहिले आहे, अगदी परवाही दोन-तीन ठिकाणी लिहिले आहे. त्यातीलच एक 'किस्सा' आमच्या या विद्वानांना पेश करणे या संदर्भात अपरिहार्य आहे. काही वर्षांमागे एक अमेरिकन पदवीधर मुलगी महाराष्ट्रविषयक विषयावर प्रबंध लिहिण्याकरिता महाराष्ट्रात आलेली होती. तिच्या प्रबंधाच्या दृष्टीनेच माझी व तिची गाठ घालून देण्यात आली होती. मी पाहिले तो ती 'केसरी' वाचीत बसलेली होती. मी तिला विचारले, "काय तुम्ही मराठी शिकता आहात

वाटते?'' ती म्हणाली, " नाही सर, मला माझ्या अमेरिकन 'गाईड' नी 'हिंदुस्थानात जाण्यापूर्वी तू संस्कृत शिकून घे' असा सल्ला दिला होता. आता मला संस्कृत येत असल्याने, एक दोन महिन्यांतच मला 'केसरी' समजू लागला. संस्कृत शिकून गेलीस तर तुला हिंदुस्थानातील बऱ्याच भाषा अल्पावधीत शिकता येतील, असे मला माझ्या गाईडनी सांगितले होते.''

'संस्कृत शिकणे म्हणजे मराठी, हिंदी, बंगाली या भाषांना उपयोगी पडणाराच अभ्यास करणे होय, हे अमेरिकन व युरोपियन विद्वानांना माहीत आहे, पण आमच्या स्वदेशी विद्वानांना मात्र संस्कृतचा अभ्यास म्हणजे त्रिभाषा-सूत्राच्या गळ्यातील व्यर्थ लोढणे वाटत आहे! संस्कृतविहीन मराठी व हिंदी पदवीधरांचे मराठी व हिंदी किती शोचनीय असते हे त्या क्षेत्रातील लोकांना माहीत आहे.

शिवाय, संस्कृतच्या अवघडपणाचे मूळ आपल्या शिकविण्याच्या अव्यवहार्य पद्धतीत आहे, हे संस्कृतसंबंधीच्या अलीकडेच झालेल्या सभेत श्री विठ्ठलराव घाट्यांसारख्या विद्वानांनी सांगितले, मीही सांगितले. चार भाषांचे ओझे होत असेल तर, अभ्यासक्रमातून फार तर मराठी वगळा. (संस्कृतज्ञांना मराठी वेगळे शिकविण्याचे कारण नाही.) अभ्यासक्रमातून हिंदी वगळा, ते फार तर परीक्षेला ठेवा. विद्यार्थी त्या दोन्ही भाषा खासगी रीतीने सहज शिकू शकतील. पण संस्कृतशिवाय भारतीय अभ्यासक्रम म्हणजे रामाशिवाय रामायण व कृष्णाशिवाय भागवत होय!

अनुक्रमणिका

२२. हिंदीचे भवितव्य

इंग्रज निघून गेल्यावर या देशात कोणत्या भाषेला वाईट दिवस यावेत ? अर्थात त्यांनी आपल्या सत्तेबरोबरच आमच्यावर लादलेल्या परक्या इंग्रजीला. पण प्रत्यक्षात घडत आहे मात्र वेगळेच! इंग्रज गेल्यानंतर इंग्रजी अधिक लोकप्रिय ठरत आहे आणि हिंदी भाषा भांडणाचे मूळ ठरत आहे. हा मोठा चमत्कार नव्हे का?

हिंदीद्वेष कशासाठी ?

अलीकडे आपल्या लोकसभेपुढे जो भाषाविषयक कायदा मंजुरीकरिता आला, त्यामुळे हिंदीसंबंधीची काही प्रांतांच्या मनातली अढी जोराने उफाळून वर आली. गेल्या तेवीस तारखेला सुमारे पाचशे लोकांनी उठाव करून मद्रासकडील थालंगाई स्टेशन जाळले. मद्रासमध्ये पोलीस खाते अस्तित्वात नाही असे नव्हे, पण मद्रास पोलिसांनी हे अत्याचार मारून काढण्याइतका जोर दाखविला नाही. इतकेच नव्हे, तर मद्रासच्या अण्णादुराई सरकारने जोराने निषेध केला नाही. याचा अर्थ स्वतंत्र भारतातील सरकारी भाषेच्या प्रयत्नापुरते तरी मद्रास सरकार दिल्ली सरकारविरुद्धची बंडाळी मोडण्याला उत्सुक नाही! तामीळ प्रांतात हिंदीला जेवढा कडवा विरोध आहे तेवढा अन्य प्रांतात नाही, हे खरे आहे; पण हिंदी विरोधकांतही आज अनेक पंथ आणि थर झाले आहेत. त्यांत काही हिंदीद्वेष्टे आहेत, काही स्वभाषाप्रेमी आहेत, तर काही इंग्रजीप्रेमी आहेत.

बंगाली लोकांना बंगालीच्या प्रेमामुळे हिंदी नको आहे तर आमच्या 'द्रविड मुन्नेत्र कळघम्' छाप तामीळ भाषिकांना तामीळचेही तितकेसे प्रेम नाही. तामीळच्या प्रेमापेक्षा त्यांचा हिंदीचा द्वेष अधिक जाज्वल्य आहे! मुंबईच्या एका इंग्रजी वृत्तपत्राने श्री चव्हाणांच्या 'ऑफ़िशियल लँग्वेजेस्' बिलाचे वर्णन "..a law giving a special status to one of our many languages..." असे केले आहे! अर्थात त्या 'इंग्रजी' संपादकाच्या मते हिंदी ही केवळ अनेक 'भारतीय भाषांपैकी एक' होय आणि तिला सरकारी कामकाजाची भाषा करणे, म्हणजे एकाच भाषेला, केवळ पक्षपत करून, इतर भाषांच्या डोक्यावर बसवणे होय! हिंदीऐवजी दुसरी कोणती भाषा केंद्र सरकारच्या कारभाराची भाषा होऊ शकेल असे हे संपादक म्हणून शकतील? बंगाली? गुजराती? मराठी? कानडी? मल्याळी? तामीळ? कोणतीच ते सुचवू शकत नाहीत. कारण तशा सूचनेवर पक्षपाताचा आरोप अधिकच यथार्थपणे होऊ शकेल. हिंदीच्या द्वेषाने रेल्वे गाड्या जाळणारे तामीळ लोक तरी दुसरी कोणती भाषा सुचवतील? तामीळ सुचवू शकतील काय? शक्यच नाही.

बरे, 'हिंदी ही सरकारी भाषा व्हावी' असे जुन्या नेत्यांना (त्यात राजाजीही होते!) आणि आजच्या केंद्र सरकारला का वाटले? हिदुस्थानातल्या जास्तीत जास्त लोकांना ती समजते, ती बोलू शकणारांची संख्याही इतर भाषा बोलणाऱ्यांपेक्षा अधिक आहे. हिंदीला राजभाषेचा दर्जा द्यायचा की नाही, हा प्रश्न असेल; पण तिला 'लोकभाषे'चा दर्जा, इंग्रजीचा या देशाला पत्ताही नव्हता, तेव्हापासून आहे. हिंदी किंवा हिंदुस्तानी सर्व प्रांतांत सहज समजत होती, वा आंतरप्रांतीय (Link) भाषा म्हणून सर्वत्र चालत होती, असे नव्हे. पण स्वत:च्या प्रांताबाहेर जाण्याचा प्रसंग आला, तर ब्रिटीशपूर्व काळात कोणीही मनुष्य हिंदीचाच आधार घेई. अशी ही हिंदी, घटनेने कारभाराची भाषा करण्याचे ध्येय मान्य केल्यावरही, स्वीकारण्याला तामीळ लोकांसारख्या बुद्धिमान लोकांचा विरोध का? तर त्यामुळे एका भारतीय भाषेला बाकीच्या तेरा भाषांच्या डोक्यावर बसवल्यासारखे होते म्हणून ! आणि हे बहिणीबहिणीतले भांडण कसे मिटवायचे? तर

पाच हजार मैलांवरची सर्वस्वी परकीय आणि कर्णकटू भाषा कायमची डोक्यावर घेऊन! खरोखर महंमद घोरीला हिंदुस्थानावर स्वारी करायला निमंत्रण देणाऱ्या जयचंद राठोडपेक्षा आणि अहंमदशहा अबदालीला दिल्लीचे तख्त घेण्याला पाचारण करणाऱ्या नजीबखान रोहिल्यापेक्षा राजाजी, अण्णादुराई, ब्लिट्झचे करंजिया आणि आमचे डी. डी. कर्वे फारसे शहाणे झालेले दिसत नाहीत! आपण स्वाभिमानी आणि स्वातंत्र्याभिमानी असलो तर आंतरप्रांतीय व्यवहाराची भाषा म्हणून हिंदी पत्करणे ही परदास्यातून मुक्त होण्याची, एक अटळ पण साधी शर्त म्हणून मान्य करू!

'लिंक लँग्वेज' म्हणून किंवा कारभाराची भाषा म्हणूनही हिंदीला दुसरा पर्याय नाही. असलाच, तर संस्कृत हा एक पर्याय आहे. पण संस्कृत ही उच्च विद्येची भाषा होऊ शकेल, सामान्य व्यवहाराची भाषा होऊ शकत नाही.

अडाणी समजूत

इंग्रजीचे हिंदुस्थानात स्थान केवळ अस्वाभाविकच नव्हे,तर लज्जास्पद आहे. पाच हजार मैलांवरून लवंगा, मिरे, दालचिनी खरीदण्याकरता आलेल्या लोकांनी, केवळ आमच्या भोंगळपणामुळे आणि बेदिलीमुळे हिंदू-मुसलमान राजांच्या ताब्यातील हा प्रचंड देश जिंकावा, हे पहिले लांछन होय, तर दुसरे त्याहून मोठे लांछन म्हणजे ते त्या 'दुकानदार' राज्यकर्त्यांनी तोंड काळे केल्यावरही आम्हाला त्यांची ट्र, ड्र, स्ट्र, यासारख्या उच्चारांनी कर्णकठोर बनलेली भाषा प्रिय वाटावी! —अपरिहार्य वाटावी! इंग्रजी गेली, तर देशाचे ऐक्य भंग पावेल, अशी एक अडाणी समजूत इंग्रजीतून शहाणे झालेले लोक जोरजोराने पसरवीत असतात. वस्तुस्थिती अशी आहे की, खऱ्या ऐक्याचा विसर पडल्यामुळे तर बूटपँट घालून इंग्रजीत देशहिताच्या गोष्टी करणाऱ्या मुठभर सुशिक्षितांना इंग्रजी हे भरतखंडाच्या ऐक्याचे साधन वाटू लागले! भरतखंडांतील अफाट जनता शंभर ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक आणि आर्थिक बंधनांनी एकत्र बांधलेली आहे. इतके असूनही जर आम्ही इतिहासकालीन स्वहितासही एकदा विसरलो असलो, तरी त्या इंग्रजीच्या शृंखलेने तरी काय ऐक्याचे दिवे लागणार आहेत?

मराठी आणि हिंदी लोकांपेक्षाही फाकडे इंग्रजी बोलणारे तामीळ बांधव अधूनमधून वेगळ्या द्रविडिस्तानची भाषा बोलतच आहेत ना? अखिल हिंदुस्थानात पहिल्या दर्जाची बॅरिस्टरी (अर्थात इंग्रजीतून!) करणारे महंमद आली जीना भारताचे दोन तुकडे करणारे झालेच ना? ज्या सद्‌गुणांवर पहारा करावा लागतो, त्याची किंमत पहारेकऱ्याइतकीही नाही, असे गोल्डस्मिथ याने म्हटले आहे. ज्या राष्ट्रैक्याला परभाषेच्या शृंखलेने (Link language) ने बांधून ठेवावे लागते, त्या राष्ट्रैक्याची किंमत त्या शृंखलेइतकीही नाही, असे मी म्हणेन. स्वत:ची रक्ताची नाती विसरणाऱ्या लोकांना, परकीयांच्या आरशात तोंड पाहूनच स्वत:च्या पितरांची ओळख करून घेण्याची वेळ येणार! काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या भारतीयांचे, पर्वत, धर्मग्रंथ, सणवार, ऐतिहासिक अभिमान वा अपमान, एक असूनही जर यांना ऐक्याकरता एकेकाळच्या आपल्या परदेशी मालकांची पाच हजार मैलांवरची भाषा लागत असेल, तर त्याहूनही अधिक घट्ट ऐक्य व खंबीर राज्यकारभार यांची जोड व्हावी म्हणून त्यांनी आपल्या इंग्रज प्रभूंनाच अर्ज करून परत का बोलावू नये!

इंग्रजांच्याच भाषेच्या केवळ नव्हेत, तर त्यांनी लिहिलेल्या खोट्या आणि उर्मट इतिहास कथांच्याही बेड्या आपण तोडल्या पाहिजेत. "आर्यांनी द्रविड लोकांना जिंकून" इ. इ. मूर्खपणाच्या थापा हा

अनुक्रमणिका

त्यातलाच एक भाग आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात "...आणि तुमचे युरोपीयन पंडित, आर्यांनी कुठल्या तरी परदेशांतून येऊन येथील आदिवासींच्या जमिनी हिसकावून त्यांची कत्तल करून भारतात वसाहत केली. इ. ज्या गप्पा मारतात ही सर्व मूर्खपणाची बडबड होय!..."

ज्या ज्या भूभागात संधी मिळेल तिथले मूळचे लोक कापून काढून युरोपियन लोक खुशाल तिथे वसाहत करतात. अर्थात आर्य लोकांनी हिंदुस्तानात तेच केले असेल अशी ते समजूत करून घेतात...

पण या समजुतीला तुमचा पुरावा काय? केवळ तर्कटच ना? मग तुमचे तर्कट तुमच्याजवळ ठेवा!" (इंग्रजी खंड ५, पृ. ५३४-३५)

अन्यत्र स्वामीजींनी तामीळ प्रांतांतील लोक हेही तामीळ भाषा बोलणारे व नाकाडोळ्यांनी उत्तरेतील लोकांपेक्षा अधिक सुंदर असलेले आर्यच होते असे दाखवून दिले आहे. (खंड ४, पृ. ३००-३०१)

'द्रविड मुन्नेत्र कळघम्' च्या आजच्या हिंदीद्वेषात, इंग्रजीतून लाभलेल्या या खोट्या इतिहासाचा भागही कमी नाही! इंग्रज गेल्यावरही इंग्रजीच्या ओंजळीनेच पाणी प्यायचे ठरले, तर इंग्रजांनी पिकविलेला हा खोटा इतिहासही या देशात स्थानिक होणार!

अनुक्रमणिका

२३. हिंदीचा उपयोग आणि दुरुपयोग

१४ सप्टेंबर हा दिवस गेली एकोणीस वर्षे 'हिंदी दिन' म्हणून पाळण्यात येत असतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हिंदुस्तानात हिंदीचा उपयोग कितपत वाढला आहे? हिंदीचा प्रसार म्हणजे हायस्कूलमधील मुलांनी संस्कृत सोडून हिंदी घेणे किंवा बी.ए., एम.ए. च्या विद्यार्थ्यांनी सहजासहजी वरचा वर्ग मिळविण्याकरिता हिंदी घेणे असे मी तरी समजत नाही. आपल्याच अन्य प्रांतीय देशबांधवांशी आपण इंग्रजीतून व्यवहार करणे ज्या दिवशी बंद होईल, त्या दिवशी हिंदीचा खरा उपयोग सुरु झाला, असे मी समजेन. या दृष्टीने हिंदीचा प्रसार झाला कितपत झाला आहे, ते १४ सप्टेंबरच्या निमित्ताने पाहिले पाहिजे. मी तर म्हणेन की इंग्रजीचा आजचा अकारण उपयोग बंद होणे हे हिंदीच्या वापरला अत्यावश्यक आहे.

इंग्रजीशिवाय आमचे व्यवहार चालू शकतील काय? आजचे आमचे गुलामी मन उत्तर देते, "छे! ते अशक्य आहे. रेल्वे, पोस्ट, तार, कोर्ट-कचेऱ्या यांचे इंग्रजीशिवाय कसे होणार?" पण हे विसरता येत नाही का, केवळ पंचवीस वर्षांपूर्वीच, 'इंग्रज अधिकारी आणि इंग्रज सैन्य येथून निजधामाला गेल्यास हिमालय कोसळून पडेल,' अशी आमची धारणा होती! आज त्याच असहायतेने आम्ही इंग्रजी भाषेला कवटाळीत आहोत. दोन भिन्न भाषी प्रांतातील व्यवहाराची गोष्ट क्षणभर बाजूला ठेवली तरी मराठीभाषी लोकच एकमेकांशी इंग्रजीतून केवढा मोठा व्यवहार करतात ते पाहण्यासारखे आहे. वास्तविक व्यापाराचे क्षेत्र म्हणजे अशिक्षितांपासून सुशिक्षितांपर्यंत सर्वांचे क्षेत्र होय. त्यात स्वभाषेचा उपयोग सर्रास करणे सर्वात सुलभ पण त्या क्षेत्रांतील नव्या उत्पादनांची नावे, कारखान्यांची नावे दुकानांची नावे, इंग्रजी ठेवल्याखेरीज आम्हाला चैन पडत नाही.

वास्तविक फार्मास्यूटिकल, होजिअरी, ग्लासवेअर, व्हल्कनायझिंग,स्नॅकबार यांसारखा शब्दांचे अर्थ ते आपल्या दुकानांच्या पाट्यांवर जाड अक्षरांनी रंगवून घेणाऱ्या व्यापाऱ्यांना तरी समजत असतील की नाही, याची शंकाच आहे. पण ही इंग्रजी नावे भाविकपणे रंगविली जातात. इतकेच नव्हे तर पुष्कळदा इंग्रजी अक्षरांतही रंगविली जातात! सर्वात हास्यास्पद गोष्ट म्हणजे आयुर्वेदीय औषधांना विचित्र इंग्रजी नावे दिल्याशिवाय आमच्या रोग्यांचा व डॉक्टरांचा त्यांवर विश्वास दिसत नाही! पंचामृतगुटीला 'कॅल्सिप्राइट' म्हटले तरच ते औषध खपते. सुरणाच्या कांद्यापासून (व इतर आयुर्वेदीय औषधांपासून) केलेल्या मुळव्याधीवरील औषधाला 'अशॉनिट' हे परकीय नाव दिले तरच त्यावर श्रद्धा बसते!

हिंदीचा प्रसार आणि इंग्रजीची हकालपट्टी, ही दोन्ही परस्परावलंबी आहेत आणि कोर्टकचेऱ्यांतील इंग्रजीच्या वापरापेक्षाही, व्यापारी, पेठांतील इंग्रजीचा धुडगुस अधिक अक्षम्य म्हटला पाहिजे. हिंदी वापरण्यासंबंधीच्या प्रतिज्ञेच्याही आधी, आपण सार्वजनिक व्यवहारात अकारण इंग्रजी न वापरण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. सार्वजनिक संस्थानी आपल्या पाट्या, पत्रांवरील छापील पत्ते इंग्रजीत न लिहिण्याची खबरदारी घेतली पाहिजे. म्हणजे मग धेडगुजरी नावांच्या अनेक जाडजूड पाट्या दिसणार नाहीत.दुकानांवरील पाट्यांचा विषय क्षुल्लक वाटला तरी डोळ्यांच्याद्वारे होणारे पाट्यांचे संस्कार छापील बारीक अक्षराहून अधिक दु:साध्य असतात.

या नंतरचे इंग्रजीच्या उच्चाटनाचे क्षेत्र म्हणजे कायदे मंडळातील आणि कॉलेजांतील भाषणांचे होय. या दोन्ही क्षेत्रांतून इंग्रजीचे उच्चाटन शक्य तितक्या लवकर झाले पाहिजे. दिल्लीच्या कायदेमंडळातून इंग्रजीचे उच्चाटन करायचे म्हणजे सर्व प्रांतांच्या प्रतिनिधींनी हिंदीतून बोलण्याचा सराव केला पाहिजे. प्रथम

दर्शनी हे अवघड वाटेल. पण जितक्या वाईट इंग्रजीत आपण आज बोलतो, तितपत हिंदीत कॉलेजात वा कायदेमंडळात बोलणे फारसे अवघड नाही! आणि इंग्रजीवर आपण जेवढे परिश्रम घेतो त्याच्या शतांश परिश्रमात आमचे प्रोफेसर व लोकप्रतिनिधी (M.P.) उत्तम हिंदी वक्ते होऊ शकतील.

पण इंग्रजीचा वापर नको याचा अर्थ इंग्रजीचे वाचन नको असा नव्हे. महाराष्ट्राखेरीज इतर काही प्रांतांतले लोक, इंग्रजी उत्तम लिहिणारे असूनही स्वभाषेत उत्तम लिहू शकतात. इंग्रजीचा किंवा दुसऱ्या एखाद्या युरोपीय भाषेचा अभ्यास केला की, लगेच स्वभाषेचा वापर बंद ठेवण्याची जशी गरज नाही तशीच स्वभाषेतून सर्व देशी व्यवहार करायचे ठरविले, की लगेच इंग्रजीचे अज्ञान पोसण्याची गरज नाही. दोन भाषा सफाईने बोलणे सर्वसामान्य पदवीधराला जड जाऊ नये. मग त्या भाषा इंग्रजी, मराठी असोत की हिंदी, मराठी या असोत.

ते काही असो. इंग्रजी या देशात कायमची राहावी व राहणार, असे मानणारे लोक स्वातंत्र्याच्या पडवीपर्यंतही पोहोचले नाहीत असे म्हटले पाहिजे. कारण स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य नव्हे, आर्थिक स्वातंत्र्यही नव्हे! जे स्वातंत्र्य राष्ट्रीय 'स्वत्व' (Identity) टिकवू शकत नाही, ते म्हणजे परराष्ट्राची दलाली होय. मग ते परराष्ट्र अमेरिका असो, इंग्लंड असो, की रशिया असो!

पण हिंदीच्या अभ्यासातही काही पथ्ये पाळली पाहिजेत. नाहीतर इंग्रजीच्या अभ्यासाहूनही हिंदीच्या अभ्यासाचा स्वभाषेवर – मराठीवर – दुष्परिणाम होणे शक्य आहे. आज तर तो परिणाम भयंकरच झालेला दिसत आहे. कारण या दोन्ही भाषांचा पाया जो संस्कृतचा अभ्यास तो आमच्या आजच्या 'असंस्कृत' शिक्षणखात्याने वाऱ्यावर सोडला आहे. काही अडाणी पुढारी संस्कृत ही उच्चवर्णीयांची भाषा अन् म्हणूनच बहुजन समाजाला निरुपयोगी, हे मत पसरवीत आहेत, असे माझे शिक्षक बंधू सांगतात! ते जर खरे असेल, तर हे बहुजन समाजाचे पुढारी बहुजन समाजाकरिताच अज्ञानाचा खोल खड्डा खणून ठेवीत आहेत. कै. भास्करराव जाधव, श्री. तावडे यांच्यासारखे सुज्ञ बहुजन हितचिंतक, संस्कृतचे भोक्ते असल्याचे दिसून येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कृतच्या अभ्यासाचे भोक्तेच होते. शिक्षणतज्ज्ञ विठ्ठलराव घाटे यांचे मत अभ्यासक्रमांत संस्कृतला महत्त्वाचे स्थान असावे असे आहे. पण आज अकाली संस्कृत सोडणारे व अकाली हिंदी शिकणारे पदवीधर जे दिव्य मराठी लिहितात ते पाहिले म्हणजे, या तिन्ही भाषांचे अज्ञान असूनही माणूस एम. ए. होऊ शकतो, एवढेच सिद्ध होते!

पण भाषेचा घात इथेच संपत नाही. हिंदी व मराठी दोन्ही भाषा प्राय: एकाच लिपीत लिहिल्या जातात. पण एवढ्या आधारावर आजचे तरुण लेखक हिंदीत जे संस्कृत शब्द मराठीपेक्षा वेगळ्याच अर्थाने वापरले जातात ते मराठीत हिंदीतल्याच अर्थाने वापरण्यात 'नया ढंग' साधल्याची फुशारकी मानतात! 'स्वर्गस्थ' या अर्थाने, 'स्वर्गीय', 'सादर करणे' या अर्थाने 'प्रस्तुत करणे', 'सोय' या अर्थाने 'सुविधा', असे शब्द वापरण्यात काही नवीन मंडळींना भूषण वाटत आहे. अपक्व वयात हिंदी शिकल्याचा हा दुष्परिणाम की अपक्व वयात मराठी लिहू लागल्याचा परिणाम, हे सांगणे कठीण आहे! हिंदीच्या ज्ञानामुळे मराठीची प्रकृती बिघडू लागली तर, 'उपाय करता अपाय' झाल्यातलाच तो प्रकार म्हणावा लागेल.

अनुक्रमणिका

२४. शिक्षणात हिंदीचे स्थान कोणते?

गेल्या शनिवारी पुण्यातील संस्कृतप्रेमी शिक्षण तज्ज्ञांची एक प्रातिनिधिक सभा साहित्य परिषदेच्या सभागृहात भरली होती. या सभेत पुणे विद्यापीठातील संस्कृत केंद्राचे प्रमुख डॉ. जोशी, प्रिं. सुरु, डॉ. खेर, प्रो. अर्जुनवाडकर, प्रो. वीरकर यांच्यासारखी शिक्षणक्षेत्रातील विद्वान मंडळी तर बोललीच पण शिवाय दोन साहित्य संमेलनाध्यक्ष (घाटे व क्षीरसागर) बोलले. अध्यक्षस्थानी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संस्कृत विद्वान डॉ. दांडेकर हे होते. श्रोत्यांतही डॉ. गो. के. भट, प्रो. मंगरूळकर, डॉ. कु. जयश्री गुणे यांसारखी संस्कृतच्या क्षेत्रांतील प्रसिद्ध मंडळी होती. संयोजकांतील व्यंकटेशशास्त्री जोशी व डॉ. पळसुले यांनी म्हटल्याप्रमाणे शैक्षणिक प्रश्नाकरिता एवढी प्रातिनिधिक सभा क्वचितच झाली असेल. (या सभेचा वृत्तांत वृत्तपत्रांनी दोन ओळीदेखील दिला नाही!) साहजिकच आहे. गेल्या दीडशे वर्षांतील आधुनिक शिक्षणक्रमात ज्या विषयाला अग्रस्थान होते, त्याला केराच्या कोपऱ्यात ढकलणारे शिक्षणखाते पाहून महाराष्ट्रीय विद्वान खडबडून जागे झाले नसते तरच आश्चर्य! आजच्या शिक्षणखात्याला संस्कृतच्या स्थानासंबंधीच्या सूचना करण्याची वेळ संपत आली असल्याने पुण्यातील संस्कृतविद्येच्या प्रमुख संस्थांना धावपळ करून आगीचे बंब बोलावणे भाग पडले! मग इत्यर्थ काय ठरला? इत्यर्थ दोन वाक्यांत सांगता येईल. संस्कृतची उपेक्षा करणे हास्यास्पद होईल, आणि हिंदीला स्वातंत्र्यानंतर शिक्षणक्रमात भलतेच स्थान दिले गेले आहे.

थोडक्यात म्हणजे, (एका वक्त्याने सांगितल्याप्रमाणे) आजचे शिक्षणखाते छप्पन्न प्रयोग करण्यात अग्रेसर असेल, पण त्यांच्या विद्वान सल्लागाराजवळ 'तरतमभाव' अथवा Sense of value मात्र त्रिभाषा शिक्षणाच्या बाबतीत तरी, फारच अल्प आहे. सर्व भारतीय भाषांच्या शिरोभागी असलेल्या, देवांच्या आणि पितरांच्या संस्कृत भाषेला अडगळ समजणाऱ्या विद्वानांची मूल्य-कल्पना कोणती असावी याची कल्पनाच करवत नाही! उलट जी आंतरप्रांतीय व्यवहाराची भाषा म्हणून या देशात (शिक्षणक्रमात नसूनही) शेकडो वर्षे वापरली जात आहे, ती जणू ग्रीक किंवा चिनी भाषा असल्याप्रमाणे अभ्यासक्रमात अवडंबर माजवले जात आहे.

परवाच्या विद्वत्सभेचा 'कन्सेनसस' जर कोणता असेल तर हिंदीच्या स्तोमामुळे शिक्षणखात्याने आज भाषाशिक्षणाची ही हास्यास्पद अवस्था करून ठेवली आहे, हा होय. विठ्ठलराव घाटे यांनी सुचविले की, हिंदीला फारतर हायस्कूल शिक्षणातील दोनच वर्षांत स्थान असावे. मी माझ्या भाषणात हिंदी अभ्यासक्रमाचे आणखीही काही धोके दाखविले होते. ज्यांचे मराठीचे ज्ञानही अद्याप पुरते नाही अशा दहा वर्षांच्या मुलांवर हिंदीचा मारा केल्यास त्यांच्या डोक्यात गोंधळ माजल्याशिवाय राहत नाही.

एकच शब्द मराठीत एका अर्थाने तर हिंदीत दुसऱ्या अर्थाने वापरला जातो. एकच शब्द मराठीत एक प्रकारे लिहिला जाणार तर हिंदीत दुसऱ्या प्रकारे लिहिला जाणार! खेड्यातील मुलांना 'पानी' ऐवजी शिक्षक 'पाणी' लिहायला शिकवितात ना शिकवतात तोच त्यांच्या डोक्यात हिंदी 'पानी' शिरते! आणि जे शिकविले ते विसरण्याची वेळ येते. 'दुसरा' शब्दातील 'दु' ऱ्हस्व काढायचा हेही लहान मुले लक्षात ठेवतात न ठेवतात तोच हिंदीतील दीर्घ 'दूसरा' त्यांना शिकावा लागतो.

पण आपत्ती एवढीच नाही. गेल्या शंभर सव्वाशे वर्षांतील विचारप्रधान मराठी गद्याच्या निकोप विकासाने मराठीतील संस्कृतोद्भव शब्द विशिष्ट अर्थाने बांधले गेले आहेत. ते शिकताशिकताच हिंदीतील त्याच शब्दांचे वेगळे उपयोग किंवा त्याच अर्थी वेगळ्या संस्कृत शब्दाचे उपयोग लहान मुलांच्या कानी

पडल्यास, त्यांच्या डोक्यात गोंधळ झाल्याशिवाय राहत नाही. ‘भाषांतरा’च्या ऐवजी ‘अनुवाद’ , ‘सामना’ या ऐवजी ‘प्रतियोगिता’ ,’सोय’ च्या ऐवजी ‘सुविधा’ असले शब्द रूढ मराठी शब्दांचे स्थान अकारण अस्थिर करतात. हिंदीच्या संपर्काने व अनुकरणाने मुळात नेमक्या (Precise) असलेल्या मराठी शब्दाऐवजी भोंगळ व बोजड शब्द वापरण्याचा मोह होत आहे. अलीलकडच्या हिंदीत संस्कृत शब्दांचे तर प्राचुर्य आहेच, पण शिवाय ते चुकीच्या रुपात आणि चुकीच्या अर्थातही रूढ आहेत. इंग्रजीच्या अतिसंपर्काने जेवढे नुकसान झाले नाही, तेवढे हिंदीच्या अल्पवयातील अभ्यासाने होणार हे उघड दिसू लागले आहे. यावर इलाज एकच. हिंदीची हायस्कूलमधून हकालपट्टी करणे आणि पूर्ण विषय म्हणून संस्कृतचा अभ्यास हायस्कूलमध्ये अनिवार्य ठेवणे. हिंदीसारख्या जवळच्या भाषेचा अभ्यास मुलांच्या माथी वर्षानुवर्षे लादण्याची मुळीच गरज नाही ‘सर्टिफिकेट कोर्स ’ म्हणून ठेवल्यानेही हिंदीचे कामापुरते ज्ञान होऊ शकेल.

अनुक्रमणिका

२५. मराठीने केला कानडी भ्रतार

पन्नास वर्षांच्याही पूर्वीची गोष्ट. मी नुकताच मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालो होतो. वयाने व त्याहूनही आकृतीने लहान म्हणून कोणाच्या तरी छत्राखाली मला कॉलेजच्या गावी पाठवायचे ठरले. कै. अश्वत्थामाचार्य गजेंद्रगडकर त्यावेळी नुकत्याच निघालेल्या धारवाडच्या कर्नाटक कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक होते. साताऱ्याच्या गजेंद्रगडकर मंडळींचा आणि आमच्या घराचा जुना ऋणानुबंध होता. शिवाय त्यांचे कनिष्ठ बंधू प्रल्हादाचार्य हे सातारा हायस्कूलमधील माझे वर्गबंधू या सर्व योगायोगामुळे कानडीचा शब्दही कानाने न ऐकलेला, माझ्यासारखा सातारकर मुलगा, धारवाडच्या कॉलेजमध्ये दाखल झाला!

तो काळ संयुक्त कर्नाटक चळवळीच्या प्रारंभाचा होता. 'संयुक्त महाराष्ट्र' हा राजकारणातील शब्दही अद्याप जन्माला यायचा होता. माझ्यासारख्या नुकत्याच शाळेतून बाहेर पडलेल्या मुलाला 'संयुक्त कर्नाटक' च काय, पण कर्नाटकदेखील नवीन! "मी कुठल्या परप्रांतात जात नसून महाराष्ट्राच्याच दक्षिण भागात जात आहे. पण तिथे भाषा मात्र कानडी बोलली जाते," एवढीच माझी बापड्याची कल्पना! तिथे गेल्यावर मात्र मला भोवताली संयुक्त कर्नाटकची धग जाणवू लागली. मी तेथील एका जुजबी खाजगी हॉस्टेलमध्ये राहत असे. कॉलेजला अद्याप स्वतःची इमारत नव्हती. मग वसतिगृह कोठून येणार? पण खाजगी का होईना, हॉस्टेलमध्ये राहिल्याने, त्यावेळी कल्पनेच्या आकाशात उदय पावत असलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या नवयुवकांशी माझा पहिलाच संपर्क आला. त्यांच्या अशा-आकांक्षा, उमेदी कळल्या. त्यांचे रागद्वेष कळले. त्या वसतिगृहातील विद्यार्थीच नव्हेत, तर खुद्द माझा रूममेटही 'कन्नड भाषिक' होता. विशेष गोष्ट म्हणजे, संयुक्त कर्नाटकच्या नवथर अभिमानाने धगधगणाऱ्या, या माझ्या एकूणएक हॉस्टेलबंधूना मराठीचे चांगलेच ज्ञान होते. मला मात्र कानडीचा एकही शब्द कळत नव्हता-मी यापूर्वी तो ऐकलेलाच नव्हता!

मराठी म्हणजे कोकणस्थ!

अर्धशतकापूर्वीच्या या अनुभवामुळे मी आजच्या कानडी-मराठी वादाकडे जणू एका ऐतिहासिक दुर्बिणीतून पाहू शकतो. आज उडालेला भाषिक भडका राजकारणाच्या पेट्रोलने इतका भडकला असला, तरी त्याची मुळे पन्नास-साठ वर्षांपूर्वी पेरलेल्या त्या चळवळीत आहेत. मला आठवते, त्यावेळी माझ्या वसतीगृहात असलेले ते काळसर, प्रेमळ कर्नाटकी बांधव 'कृतक' कोपाने मला 'कोक्या' म्हणत! कारण देशस्थ म्हणजे कर्नाटकस्थ, तर 'मराठी भाषी' म्हटला की तो 'कोकणस्थ' , अशी त्या भाबड्या कॉलेज युवकांची कल्पना असे! मी कानडीपुरता अडाणी असलो, तरी वादविवादात मागे सरणारा नव्हतो. आमच्या शिवाजी महाराजांना आणि लोकमान्य टिळकांना तोडीस तोड म्हणून माझ्या कानडी मित्रांजवळ जुन्या नव्या इतिहासातील प्रसिद्ध कर्नाटकीय नावे तयार असत.नव्या इतिहासातील दोन नावे 'दिवाकर'आणि 'कोंजलगी' ही असत, असे स्मरते. त्यातील आर. आर. दिवाकर हे आजही प्रसिद्ध आहेत.

कर्नाटकचा प्राचीन इतिहास काही दृष्टींनी महाराष्ट्रापेक्षाही दैदीप्यमान आहे. विजयनगर साम्राज्य हे जगातील अत्यंत वैभवसंपन्न साम्राज्यांपैकी होऊन गेले, हे सर्वमान्य आहे. शिवाजीमहाराज व शहाजीमहाराज यांनाही भारतीय परंपरेचे राज्य उभारताना विजयनगरच्या अस्सल भारतीय परंपरेचा थोडाफार उपयोग झाला, असे कै. शेजवलकरांसारखे इतिहासपंडित मानतात. पण विजयनगर साम्राज्य

प्राधान्येकरून कन्नडिगांचे होते की तेलुगू भाषिकांचे होते. याबद्दल वाद आहेत. अर्थात ते साम्राज्य विशाल असल्यामुळे, त्याचे पुढारी कुणीही असले तरी त्याची प्रजा अनेक प्रांतांतील होती.

पण मला त्याही काळात नवल वाटे, ते बेळगाव-धारवाडकडील लोकांत ही चळवळ निघावी याचे! कारण म्हैसूर तर आपल्या संस्थानी अस्मितेतच त्या काळात दंग होते! आणि बेळगाव-धारवाड आणि महाराष्ट्र यांत मला तर भाषेखेरीज कसलाच फरक दिसत नव्हता. आणि धारवाड, हुबळी, गदग, विजापूर, कारवार वगैरे भागात कानडीचे प्राचुर्य असले तरी प्राय: सर्व शहरवासियांना तरी कानडीबरोबरच मराठीही बोलता येते, असे माझ्या अनुभवाला येई. याभागातील स्त्री-पुरुषांचे पोशाखही म्हैसूरला जवळ नसून पुण्या-मुंबईलाच जवळ भासत! चालीरीती, सणवार, खाण्याचे पदार्थ यांतही फारसा भेद नसे. या सर्व बाबतीत अगदी आमच्या शेजारचा गुजरातही उत्तर कर्नाटकापेक्षा आम्हाला दूरचा आहे.सोयरिकी तर महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोहोतील उच्च वर्णीयांत इतिहासकालापासून होत आहेत. नोकरीव्यवसायाकरता धारवाड-कारवार पासूनचे सुशिक्षित व अशिक्षित लोक जेवढ्या प्रचंड प्रमाणात पुण्या-मुंबईकडे धाव घेतात, तेवढ्या प्रमाणात बंगलोर-म्हैसूरकडे येत नाहीत,असे आढळून येईल!

असे असता, याच भागात संयुक्त कर्नाटकाचा 'नारा' उठावा हे कसे काय? मला त्या काळात असे जाणवले की, ही चळवळ मराठी लोकांच्या तादृश वर्चस्वा विरुद्ध आहे. इंग्रजी शिक्षण आणि इंग्रजी अंमल सुरू झाल्याबरोबर पुण्या-मुंबईकडील इंग्रजी शिकलेले लोक सर्वत्र पुढे सरसावले. हे लोक कोकणस्थ आणि सारस्वत होते. बेळगाव-धारवाडकडचे नव्हे, तर सातारा-सांगलीपासून कराचीपर्यंत, यांपैकी निवडक लोकच शिक्षणधिकारी, न्यायाधीश वा डेप्युटी कलेक्टर असत. साहजिकच ते मत्सराचा विषय होत, कारण ते गोरेगोमटे, आधुनिक बनलेले आणि उच्चपदस्थ असत. महाराष्ट्रात देखील अस्तित्वात असलेल्या या वर्गमत्सराला, उत्तर कर्नाटकात प्रांतविरोधाचे स्वरूप आले! कोल्हटकर, आपटे, गोखले, चंदावरकर, कामत ही नावे जर बेळगाव-धारवाडकडे पुढे सरसावली नसती तर रामय्या, विश्वेश्वरय्या ही नावे बेळगाव-धारवाडकरांच्या क्रोधाला पात्र झाली असती!

पण मुद्याची गोष्ट वेगळीच आहे. एवढ्या मोठ्या देशात भिन्नभाषी प्रजेची सरमिसळ होणारच. बराच काळ देश पारतंत्र्यात नसता, तर ती याहूनही मोठ्या प्रमाणात झाली असती. पेशवाईत तेलंगी ब्राह्मण आणि कनोजी ब्राह्मण पुण्यात गोळा होत. संभाजी महाराजांचा कलुशा आणि नाना फ़डणीसांचा घाशीराम, हे कनोजी ब्राह्मणच होते. गर्दी करून घाशीरामला दगडांनी ठेचणारे पुण्यातील ब्राह्मण एकजात तेलंगी होते. शिवाजी महाराजांची आणि शहाजी महाराजांची राजकारणे भागानगरपासून ते तंजावरपर्यंत तेलुगु आणि तामीळ ब्राह्मणांमार्फतच चालत! 'बंगळूर' ही तर शहाजी महाराजांची राजधानीच होती. उलट राष्ट्रकूट आणि चालुक्य राजवंशाच्या कारकीर्दीत मराठी आणि कानडी प्रजा सरमिसळ आणि समान होती. पेशवाईत निजामाच्या नावाने वागणाऱ्या कोल्हापूरकरांना आणि जबरीने धर्मांतरे करणाऱ्या हैदर-टीपूंना 'शह' म्हणून पेशव्यांनी पटवर्धन सरदारांचे जाळे पसरले. त्यांच्याबरोबरच पुढे सरसावलेले कोकणस्थ, इंग्रजी अमलात मत्सराचा विषय झाले! पण आज भाषेने भिन्न पण वंशाने आणि संस्कृतीने एक असलेली कानडी आणि मराठी प्रजा, इकडे मुंबईपर्यंत तर तिकडे बंगलोरपर्यंत इतकी सरमिसळ झाली आहे की ,राजकारणापुरती (व मारामारीपुरती) त्यांची आडनावे आणि डोकी वेगळी निवडणे प्रांताभिमान्यांनाही कठीण झाले आहे! कामिशने नेमून नकाशातील सरहद्दी ठरवता येईल. पण सरमिसळ झालेली लोकवस्ती वेगळी काढणे शक्य नाही! हे लक्षात घेऊनच प्रसंगापुरत्या भडकलेल्या पुढाऱ्यांनी आपला क्रोध मर्यादित ठेवला पाहिजे.

अनुक्रमणिका

पण विपरीत गोष्ट अशी की, हा तंटा तोडण्याचे काम न्या.महाजनांसारख्या उत्तरवासियांकडे आले होते. हा भाग जातीने माहीत असलेल्या पाटसकरांनी, खेडे हा घटक मानण्याचा दिलेला स्वाभाविक निर्णय इतर प्रांतांत यशस्वी ठरला. महाराष्ट्रात महाजन कमिशनमुळे मागे पडला! महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे महाजन कमिशनपुढे साक्ष देण्याचा प्रसंग मजवर आल्यामुळे पुण्याच्या कौन्सिल हॉलमधील त्या कमिशनचे कामकाज माझ्या डोळ्यांपुढे आजही उभे राहते!

म्या पामराने त्या कमिशनबद्दल काय लिहावे! त्याकरिता आचार्य अत्र्यांचीच लेखणी हवी होती! 'नाठाळाचे माथा देऊ काठी' या न्यायाने अत्रे जी न्याय्य आणि शेलकी शिवीगाळ करीत, ती त्यांनीच करावी! मी आणि प्रो. बनहट्टी आपापली निवेदने घेऊन त्या महाजन कमिशनपुढे दाखल झालो होतो. आम्हाला वाटले चर्चा होईल, मुद्दे निघतील, भाषिक स्वातंत्र्याच्या गोष्टी निघतील-

-पण छे! निळसर, हिरवट डोळ्यांचे महाजन, आम्ही विनंती केल्यावरही काही प्रश्नच विचारायला तयार नव्हते! ते विटलेले आणि त्रस्त दिसले. मी म्हणालो की आमचे निवेदन आपल्या समोरच आहे, काही विचारायचे असेल तर विचारा. तेव्हा महाजन जणू उबग येऊन म्हणाले , "मी काय विचारणार? तुम्हीच मला ऐकवणार!" त्यानंतर झालेल्या प्रश्नोत्तरांतही त्यांची विटकी मन:स्थिती आमच्या प्रत्ययाला येत होती. अखेर तो महाजन अहवालही इतर अहवालांप्रमाणे केराच्या टोपलीत पडला! आणि हट्टी पुढाऱ्यांनी पेटविलेला प्रांतिक वितुष्टाचा अग्नी, तेरा वर्षे धुमसत राहिला! त्याचाच भडका आज उडाला आहे!

उत्तर कर्नाटकचे लोक सांस्कृतिक दृष्ट्या म्हैसूरपेक्षा महाराष्ट्राला अधिक जवळ आहेत आणि असमंजस महाजन अहवाल बाजूला फेकल्यावर ते महाराष्ट्रात आणि कर्नाटकात पहिल्याप्रमाणे प्रेमाने नांदतील याविषयी मला शंका नाही.

अनुक्रमणिका

२६. फारसीच्या अभ्यासाची गरज

मी येथील भावे स्कूलमध्ये शिक्षक असता, वरच्या वर्गांना शिकवणाऱ्या एका नाणावलेल्या शिक्षकांनी शिक्षकांच्या बैठकीत पृच्छा केली : 'खुशबू म्हणजे काय हो?' मला फारसी येते अशी (कदाचित माधवराव पटवर्धनांच्या संपर्कामुळे) उगीचच कल्पना झाल्यामुळे कोणीतरी 'त्या क्षीरसागरांना विचारा' अशी सूचना केली. त्यावर मी म्हणालो, 'खुश म्हणजे प्रसन्न, आनंददायक; आणि बू म्हणजे गंध किंवा वास. अर्थात खुशबू म्हणजे सुगंध'. 'सुगंध?' ते शिक्षक आश्चर्याने उद्गारले. "आपण तर बुवा तो माणूस अगदी खुशबू आहे असं म्हणतो. खुशबू म्हणजे आपलं..चैनी, खुशालचंद."

आजच्या मराठीतही शेकडा चाळीस फारसी-अरबीतून आलेले शब्द आहेत. जुन्या मराठीत तर ते शेकडा साठाहून अधिक भरतील. अशा स्थितीत 'खुशबू' म्हणजे 'खुशालचंद' यासारख्या भोंगळ अर्थावर शिक्षक भागवून घेऊ लागले, तर पंचाईत होईल! नुकतेच यवतमाळच्या य. खु. देशपांडे यांच्या निधनाचे वृत्त देतांना पुण्यातील एका दैनिकाने त्यांना ज्या अनेक भाषा येत होत्या त्यात 'पारशी' आणि 'परशीयन' या दोन भाषा नमूद केल्या आहेत! मराठीतील कित्येक साहित्यविषयक ग्रंथात व पीएच. डी. च्या प्रबंधात गझल 'हा एक वृत्तप्रकार आहे' अशी अद्‌भुत माहिती दिलेली आढळते. वास्तविक, मराठीच्या शिक्षकांना फारसी भाषा येत नसली तरी त्या भाषेतील शब्दाकडे चिकित्सकपणे पाहण्याइतपत शिक्षण मिळालेले असले पाहिजे. पण त्याकरिता फारसीचा पद्धतशीर अभ्यास केलेला एक तरी शिक्षक कॉलेजच्याच काय, पण हायस्कूलच्या शिक्षकवर्गातही असला पाहिजे. पण अभ्यासक्रमात ऐच्छिक म्हणूनही फारसी हा विषय नसल्यास शिक्षकांत फारसीचा अभ्यास केलेले शिक्षक असण्याचा संभव नाही. मी स्वतः सरकारी हायस्कूलमध्ये शिकत असता, इंग्रजी चौथ्या इयत्तेपासून दुसरी भाषा म्हणून संस्कृत ऐवजी फारसी घेण्याची सोय असे व त्याकरिता एक मुसलमान शिक्षकही असे. मी येथील भावे स्कूलमध्ये शिक्षक असता, तेथेही कित्येक वर्षे फारसी शिकविण्याची सोय असे. जे मुसलमान गृहस्थ भावे स्कूलमध्ये फारसी शिकवीत तेच येथील 'भारत इतिहास मंडळात'ही फारसी कागद वाचण्याचे काम करीत. म्हणजे इतिहास संशोधक मंडळालाही सदैव एका फारसी उत्तम प्रकारे जाणणाऱ्या मनुष्याची गरज होती व आहे.

महाराष्ट्रातील कॉलेजांत व विद्यापीठांत फारसी जाणणारे विद्वान नसतील, तर त्यांचे मराठी विभाग, हिंदी विभाग, गुजराती विभाग व इतिहास विभाग अपूर्णच समजावे लागतील. कॉलेजांच्या व विद्यापीठांच्या मराठी विभागात संस्कृतचा विशेष अभ्यास केलेला जसा एकतरी विद्वान हवाच तसाच फारसीचाही अभ्यास केलेला हवा. आपल्याकडे मात्र 'मराठी डिपार्टमेंट' मध्ये भरती करताना 'मराठीचे आठही पेपर घेतलेले असणे' हेच अधिक मोठे क्वालिफिकेशन समजले जाते! परवा माधवराव पटवर्धन यांच्या स्मृतिदिनानिमित्त सुप्रसिद्ध फारसी पंडित सेतूमाधवराव पगडी यांचे फारसीच्या अभ्यासाच्या आवश्यकतेसंबंधी सुंदर विद्वत्ता प्रचुर व्याख्यान झाले. फारसीच्या अभ्यासाअभावी अनेक क्षेत्रांत कसे अडते, याची त्यांनी गमतीदार उदाहरणे दिली आहेत. पुणे येथील भांडारकर इन्स्टिट्यूटमध्ये कित्येक दुर्मिळ फारसी हस्तलिखिते आहेत. पण फारसी वाचणाऱ्या विद्वानांच्या व ग्रंथपालांच्या अभावी त्यांचे वर्गीकरणही न होता ते परवापर्यंत पडलेले होते! तर क्वचित योगवासिष्ठासारख्या ग्रंथाचा कर्ता 'रामचंद्र' असा सारख्याही नोंदी झालेल्या होत्या!

जुन्या काळी हिंदुस्थानात बऱ्याच ठिकाणी राजकीय पत्रव्यवहाराकरिता तरी पदरी फारसी जाणणारे लोक ठेवावे लागत. आज तो जमाना बदलला असला तरी, जुने फारसी कागदपत्र,

भारतासंबंधीचे व भारताच्या इतिहासासंबंधीचे जुने ग्रंथ अनेक ग्रंथालयांत आहेत, त्यांच्या अभ्यासाकरिता नव्हे, नुसत्या वाचनाकरिताही आपण इंग्रज विद्वानांवर वा परप्रांतीय विद्वानांवर अवलंबून राहतो; व त्याचे परिणाम भोगतो. आपल्याकडील कै. शेजवलांसाररख्या तालेवार इतिहास पंडितालाही फारसी येत नाही, म्हणून टोमणे सहन करावे लागत असत. फारसीच्या अभ्यासाच्या आड मुख्यतः आपली एकमार्गी शिक्षणपद्धतीच येते. कधी संस्कृतवरच भर; कधी इकॉनॉमिक्सकडे दाटी, तर कधी इंजिनिअरिंगकडे दाटी! अशी आपली विषयविभागणी असते. समाजाच्या गरजांप्रमाणे व विद्यार्थ्यांच्या खऱ्याखुऱ्या कलाप्रमाणे विषयाची निवड होतच नाही.त्यातच अलीकडे 'फारसी ही मुसलमानांची भाषा', 'फारसी शब्दांवर आपण तर बहिष्कार घालू लागलो आहोत' या कल्पनेचाही पगडा आहे. फारसी ही 'मुसलमानांची' कितपत आहे, याची चिकित्सा सेतुमाधवरावांनी केवळ हिंदुस्थानच्या इतिहासाची छाननी करूनच नव्हे, तर इराण, तुर्कस्थान, इजिप्त, अफगाणिस्थान या अनेक देशांच्या इतिहासाची छाननी करून केली. बहुसंख्य मुसलमानांनाही ती भाषा परकीय असून त्यांनी इतिहासाची ती केवळ फॅशन म्हणून स्वीकारली होती. किंबहुना इंग्रजी आज आपल्या डोक्यावर बसली त्याप्रमाणे ती त्यांच्या डोक्यावर बसली होती. पण ते काही असले तरी आपले जुने वाङ्मय व आपला जुना इतिहास यांचा अभ्यास फारसीच्या अभ्यासाशिवाय होणार नाही. जे लोक फारसीच्या अभ्यासाशिवाय ते धकवू पाहतील ते 'खुशबू म्हणजे खुशालचंद' आणि 'गझल हा एक वृत्तप्रकार आहे,' असल्या ज्ञानावर समाधान मानतील. सेतूमाधवरावांनी इतिहासज्ञानातील गफलती तर याहूनही धक्का देणाऱ्या अशा सांगितल्या. अल्लाउद्दीन आणि पद्मिनी यांची जी कथा आपण आपल्या मुलांना शिकवतो ती, अनैतिहासिक असून एका फारसी काव्यातून नायक-नायिकांना एका मुसलमान कवीने दिलेली पद्मिनी- अल्लाउद्दीन ही नावे खरी धरून जो इतिहास बनविला गेला तोच आपल्या मुलांना अद्याप शिकवीत आहोत! तसे पहिले तर अल्लाउद्दीनाने ज्यावेळी पद्मिनीची अभिलाषा धरली असे आपला तथाकथित इतिहास सांगतो, त्याकाळात पद्मिनी बारा मुलांची आई होती! प्राचीन भारतीय इतिहासाची बहुतेक साधने फारसीत आहेत. आणि त्या भाषेचे ज्ञान नसल्याने किंवा त्या भाषेतील सामग्री इंग्रजीत आली तेवढीच वाचल्याने, आमचे विद्वान डोळे बांधून इतिहासात संचार केल्यासारखे करीत असतात. पण फारसी भाषा व फारसी लिपी (वस्तुतः अरबी लिपी) शिकण्याची आणखी एक गरज आहे. हिंदू आणि मुसलमान यांचे एकमेकांविषयीचे दुष्ट ग्रह वाढतच गेले आहेत, अशा स्थितीत मुसलमानांनी चालविलेली उर्दू वृत्तपत्रे कोणता प्रचार करीत असतात, ते वाचण्याची गरज महाराष्ट्रातील कट्टर हिंदुत्वनिष्ठ पुढाऱ्यांना भासत नाही, हे नवल आहे. उत्तर हिंदुस्थानात अनेक हिंदू पत्रकारांना उर्दू वाचता येते. महाराष्ट्रात मात्र आम्ही आपली गुजराण मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांवरच करतो. परवापर्यंतचे निजामाचे राज्य होते म्हणून आजही उर्दू-फारसी वाचू शकणारे काही महाराष्ट्रीय विद्वान मराठवाड्यात वा मराठवाड्यातून आलेले असतात. (सेतूमाधवराव त्यातलेच एक आहेत.) पण निजामाच्या राज्यात वाढलेली पिढी लुप्त झाल्यावर महाराष्ट्रीय विद्वानांत फारसी, उर्दू वाचणारे किती सापडतील? मला वाटते, पूर्वी जे दरबार आपल्या पदरी ज्याप्रमाणे 'पारसनवीस' ठेवीत त्याप्रमाणे आजच्या विद्यापीठांनी आणि वृत्तपत्रांनी आपल्या पदरी पारसनवीस ठेवण्याची गरज आता उत्पन्न झाली आहे!

अनुक्रमणिका

२७. हिंदुस्थानातील इंग्रजी भाषेचे भवितव्य

हिंदुस्थानात इंग्रजांचे राज्य होणे ही गोष्ट केवळ राज्यक्रांती नसून सामाजिक व भौतिक क्रांती होय असे मानण्यात येते. मार्क्स सारख्या दूरदर्शी सामाजिक तत्त्ववेत्याने तर या क्रांतीस आशिया खंडातील पहिली खरी क्रांती असे संबोधिले आहे. (मार्क्सचे हिंदुस्थान विषयक लेख पाहावेत) ही क्रांती कोणकोणत्या क्षेत्रात होत आहे याचे तिच्या सुरुवातीस इंग्रजांस व हिंदवासीयांस बेताचेच ज्ञान होते आणि ती ज्या साधनांनी घडून येत होती त्यांच्याही दीर्घ-परिणामाविषयी पूर्ण ज्ञान नव्हते. जे बदल त्या वेळी क्रांतिकारक वाटले, ते आता विसरले आहेत. व जे त्यावेळी केवळ मामुली सोयी म्हणून सुरू करण्यात आले त्याचे परिणाम आता जाणवत आहेत. ख्रिस्ती धर्माचा इंग्रजी आमलाचे प्रारंभास केवढा बाऊ वाटला! उलट, इंग्रजी शिक्षणाइतकी पथ्यकर सुधारणा दुसरी कोणतीच वाटत नसे! पैकी ख्रिस्ती धर्माचा बाऊ करणारा आता वेडा ठरेल, इंग्रजी शिक्षणाच्या बऱ्या वाईट परिणामांचा जमा- खर्च मांडणारा शहाणा व जागरूक ठरेल. कित्येक लोक इंग्रजीचे अध्ययन ही गोष्ट रेल्वे, तारायंत्रे, छापखाने, गिरण्या याप्रमाणे प्रगतीला अत्यावश्यक समजतात; तर कित्येक इंग्रजांची भाषा, आपल्या स्वातंत्र्यहर्त्यांची भाषा म्हणून द्वेष्य समजतात. दोघांच्याही अनुमानात अनुमानविषयाच्या साहचर्यामुळे दोष उत्पन्न झालासे वाटते. एकाचे म्हणणे रेल्वेबरोबरच आलेली गोष्ट रेल्वे इतकीच उपयुक्त! तर दुसऱ्याचे म्हणणे एक अपकारक गोष्ट करणारा मनुष्य दुसरी उपकारक गोष्ट कशी आणील? सारांश, आजच्या स्थित्यंतराच्या काळात आपणांस परिणामावरूनच स्वतंत्र विचार केला पाहिजे. इंग्रजी भाषेच्या अध्ययनाने आपणास काय दिले- आपले काय हिरावून घेतले व आजच्या थोड्याफार स्वराज्याच्या काळात त्या भाषेस आपण कोणते स्थान द्यावे, या विषयीचा तो विचार होय.

आजपर्यंत इंग्रजीस आपण कोणते स्थान देत होतो? मला वाटते इंग्रजी अमलानंतर आपण इंग्रजी भाषेस केवढे स्थान दिले होते याची खरी कल्पना फार थोड्या लोकांना असेल. प्रत्येक राष्ट्रास काही भाषांचे काही दृष्टींनी महत्त्व असते. लोकभाषा, आंतरराष्ट्रीय भाषा, धर्मव्यवहार भाषा या दृष्टींनी दोन तीन भाषांचा परिचय ठेवावा लागतो व तारतम्याने ठेवल्यास हितकारकच असतो. एका साम्राज्यवादी कवीने " What do they of England know who only England know?" अशा अर्थाची एक पद्यपंक्ती लिहिली आहे. भाषेच्या बाबतीतही तसेच आहे. स्वभाषेचेही खरे ज्ञान होत नसते. पण 'अद्‌भूत-भूमी (land of wonders) म्हणून गणलेल्या आमच्या भारतवर्षात इंग्रजी भाषेची कथाही थोडी अद्‌भूत होऊन गेली आहे. पाच हजार मैलांवरील लहानशा बेटाच्या या भाषेस आपण आज मायभाषा, परदेश व्यवहाराची भाषा, आणि गीर्वाण भाषा या तिन्हींचे स्थान एकदम दिले आहे! एवढे महत्त्व एका भाषेस कधीच आणि कोठेच आले नसेल!

कित्येकांस वरील गणना थोडी अतिशयोक्तीची वाटेल. अशा मंडळींनी अतिपरिचयामुळे स्वाभाविक वाटणाऱ्या गोष्टीकडे थोडी नजर फिरवून पहावे. म्हणजे त्यास असे दिसून येईल की, ज्या शिक्षणाचा फैलाव गेल्या शंभर वर्षात झाला म्हणून आपण संतोष मानतो आणि एक निर्भेळ हित पदरात पडले म्हणून समजतो, ते शिक्षण म्हणजे बहुतांशी या नवख्या व अत्यंत भिन्नधर्मीय भाषेचा परिचय होय! इंग्रजी लिहिणे, वाचणे, बोलणे- अनेक विषयांचा इंग्रजीतून अभ्यास व त्या अभ्यासाचे फिरून इंग्रजीतून आविष्करण ... या सर्वांस मिळून आपण शिक्षण समजत आहो. या सर्व चक्रव्यूहात, श्रम, खरे ज्ञान आणि इंग्रजीचे ज्ञान या तिन्हींचे प्रमाण काय हे ठरविण्याची वेळ आली आहे.

अनुक्रमणिका

पैकी मधला म्हणजे खऱ्या ज्ञानाचा प्रश्न आपण तूर्त बाजूला ठेवू आणि श्रम व इंग्रजीचे ज्ञान यांचे प्रमाण पाहू. इंग्रजी भाषा यावी म्हणून आज आपण जेवढे श्रम करतो तेवढे कोणत्याही एका – मग ती देवाची का भाषा असेना!- भाषेकरिता करावे की नाही, हा एक महत्वाचा प्रश्न आहे. ज्याला आवडीचा व्यासंग (labour of love) म्हणतात त्याचा प्रश्नच नाही. कारण हौसेला मोल नाही! पण राज्ययंत्रातून सर्वांस लागू होणाऱ्या शिक्षणक्रमांत एका भाषेस एवढे स्थान देणे हे श्रमाच्या मितव्ययाच्या दृष्टीने कितपत क्षम्य आहे याचा विचार, ही पहिली गोष्ट आणि त्यानंतर दुसरी गोष्ट म्हणजे आंग्ल भाषापरिचय हा ज्ञानाचा मध्यबिंदू कल्पूनही गेल्या शंभर वर्षांत आपण तो परिचय कितपत करून घेतला?

इंग्रजीच्या परिचयाचेही वेगवेगळे क्रम कल्पावे लागतील. जेथे एक प्राचीन, सुसंस्कृत आणि बुद्धिमान राष्ट्रच्या राष्ट्र इंग्रजी शिकू लागले तेथे भीत भीत व्याकरणदोषयुक्त बोलणाऱ्यांपासून शास्त्री-सुरेंद्रनाथांसारख्या वाचस्पतीपर्यंत सर्व प्रकार आढळणार, हे उघडच आहे. तरी भाषाप्रभूंची संख्या, सम्यक अध्ययन केलेल्यांची संख्या आणि र-ट-फ करणारांची संख्या यांचे योग्य प्रमाण आपल्या पदरात पडले की नाही, याची प्रत्येक प्रांताने गणती करण्याची वेळ आली आहे! पहिल्या वर्गात ज्यांचे इंग्रजी परदेशचे लोकही वाचतात असे राममोहन, विवेकानंद, टागोर, गांधी, गोखले यांसारखी मंडळी; दुसऱ्या वर्गात जे लोक आपल्या विषयापुरते संपूर्ण अध्ययन व अध्यापन इंग्रजीतून वाकबगारपणे करू शकतील असे प्रोफेसर, एडिटर वगैरे आणि तिसऱ्या वर्गात परीक्षेपुरते इंग्रजी पढणारे असंख्य लोक! हे वर्गीकरण केल्यानंतरचा प्रश्न म्हणजे ज्यांस दोन संस्कृतीचे मीलन घडवून आणणारे प्रतिभावंत म्हणता येईल असे इंग्रजी अमलापासून किती निघाले? अशा प्रतिभावंतांची संख्या कोणत्याही राष्ट्रात थोडीच असते. तरी हिंदुस्थानसंबंधीच सांगावयाचे झाल्यास सर्वस्वी परकीय भाषेवर असामान्य प्रभुत्व मिळवून जागतिक वाङ्मयात भर घालण्यात आपल्या देशाचा हात कोणास धरवणार नाही. दुसरा वर्ग जन्मभर इंग्रजीचे आराधन करणाऱ्या बैद्धिक वर्गाचा. यांचा इंग्रजीचा व्यासंग आणि इंग्रजीचा गर्व त्यांच्या बरोबरच लयाला जातो. विशेषत: कॉलेजमधील प्रोफेसर मंडळींच्या जन्माच्या व्यासंगाचे आणि चिरगर्वाच्या विषयाचे काहीच चीज होत नाही, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. इतरेजनांच्या स्पेलिंग-पठणाची फलश्रुती काय याचा प्रस्तुत लेखकास तर काहीच शोध लागत नाही. मॅट्रिक होण्याकरता, बी. ए. करता, एम.ए. करता 'कंपलसरी' पठण करणारांच्या श्रमाचे फळ काय? एक गोष्ट मात्र दृष्टीआड करून चालणार नाही. आणि ती म्हणजे टागोर, गांधी जितके इंग्रजीशी समरस होणार नाहीत तितके आमचे बौद्धिक व्यवसायी (learned profession करणारे) प्रोफेसर, वकील वगैरे झालेले असतात. आणि प्रोफेसरास प्रोफेसर होण्यास जितकी डोकेफोड करावी लागते त्याहूनही अधिक, 'कंपलसरी' म्हणून इंग्रजी पठण करणाऱ्या आणि पाच टप्प्यांनी एम.ए. होणाऱ्या पोटार्थी विद्यार्थ्यांस लागते. सारांश, परक्या भाषेच्या अध्ययनात केवळ अनिर्वाह – पक्ष म्हणून इतका दीर्घपरिश्रम करण्यात सद्व्यय होत आहे, असे म्हणता येणार नाही (शिवाय या अनिर्वाहपक्षी व्यासंगातून निर्वाहाचे साधनही निघत नाही, हे वेगळेच!)

पण, या परिश्रमांच्या हिशोबाचा प्रश्न काढताच कित्येकांस शाळा कॉलेजे, कोर्ट, कौन्सिले यांतील व्यवहारास व्यत्यय आणल्यासारखे वाटते.जे सुरळीत चालले आहे ते फिरविणे म्हणजे यातायात असे वाटते. पण, या मंडळींनी शिक्षणक्रमांतील अनैसर्गिक श्रमांच्या बाबतीतही असाच दयार्द्रपणा दाखविला पाहिजे. मराठीत काम चालवून घेणाऱ्या डिस्ट्रिक्ट जज्जची गैरसोय आणि 'अपरिहार्य' म्हणून मिनतवारीने स्नेह जोडणाऱ्या शेकडो अंडर ग्रॅजुएटांची गैरसोय यांपैकी कोणती पत्कारायची हे ठरविण्याची वेळ आज आली आहे. शिक्षण याचा अर्थ पुस्तकी शिक्षण आणि पुस्तक याचा अर्थ इंग्रजी पुस्तक हे समीकरण

अनुक्रमणिका

सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या परिश्रमांच्या दृष्टीने किती घातुक आहे याची कल्पना सवयीमुळे पुष्कळदा नीटशी येत नाही.

इंग्रजीने आज व्यापलेल्या स्थानाचा असा थोडा आमुलाग्र विचार करू लागताच कित्येकांस दोन महत्त्वाच्या शंका व्याकुळ करतात. एक म्हणजे अनेक देशीय विद्येचे द्वार जे इंग्रजी ते बंद केल्यास अकल्याण होणार नाही काय? आणि कौन्सिलचे वादविवाद, कॉंग्रेसची भाषणे आणि विविध अखिल भारतीय व्यवहार तुम्ही मराठीतून करणार की काय?

यापैकी इंग्रजीस दिल्या जाणाऱ्या पहिल्या श्रेयाची म्हणजे विविधज्ञानदातृत्वाची थोडी छाननी होणे जरूर आहे. अर्वाचीन काळातील विद्वानांनी विविध क्षेत्रांतील ज्ञानाची पैदास इंग्रजीच्या द्वारे केली, हे खोटे नाही. तथापि, ज्यांस विविध क्षेत्रांतील ज्ञानाची खरी लालसा आहे व ती इतक्या प्रमाणात आहे की देशी भाषा त्यांस अपुऱ्या पडतात अशा लोकांचे प्रमाण फार थोडे असते. अशा अत्यल्प ज्ञानप्रेमी लोकांकरिता सजविलेली विद्यालये आणि ग्रंथालये बिचाऱ्या 'कंपलसरी' ज्ञानाच्या वाटेकऱ्यांच्या दृष्टीने केवळ विद्यागौरीची आरासच नव्हत काय? शिवाय अर्वाचीन भारतवर्षाच्या प्रत्येक प्रांतात प्रत्येक पिढीत जे हाताच्या बोटावर मोजण्यासारखे खरे विद्यासेवक होतात त्यांना तरी इंग्रजीची अपरिहार्यता आहे काय? याही प्रश्नाचे उत्तर शोधताना थोडा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ उघडकीस येईल. वाङ्मय, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, राजशासन शास्त्र, इतिहास यांसारख्या पुस्तकी विद्येतही विद्वानांस इंग्रजीहून इतर भाषांतीलच ग्रंथ वाचावे लागतात. आजकाल सर्वतोमुखी असलेल्या काही जगमान्य ग्रंथकारांची नावे पाहिल्यास या म्हणण्याची सत्यता पटेल. टॉलस्टॉय, कार्ल मार्क्स, शोपेन् हौर, गटे, रोमा रोला, टागोर, गांधी, शॉ, वेल्स यांसारख्या सर्व जगातील बुद्धिमंतांच्या वाचनात येणाऱ्या ग्रंथकारांचे ग्रंथ आपण इंग्रजीतून वाचतो आणि इंग्रजी भाषेच्या पायी कृतार्थतेने लोटांगण घेतो. पण अशा जगद्विख्यात आणि जगत्प्रेरक ग्रंथकारांपैकी शेकडा नव्वद ग्रंथकार इंग्रजेतर असतात हे आपण — इंग्रजी घोकीत लहानाचे मोठे झालेले- आधुनिक सुशिक्षित कधीच लक्षात आणीत नाही. जगाच्या पाठीवर हिंदुस्थान खेरीज इंग्रजी 'कंपलसरी' नाही; तरी जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात वरील ग्रंथकार बुद्धिमंतांच्या परिचयाचे आहेत.

अशा स्थितीत नव्या स्वराज्याच्या काळात इंग्रजीचे पूर्वीचेच गीर्वाणपद कायम राहणार काय? आमच्यातील विद्वान आणि विचारवंत म्हणविणारांच्याही विचारांची धाव काही विशिष्ट कुंपणापर्यंत जाते. इंग्रजीतून गणित, रसायनादी विषय शिकणे, संस्कृतही इंग्रजीतून शिकणे, आजच्या इंग्लंडमधील शिष्टाचार, विनोद वगैरेंच्या लकबा समजावून घेण्यात धन्यता मानणे, इंग्रजी उच्चार थेट इंग्रजांइतके बोबडे वठवण्याकरिता ग्रामोफोन, रेडिओ, वगैरे साधनांचा मोठ्या उत्साहाने उपयोग करणे वगैरे गोष्टींत आमच्या विद्वान म्हणविणाऱ्यांसही विपरीतसे काही वाटत नाही. शिक्षणक्रमात बदल याचा अर्थ शेक्सपिअर जाऊन शॉ येणे आणि आय. इ. एस. मधील एका साहेबाने लिहिलेली पुस्तके जाऊन दुसऱ्या साहेबांची पुस्तके येणे! मोठ्यांत मोठ्ठा भाषाभिमान म्हणजे भाषांतराच्या व अनुकरणाच्या द्वारे स्वभाषा इंग्रजीच्या वळणावर नेण्याची पराकाष्ठा करणे! भाषाशुद्धीच्या नावाने इंग्रजीवर बहिष्कार घालू पाहणारांचीही भाषाभिमानाची मजल येथपर्यंतच आहे. स्वतंत्र देशातील अभ्यासक्रम आणि हिंदुस्थानातही राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळींच्या वेळी बोलली जाणारी स्वतंत्र शिक्षणाची भाषा सध्या भाषाभिमानीही काढताना दिसत नाहीत. कदाचित इंग्रजी कायमची हिंदुस्थानच्या डोक्यावर आली व आता आपण जास्तीत जास्त म्हणजे स्वभाषेत तिची भेसळ होऊ न देणे एवढेच करू शकू, असे या बाबतींतील या विद्वानांचे ठाम मत झाले असावे! पण स्वतंत्र विचार करणाऱ्यांस या बाबतीत पुढील गोष्टी पटल्याशिवाय राहणार नाहीत.

अनुक्रमणिका

१) जागतिक विचारांची भूक पदवीधरांपैकीही फार थोड्यांस असते व अशा थोड्या लोकांकरिता सर्वसामान्य विद्यार्थ्यांवर इंग्रजीची सक्ती करण्याचे कारण नाही.

२) जागतिक विचारांपैकी अत्यल्प भाग इंग्रजी ग्रंथकारांनी लिहिलेला असतो.

३) सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या इंग्रजीच्या अध्ययनाचे ध्येय इंग्रजीतून लेख लिहिणे आणि व्याख्याने देणे हे असल्याचे आजच्या अभ्यासक्रमावरून दिसेल. हे ध्येय अनावश्यक आणि हास्यास्पद आहे. आजच्या विद्यार्थ्यांच्या वयाची साधारणपणे ११ ते १८ ही वर्षे वरील ध्येयाकरिता खर्ची पडतात व त्या मानाने शेकडा नव्वद विद्यार्थ्यांच्या हाती इंग्रजीच्या शोचनीय अज्ञानाखेरीज काहीच पडत नाही.

४) या अक्षम्य अपव्यायाचे कारण इंग्रजीच्या अध्यापन-पद्धतीतील तऱ्हेवाईकपणा हेही आहे.

५) राष्ट्राच्या तरुण पिढीच्या वयांतील महत्त्वाची वर्षे पूर्वीप्रमाणे वाया घालवावयाची नसल्यास पुढील शिक्षणक्रमांतील इंग्रजी भाषेच्या स्थानाचा विचार राष्ट्रीय दृष्टीने व्हावयास पाहिजे.

पण स्वभाषेचा, इंग्रजी भाषेचा आणि तरुण पिढीच्या शिक्षणाचा विचार राष्ट्रीय दृष्टीने करण्यास इंग्रजाचे राज्य आणि इंग्रजी भाषा ‘ यावच्चंद्रदिवाकरौ’ हिंदुस्थानात चालू राहणार असे समजणाऱ्यांचा फारसा उपयोग नाही. हे लोक फार तर स्वभाषा टोपलीखाली झाकण्याचा प्रयत्न करतील; पण त्याबरोबरच इंग्रजीचे अध्ययन (आणि तेही थेट आपण इंग्लंडमध्ये राहत आहोत या कल्पनेने!) करीत राहतील. चालू स्थितीच्या आवरणातून पलीकडे पाहिल्याखेरीज भावी काळातील इंग्रजीच्या स्थानाचा प्रश्न सुटणार नाही.

२८. भाषांची लढाई आणि नवी विद्यापीठे

इंग्लंडमध्ये राजाच्या निधनाच्या वेळी एक विचित्र विरोधाभासात्मक उद्‌गार निघतो. " The King is dead; long live the King!" -अशा स्वरूपाचा तो उद्‌गार असतो. आपणही गणपतीसारख्या प्रिय दैवताच्या विसर्जनाचे वेळी, "पुढल्या वर्षी लवकर या!" असे झटकन म्हणण्यास चुकत नाही. 'इंग्रजी' भाषारुपी जी मरीआई, आपण गेली कित्येक वर्षे गावाच्या शिवेपलीकडे काढीत होतो ती आज शिवेवर उभी आहे. पण तिचा 'अलविदा' होण्यापूर्वीच आमच्यातील कित्येकांना रडू येऊ लागले आहे! आणि पाण्याने डबडबलेल्या डोळ्यांना यथाप्रमाण दर्शन (perspective) ते कितपत लाभणार? अर्थात 'कण्ठ:स्तम्भित बाष्पवृत्तिकलुषश्चिन्ताजडं दर्शनम् |' अशा अवस्थेत असलेल्या काही मद्रासी पंडितांनी इंग्रजी भाषेच्या हिंदुस्थानातील ऐतिहासिक वास्तव्याला, "उलटी(?) (retrospective) बढती "देण्याला सुरुवात केली आहे. इंग्रजी दैनिकांतील एक लेखक म्हणतो, " English has been with us for over two hundred years!" त्याच लेखकाने आणखी एक गमतीदार कोटिक्रम केला आहे, "आता काय इंग्रजी राज्य तर गेले! आता इंग्रजीला विटाळ राहिला नाही!" ("The British have departed and with them has gone the the sigma attached to English as the language of alien rulers.") इंग्रजी राजवटीच्या मागे, आठवण म्हणून राहिलेले इंग्रज अगर स्कॉच मिशनरी, हे यापुढे श्राद्धंपक्षाला ब्राह्मण म्हणून बोलवायला पंचाईत नाही, असे या लेखकाने का सुचविले नाही कोण जाणे!

पण या अदूरदृष्टीला कारण, केवळ विरह दु:खाने भरून आलेले डोळेच असतील असे नाही. सवय आणि तात्पुरती सोय, यांनी मनुष्य विरहाहूनही अधिक अंध बनतो. आणि अशीच कित्येक मंडळी इंग्रजीचा मुक्काम संपवावा कसा, यापेक्षा लांबवावा कसा या विवंचनेत आहेत!

आणि तरीही इंग्रजी जात आहे, गेली आहे; नव्हे, हे लोक समजतात तितकी ती स्थानिक आणि सर्वव्यापी कधीच नव्हती! इंग्रजीची जागा हिंदुस्तानी आज घेऊ शकत नाही असे हे लोक सांगतात. आणि ते खरेही आहे. पण हिंदुस्थानीची जागा इंग्रजीने कधीच घेतली नव्हती, हे कायदेमंडळे आणि युनिव्हर्सिट्या यांमधील विद्वानांनी विसरू नये! मुंबई-कलकत्त्यामधील ट्रामगाड्या, काशीप्रयागमधील गांगाघाट आणि तीन तीन लाखांच्या सभा यांत इंग्रजीचा उपयोग नसे.आणि तरीही राज्यकारभार आणि उच्च शिक्षण यांची भाषा म्हणून इंग्रजीला उणीपुरी शंभर वर्षे जे स्थान लाभले होते तिजवरून आज ती खाली उतरत आहे. आणि त्या राजकीय आणि सांस्कृतिक 'तख्ता' च्या पायऱ्यांशी देशी भाषा जाग्या होऊन, उभ्या राहून, पदर सावरून, उद्याच्या अधिकाराकरता लढाई खेळत आहेत!

पहिले करारमदार, वारसाहक्क जितके मोघम आणि ओंगळ तितका कज्जेदलालीला अधिक रंग चढतो हा नियमच आहे. राष्ट्र म्हणजे काय, राष्ट्रभाषा म्हणजे काय, धर्म-निरपेक्ष राज्य म्हणजे काय, वगैरेसंबंधी आपल्या मनातील गोंधळ जसजसा बाहेर येत आहे तसतशी ही भांडणे वाढत आहेत. पण पूर्वीच्या शांततेपेक्षा ही भांडणे देखील अधिक स्वाभाविक, चैतन्यदर्शक आणि अभिनंदनीय आहेत! त्यात योग्य ते 'प्रमाण' मात्र राहिले पाहिजे!

आज भांडण्याच्या भरात अनेक प्रश्न निघाले तरी मुख्य प्रश्न पुढील होत, असे म्हणण्यास हरकत नाही.

अनुक्रमणिका

१)मध्यवर्ती सरकारच्या कारभाराची भाषा २) उच्च शिक्षणदानाची भाषा ३) या दोन्ही क्षेत्रांतून इंग्रजी काढणे इष्ट आहे की नाही? ४) काढल्यानंतर इंग्रजीची जागा घेणाऱ्या भाषेचे-हिंदीचे वा हिंदुस्थानीचे स्वरूप ५) महाराष्ट्राच्या दक्षिणेसही तीच राष्ट्रभाषा सोयीची होईल का? ६) देवनागरी लिपी ठेवण्यात काही अडचणी आहेत काय? ७) पाकिस्तान निर्माण होऊ दिल्यानंतरही मुसलमानांच्या भावनांखातर राष्ट्रभाषेच्या स्वरूपास मुरड घालणे आवश्यक आहे काय?

वरील प्रश्नांपैकी बहुतेक प्रश्न पंडितांच्या परिश्रमापेक्षाही परिस्थितीच्या बळामुळेच सुटत चालले आहेत. द्राविडी भाषाकुटुंबाचे राज्य ज्या भागात आहे त्या भागात –म्हणजे तेलंगण, मलबार, म्हैसूर, मद्रास या विभागांत हिंदी वा हिंदुस्तानी चालू होणे तितकेसे सोयिस्कर नाही हे खरे आहे. पण 'तितकेसे' म्हणजे काय हेही पाहिले पाहिजे. गुजरात किंवा महाराष्ट्र यांना हिंदी-हिंदुस्थानी शिकणे जितके सोपे, तितके या दक्षिण भागात ते सोपे नाही, हे उघडच आहे. पण इंग्रजी शिकण्यापेक्षा ते सोपे नाही असे म्हणणे हा शुद्ध त्रागा आहे! आणि या त्राग्याच्या मुळाशी भावना वेगळीच आहे. तामिळ किंवा तेलुगूचे एक अक्षरही न शिकता आम्ही इंग्रजी शिकण्यात तपेच्या तपे घालवली तर त्यात फायदा होतो; हिंदी शिकून फायदा कोणता?

मला अशी खात्री आहे की 'फायद्या'कडेच नजर देणारे जे असतील, त्यांची खात्री पटविण्यास फार वेळ लागणार नाही. कारण हिंदी शिकण्याचे फायदे लवकरच दिसू लागतील, इंग्रजी शिकलेला मनुष्य आजवर सेकंडक्लासचा डबा, आणि दिवाणखान्यांतील सभा, यांत सुरक्षित राहून, इंग्रजी न शिकलेल्या हजारो लोकांकडे दुर्लक्ष करू शकत असे यापुढे त्याला तसे करता येणार नाही. आणि मग इंग्रजीसारख्या परभाषेत पंडित होणारा हा विद्वान वर्ष दोन वर्षांत हिंदीचाही पंडित बनेल!

हे प्रश्न सुटत आहेत; सुटतील; पण जे निराळेच प्रश्न उपस्थित होणार आहेत ते मात्र चातुर्य, परिश्रम आणि व्यवहारवाद यांखेरीज सुटणार नाहीत, नव्हे, ते अद्याप पुरतेसे लक्षातही आलेले नाही. "इंग्रजीला पूर्वीचेच स्थान असावे; हिंदी वा हिंदुस्तानी, इंग्रजीची जागा घेऊ शकत नाही" –असे म्हणणारांना लवकरच माघार घ्यावी लागेल. पण या राष्ट्रवादी भूमिकेतील 'गर्भित ऋण' (Implied responsibility) ज्यांनी ओळखले नाही, असे लोक राज्यकारभाराच्या आणि –विशेषत: शिक्षण-प्रसाराच्या क्षेत्रांत बराच घोटाळा करणार आहेत. नव्हे, त्यांनी 'मातृभाषा', 'मायबोली', 'भाषाशुद्धी' वगैरेंच्या नावाखाली, यापूर्वीच पुष्कळ अडाणी कारभार करूनही ठेवला आहे! ज्ञानदानाची भाषा इंग्रजी नसावी; 'देशभाषा'असावी, असे आपण बरीच वर्षे म्हणत आहो. तसेच, आपली भाषा, आपले वाङ्मय यांविषयींचा अभिमान म्हणजेच निम्मे अधिक राष्ट्रीयत्व, ही भूमिका देखील अनेक वर्षे देशाच्या मनात बिंबवली जात आहे. पण आधुनिक जगात स्वत:ची भाषा आणि स्वत:चे वाङ्मय यांचा अभिमान धरणे, म्हणजे केवढी जबाबदारी आहे याची कल्पना 'मातृभाषे' चा अभिमान वेळी अवेळी फडकविणाऱ्या मंडळींपैकी फार थोड्यांना असते. इंग्रजी शब्द, इंग्रजी वाङ्मय आणि इंग्रजी विचार यांचा विटाळ होऊ न देणे म्हणजे भाषाभिमान अशी यांतील पुष्कळांची कल्पना असते. पण इंग्रजीवर बहिष्कार टाकण्यासही इंग्रजीचे सूक्ष्म ज्ञान लागते, ही गोष्ट अशी मंडळी बहुधा विसरतात. ज्या देशावर स्वारी करायची; किंवा ज्या देशाच्या स्वारीला तोंड द्यायचे त्या देशाच्या लष्कराची, तोफखान्याची आणि गुप्त हेरांचीही बित्तंबातमी असणे जरूर असते त्यातलीच ही गोष्ट आहे. पण वाङ्मय आणि उच्च शिक्षण या क्षेत्रांतील कित्येक मंडळींची कल्पना दुसऱ्या बाजीरावाच्या वळणावरच अधिक दिसते! शब्दांच्या बहिष्कारांसंबंधीच्या, उर्फ भाषाशुद्धीसंबंधीच्या 'बाजीरावी' कल्पनांबद्दल मी गेल्या बारा वर्षांत अनेकदा लिहिले आहे.पण अलीकडे इंग्रजी वाङ्मयावरील

बहिष्कारांसंबंधी कित्येक वेडगळ कल्पना पुष्कळांच्या नजरेस आल्या असतील, स्वभाषेतील वाङ्मयाच्या अभ्यासावर भर देणे हे अर्थातच आधुनिक भारतीय विद्यापीठांचे एक वैशिष्ट्य आहे. अर्थात ही एक फार दिवसांची मागणी असल्याने, मराठीसारख्या देशी भाषेला अभ्यासक्रमात वाढते महत्व मिळणे स्वाभाविकच आहे. आज अशा आधुनिक भाषांचे अभ्यासक्रम ठरविणारे लोक संस्कृत व इंग्रजी या भाषांच्या परंपरांतून वागत आलेले असल्याने आजच्या अभ्यासक्रमांत पुष्कळच तारतम्य दिसत आहे, ही गोष्ट खरी आहे व आनंदाचीही आहे. पण, 'निव्वळ' मराठीची डीग्री; 'सर्व पेपर्स' मराठीचे; वगैरे मराठीच्या महत्वाचे प्रकार आल्यानंतरच्या मराठीच्या पदवीधरांत काही चुकीच्या व संकुचित कल्पना शिरत आहेत असे दिसून येते. मराठी नाट्याचा अभ्यास म्हणजे विष्णूदास भाव्यांपासून तो अत्रे यांच्यापर्यंतच्या नाटकांचा अभ्यास; फार फार तर शहाजीच्या काळाच्या एखाद्या दुर्मिळ नाटकाचे अस्तित्व संशोधकांकडून माहीत करून घेणे! संस्कृत आणि इंग्रजी साहित्यांचे स्तोम मराठीच्या साहित्यचर्चेत कशाला असे प्रतिपादणारी मराठीच्या अभिमानाची जात, मराठी अभ्यासक्रमाच्या विस्ताराबरोबरच दिसू लागली आहे. त्यातच स्वभाषेचे प्रेम म्हणजे परभाषेसंबंधी नावड ही सोईस्कर कल्पनाही महाराष्ट्रात बरीच वर्षे रूढ आहे. पण ज्यांनी ज्यांनी आधुनिक मराठी वाङ्मयात महत्त्वाची भर घातली ते सर्व इंग्रजी वाङ्मयाचे आजन्म अभ्यासक होते; आणि अलीकडे जे कित्येक लेखक चुरचुरीत भाषा आणि ठाकठीक तंत्र यांच्या जोरावर अल्पकाळात प्रसिद्ध झाले आणि लवकरच मागे पडले, ते बहुधा केवळ मराठी वाचनावर भिस्त ठेवणारे होते!

मी या ठिकाणी 'इंग्रजी वाचन' हा शब्द त्या शब्दाच्या व्यावहारिक अर्थाने वापरीत आहे हे सांगितले पाहिजे असे नाही. पण आज इंग्रजी वाचन म्हणजे अनेक पाश्चत्य देशांतील प्रसिद्ध ग्रंथाचे वाचन असते हे उघडच आहे. आणि आजच्या काळात जो स्वत:च्या भाषेचा अभिमान धरील, म्हणजेच तिला शक्यतो स्वयंपूर्ण करण्याची मनीषा धरील त्याला पाश्चात्य वाङ्मयाचा मार्मिक व खोल अभ्यास करणे अपरिहार्य आहे. केवळ मी बोलताना अगर लिहिताना इंग्रजी शब्द बिलकुल वापरीत नाही, हा अभिमान भाषेची सक्रिय (Positive) सेवा करण्यास पुरेसा नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी उच्चारलेले स्वभाषेसंबंधी आणि स्वत:संबंधी अभिमानाचे सुप्रसिद्ध वाक्य इंग्रजीत होते आणि इंग्रजी पत्रात होते. तांबे खाजगी संभाषणात ऐंशी टक्के इंग्रजीतून स्फूर्तिदायक वाङ्मयचर्चा करीत. माधवराव पटवर्धन प्रस्तुत लेखकास भाषाशुद्धीचे महत्त्व पटविताना अस्खलित इंग्रजीत 'अर्ग्यू' करीत!

हे गमतीचे दाखले सोडले, तरी आजच्या विद्यापीठांतून स्वभाषेचे महत्त्व वाढवावयाचे म्हटल्यास स्वभाषेच्या प्रोफेसरांवरील जबाबदारी अधिक वाढते असे माझे मत आहे. "ज्यांनी इंग्लंडखेरीज काही पहिलं नाही त्यांना इंग्लंडची माहिती ती कितपत असणार?" हे किपलिंगचेच वचन येथे थोड्या वेगळ्या अर्थाने लागू केले पाहिजे. जे फक्त मराठीचे भक्त असतील, ते मराठीची सेवा ती काय करणार? उद्याचे मराठीचे अध्यापक आणि ग्रंथकार हे अनेक देशांच्या वाङ्मयपेठांचे सौदागर असले पाहिजेत. व त्याकरता व्यासंगाइतकीच व्यापक अभिरुचीचीही देणगी त्यांस निसर्गाकडून लाभलेली असली पाहिजे.

केवळ सोवळेपणानेच नव्हे तर दोन्ही भाषांच्या अन्तरंग-ज्ञानाने अर्थपूर्ण शब्द तयार करणे; नवीन नवीन वाङ्मयकृतीचे आकलन आधुनिक दृष्टीने करणे; पाश्चात्य वाङ्मयाची आणि इतर ज्ञानसामुग्रीची माहिती शुद्ध आणि जिवंत अशा स्वभाषेतून करून देणे यांसारखी अनेक कामे या मंडळींच्या वाट्यास येणार आहेत. म्हैसूर विद्यापीठासारख्या विद्यापीठांनी तर कॉलेजांतील प्रोफेसरांना गावोगावी आपापल्या विषयांवर व्याख्याने देण्यास पाठविण्याची योजना केली आहे.

या दृष्टीने पाहता स्वभाषेच्या अभिमानाचा सोवळा अर्थ सोडून हा व्यापक अर्थ पत्करला तरच या स्वातंत्र्याच्या जमान्यात आपण खरी स्वजनसेवा करू शकू असे दिसून येईल पण त्याकरता आपणास स्वभाषेइतकेच इंग्रजीवर प्रेम करावे लागेल. कारण इंग्रजी हीच काय ती आधुनिक जगात नेऊन सोडणारी 'खैबरखिंड' आपणांस जास्तीत जास्त नजीक आहे. आणि 'इंग्रजीवर प्रेम केले पाहिजे' असे 'सर्क्युलर' काढून तर आमची विद्यापीठे हे कार्य तर खासच करू शकणार नाहीत!

माझ्या लिहिण्यातील मतलब एवढाच की, व्यासंगातील सोवळेपणापेक्षा व्यापकपणामुळेच आपल्या प्रांतिक भाषा अधिक आधुनिक आणि संपन्न होतील.

आणि आपल्या भाषा आधुनिक विचारांनी आणि वाङ्मयप्रकारांनी समृद्ध झाल्या, म्हणजेच आपण इंग्रजीच्या पारतंत्र्यातून मुक्त होऊ.

असा हा 'विरोधविकास' आहे! इंग्रजीच्या बेडीतून मुक्त होण्याकरताच इंग्रजी वाङ्मय आत्मसात केलेल्या अध्यापकांची आणि साहित्यिकांची गरज आहे!

अनुक्रमणिका

२९. इंग्रजीवाचून अडणारे स्वराज्य

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्याला वीस वर्षे झाली. अन स्वातंत्र्याची चळवळ सुरु झाल्याला ऐंशी वर्षे होऊन गेली. तरी जिचा भारतीय भाषांशी काडीचा संबंध नाही, अशा इंग्रजीवाचून आपले चालत नाही, ही एक नवलाची अन् शरमेची गोष्ट नव्हे का? पण ज्या संस्थेने भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले असे आपण मानतो, तिलाच आपण 'कॉंग्रेस' या इंग्रजी नावाने संबोधतो हे लक्षात घेतले, म्हणजे आपले स्वातंत्र्यही इंग्रजी भाषेच्या खांद्यावर बसून कसे चालले आहे ते लक्षात येईल. कॉंग्रेसचे नावच केवळ इंग्रजी होते, असे नव्हे. कॉंग्रेसचा सर्व कारभारच इंग्रजीत चाले. कारण कॉंग्रेसचे कार्य चालवणारे सगळे पुढारी इंग्रजीतून विचार करणारे अन् इंग्रजीमुळे एकत्र आलेले होते. अशा इंग्रजी चळवळीतून मिळालेल्या स्वराज्यात इंग्रजी भाषा ही हवापाण्याइतकी अपरिहार्य वाटली तर नवल कसलं?

मला पुष्कळदा असे वाटते की, अठराशे सत्तावनचे बंड यशस्वी झाले असते तर या देशाचे अधिक हित झाले असते. कारण मग हा देश देशी मार्गांनी आधुनिक बनला असता. इंग्रजांचे राज्य झाल्यावर तो 'आधुनिक' बनला, पण 'इंग्रजी' बनला. त्यामुळे त्याला आधुनिक होण्याला इंग्रजी भाषा एवढे एकच द्वार आहे असे वाटू लागले. इंग्रजांनी आगगाड्या आणल्या म्हणून आम्हाला आगगाड्या इंग्रजीतच चालतात असे वाटू लागले! इंग्रजांनी तारायंत्रे आणली, म्हणून तार फक्त इंग्रजीतच होऊ शकते अशी आमची समजूत झाली, ती अद्यापही कायम आहे. यावरून एक गमतीची गोष्ट आठवते. सुमारे पंचेचाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट. मुंबईतील एका कारखान्यातील भय्याला त्याच्या साहेबाने फोन करायला सांगितले. त्यावर तो म्हणाला ' मी कसा फोन करणार? मला इंग्रजी थोडेच येतेय!' त्या अडाणी भय्यासारखीच आज आमच्या सुशिक्षित पुढाऱ्यांची स्थिती आहे. इंग्रजीशिवाय कारभार चालणार नाही , इंग्रजीशिवाय कॉलेजे चालणार नाहीत, अशी त्यांची समजूत आहे आणि हे सर्व केव्हा ? तर भारताच्या घटनेने 'देवनागरीत लिहिलेली हिंदी ' ही हिंदुस्थानची सरकारी (official) भाषा होईल असा जाहीर निर्णय दिल्यावर! म्हणजे इंग्रजीत वाढलेले आणि इंग्रजीतच विचार करणारे आमचे पुढारी घटनेत नमूद झालेला निर्णयही मानायला तयार नाहीत.

इंग्रजी अमलात इंग्रजी ही कारभाराची अन शिक्षणाची भाषा झाली. रेल्वे आणि पोस्ट खात्यातही हीच भाषा वापरली गेल्यामुळे ती जनतेच्या परस्पर व्यवहाराची भाषा बनू लागली. इंग्रजी वृत्तपत्रांमुळे ती वृत्तपत्रीय जगतातही प्रतिष्ठित भाषा ठरली. मुंबई, कलकत्ता यांसारख्या मोठ्या शहरांतल्या व्यापारी कंपन्यांच्या इंग्रजी नावांमुळे व इंग्रजी जाहिरातींमुळे, व्यापारातही इंग्रजीला खोटी प्रतिष्ठा लाभली. 'कॉंटिनेंटल' 'इंटरनॅशनल' 'अलाइड' यांसारखी उपपदे दोन खणात थाटलेल्या दुकानांच्या नावांमागे चिकटल्याशिवाय ती नावे डोळ्यांत भरेनातशी झाली. 'स्टोअर्स' , 'मार्ट' 'एम्पोरियम' 'सलून' या शब्दांचे अर्थ माहीत नसले तरी, ते खेडवळ लोकांच्या पाट्यांवरही झळकू लागले. अशा प्रकारे सर्व व्यवहारांत इंग्रजी शिरले. मग काही चलाख मंडळींनी तर जन्मभाषेचे शिक्षण हे केवळ शोभेकरता आहे हे झटकन ओळखून आपल्या मुलांना ख्रिस्तांच्या 'कॉन्व्हेंट' शाळांत घालायला प्रारंभ केला. त्यांची मुले 'ममी', डॅडी' , 'ऑंटी', म्हणण्यात भूषण मानू लागली. अशा रीतीने सहाव्या वर्षापासून साठाव्या वर्षापर्यंतचे सर्व व्यवहार इंग्रजीतून करायचे असल्यास देशी भाषांची अडगळ केवळ लाज म्हणूनच गळ्यात बाळगायची की काय? ज्या लोकांना इंग्रजीशिवाय या देशाचे शिक्षण होणार नाही, कारभार चालणार नाही, ऐक्य टिकणार नाही, असे वाटते ते जर ही दिखाऊ लाज थोडी झटकून टाकतील, तर देशाची जन्मभाषाच इंग्रजी करणे अधिक सोयीचे आहे असे त्यांना वाटेल. गोव्यातील व इतर काही प्रांतातील ख्रिस्ती लोक घरातही इंग्रजीच

बोलतात. तसेच सबंध हिंदुस्थानचे केले तर 'त्रिभाषा सूत्रा'ची कटकट तरी मिटेल! इंग्रजी ही भारतीय ख्रिस्त्यांप्रमाणे सर्वांची जन्मभाषा तरी करा, नाही तर मराठी, कानडी, गुजराती या भारतीय भाषांना विकसित आणि इतिहाससंपन्न भाषांचा दर्जा तरी द्या असे म्हणायची आता वेळ आली आहे.

इंग्रजीने म्हणे या देशात ऐक्य निर्माण झाले! ज्यांची संख्या शेकडा एक देखील भरणार नाही असे टायपँटवाले देशीसाहेब एकमेकांशी इंग्रजीत बोलल्याने सबंध देश एक होतो, या कल्पनेइतकी दुसरी खुळचट कल्पनाच असेल. या देशात परकीय राज्यकर्त्यांच्या सोयीकरता इंग्रजी येण्यापूर्वीही काशीपासून रामेश्वरापर्यंत लोकांचे जाणे-येणे होतेच, त्यांचे इंग्रजीशिवाय अडलेले नव्हते. इंग्रजी येण्यापूर्वीची स्थिती स्वाभाविक होती. नंतरची स्थिती अस्वाभाविक गुलामगिरीची आहे. पण मूठभर इंग्रजी शिक्षित गुलामांना तीच स्वाभाविक स्थिती वाटू लागली आहे!

'इंग्रजी ही जागितक भाषा आहे' हा देखील असाच एक कृत्रिम भ्रम आहे.इंग्लंडमध्ये शिक्षणाकरता गेलेले आमचे विद्यार्थी इंग्रजीसंबंधीचा हा भ्रम कवटाळून जेव्हा युरोपमधील प्रेक्षणीय स्थळे पाहायला निघतात तेव्हा फ्रान्सच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवल्यापासून इंग्रजीचा काडीइतका उपयोग नाही असे आढळून ते चकित होतात! मग इंग्रजीबद्दलची आमची ही भोळी समजूत इतके दिवस कशी टिकून राहिली? या संबंधात एक गमतीची गोष्ट आठवते. १९५६ मध्ये हिंदुस्थान सरकारने प्रसिद्ध केलेल्या ' ऑफिशिअल लँग्वेज कमिशन' च्या रिपोर्टमध्ये 'जगाच्या काही देशातील इंग्रजीचा अभ्यास' म्हणून एक प्रकरण आहे. त्या प्रकरणाचा प्रमुख निष्कर्ष "...English is now definitely the foremost foreign second language... Over the greater part of the world." असा आहे. मात्र या प्रकरणाच्या शेवटी एक ओळीची बारीक टीप आहे, ती अशी "We are indebted to the British Council for some of this information." म्हणजे इंग्रजी भाषा ही इतर देशांतही प्रमुख मानली जाते की नाही, हेही आमचे अधिकृत कमिशन पुन्हा इंग्रजांकडूनच समजावून घेणार! इंग्रजांचे जुने कपडे घालून मिरवणारे लोक म्हणून आमचा झालेला दुर्लौकिक इंग्रज गेल्यावरही टिकून राहावा अशी काही विद्वानांची इच्छा दिसते.

इंग्रजी गेल्यावर आमच्या उच्च शिक्षणाचे काय होणार? जणू काही जगाच्या सर्व देशांतील विद्यापीठांत इंग्रजीतूनच शिकवतात! नाही तर बंगाली, मराठी, हिंदी, तामीळ या भाषा जगातल्या सर्व भाषांत मागासलेल्या तरी म्हणाव्या लागतील! शिवाय आणखी एक प्रश्न इंग्रजीच्या भक्तांना विचारला पाहिजे. जन्मभाषा हेच शिक्षणाचे स्वाभाविक आणि उत्कृष्ट माध्यम होय, हे जग प्रसिद्ध आहे; व हे तत्त्व आमचे पुढारी निदान गेली साठ वर्षे तरी घोकत आहेत. अशा स्थितीत आमच्या विद्यापीठांना गेल्या शंभर वर्षांतही देशी भाषांत पुरेशी ग्रंथसामग्री निर्माण करता आली नसेल, तर आणखी दहा वीस वर्षांच्या मुदत वाढीने तरी काय होणार आहे? विद्यापीठांतील अभ्यासाच्या ग्रंथांपासून ते वृत्तपत्रांना येणाऱ्या वार्तांच्या तारांपर्यंत सर्व मूळ इंग्रजीतून उपलब्ध असल्याने देशी भाषांवर किती विपरीत परिणाम होत आहे, ते आजच्या वृत्तपत्रांतल्या नुसत्या मथळ्यांकडे पाहिले तरी कळेल! ही सर्व अस्वाभाविक परिस्थिती इंग्रजीचे या देशांतले प्रस्थ कमी झाल्याशिवाय नष्ट होणार नाही!

अनुक्रमणिका

३०. इंग्रजीचे ज्ञान आणि स्थान

अलीकडच्या एका घोषणेत ना. मधुकरराव चौधरी यांनी महाराष्ट्रीय शिक्षणक्षेत्रातला 'इंग्रजीचा वेताळ' फिरून पूर्वस्थळावर आणला आहे! यामुळे बहुधा सर्व पालक त्यांना धन्यवादच देतील. पण इंग्रजीचा अभ्यास 'पाचवीपासून सुरू करायचा की आठवीपासून?' इतका हा प्रश्न 'डिपार्टमेंटल' किंवा 'शाळा- खात्या' चा नव्हे. या प्रश्नांत आपला इतिहास, आपला स्वाभिमान, परभाषेसंबंधीचे कोणत्याही राष्ट्राने ठेवायचे धोरण ही तिन्ही गुंतलेली आहेत. आपल्याकडचा बी. ए. निदान अकरा वर्षे इंग्रजी शिकत असतो . पण त्याचं फळ काय? तर इंग्रजी बोलतानाच नव्हे, तर लिहितानाही अडखळणे. फर्स्टक्लास एम्. ए. नी प्राध्यापकीकरिता केलेल्या अर्जात 'युवर्स फेथफुली' मधील 'एस्' ला ऑपॉस्ट्रोफीची खूण केलेली मी पाहिली आहे. आजच्या शाळाकॉलेजांत कोणत्याही विषयापेक्षा इंग्रजीच्या अध्ययनात व अध्यापनात जितका शक्तीचा अपव्यय होतो तितका कशातच होत नसेल. आपले सर्वसामान्य पदवीधर इंग्रजी लिहिण्याबोलण्यात पटाईत होणे, ही गोष्ट राष्ट्रीयदृष्ट्या आवश्यक की अनावश्यक हा प्रश्न मी येथे उपस्थित करीतच नाही. पण याकरता श्रमांच्या रूपाने अन इतर विषयांना अकारण गौणत्व देण्याच्या दृष्टीने, केवढी किंमत द्यायची हा मुख्य प्रश्न आहे.

या अपव्ययाची कारणे दोन. एक म्हणजे इंग्रजी शिकण्यातला आमचा उद्देश आम्ही अद्याप नीट तपासलेलाच नाही. अन दुसरे म्हणजे इंग्रजीच्या अध्यापनात काही इंग्रज 'इन्स्पेक्टरां'नी अन 'डायरेक्टरां'नी 'मेथड्स' च्या नावाखाली चालू केलेल्या मर्कटचेष्टा! यातल्या दुसऱ्या कारणासंबंधी म्हणजे आपल्या इंग्रजी शाळांसंबंधी मी पुन्हा केव्हा तरी लिहीन. आज फक्त पहिल्या कारणासंबंधी लिहायचे आहे. आपण पाच हजार मैलांवरच्या एके काळच्या आपल्या सुलतानांची भाषा शिकायची, ती आंतरप्रांतीय, आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी आणि शास्त्रीय विषयांच्या ज्ञानासाठीच शिकायची ना? —की इंग्लंडमधल्या प्रत्येक पिढीतल्या कवीनी अन तत्त्ववेत्यांनी व्यक्त केलेले सूक्ष्म विचार वाचण्याकरिता शिकायची? आमचे इंग्रजीचे अभ्यासक्रम आखणारे विद्वान तर अभ्यासक्रम समितीत बसले म्हणजे जणू इंग्रजीच्या कैफातच असतात! मी कॉलेज आणि विद्यापीठ यांच्याप्रमाणे हायस्कूलमध्येही शिकविलेले असल्यामुळे, मला याचा अनुभव आहे. चाळीस वर्षांमागे मॅट्रिक्युलेशनच्या वर्गाला शिकवीत असता, त्या बावरलेल्या चेहऱ्यांना कार्लाईल, हॅशलिट आणि चेस्टरटन यांचे गद्य; अन 'वाल्टर-द-ल-मरे' च्याही कविता शिकविण्याचे मला हसू येई! चेस्टरटनचं बुद्धिचापल्य परभाषेतून ग्रहण करण्याचे सामर्थ्य त्या पंचावन्न मुला-मुलींपैकी कितींना असेल? व्यायाम होत असे तो माझ्या बुद्धीला! मुलांना आनंद होई, पण तो शिक्षक करीत असलेली सर्कस पाहण्याचा. 'सर ' छान शिकवतात, असे म्हणून मुले अखेर कै. पप्पू मास्तरांच्या गाइडमधील सारांश घोकून काढीत. 'वाल्टर-द-ला-मरे' सारख्या अर्वाचीन इंग्रज कवींसंबंधी तर विचारायलाच नको! सूक्ष्मता हेच त्याचे ध्येय आणि हेच त्याचे वैशिष्ट्य! ही सूक्ष्मता दिवसेंदिवस वाढतच आहे. प्रौढ वयात मी इंग्रजी काव्याचा भोक्ता झालो असूनही, बी. ए. होईपर्यंत मला शेलेदेखील फार सूक्ष्म आणि आत्मकेंद्रित वाटे. त्या मानाने मला बायरन आटोक्यातला वाटे. अन् मग मॅट्रिकच्या वर्गाला शेलेपेक्षाही सूक्ष्म कवी शिकवताना माझा त्या शिकवण्यावर विश्वास बसणार कसा? मी स्वत: हायस्कूलमध्ये होतो तेव्हापासूनच्या आमच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमात चार इंग्रज अधिकारी अन् हिंदू प्रोफेसर यांच्या विक्षिप्त आवडीचे जितके दर्शन होई, तितके मुलांच्या पात्रतेचे दर्शन होत नसे!

माझ्या वडिलांच्या वेळी मॅट्रिकच्या वर्गाला गोल्डस्मिथच्या 'डिझर्टेड व्हिलेज' सारखे एखादे काव्य असे. "गोल्ड स्मिथ हा इंग्रजीतला तिसऱ्या दर्जाचा कवी की चौथ्या दर्जाचा?" हा प्रश्न इथे अप्रस्तुत आहे.

स्वत: इंग्रज नसलेल्या पंधरा सोळा वर्षांच्या मुलांना गोल्डस्मिथचे सफाईदार पद्य अधिक उपयुक्त की विसाव्या शतकातल्या कवीचे गूढ काव्य अधिक उपयोगी, हा प्रश्न येथे मुख्य आहे. कॉलेजातल्या इंग्रजी अभ्यासक्रमाचीही तीच रडकथा आहे. प्रत्येक शतकातल्या इंग्रजी वाङ्मयाशी भारतीय विद्यार्थ्यांची ओळख करून देणे, हा आमच्या अभ्यासक्रमाचा उद्देश दिसतो! इतकेच नव्हे, तर अगदी लेटेस्ट वाङ्मयप्रवाहही सोडायचे नाहीत, असा अट्टाहास दिसतो. भारतातल्या सर्व विद्यार्थ्यांना याची गरज आहे का? इंग्रजीतून विविध विषयांचे ज्ञान मिळवणे हा त्यांचा मुख्य उद्देश. इलियट आणि एझ्रा पाउंड यांची तऱ्हेवाईक कविता वाचण्याचा याला काही उपयोग आहे का? सुस्पष्ट असे अठराव्या, एकोणीसाव्या शतकातले गद्यच त्याला अधिक उपयोगी पडेल. किंबहुना आत्मविष्कार करणारे, म्हणजेच मनातली गुंतागुंत कागदावर मांडणारे 'साहित्यिक' बाजूला ठेवले तरी इतिहास, अन्य देश वर्णन, व सामान्य माहितीपूर्ण चरित्र लिहिणारे शेकडो इंग्रज लेखक सुंदर इंग्रजी लिहितात. अन् त्यात आत्मकेंद्रित सूक्ष्मताही नसते. विद्यार्थ्यांनी 'इंग्रजी भाषेकरिता म्हणून' वाचले, तर काय बिघडेल? इंग्रजीचा अभ्यासक्रम इंग्रजीच्या प्रोफेसरांनीच तयार केला पाहिजे ही कल्पना निर्दोष नाही. हायस्कूल व कॉलेजमधील मुलांची बौद्धिक वाढ आणि मानसिक आवड ज्यांना माहीत आहे, अशांचा उपयोग, अभ्यासक्रम तयार करण्यात प्रोफेसर लोकांहूनही अधिक आहे. प्रोफेसर लोकांतही मुलांचे वय लक्षात घेऊन अभ्यासक्रम रचणारे अगदीच नसतील असे नव्हे; पण आपण 'अ-पंडित' ठरू अशा भीतीने ते इंग्रजी पंडीतांपुढे पडते घेतात असे दिसते! आमच्या शाळाकॉलेजांत कादंबऱ्या नेमायच्या झाल्या, तर भारतीय जीवनासंबंधीच्या नेमल्या तर अधिक उपयुक्त! आपल्या राहणीसंबंधी परकीयांशी बोलताना त्याचा त्यांना उपयोग होईल. इंग्रजी कादंबऱ्यातून, इंग्रजी रीतरिवाज शिकून साहेबांशी बिनचूक वागण्याचा यत्न करण्याचे दिवस गेले! काही लोकांना अद्यापही इंग्रजी 'एटिकेट' शिकण्याची गरज वाटते, हे आपले दुर्दैवही आहे अन् बौद्धिक दास्यही आहे. आपण हिंदीच्या अभ्यासक्रमांतही आज ही वास्तववादी दृष्टी ठेवण्याऐवजी पंडिती दृष्टी ठेवीत आहो, अशी मला शंका आहे. कारण, आमची मुले व मुली हिंदी वाङ्मयातल्या 'रीतिकाला' वर विद्वत्ताप्रचुर निबंध लिहितील, 'रामचरितमानसा' चा अभ्यास भाषाशास्त्राच्या दृष्टीने करतील, पण व्यासपीठावरून चार हिंदी वाक्ये बोलताना मात्र चाचरतील, असे दिसून येते.

परभाषेच्या अभ्यासातला 'उद्देश' निश्चित झाला, म्हणजे ती दहाव्या वर्षापासून शिकावी, की चौदाव्या वर्षापासून शिकावी हे नीट ठरविता येईल. वास्तविक आज मॅट्रिक झालेल्या मुलांना इंग्रजीचे जेवढे ज्ञान असते, तेवढे ज्ञान चार वर्षांतही उत्तम प्रकारे देता येईल. त्याला, सात वर्षं ती भाषा शिकविण्याची गरजच नाही. पण त्याकरता जुन्या युरोपियन शाळाधिकाऱ्यांनी आणून सोडलेल्या अन् आम्ही आंधळेपणाने शिसावंद्य ठरविलेल्या कित्येक कल्पना सोडाव्या लागतील. 'एज्युकेशन इन्स्पेक्टर' लोक शाळांची तपासणी चालू शिक्षणशास्त्राप्रमाणे करतात; पण शाळांची म्हणजे संपूर्ण शाळाखात्याचीच तपासणी एकदा चार सुबुद्ध वास्तववादी (म्हणजेच व्यवहारवादी) पालकांनी करण्याची आता वेळ आली आहे. तशी केली; तर काय आढळेल, ते मी पुन्हा कधी तरी लिहीन. पण एवढे मात्र खरे, की त्या पाहणीने मुलांचेही कल्याण होईल अन् शिक्षकांचेही कल्याण होईल!!

अनुक्रमणिका

३१. ‘अंग्रेजी हटाव’ संबंधी अतिरेकी गैरसमज

‘अंग्रेजी हटाव’ हे सूत्र मुळात राममनोहर लोहिया यांचे आहे. पण त्यातील धोरण मात्र टिळकांच्या वेळच्या राष्ट्रीय चळवळीइतके जुने आहे. किंबहुना भाषावार प्रांतरचना, राष्ट्रीय शिक्षण वगैरेंचा पाया या सुत्रातच आहे. स्वातंत्र्याची पूर्तता स्वभाषेतून शिक्षण आणि राज्यकारभार यांच्यातच आहे. जगात असा कोणता स्वतंत्र देश आहे की जो आपल्या जेत्यांची भाषा, त्या जेत्यांना घालविल्यावरही पोटाशी कवटाळून बसतो ! या साध्या गोष्टी संबंधानेही स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तीस वर्षे वेडे समज घट्ट धरावे आणि वादविवाद करावे हा खुळेपणा भारतातील काही पक्षांखेरीज व व्यक्तींखेरीज कोणीही करणार नाही.

या वेडेपणाच्या पोटी इतरही कित्येक वेडगळ सिद्धान्त घोकले जातात. उदाहरणार्थ, ‘इंग्रजी ही जागतिक भाषा आहे.’, ‘विज्ञानाची प्रगती व विज्ञानाचे शिक्षण इंग्रजीशिवाय होणार नाही.’ इ. इ. या लोकांना जपान, रशिया, फ्रान्स, जर्मनी यांसारखे देश दिसत नाहीत की काय कोण जाणे. भारतातील केवळ नोकरीकरिता शिकणाऱ्या हजारो-लाखो मुलांचा जेवढा वेळ इंग्रजी शिकण्यात व इंग्रजीतून शिकण्यात जातो त्याच्या शतांशही वेळ जपान किंवा चीनमधील विद्यार्थ्यांचा जात नसेल. पण अंग्रेजी हटाव म्हणणारे लोक ‘इंग्रजी शिकू नका’ असे म्हणतात ही काही लोकांची समजूत केवळ अडाणीपणाची होय. त्यांचे म्हणणे ‘इंग्रजी शिका, पण इंग्रजीतून शिकू नका,’ ‘इंग्रजी शिका पण इंग्रजीतून स्वदेशातील व्यवहार करू नका.’ एवढेच असते. राज नारायण यांनीदेखील ‘इंग्रजी शिकू नका’ असे कधीच म्हटलेले नाही. फक्त ‘एका हिदुस्थानी व्यक्तीने दुसऱ्या हिदुस्थानी व्यक्तीशी इंग्रजीत बोलणे हे गुलामी वृत्तीचे लक्षण आहे’, एवढेच गांधीजी, लोहिया, राजनारायण इत्यादी पुढाऱ्यांचे म्हणणे आहे. दोन हिंदुस्थानी व्यक्ती युरोप-अमेरिकेतील एखाद्या देशात जेव्हा इंग्रजीतून संभाषण करतात, तेव्हा हिन्दुस्थान अद्यापही इंग्रजांच्या गुलामगिरीत आहे असे समजून परराष्ट्रांतील लोक हिंदुस्थानची कीव करतात. विजयालक्ष्मी पंडित यांनी जेव्हा आपली अधिकारपत्रे इंग्रजीत सादर केली तेव्हा रशियन अधिकाऱ्यांनी ती स्वीकारण्याचे नाकारले. ही गोष्ट वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली होती. ज्यांची भाषा हिंदी किंवा कोणती तरी एक भारतीय भाषा आहे त्यांनी आपली ओळखपत्रे रशियाला इंग्रजीतून सादर करावी हा खरा आचरटपण आहे. ‘मी या माझ्या देशात माझ्या देशबांधवांशी इंग्रजीतून बोलणार नाही.’ असे म्हणणे हा आचरटपण नव्हे.

एकदा पुणे विद्यापीठातील माझा तास संपवून मी गावात येत होतो. विद्यापीठाच्या गाडीत दुसरे एक प्रोफेसर होते. ते रशियन होते. काही तरी बोलायचे म्हणून मी भाषाज्ञानासंबंधी बोलणे काढले आणि विचारले,. “आपण थोडे फार हिंदी शिकला आहात की नाही?” (अर्थात हे मी इंग्रजीतून विचारले.) त्या आधी माझे व त्या रशियन प्रोफेसरांचे काहीसे रागाचे बोलणे झाले होते. माझ्या प्रश्नावर ते रशियन प्रोफेसर म्हणाले, “परदेशातून येणाऱ्या माणसाने हिंदी काय म्हणून शिकावे? तुमचे सर्व व्यवहार तर इंग्रजीतूनच चालले आहेत!” मी थोडा चमकूनच पाहू लागलो. आमची गाडी डेक्कन जिमखान्याच्या भागातून चालली होती. त्या रशियन प्रोफेसरने रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या दुकानांवर आणि घरांवर लटकलेल्या पाट्यांकडे बोट दाखविले. त्यातील शेकडो पाट्या इंग्रजीत होत्या. मग चीनने किंवा रशियाने ‘हिंदुस्थान अद्याप इंग्लंडची कॉलनी आहे’ असे म्हटले तर राग का यावा?

मध्यंतरी पुणे विद्यापीठाच्या होस्टेलमधील विद्यार्थ्यांत काही कारणावरून बाचाबाची झाली. इराणी विद्यार्थी आणि भारतीय विद्यार्थी यांच्यात काही कारणाने (बहुधा होळीवरून) बोलाचाली झाली. त्यावेळी (मी असे ऐकले की) त्या इराणी विद्यार्थ्यांनी ‘Bootlickers of the British’ म्हणून हिंदी विद्यार्थ्यांना

अनुक्रमणिका

हिणविले. आपली प्रतिमा शेजारच्या देशात कोणती आहे, ते या पोरवयाच्या विद्यार्थ्यांच्या बोलाचालीवरून दिसेल.

विद्येचे किंवा कारभाराचे फायदे मिळावेत, म्हणून आपल्यावर सुलतानी गाजवून गेलेल्या देशाची भाषा कायमची चालविण्याचा 'आचरटपणा' कोणत्याही देशाने केलेला नसेल.त्यातून भारतासारख्या हजारो वर्षांची संस्कृती असलेल्या देशाने तर कधीच केला नसेल.

आता मध्यंतरीच्या लोकसभेतील खटक्याचा विचार करू. एका तामीळ खासदाराला आरोग्यमंत्री राजनारायण यांनी हिंदीतून उत्तर दिल्याने तो अप्रिय प्रसंग उद्भवला होता. त्या तामीळ सभासदाने, 'मला तामीळमधून उत्तर पाहिजे' असा हट्ट धरला होता काय? नाही! त्याला प्रेम जुन्या परकीय राज्यकर्त्यांच्या भाषेचे होते व ती भाषा कायमची आपल्या बोकांडी बसावी, असा त्याचा व त्याच्या प्रांतबांधवांचा हट्ट आहे. हा हट्ट स्वतंत्र देशातील लोकांना शोभण्यासारखा नाही. लोहिया हेच म्हणत असत, "या देशाचा कारभार तामिळमधून चालला तरी माझी हरकत नाही. पण इंग्रजीतून चालणे हे लज्ञास्पद आहे." आमचे हे खासदार म्हणतात, "इंग्रजी ही जागतिक भाषा आहे." मी त्यांना असे विचारतो, इंग्रजांच्या वंशातील नसलेल्या किती देशांचा कारभार इंग्रजीतून चालला आहे? दहा –पाच वर्षांत केव्हा तरी एखाद्या जागतिक परिषदेला जाणाऱ्या दोनतीन पंडितांना इंग्रजी भाषा वापरावी लागेल म्हणून बारा वर्षांच्या मुलाला इंग्रजीतून गणित शिकविणे, मराठी पुस्तकांतीलही आकडे इंग्रजीत छापणे, तालुक्याच्या व जिल्ह्याच्या कोर्टातील कामकाज, कागदपत्र इंग्रजीत ठेवणे, हे कसे काय समर्थनीय ठरते? आणि हे सर्व देशभाषेत करा म्हणणारांना 'इंग्रजी शिकणेच मान्य नाही' हे कोणत्या तर्कशास्त्राप्रमाणे निष्पन्न होते? मराठीच्या अभिमानाने श्री. द. बा. पोतदारांसारख्या देशभक्तांनी काढलेल्या पुणे विद्यापीठाचा कारभारही मराठीतून होत नाही! नशीब त्या मराठीचे की साहित्य परिषद आणि इतिहास संशोधक मंडळ यांचे कारभार तरी अद्याप मराठीतूनच चालतात!

सर्वात आततायीपणाची गोष्ट म्हणजे भारताच्या लोकसभेत 'हिंदीतून उत्तर नको' म्हणणारा 'आचरट' ठरत नाही, पण 'माझ्या देशात, माझ्या देशाच्या लोकसभेत मी इंग्रजी वापरणार नाही' असे म्हणणारा मंत्री मात्र इंग्रजीच्या अभिमान्यांना 'आचरट' वाटतो! मुद्दाम वाकडा समज करून घेणाऱ्या आमच्या देशबांधवांना हे सांगितले पाहिजे की 'इंग्रजी शिकू नका' असे लोहियाही म्हणत नव्हते. (लोहियांनी काही इंग्रजी पुस्तकेही लिहिली आहेत. 'आपल्या देशाच्या भाषेतून व्यवहार करा' एवढेच त्यांचे साधे सांगणे होते. त्यांच्यापुढे इंग्रजीच्या जागतिक महत्त्वाची ध्वनिमुद्रिका लावणे, हे एक अज्ञान तरी असेल, नाही तर कांगावखोरपणा तरी असेल. जोपर्यंत आमचे शिक्षणदान आणि आमचा कारभार इंग्रजीतून होत आहे, तोपर्यंत इंग्रज गेल्यावरही आम्ही स्वखुशीने त्यांच्या राज्यात राहत आहोत! हे इतर देशातील लोकांना समजते, पण आम्हाला मात्र समजत नाही, हे दुर्भाग्य होय! मग व्यर्थ 'टिळक महाराज की जय', 'गांधी महाराज की जय' असे म्हणण्यात हशील काय?

अनुक्रमणिका

३२. अद्याप उरलेले इंग्रजी राज्य

परकीय राज्याने होणाऱ्या अनेक तोट्यांपैकी एक प्रमुख तोटा म्हणजे परभाषेतून राज्यकारभारच नव्हे तर सर्व व्यवहार करण्याची आपत्ती येणे! मुसलमानी राज्य होते तेव्हा हीच आपत्ती आली होती. आली होती इतकेच नव्हे, तर तिने केलेली जखम अद्यापही पुरती बुजलेली नाही. आजही मराठी भाषेत कमीत कमी शेकडा चाळीस शब्द अरबी फारशी आहेत. याचा अर्थ ते उपटून काढण्याचा हास्यास्पद प्रयत्न करण्याला माझी अनुमती आहे असा नव्हे. सुमारे चाळीस वर्षांपूर्वी सावरकर आणि पटवर्धन या भाषाशुद्धीच्या दोन खंद्या नेत्यांना मी कडाडून विरोधच केला होता. परभाषेतील शब्द मराठीत किती खोल रुजले आहेत याची अशा बुद्धिमान नेत्यांनाही पुष्कळदा कल्पना नसते. खुद्द सावरकरांनी मला दिलेल्या उत्तरातून मी काही फारसी शब्द काढून दाखविले होते! 'जागा', 'इलाज', 'जमीन' यांसारखे शब्द परकीय आहेत, हे लेखनाच्या ओघात भाषापंडितांच्याही लक्षात येत नाही. सावरकरांनी उत्तरात वापरलेला 'जागा' शब्द मला काढून दाखवावा लागला होता.

पण मला आज परकीय शब्दांचे सोवळेओवळे पाळायला सांगायचे नाही . भाषेत शेकडो वर्षे वापरले जात असलेले शब्द काढून त्याऐवजी नवे शब्द वापरण्याची चळवळ डोक्यावरचे केस उपटून काढण्याइतकीच उपद्रवकारक होय! 'जमीन' शब्दाऐवजी 'शेत' शब्द वापरला, तरी जमीनजुमला, जमीनअस्मान हे वाक्प्रचार उरतातच. म्हणजे एकदा परकीय शब्द बोलण्यात आणि वाङ्मयात रुजल्यानंतर नाईलाज म्हणून ते पत्करून चालणेच शहाणपणाचे होय, पण काही परकीय शब्द पचवून मराठीतच व्यवहार करणे, यात कमी नुकसान आहे. संपूर्ण व्यवहार परक्या भाषेत करण्यात अधिक नुकसान आहे. इंग्रजी राज्यात जी आपत्ती आपण गळ्यात घेतली ती हजार पाचशे इंग्रजी शब्द लिहिण्या-बोलण्यात वापरण्याची नव्हे, तर संपूर्ण व्यवहारच इंग्रजीतून करण्याची होय. कोर्ट-कचेऱ्या, शाळाकॉलेजे यांतील व्यवहार इंग्रजीतून चालू झाले, म्हणजे नुसते वर्गात- आणि कोर्टात, शिकविणे आणि खटला चालविणे इंग्रजीतून सुरू झाले असे नव्हे, तर शाळा-कॉलेजातील, विद्यापीठाच्या परीक्षांतील दप्तर इंग्रजीत ठेवले जाऊ लागले.'परीक्षेचा फॉर्म, परीक्षेचा रिझल्ट' हे सर्व व्यवहार एकदा इंग्रजीत होऊ लागल्यावर या क्षेत्रातून इंग्रजी काढणे अधिकच अवघड वाटू लागले. हिंदी लोक 'परीक्षेचा परिणाम' हा शब्दप्रयोग करू लागले आहेत! हिंदीतील शब्द जसेच्या-तसे मराठीत वापरण्याने त्या दोन्ही भाषा जवळ येतील अशी खुळी समजूत करून घेणाऱ्या लोकांनी अद्याप 'परीक्षेचा परिणाम' असे मराठीत म्हणण्यास सुरुवात केली नाही हे आपले नशीबच म्हटले पाहिजे!

पण केवळ राज्यकारभारच नव्हे तर व्यापारही इंग्रजीतून करण्यात आम्हाला आजकाल पराक्रम वाटत आहे. 'मार्ट', 'एम्पोरियम', 'सलून' यांसारखे शब्द तर धंद्याच्या क्षेत्रात शिरले आहेतच; पण शास्त्रशुद्ध, उच्चारानुसारी, बालबोध मराठी लिपीऐवजी इंग्रजी स्पेलिंगात दुकानावरील व चित्रपटगृहवरील पाट्या रंगविण्याची टूम अलीकडे जोरात आहे. 'दाग' या चित्रपटाचे नाव 'DAAG' असे भित्ती-पत्रकात छापण्यात कोणता पुरुषार्थ वाटतो हे मला माहीत नाही. पुण्याच्या संस्कृत वस्तीत बऱ्याच वर्षांपूर्वी बांधलेल्या चित्रपटगृहाला त्याच्या मालकाने 'हिन्दविजय' हे नाव दिले होते. दुसऱ्या मालकाने ते विकत घेताच त्याला 'नटराज' हे नाव दिले, पण ते नाव मात्र आज त्या चित्रपटगृहावर मोठमोठ्या इंग्रजी अक्षरांत लटकवलेले दिसेल ! त्यातही पुन्हा गुलामी अनुकरण इतके आहे की, गेली सव्वशे वर्षे विशेषनामांचे पहिले अक्षर कॅपिटल काढण्याचा नियम घोकणारे लोक, आता ते नियम आवर्जून भाविकपणाने मोडीत आहेत. कारण काय? तर कोणीतरी पोरकट मुर्खांनी इंग्लंडमध्ये किंवा अमेरिकेत कॅपिटल अद्याक्षरे काढणे बंद

केले एवढेच! एवढी गुलामी वृत्ती आपल्या समाजात वाढल्यावर जे शेकडो व्यवहार इंग्रजी राज्यात इंग्रजीत होत ते पुन्हा मराठीत करणे आमच्या लोकांना अशक्यप्राय वाटू लागले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशातील वेगवेगळ्या प्रांतांच्या प्राचीन प्रतिष्ठित भाषांतून व्यवहार करणे आज या देशातील लोकांना अवघड वा अशक्य वाटत आहे. तामीळ प्रांतात तर असा वर्ग निर्माण झाला आहे की, इंग्रजी ही या देशातील आंतरप्रांतीय व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रज गेल्यावरही त्यास कायमची हवी आहे. म्हणजे या देशाच्या लोकसभेचे व्यवहार आमच्या तामीळ बांधवांना इंग्रजीतून व्हायला हवे आहेत! रेल्वेची हकीकत तीच आहे. आगगाडीच्या डब्यावर 'सेन्ट्रल' च्या ऐवजी 'मध्य' वेस्टर्नच्या ऐवजी 'पश्चिम' असे रंगवून घेतलेले दिसेल. पण रेल्वेचा संपूर्ण व्यवहार व रेल्वेचे दप्तर इंग्रजी भाषेत चालूच आहे. शाळेत मुलांना गणितातील आकडे इंग्रजीतून वाचावे लागत आहेत व लिहावेही लागत आहेत. हे इंग्रजी आकडे कोणी व का सुरु केले मला माहीत नाही. पण तसे करणे अनावश्यक व हास्यास्पद आहे असे म्हणून त्यांना आमच्या शिक्षणशास्त्रज्ञांनी विरोध कसा केला नाही, हे मात्र समजत नाही.

शाळा कॉलेजांच्या वार्षिक संमेलनांतील भाषणेही इंग्रजीतून करण्याचा रिवाज आहे. वास्तविक हे प्रसंग म्हणजे 'स्नेहसंमेलना' चे प्रसंग होत. पण मैत्रीचे प्रसंग असोत की, विवाह प्रसंग असोत, आम्हाला इंग्रजीतून व्यवहार करण्यात प्रतिष्ठा वाटते. यात स्वभाषेचा अपमानही आहे आणि घातही आहे. पण हे सर्व व्यवहार इंग्रजीतून करणे हास्यास्पद आहे, असे कुणी दाखवून देताच हे भोक्ते, 'इंग्रजी भाषा या देशातून कायमची घालविल्यास कसे होईल' या चिंतेत पडतात. या विषयावर टाइम्स ऑफ इंडियासारख्या पत्रात वाचकांची जी मते व्यक्त होतात ती पाहण्यासारखी असतात. इंग्रजीच्या ज्ञानामुळेच आपणाला सुधारलेल्या जगाची बरोबरी करता येईल, हे त्यांचे पालुपद असते. आपल्यातील प्रगत विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना इंग्रजीतील ज्ञानाचा उपयोग करता आला म्हणजे झाले, अशी यांची दृष्टी नसते. स्वतःच्या नावापासून ते वर्गावरील पाटीपर्यंत सर्वत्र इंग्रजीचा उपयोग केला तरच आपण पुढारलेले ठरू ही त्यांची समजूत असते.नावाची आद्याक्षरे इंग्रजीत लिहिली तरच आपले नाव कायदेशीररित्या लिहिल्यासारखे होईल अशी यांची समजूत असते. 'यशवंतराव चव्हाण' असा उल्लेख करणे खेडवळपणाचे होय, 'वाय. बी. चव्हाण' असे म्हटले तरच ते पुढारलेपणाचे लक्षण होय अशी एक समजूत आहे.

या इंग्रजीमयतेचा परिणाम आपल्या जन्मभाषेवरही होत आहे, याची फारच थोड्या लोकांना कल्पना आहे. इंग्रजीतून येणाऱ्या बातम्या घाईघाईने मराठीत उतरणारे उपसंपादक भाषेची केवढी विटंबना करीत आहेत याची अनेकांना कल्पना नसते. आजची मराठी दैनिके वाचताना शेजारी मूळ इंग्रजी ठेवले तरच काही बोध होण्यासारखा असतो. रेडिओच्या वार्तापत्रांचे मराठी तर दिव्यच असते! परवाच मी, हवामानाचे वार्तापत्र ऐकताना, 'एकोणचाळीस पूर्णांक सहा-दशांश अंश तापमान' हा अद्‌भूत प्रयोग ऐकला. तपमान वगैरे शब्द तूर्त बाजूला ठेवू, पण 'दशांश अंश' हा काय प्रयोग आहे? खुद्द महाराष्ट्रातल्या गावांची नावे देखील इंग्रजी स्पेलिंगातून रेडिओपर्यंत पोहोचलेली असल्याने त्यांचे विचित्र उच्चार ऐकावे लागतात. याच तारा जर मराठीतून पाठविल्या गेल्या तर असल्या हास्यास्पद चुका होणार नाहीत. पण हे झाले मराठीचे अज्ञान, इंग्रजीचे ज्ञान आणि सर्वसामान्य ज्ञान यांची रड तेवढीच आहे. मध्यंतरी रुक्मिणी आरुंडेल या प्रसिद्ध बाईंचे नाव राष्ट्राध्यक्षपदाच्या संदर्भात काही दिवस वृत्तपत्रात येत होते. पुण्यातील पहिल्या दर्जाचे मराठी दैनिक वार्तेच्या ठळक मथळ्यात ओळीने तीन चार दिवस रुक्मिणी 'अरुंदले' असे छापीत असे! उपसंपादक अल्पशिक्षित असले तरी मुख्य संपादक असले दिव्य उच्चार कसे काय खपवून घेतात? मी कित्येकदा 'कार्यवाह राष्ट्रपती जत्ती' हा शब्दप्रयोग वाचला. यातील कार्यवाह शब्दाचा अर्थ कोणता? 'कार्यवाह' हा शब्द सेक्रेटरी या शब्दाचा प्रतिशब्द म्हणून बनवला होता ना? 'ठाणे, कुलाबा व बृहन्मुंबई

जिल्ह्यात अठ्ठेचाळीस तासात विस्तृत पावसाचा अंदाज आहे.' यातील इतर शब्दांकडे आपण दुर्लक्ष करूया पण 'विस्तृत पाऊस' यातील 'विस्तृत' शब्दाचा अर्थ काय? 'सर्वत्र पाऊस पडेल' असे म्हणण्यानेच मूळ इंग्रजीच अर्थ व्यक्त झाला असता. पण शब्दाला शब्द ठेवून देणे एवढेच आमच्या उपसंपादकांना येते. पण याला मुख्य कारण काय? मूळ वार्ता इंग्रजीत येते, हेच! 'हायकोर्टात याचिका अर्ज दिला', 'चित्रांची प्रदर्शनी', 'त्याने अनुद्गार काढले' यांतील दिव्य मराठीचे वर्णन काय करावे? पैकी 'प्रदर्शनी' शब्द इंग्रजीच्या संपर्कामुळे नव्हे तर हिंदी लोकांच्या स्त्रीलिंगी शब्दांबद्दलच्या विचित्र आवडीमुळे मराठीत शिरत आहे! त्या लोकांना 'योगसाधन' हा शब्द आवडत नाही; ते लगेच त्याचे साधना करून टाकतात. ते जीवन म्हणणार नाहीत 'जीवनी' म्हणतील! 'याचिका अर्ज' म्हणजे काय? याचिका म्हणजेच अर्ज नव्हे काय? आणि 'याचना' हा मूळ स्त्रीलिंगी शब्द उपलब्ध असून याचिका हा मूर्खपणाचा शब्द निर्माण करून काय साधले?

पण वार्ता इंग्रजीतून येणार, आणि प्रत्येक इंग्रजी शब्दाला मराठी शब्द बनविलेलाच पाहिजे, किंबहुना बनविण्यात पुरुषार्थ आहे, या कल्पनेमुळे भाषेत आचरटपणाचे प्रयोग शिरत आहेत. वृत्तपत्रातील प्रत्येक वाक्य कोणत्यातरी इंग्रजी वाक्याचे भाषांतर आहे ही स्थिती शक्य तेवढ्या लवकर बदलली पाहिजे. मूळ मराठी वाक्ये जर लेखक लिहील तर त्याची भाषा अशी विचित्र आणि दुर्बोध होणार नाही. आज मात्र प्रत्येक वाक्य आणि प्रत्येक शब्द इंग्रजीचे मराठी करून लिहिला जात आहे व त्यामुळे मराठी भाषेचे वाटोळे होत आहे.

पण जोपर्यंत देशाचे सर्व व्यवहार इंग्रजी होत आहेत तोपर्यंत वृत्तपत्रातील मराठी हे भाषांतर मराठीच राहणार. त्यातला भाषांतरीपणा घालवायचा असेल तर लेखकांना निग्रहाने फारच मोठी कसरत करावी लागेल. मूळचे इंग्रजी वाक्य प्रथम नीट डोक्यात घेऊन मग ते पुन्हा मराठीत स्वतंत्रपणे व्यक्त करावे लागेल. म्हणजे भाषांतराची प्रक्रिया बंद करून मूळचे विधान स्वतंत्रपणे मांडण्याची अथवा Retell करण्याची प्रक्रिया वृत्तपत्र संपादकांना सुरू करावी लागेल. रेडिओच्या वार्तापत्रात तर News Retold या प्रकाराला कायद्याच्याही अडचणी येतील. कारण मूळ इंग्रजी वाक्ये ही येथे अधिकृत समजली जातात. त्यांचे स्वैर 'पुन:कथन'केल्यास मूळ वार्तेत फरक केल्याचा गुन्हा घडेल! म्हणून भिकार आणि क्लिष्ट मराठी वापरणेच रेडिओला अपरिहार्य आहे. पण मूळ वार्ताच या देशाच्या स्वत:च्या चौदा भाषांपैकी एखाद्या भाषेत लिहिली गेली तर भिकार भाषांतराचा प्रसंग टळेल. याचा अर्थ हा आहे की, आपले व्यवहार 'स्वभाषेतून'झाल्याशिवाय आपली भाषा 'स्वभाषा' या नावाला पात्र होणार नाही, पण इंग्रजी राज्याचा परिणाम आपले सर्व व्यवहार परभाषेतून होणे हा झाला आहे. आपण इंग्रजी शिकू नये किंवा वाचू नये असा इंग्रजी विरोधकांच्या म्हणण्याचा अर्थ नाही. आपण इंग्रजी शिकावे – इंग्रजी वाचावे, पण स्वभाषेतून लिहिताना समोर मूळ इंग्रजी ठेवू नये. आणि ही कसरत अवघड वाटत असेल तर आपल्या शिक्षणातून आणि व्यवहारातून इंग्रजीला अजिबात गचांडी देण्याचाही शेवटचा इलाज आपणास करावा लागेल. पण आज जे भाषांतरी अथवा धेडगुजरी मराठी लिहिले जात आहे, ते शक्य तेवढ्या लवकर थांबवलेच पाहिजे.

अनुक्रमणिका

३३. भाषाविकास परिषदेचे धावते संस्कार चित्रण

गेल्या दोन महिन्यांत पुण्यात एकंदर चार मोठाल्या परिषद भरल्या. त्यातील तीन तर अखिल भारतीय होत्या. या आधीच्या एक-दोन वर्षातही दोन अखिल भारतीय परिषदा- विज्ञान परिषद आणि तत्त्वज्ञान परिषद पुण्यास भरल्या होत्याच. डॉ. जयकर यांनी परवाच्या भाषाविकास परिषदेच्या उपसंहारात सांगितल्याप्रमाणे या सर्व ज्ञानौघाला पुण्याकडे ओढणारा आकर्षणबिंदू 'पुणे विद्यापीठ' हाच मानण्याकडे मनाचा कल निःसंशय होतो. अशा सांस्कृतिक परिषदांचा प्रमुख उपयोग विचारशोधनाचा असतो. तो केवळ विद्यावर्धनाचा किंवा संशोधनाचाही नसतो, की केवळ राजकीय चळवळीचाही नसतो. परवाच्या भाषाविकास परिषदेकडे या पार्श्वभूमीवरून पाहिल्यास तिची नेमकी उपयुक्तता कळण्यास मदत होईल.

या परिषदेकरिता कित्येक फार मोठाले विद्वान पुण्यास गोळा झाले होते हे खरे; पण या परिषदेनंतर लगेच डेक्कन कॉलेजवर झालेल्या दुसऱ्या भाषा परिषदेप्रमाणे ही केवळ शास्त्रीय प्रश्नांची परिषद नव्हती. तसेच या परिषदेत भाषावार प्रांतरचना, कारभाराची भाषा यांसारख्या राजकीय प्रश्नांवरही चर्चा करावी लागली असली, तरी तिजपुढील प्रश्न केवळ राजकारणी लोकांच्या आवाक्यातील नव्हते. या परिषदेत भाषापंडित असलेल्या सांस्कृतिक नेत्यांचे खरे काम होते; इतकेच नव्हे, तर अशा अखिल भारतीय नेत्यांच्या बुद्धीमत्तेची आणि मुत्सद्देगिरीची या परिषदेत जणू एक प्रकारे परीक्षाच घेतली जावी, इतके बिकट प्रश्न तिजपुढे होते! डॉ. सुनीतिकुमार चटर्जी आणि डॉ. रघुवीर हे दोघे पंडित म्हणजे भाषापांडित्याच्या हिमालयाचे गौरीशंकर आणि कैलास पर्वतच होत! हे दोघे या परिषदेच्या दोन विभागांचे कर्णधार होते. पण यांशिवायही अनेक मोठमोठ्या पंडितांनी ग्रंथकारांनी आणि राज्यकर्त्यांनी परिषदेच्या विशेष शाखांच्या कामांतील वाटा उचलला होता. श्री काका कालेलकर, डॉ. यदुनाथ सरकार, जस्टिस दिवेटिया, अलाहाबाद विद्यापीठाचे डॉ. बाबूराम सक्सेना व डॉ. धीरेन्द्रलाल वर्मा, प्रिं. धनंजयराव गाडगीळ, प्रिं. खाड्ये, श्री विठ्ठलराव घाटे, कलकत्ता विद्यापीठाचे डॉ. असितकुमार बानर्जी, मद्रासचे शिक्षणमंत्री श्री कृष्णराव यांच्यासारख्या अनेक नामांकित विद्वानांनी, परिषदेकडे आलेल्या लेखी प्रबंधावरील चर्चेत व त्यांच्या आधारे राष्ट्रोपयोगी निर्णय नमूद करण्यात भाग घेतला होता. परिषदेसंबंधी शुभेच्छा व्यक्त करण्याकरिता मुंबई राज्याचे गव्हर्नर सर गिरीजाशंकर वाजपेयी हे स्वतः शेवटच्या दिवशी हजर राहिले होते. परिषदेकरिता मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणखात्याचे चिटणीस व विख्यात साहित्यिक डॉ. हुमायून कबीर हे स्वतः मुद्दाम दिल्लीहून येथे आले होते. या सर्व विख्यात नावांकडे पाहिल्यास परिषदेचे महत्व लक्षात येईल.

परिषदेच्या कार्याला धरून परिषदेचे तीन पोटविभाग करण्यात आले होते. एक विभाग शास्त्रीय परिभाषेचा विचार करण्याकरिता, दुसरा राज्यकारभाराच्या भाषेचा निश्चय करण्याकरिता व तिसरा विभाग प्रमुख प्रादेशिक भाषांच्या विकासाचा विचार करण्याकरिता, असे तीन विभाग पाडण्यात आले होते. परिभाषा- विभागाचे अध्यक्ष डॉ. सुनीतिकुमार चटर्जी हे असून त्या विभागाकडे असलेल्या प्रबंधांची छाननी व व्यवस्था करण्याकरिता, प्रिं. गो. रा. परांजपे व श्री. श्री. द. लिमये हे 'रपॉट्यूर'(संयोजक) म्हणून काम करीत होते. दुसऱ्या विभागाचे अध्यक्ष श्री. मास्ती वेंकटेश अय्यंगार असून त्यांचे 'रपॉट्यूर' म्हणून प्रिं. धनंजयराव गाडगीळ व प्रो. वर्मा हे काम करीत होते. तिसऱ्या विभागाचे अध्यक्षस्थान डॉ. रघुवीर यांजकडे होते व या विभागाचे 'रपॉट्यूर' म्हणून श्री. विठ्ठलराव घाटे व मी असे दोघेजण काम पहात होतो.

अनुक्रमणिका

परिषदेच्या पहिल्या दिवशी सकाळी जाहीर अधिवेशनाचे अध्यक्ष महामहोपाध्याय काणे व डॉ.जयकर यांची भाषणे झाली व दुपारी तिघा विभागाध्यक्षांची भाषणे झाली. पहिल्या दिवशीच्या सर्व भाषणांत डॉ. चटर्जी यांचे भाषण सर्वांगसुंदर म्हणून निर्देशित येईल. गाढ विद्वत्ता, वास्तववादी दृष्टीकोन, परमताविषयी आदर राखूनही स्पष्टोक्ती, यासर्व दृष्टींनी सुनीतिकुमारांचे भाषण फारच श्रेष्ठ प्रतीचे होते. त्यांनी संपूर्ण भाषण लिहून आणले होते व सुमारे दीड तासातही संपविण्यास कठीण असा मजकूर त्यांनी 'पंजाब मेल' सोडून एका तासात पुरा केला! डॉ.चटर्जी यांच्याजवळ विद्वत्ता, कुशाग्रबुद्धी व भाषा प्रभुत्व आहे; तथापि, वाणीचे माधुर्य अगर भावनेचा ओलावा यांना मात्र त्यांच्याजवळ तिळमात्र थारा दिसला नाही. वेचक भारतीय विद्वानांनाही गुंग करून सोडील असा पंचवीस बंद मजकूर, डॉ. महाशयांनी जणू गणपत्यथर्वशीर्षाप्रमाणे ओढून काढला! डॉ. सुनीतिकुमार हे बुद्धीने प्रखर, वृत्तीने थंड आणि शरीराने कणखर असे दिसतात!

डॉ.चटर्जींनी आपल्या भाषणांत डॉ. रघुवीर यांच्या कित्येक सिद्धान्तांवर प्रमाणपूर्वक हल्ला चढविला होता. केवढाही महापंडित झाला तरी तो केवळ एकट्याच्या डोक्यातून नवी भाषा निर्माण करू शकणार नाही; अर्थात रघुवीरांचे अनेक सिद्धान्त अव्यवहार्य व अनैतिहासिक आहेत, असा चटर्जींच्या प्रतिपादनाचा रोख होता. डॉ रघुवीर यांस पहिल्या दिवशीचे शेवटचे भाषण करायचे होते; तथापि एका क्षणात डॉ रघुवीर यांनी संपूर्ण वातावरण बदलून टाकले. अनेकांना त्यांची कृत्रिम शब्दनिर्मितीही मान्य नसेल —मलाही नाही- तथापि, त्यांच्या रोमारोमात सळसळणारी निष्ठा अक्षरशः अमोघ आहे असे म्हणावे लागेल. त्यांनी संपूर्ण भाषण लिहून आणलेले नव्हते आणि जी त्रोटक टिपणे आणली होती, तीही बाजूला ठेवून त्यांनी चटर्जींच्या हल्ल्याला उत्तर म्हणूनच प्रारंभ केला. तथापि त्यांच्या भावनेच्या उत्कटतेने भाषेच्या ओघाने आणि कोटिक्रमाच्या बिनतोडपणाने श्रोत्यांना हे सर्व संकेतभंग विसरावयास लावले!

तीन विभागापैकी 'परिभाषा विभागा'ला काहींच्या दृष्टीने विशेष महत्त्व होते. तथापि, परिभाषेतील स्थूल धोरणाचाच भाग काय तो परिषदेपुढे येण्यासारखा होय, असे मला वाटते. बाकी तपशिलाचा भाग लहान समितीने ठरविण्यासारखा, किंबहुना एकेका शास्त्रज्ञाने शास्त्रीय विवरणाच्या ओघात स्फूर्तीने निर्मिण्यासारखा होय, असे मला वाटते. तथापि, पुष्कळशा महाराष्ट्रीय विद्वानांनी याच विभागात लक्ष घातले होते. प्रिं. गो. रा. परांजपे, सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ लिमये, प्रो. कृ. प्रां. कुलकर्णी, प्रो. बनहट्टी, डॉ.तुळपुळे वगैरे विद्वानांनी आपले प्रबंध या विभागाकडेच धाडले होते. धोरणाच्या दृष्टीने या विभागात रघुवीरांचा जय झाला, की चटर्जींचा जय झाला यावर विद्वानांतही मतभेद दिसत होता. स्थूलमानाने रघुवीरांचे धोरण राष्ट्रीय व चटर्जींचे आंतरराष्ट्रीय, असे म्हणता येईल. स्वतः रघुवीर हे तत्त्वांत काडीचीही तडजोड मानीत नसल्याने, त्यांना मात्र स्वत: चा विजय अपुरा वाटत होतासे दिसले. शेवटच्या दिवशी त्यांनी परभाषेतील शास्त्रीय संकेताक्षरे आणि सूत्रे स्वीकारण्याच्या धोरणाविरुद्ध उघड अधिवेशनात थोडक्यात पण अत्यंत विद्वत्ताप्रचुर भाषण केले. उघड अधिवेशनात काय, किंवा विभागसंमेलानात काय, डॉ. रघुवीर फक्त संस्कृतनिष्ठ हिंदीतच बोलत. पहिल्या दिवशीच्या आवेशायुक्त अध्यक्षीय भाषाणांतही या पंजाबच्या भूमीतील पंडितांने अगदी चुकूनसुद्धा फारशी शब्द येऊ दिले नाहीत, ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. डोळ्यांत तेल घालून बसलेल्या अलिगड येथील एका पंडिताने (डॉ. हुसेन यांनी) त्यात 'नकल्ची' हा एकच फारशी शब्द मला काढून दाखविला; पण त्याचेही रघुवीरजींनी लगेच संस्कृत भाषांतर केले!

डॉ. रघुवीर यांनी आमच्या विभागाचे, म्हणजे प्रादेशिक भाषांच्या विभागाचे, कामही मोठ्या कौशल्याने पार पाडले वास्तविक या विभागाचे काम व राज्यभाषा (State Language) विभागाचे काम,

अनुक्रमणिका

यात सरहद्दीची गुंतागुंत फारच होती. दोन्ही विभागांच्या संयोजकांना प्रबंधांची व विवाद्य प्रश्नांची विभागणी करतानाही पुष्कळच पंचाईत पडली. माझा प्रबंध "The Policy of Linguistic Assimilation and the Deveslopment of Regional Languages." हा होता. हा दुसऱ्या विभागात टाकावा की तिसऱ्यात टाकावा याचा निश्चय करणे आमचे आम्हालाच कठीण गेले! राज्य भाषाविभागाचे अध्यक्ष मास्ती वेंकटेश होते. त्या विभागाच्या चर्चेचा उपन्यास प्रिं. धनंजयराव गाडगीळ यांनी आपल्या अत्यंत तर्कशुद्ध अशा भाषणाने केला. अनेक राष्ट्रांना सामान्य भाषा म्हणून जी भाषा विकसित करावयाची असेल, तिजमध्ये कोणती वैशिष्ट्ये आवश्यक होत, याचे त्यांनी तात्त्विक विवेचन केले.लिंगवचनानुरूप बदलणारी रूपे आणि स्थानिक वैशिष्ट्यांवर आधारलेले वाक्प्रचार यांपासून अशी सामान्य भाषा मुक्त असावी असा त्यांच्या प्रतिपादनाचा रोख होता. तथापि, ही भाषा शास्त्रांतील सिद्धान्त वाक्यांप्रमाणे वा तारेतील 'तडक' संदेशाप्रमाणे निर्गुण निर्विकार होईल! तिच्याद्वारे माहिती कळविता येईल; पण भावना व वैयक्तिक प्राधान्य भाव (Emphasis) व्यक्त करता येणार नाही. सारांश, ही भाषा तारेच्या राजकीय व्यवहाराची होईल, पण भावनांच्या वाङ्मयीन अभिव्यक्तीला निरुपयोगी होईल. याच विभागात श्री काका कालेलकर यांचे भाषणही अत्यंत संयत व विचारपरिप्लुत असे झाले. राज्यभाषेचा विकास बहुजनांच्या प्रगतीकरता करावयाचा आहे; या प्रांतांतून त्या प्रांतांत बिऱ्हाड हलविणाऱ्या प्रोफेसरांच्या सोयीकरता नव्हे, ही त्यांची स्पष्ट सूचना आमच्या 'प्राध्यापकप्रधान' परिषदेत फारच आवश्यक होती! तथापि, देशातील चौदा प्रादेशिक भाषांचे चौदा शब्दकोश घेऊन नवी राज्यभाषा तयार करण्याचे वेड कालेलकरांसारख्या बहुजनाभिमुख भाषापंडितांच्याही डोक्यात आहेच. 'भाषा सरकारी हुकुमाने तयार करता येत नाही,' ही चॅन्सेलर सर गिरीजाशंकर यांनी शेवटच्या दिवशी दिलेली जाणीव या दृष्टीने आवश्यकच होती. तथापि, याच विभागात (विभाग 'ब'मध्ये) श्री. विठ्ठलराव घाटे यांनी केवळ लहानशा भाषणात हा मुद्दा जोराने मांडला होता. घाटे यांनी त्या दिवशीच्या थोड्याफार विस्कळित वादविवादाला आणखी एका सुंदर सीमारेखेने झटकन काबूत आणले. ते म्हणाले, "हिंदी आणि प्रादेशिक भाषा यांचे संबंध ठरवितांना प्रथम हिंदीने भिन्नभाषी प्रदेशांत कुठे कुठे शिरू नये ते ठरवूया. तिने प्राथमिकपासून कॉलेजअखेर अध्यापनाची भाषा होऊ नये; तिने आमच्या कोर्टकचेऱ्यांची भाषा होऊ नये; तिने आमच्या प्रादेशिक सरकारच्या कारभाराची भाषा होऊ नये."

आनंदाची गोष्ट म्हणजे डॉ. बाबूराव सक्सेना आणि डॉ. धीरेंद्रलाल वर्मा यांच्यासारखे कट्टे हिंदीभक्तही या बाबतीत घाट्यांसारख्या भिन्न प्रांतीयांशी एकमत होते. तथापि म. म. पोतदार आणि प्रिं खाड्ये यांनी या संबंधात एक धोक्याची सूचना वेगवेगळ्या प्रसंगी दिली. आपल्या अलाहाबादी मित्रांनी हिंदीच्या बाबतीत एवढा नेमस्तपणा दाखविला, तरीही त्यांचे हिंदी हे कृत्रिम आणि फाजील संस्कृतप्रचुर आहे व त्यांच्या नेमस्त धोरणाला भाळून ते सर्व प्रांतांच्या गळ्यात बांधू नये; निदान राज्यघटनेतील 'हिंदी' चा तो अर्थ नव्हे, असे या दोघांचे म्हणणे होते.

या सर्व मतामतांच्या गलबल्यातून आखिल भारतीय धोरणाची निश्चित सूत्रे काढणे प्रारंभी प्रारंभी तर अशक्यप्राय वाटत असे, हिंदुस्थानच्या दूरदूरच्या टोकाहून आलेले, -पंचवीस पंचवीस वर्षे एकेका गोष्टीचा आग्रह धरून प्रचार करीत असलेले, पंधरा पंधरा, वीस वीस ग्रंथांचे कर्ते केवळ दहा मिनिटे बोलायला संधी मागत असून ती देण्याला मुष्कील! अशा स्थितीत वीस-पंचवीस परस्परविरोधी भाषणांनंतर सर्वसंमत निष्कर्ष काढणे किती कठीण होते याची कल्पना सहज करता येईल. तथापि डॉ. रघुवीर, डॉ. चटर्जी यांच्यासारख्या कुशाग्रबुद्धीच्या अध्यक्षांनी तो चमत्कार चुटकीसरसा! करून दाखविला.

अनुक्रमणिका

अर्थात त्यातून असंतुष्ट आत्मे असे कोणीच राहिले नाहीत असे नाही. विशेषत: बंगाली-बिहारी यांचे तंटे आणि पंजाबमधील शीख-हिंदू यांचे भाषिक वाद किती नाजूक अवस्थेला जाऊन पोहोचले आहेत याची चुणूक आम्हाला आमच्या विभागात चांगलीच पहावयास सापडली. चंदीगडचे प्रो.गौरीशंकर (Secretary Textbooks, Punjab Government) कटक येथील डॉ. दास, व स्वत: सर यदुनाथ सरकार यांनी प्रादेशिक भाषांच्या अधिकार रक्षणार्थ आमच्या विभागात फारच चिवटपणे झगडा केला.

दुर्दैवाने व्यक्तिश: मी देखील या असंतुष्ट आत्म्यांच्याच अल्पसंख्य वर्गात होतो! आणि माझी ओरड कोणत्या उघड राजकीय आक्रमणाविरुद्ध नसून सूक्ष्म भाषिक आक्रमणाविरुद्ध असल्याने केवळ पंधरा मिनिटांच्या भाषणात मी माझे म्हणणे सभेला पटवू शकलो नाही. विविध प्रादेशिक भाषांना सामान्य असा एकच शब्द संग्रह वाढविणे हे राष्ट्रनिर्मितीला व राष्ट्रभाषा निर्मितीला आवश्यक आहे या भूमिकेवरून, प्रादेशिक भाषांतील शब्दसंग्रहात हवा तसा गोंधळ घालण्याची प्रवृत्ती वाढत आहे, अशी तक्रार मी माझ्या विस्तृत प्रबंधात मांडलेली होती. डॉ. सक्सेनांसारख्या हिंदी भाषिकांनीही माझी तक्रार मान्य केली होती. तथापि, शेवटी नमूद करण्याच्या निष्कर्षांत माझे म्हणणे नमूद करण्यास मात्र सर्वांनी – (यात स्वत: डॉ. रघुवीर, सर यदुनाथ यांसारखे परप्रांतीय; आणि म. म. काणे, प्रि. खाड्ये यांजसारखे महाराष्ट्रीयही होते.) विरोध केला! " Without tampering with the genius either of Hindi or of the regional languages." (" हिंदीच्या अगर प्रादेशिक भाषांच्या मूळ पिंडाचा बिघाड न करता") हे शब्द घालावे असे माझे म्हणणे होते. सर यदुनाथ यांनी तर "निरंकुशा: कवय:" हे वचन माझ्या तोंडावर फेकून, लेखकच भाषा बिघडवू लागले तर ब्राह्मदेवाचाही इलाज चालणार नाही, असे बजावले!

नवी हिंदी व तिच्या लोभाखातर मराठी, गुजराती आदिकरून प्रादेशिक भाषा आपण कृत्रिम आणि बोजड करणार की काय हा माझा मुख्य सवाल होता आणि आहे. डॉ. चटर्जी हे तर इतके व्यवहारवादी आहेत की, रोमन लिपीचा स्वीकार करणे, ग्रांथिक हिंदीऐवजी बाजारी हिंदीचे व्याकरण पत्करणे वगैरे अप्रिय प्रयोगांचाही ते पुरस्कार करीत असतात. एका खाजगी बैठकीत मी त्यांना दोन प्रश्न विचारले व त्यांची उत्तरे त्यांनी आश्चर्य वाटण्याइतक्या प्रामाणिकपणाने दिली. मी विचारले "परप्रांतीयांना हिंदीचे 'व्याकरण' कठीण जाईल की, 'शब्दसंग्रह' कठीण जाईल?" ते म्हणाले "आम्हा बंगाली लोकांना अडचण आहे ती शब्दांची नव्हे, तर व्याकरणाची आहे," मी पुन्हा विचारले, "मराठीच्या मानाने बंगाली भाषा फाजील संस्कृप्रचुर आहे, असे तुम्हाला वाटते का? व ती प्रथमपासूनच तशी आहे की काय?" ते म्हणाले, "होय; आधुनिक बंगाली संस्कृतप्रचुर आहे व मुळात ती तशी नव्हती ."

डॉ. चटर्जी यांनी दिलेल्या या दोन महत्त्वाच्या कबुलीजबाबांना लहानशीच पुस्ती जोडून या परिषदेचे हे धावते "संस्कार चित्रण" संपवितो. आधुनिक हिंदीतील बहुतेक जाडजूड (व कित्येक चुकीचेही!) शब्द बंगालीतून उसने घेतलेले आहेत. 'भाषण' ऐवजी 'वक्तव्य'; 'बातमीदार' ऐवजी 'संवाददाता'; 'सामना' याऐवजी 'प्रतियोगिता'; 'खालील' याऐवजी 'निम्नलिखित' यांसारखे तोंडभर शब्द पत्करून भाषिक ऐक्य साधायचे की काय? हा माझा प्रश्न परिषदेत अखेर नीटसा सुटला नाही!

अनुक्रमणिका

३४. भाषा- विकासाची समस्या

परराज्यात ज्या अनेक वाटांनी राष्ट्रीय प्राणाचा कोंडमारा होतो, त्यांत भाषिक पारतंत्र्याची वाट प्रमुख असते. इंग्रजी अमलात इंग्रजी ही राज्यकारभाराची व शिक्षणदानाची भाषा झाली, मुसलमानी अमलात, फारशी ही राज्यकारभाराची भाषा झाली. या दोन्ही राजावटींना हिंदी राष्ट्राने चिवटपणाने प्रतिकार करून वाटेला लावले आणि तरी राजकीय स्वराज्यानंतरही भाषिक स्वराज्याचा प्रश्न उरलाच आहे.

स्वराज्यात या देशाच्या पोटातील अनेक प्राचीन आणि स्वयंपूर्ण राष्ट्रांचे व्यवहार, त्यांच्या त्यांच्या भाषेतच व्हावयास हवेत. महाराष्ट्राचा कारभार मराठीतून; शिक्षणदान मराठीतून; वृत्तपत्र -रेडिओ वगैरे लोकशिक्षणाची साधनेही मराठीतूनच चालली पाहिजेत. ज्ञानकोशकार केतकर म्हणत असत की, मुंबई इलाख्याच्या इंग्रज गव्हर्नरने आपल्या हुकुमावर सही मराठीतच केली पाहिजे. त्याचप्रमाणे वंगराष्ट्राचा कारभार बंगालीतून चालला पाहिजे; गुजरातचा गुजरातीतून चालला पाहिजे. अयोध्या प्रांताचा कारभार हिंदी, उर्दूतून चालला पाहिजे, हाच भाषिक स्वराज्याचा अर्थ आहे. गुजरात्यांना बंगालीतून शिक्षण दिले, किंवा मराठ्यांना हिंदीतून कोर्टाचे काम चालवावे लागले, तर ते भाषादृष्ट्या परराज्यातच आहेत असे म्हणावे लागेल.या देशाच्या विविध विभागांचा एकमेकांशी व्यवहार-व्यापार, राज्यकारभार इ. मात्र सर्वांना सोईस्कर अशा एकाच भाषेतून झाला पाहिजे व अशी भाषा गेली कित्येक शतके प्रवासादिकांत वापरली जाणारी सुलभ हिंदी वा हिंदुस्तानी हीच होय.

वर सांगितलेले राष्ट्रीय मनोगत सर्वमान्य व सर्वपरिचित आहे अर्थात हिंदी भाषा ही कर्नाटक, तेलंगणादी भागात, उत्तर हिंदुस्तान व गुजरात, महाराष्ट्र, बंगाल यांच्याइतकी सोयीची नाही. तथापि, दुसरी कोणतीही देशी भाषा, या दाक्षिणात्य प्रांतांतही हिंदीची जागा घेण्यासारखी नाही. अर्थात स्वराज्यात हिंदी व विविध देशभाषा यांचे स्थान निश्चित आणि पृथक आहे. या दोहोंच्याही वाढीला अडथळा करणारी इंग्रजीही आता राजभाषा म्हणून उरलेली नाही. अशा स्थितीत भारतीय भाषांचा प्रश्न वादग्रस्त राहण्याचे कारणच नाही.

तथापि, वस्तुस्थिती मात्र उलट आहे. भारतीय भाषांच्या भवितव्याचा प्रश्न, हा स्वतंत्र हिंदुस्तानपुढे आज असलेल्या अत्यंत वादग्रस्त प्रश्नांतील एक आहे. त्याकरिता समित्या नेमल्या जात आहेत; कायदे केले जात आहेत; व तामीळ प्रांतात तर अधूनमधून डोकीही फोडली जात आहेत. गेल्या महिन्याच्या अखेरीस पुणे विद्यापीठाने विद्वानांची व सांस्कृतिक नेत्यांची एक अखिल भारतीय परिषद भरविली होती व तिजमध्ये डॉ. सुनीतिकुमार चटर्जी, डॉ. रघुवीर, डॉ. हुमायून कबीर, जस्टिस दिबेटिया, सर यदुनाथ सरकार, महामहोपाध्याय काणे, डॉ.बाबुराव सक्सेना, डॉ. धीरेन्द्रलाल वर्मा, मास्ती वेंकटेश अय्यंगार यांच्यासारख्या विद्वानांनी व नेत्यांनी भाग घेतला होता.

भारताची राज्यघटना तयार झाल्यापासून या प्रश्नाचे स्वरूप केवळ तात्त्विक चर्चेचे उरले नाही; ते आता प्रत्यक्ष राजकीय धोरणाचे होऊन बसले आहे. त्यातच मुंबई सरकारने मध्यंतरी आपल्या प्रदेशातील राज्यभाषेसंबंधी एक ठराव लोकमत अंदाजण्याकरिता प्रसिद्ध केला होता. तेव्हापासून या प्रांतातील लोकांना तर हा प्रश्न निकडीचा वाटू लागला आहे. मध्यप्रदेश कायदेमंडळाने केलेल्या “ऑफिशियल लँग्वेजेस् ॲक्ट” संबंधी विदर्भसाहित्य संघाने सरकारला सादर केलेल्या निवेदनाची प्रत नुकतीच मजकडे

आली आहे. या दृष्टीने पाहता परवा पुण्यास भरलेली अखिल भारतीय भाषाविकास परिषद, महाराष्ट्राला किती महत्त्वाची होती हे वेगळे सांगायलाच नको.

या परिषदेत अनेक विवाद्य आणि महत्त्वाच्या प्रश्नांचा खल झाला, कित्येक महत्त्वाचे निर्णयही केले गेले. तथापि, विद्वानांनाही या गुंतागुंतीच्या भाषिक अरण्यात, अद्याप दिङ्मूढ करून टाकणारे पुष्कळच आहे, हाच संस्कार या परिषदेला गेलेल्या प्रत्येक विद्वान प्रतिनिधीच्या मनावर झाला असेल, यात शंका नाही.

अखिल भारतीय व्यवहाराची भाषा हिंदी होणार हे तर खरेच; पण त्या हिंदीचे स्वरूप कोणते? तसेच उच्च शिक्षणही प्रादेशिक भाषांतून द्यायचे ठरविल्यास त्याकरिता काय तयारी करावी लागेल? स्वतंत्र हिंदुस्तानात इंग्रजीचे कार्य कोणते? उच्च शिक्षणदानाची भाषा यापुढे हिंदी व्हावी असे म्हणणारांच्या म्हणण्याला कितपत महत्त्व द्यावे? हे सर्व प्रश्न अद्यापही अत्यंत विवाद्य अवस्थेत आहेत; इतकेच नव्हे तर त्यासंबंधी विद्वानांनाच्याही डोक्यात बराच गोंधळ आहे, हे परवाच्या अखिल भारतीय परिषदेत चांगलेच प्रत्ययाला येते.

अशा मानसिक गोंधळांपैकी पहिला गोंधळ मोठा गमतीचा आहे. अशा भाषा परिषदांचे पहिले कार्य म्हणजे जाड्या पंडितांनी एकत्र बसून जाडजूड पारिभाषिक शब्द (इंग्रजी शब्दांचं भाषांतर करून) तयार करणे हे होय, हा समज फार मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. पदार्थविज्ञान, रसायन, गणित, वैद्यक वगैरे शास्त्रांच्या परिभाषेसंबंधी स्थूल धोरण ठरविणे, हे अर्थातच या परिषदेच्या कक्षेत येते. परंतु प्रत्यक्ष शब्दनिर्मितीचे काम, या किंवा अशा, किंबहुना कोणत्याच!—परिषदेचे काम नव्हे, असे माझे मत आहे.

शब्द तयार करणे म्हणजे साबणाच्या वड्या अगर शिंगांची बटने तयार करणे नव्हे! शास्त्रीय परिभाषा तयार करणे हे देखील व्याकरण, कोश आणि रुक्ष पांडित्य यांचे काम नसून कौशल्याचे व स्फूर्तीचे कार्य आहे. लेखनाच्या अगर प्रतिपादनाच्या ओघातच शास्त्रीय शब्द देखील तोंडावाटे अगर लेखणीवाटे बाहेर पडतात व कालकरून रूढ होतात.

जगद्विख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांनी आपल्या भाषणात याच मुद्यावर भर दिला होता. काही काळ आपल्या शब्दांच्या जोडीला कंसात इंग्रजी शब्द द्यावे लागतील हे बजावण्यातही त्यांनी प्रशंसनीय व्यवहारवादच स्वीकारला होता.

उद्याच्या हिंदीचे स्वरूप ठरविताना काय, की कॉलेजांतील विद्यादानाची भाषा ठरविताना काय, अशाच वास्तववादाचा आश्रय करणे जरूर आहे. आचार्य कालेलकरांसारखे आसेतुहिमाचल फिरलेले व जन्मतः रसिक असलेले सांस्कृतिक नेतेही जेव्हा भारतातील चौदा प्रमुख भाषांचे चौदा कोश घेऊन बसण्याची भाषा बोलतात व नवीच राष्ट्रीय हिंदी 'मॅन्युफॅक्चर' करण्याची उमेद धरतात, तेव्हा मला मोठा विस्मय वाटतो! 'खडी बोली'च्या रूपाने एक मधुर, सुगम आणि अत्यंत उपयुक्त अशी भाषा आधीच आंतरप्रांतीय व्यवहारात चालू आहे. शास्त्रीय शब्दांकरिता आपण अर्थातच संस्कृतकडे धाव घ्यावी. पण आधीच या भाषेत रूढ असलेले फारशी शब्द खणून काढण्याचा महंमद तुघलकी उद्योग मात्र करू नये. पारिभाषिक शब्दांखेरीजकरून इतरत्र संस्कृतचा 'रघुवीरी' माराही करू नये. यालाच मी हिंदी संबंधीचा वास्तववाद असे म्हणतो. मुन्शी प्रेमचंद व महात्मा गांधी यांचे हिंदी, स्थूलमानाने याच नमुन्याचे होते.

अनुक्रमणिका

लिपीचा विकल्प ठेवण्यात देखील गांधीजींनी आपल्या विशिष्ट पद्धतीने औदार्य आणि व्यावहारिकपणा याचा सुंदर मिलाफ साधला होता. परंतु हिंदू व मुसलमान या दोन्ही गोटांतील अतिरेकी मंडळींनी दरम्यानच्या काळात आपापले एकांडे आग्रहच पुढे रेटले आहेत. वृत्तपत्रांतील व ग्रंथांतील आजचे हिंदी इतके संस्कृतप्रचुर, बोजड व अनैसर्गिक होत चालले आहे की प्रत्यक्ष संस्कृतातही त्याहून सोपे बोलता येईल.

परवाच्या परिषदेतही याचा अनुभव आला. एका तरुण महाराष्ट्रीय वक्त्यांनी संस्कृतात केलेले 'वक्तव्य' (?) सर्व सामान्य हिंदी वृत्तपत्रांतील गद्याहून नि:संशय कमी संस्कृतप्रचुर होते. "सरकार निर्यात व्यापार विकास के लिए सचेष्ट", "मादक वस्तुओंका अवैध व्यापार" "तिलक अखिल भारतीय प्राक्कलन मे", "भारतीय वाणिज्य मंडळ" ... हे शब्दप्रयोग माझ्यासमोर असलेल्या एका लोकप्रिय हिंदी दैनिकातून सहज दिसले तसे घेतले आहेत! कदाचित दैनिक वृत्तपत्राचे वाचकही विद्वानच असले पाहिजेत असा पक्ष, शब्दांच्या टांकसाळी घालणारे आमचे काही बंधू मांडू शकतील. परवा डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांनी पुण्यातील एका हिंदी केंद्राला भेट दिली. त्यावेळी त्यांना भारतसरकारने अलीकडेच मंजूर केलेला एक मनीऑर्डर फॉर्म दाखविण्यात आला. सामान्यत: संस्कृतनिष्ठ हिंदीचाच डॉ. चटर्जी हेही पुरस्कार करतात. परंतु "प्रेष्यद्रव्य-स्वीकृति..." यासारख्या आणि याहूनही जाडजूड संस्कृत शब्दांनी भरलेला तो रोजच्या व्यवहारांतील फॉर्म पाहून, त्या (बंगाल कायदेमंडळाचा अध्यक्ष असलेल्या!) पंडिताने कपाळाला हात लावला व समोर बसलेल्या महामहोपाध्यायांना विचारले, "आखिर ये सब कौन कर रहा है?" प्रत्यक्ष बाणभट्टालाही फाजील 'वातुळ' वाटेल, अशी भाषा साध्या हुंडीच्या पत्रकात भरलेली आमच्या जनताप्रेमी सरकारने मंजूर केली असेल, हे मला तर खरेही वाटेना!

अर्थात नव्या हिंदीचे स्वरूप कोणते व ते कुणी ठरवायचे, हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे व तो आज रुक्ष प्रचारवेडे लोक, केवळ अंगात धावपळ करण्याचा उत्साह आहे एवढ्या पुण्याईवर, राष्ट्रघातक पद्धतीने सोडवीत आहेत! उद्याची हिंदी संस्कृतप्रचुर होणार की फारशीप्रचुर होणार; एका प्रांतात तयार होणार की चौदा प्रांतातील शब्द घेणार, या प्रश्नाचा जोराने काथ्याकूट होतो,पण माझ्या मते हे प्रश्न तितकेसे महत्त्वाचे नाहीत. ती हिंदी स्वाभाविक –सुगम होणार की अस्वाभाविक व बोजड होणार हा मुख्य प्रश्न आहे.

हिंदीच्या व इतर प्रादेशिक भाषांच्या स्वाभाविकतेसंबंधी मी जेव्हा परिषदेत चिंता व्यक्त केली, तेव्हा विख्यात हिंदी विद्वान व साहित्यिक डॉ. बाबुराव सक्सेना यांनी मला विचारले, "What do you mean by natural Language?" भाषाविषयक प्रश्न सोडविणारे पंडित भाषांच्या प्राणभूत तत्त्वापासून किती दूर गेले आहेत, हे या प्रश्नावरून लक्षात येईल. मला तरी तो प्रश्न ख्रिस्ताला फाशी देणाऱ्या रोमन गव्हर्नरच्या "What is truth?" या प्रश्नाइतकाच विस्मयकारक वाटला. अर्थात स्क्सेनांच्या प्रश्नात पॉंशियस पायलेटच्या प्रश्नातील अश्रद्ध तुच्छता मात्र मुळीच नव्हती, हे कबूल केले पाहिजे.

आजच्या नियोजनाच्या, निर्मितीच्या आणि पंचवार्षिक योजनेच्या युगात, जर मुख्य आपत्ती कोणती असेल, तर ती इंग्रजीचा मुक्काम वाढण्याची नाही; की हिंदीची कुरघोडी होण्याचीही नाही. आपत्ती आहे ती हिंदीसह सर्वच प्रांतिक भाषा कृत्रिम योजनांच्या झपाट्यात बोजड आणि अनैसर्गिक बनण्याची! परवाची परिषद होती भारतीय भाषांचा 'विकास' करण्याची; आणि मला चिंता होती त्या कृत्रिम विकासाच्या झपाट्यात त्यांचे हातपाय मोडण्याची किंवा पोट फुगण्याची! दुर्दैवाने माझी ही चिंता परिषदेतील विद्वानांना तितकीशी बाधा करू शकली नाही! आपला बहुजनसमाज आज लिहू वाचू लागला आहे. आपणा सुशिक्षितांना ज्ञानाचे अजीर्ण झाले असेल पण बहुजन समाज अद्याप बाल्यावस्थेत आहे. त्याची बाळभूक

अनुक्रमणिका

प्रखर आहे. आपण त्याच्या जिवंत भाषेत त्याला पचेलसे अन्न देणार की हे दुर्बोध दगडधोंडे त्याच्या भुकेल्या तोंडावर फेकणार, हा मुख्य प्रश्न आहे.

हिंदीचा काय की प्रादेशिक भाषांचा काय मुख्य प्रश्न हा आहे : “त्यांचा विकास पंडितांच्या समाधानाकरिता करायचा आहे, की सामान्य जनांच्या समाधानाकरता करायचा आहे?”

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेची नवीन प्रकाशने

१) शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम – वासुदेव बळवंत पटवर्धन

२) मराठी भाषा : वाढ आणि बिघाड – श्री. के. क्षीरसागर

३) 'वृद्धी:' भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन – दिनेश ड. माहुलकर

४) बेलभाषा – सुमन बेलवलकर

५) भाषा – आपली सर्वांचीच – अविनाश बिनीवाले

अनुक्रमणिका

“भाषेत किती हजार शब्द आहेत, या बाबारोबरच त्यांपैकी किती शब्द जास्तीत जास्त लोकांना समजतात, किती शब्द त्या भाषेच्या प्रकृतीशी जुळणारे आहेत, किती त्या भाषेच्या कुशीत जन्म घेणारांच्या प्रत्यक्ष सामाजिक आणि सांसारिक क्रियांशी व संकेतांशी संबंद्ध आहेत, याला महत्त्व दिले पाहिजे.” असे लिहिणाऱ्या कै. श्री. के. क्षीरसागर यांच्या भाषाविषयक लेखांचे हे संकलन आहे.

विविध भाषांतील दर्जेदार साहित्यावर प्रेम करणाऱ्या क्षीरसागरांचे हे लेखन वेळोवेळी अनेक नियतकालिकातून आणि वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेले होते; त्या त्या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर, कविवर्य माधवराव पटवर्धन आदी भाषाशुद्धीच्या पुरस्कर्त्यांशी त्यांनी घेतलेल्या वैचारिक झुंजीसाठी गाजलेलेही होते.

भाषाशुद्धी, परिभाषेची घडण, मराठीचे लेखन आणि उच्चारण आदी अद्याप चर्चेत असणाऱ्या प्रश्नांवर प्रा. क्षीरसागर यांनी तेव्हा जे विचार व्यक्त केले होते ते पुष्कळ अंशांनी स्वीकारले तरी गेले आहेत किंवा अजून स्वीकारावेत इतके उपयुक्त तरी आहेत. आपल्या भाषेच्या संदर्भात सवर्सामान्य शिक्षित माणसाच्या मनात आज जे जे प्रश्न घुटमळत आहेत त्यांचाच क्षीरसागरांनी ‘मराठी भाषा : वाढ आणि बिघाड’ या पुस्तकामध्ये परामर्श घेतलेला आहे.

त्यांचे हे ‘नवे’ पुस्तक, आजच्या लेखक-वाचकांच्या मराठी बाबतच्या संभ्रमित झालेल्या मानसिकतेला निश्चित दृष्टीकोनाची आणि आधाराची बैठक पुरविल्याखेरीज राहणार नाही.

-सरोजिनी वैद्य

अनुक्रमणिका